
वर्ष नववे, अंक पाचवा, जानेवारी २०१६ मासिक अंकाची किंमत रु. पाच
वार्षिक वर्गणी रुपये १००/- (विशेषांक रु २५/-)

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१५



लवण मेळविता जळे। काय उरले निराळे।
तैसा समरस जाहलो। तुजमाजी हरपलो।
अग्निकर्पुराचे मेळी। न उरे काजळी।
तुका म्हणे होती तुझी माझी एक ज्योती।


वीकएंड होम किंवा इनव्हेस्टमेंट !
साऊथ पुणे, नसरापूर येथे
।।संकल्प सिध्दी।।
मुंबई – बंगलोर हायवेजवळ, नसरापूर
1 BHK 17 Lac
587 Sq.Ft. (all inclusive)
1 RK 9.5 Lac
322 Sq. Ft. (all inclusive)
Collector NA
Town Planning Sanctioned
Within PMRDA Limit
योगेश माकणे ॲण्ड असोसिएटस्
८०, भास्कर निवास, गल्ली क्र. ३, कर्वेनगर, पुणे ४११०५२.
Contact : 99212 68616
Email : yogesh.makane@gmail.com

# 'स्व'–रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१५

**संपादक**
*श्री. जयंत कवठेकर*
**संपादकीय मंडळ**
*श्री. सुनील कुलकर्णी*
*सौ. मंजूषाताई कुलकर्णी*
*श्री. निलेश धायरकर*
*कु. अहिल्या धायगुडे*

**दूरध्वनी संपर्क**
*श्री. जयंत शंकर कवठेकर*
*संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२०४*
*(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०*
*भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६*
*किंमत रूपये ५/-*
*वार्षिक वर्गणी रूपये १००/-*
*(विशेषांकासह)*
*आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त*
*चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी*
*या नावाने काढावा.*

## अंतरंग

❖ हृद्गत
❖ आशय मुखपृष्ठाचा
❖ विशेष लेख
❖ विभागश: वार्षिक वृत्त
❖ आर्थिक स्थिती व आवाहन

❖ छपाई ❖
प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक 'स्व'–रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ** : श्री. रवी देव

# 'स्व'–रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

* पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर  * श्री. प्रमोद चौधरी  * पद्मश्री श्री. प्रतापराव पवार

### *संस्थापक सदस्य*

- *कै. पु. व. श्रॉफ*
- *कै. कृ. ल. पटवर्धन*
- *कै. कां. गि. शहा*
- *कै. दत्तोबा तांबे*
- *कै. अ. न. गोगावले*
- *श्री. श्री. शं. सामळ*
- *श्री. कृ. गो. लवळेकर*
- *श्री. रा. प. देसाई*

### *विद्यमान कार्यकारी समिती*

***अध्यक्ष***
*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

***उपाध्यक्ष***
*श्री. उदय गुजर*
*श्री. आर. ए. मेहता*
*श्री. श्रीकांत सामळ*

***कार्याध्यक्ष***
*श्री. कल्याण वर्दे*

***सहकार्याध्यक्ष***
*श्री. शिरीष पटवर्धन*
*श्री. रामभाऊ डिंबळे*

***कोषाध्यक्ष***
*श्री. कन्हैयालाल बलदोटा*

***सहकोषाध्यक्ष***
*श्री. विलास कुलकर्णी*

***कार्यवाह***
*श्री. ज्ञानेश पुरंदरे*

***सहकार्यवाह***
*श्रीमती पुष्पाताई नडे*
*श्री. विश्वास कुलकर्णी*
*श्री. अमोल उंदरे*

***सदस्य***

- श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी
- श्री. अरविंद केळकर
- श्री. विनोद बिबवे
- कु. लता टिळेकर
- कु. दीपाली पवार
- सौ. बागेश्री पोंक्षे
- प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर
- डॉ. प्रदीप आगाशे
- श्री. संजय तांबट
- डॉ. विनेश नगरे
- श्री. नंदकिशोर सोंडूर
- श्री. अविनाश जोशी
- श्री. अजय कदम
- श्री. सुनील कुलकर्णी
- सौ. मेघना अत्रे
- श्री. पराग लकडे
- ॲड. सौ. निलिमाताई गोखले
- श्री. चंदन हायगुंडे


**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नोंदणी क्र. :** MAH/588/Pune/80
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६०**
**PAN No. : AATS 5461K**



संपर्काचा पत्ता : – 'स्व'–रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११.
दूरध्वनी : – (कार्यालय) – २६१२१७०४, २६१३४३१०, मो. :९०११३८६३८६


देणगीसाठी आयकर सवलतीचा तपशील :

**100% Exemption available under Sec. 35-AC of the Income Tax Act 1961**
**(For the period of 2014-15 to 2016-17)**
**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**


भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)
ई–मेल : wardhinee@gmail.com  वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org


**धनादेश 'स्व'–रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

## 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच....

* सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था
* व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक संस्था
* आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
* विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा
* राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक 'राष्ट्रीय प्रकल्प'
* परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था
* अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे.

शोणित वर्णामधुनी शिकले सारे उज्ज्वल त्याग । व्यापित आलो दिव्य दृष्टीने अखंड भारतभाग ।।

## ॐ हृदगत ॐ

# तपश्चर्या तीन तपांची

चौतिसाव्या वार्षिक अहवालासाठी आज (दत्त जयंती) मनोगत लिहायला बसलो तेव्हा सहज आठवण झाली ती अशी की, स्वर्गीय किशाभाऊंनी १९७९ ला 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना केली त्याला ३ तपं पूर्ण झाली आहेत. उत्कर्षाची संधी मिळत नसलेल्या सामाजिक व आर्थिकदृष्ट्या उपेक्षित वर्गातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांवर महानगरपालिकेच्या शाळेतल्या व्हरांड्यात सातत्याने संस्कार करत शिकवण्याचं जे काम त्यांनी सुरू केलं त्याचा खरंच आता वटवृक्ष झाला आहे. शहरात १७ ठिकाणी चालणाऱ्या शाखांमधून गेल्या ३५ वर्षात जी अनेक मुले संस्कारित होऊन उत्तम नागरिक म्हणून देशात व परदेशातही आपापल्या व्यवसायात चांगलं नाव कमावून आहेत, त्यातले अनेकजण संपर्कात तर आहेतच पण त्यापैकी काही जण वर्धिनीच्या कार्यकारिणीचे सभासदही आहेत.

समाजाला संघटित करून भारत बलशाली राष्ट्र निर्माण करण्याचे फार मोठे काम खऱ्या अर्थाने ज्या विचारी लोकांनी केले त्यात किशाभाऊही होते. पण नुसता विचार करून न थांबता **''स्वच्छ हातांचे, समर्थ खांद्यांचे, तल्लख बुद्धीचे, विशाल मनाचे, सामाजिक बांधिलकी मानणारे तरुण सेवाभावी कार्यकर्ते मला घडवायचे आहेत''**, या उद्देशानेच 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना त्यांनी व त्यांच्या मित्रांनी केली. **'आर्थिक व सामाजिकदृष्ट्या उपेक्षित किंवा दुर्लक्षित समाजघटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' हे सूत्र समोर ठेवून, अफाट कष्ट करून शेवटच्या श्वासापर्यंत वर्धिनीचं काम करत कै. किशाभाऊंनी एक दैदिप्यमान आदर्श समाजापुढे ठेवला व आनंदाची गोष्ट म्हणजे त्यांच्या हाताखाली शिकून तयार झालेले तरुण आता या संस्थेच्या सातत्याने वाढत जाणाऱ्या कामात, मनापासून कष्ट करून ते आणखी वाढवत आहेत.**

आज १७ शाखा, बालवाडी, महिलांसाठी शिवणवर्ग इतर कौशल्य प्रशिक्षण वर्ग, बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग, साहाय्यक परिचारिका वर्ग, तरुणांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र, खेळ प्रावीण्यासाठी विशेष मार्गदर्शन, तरुणांसाठी विविध उपक्रम, उत्तम ग्रंथालय, अभ्यासिका अशा अनेक उपक्रमातून वर्धिनी हजारो मुलांना, युवकांना व युवतींना पुढे आणते आहे. केवळ आठवण करून द्यायची म्हणून एवढंच सांगतो हा सर्व कारभार चालतो तुमच्यासारख्या हितचिंतकांच्या मदतीवर. तुमच्या प्रतिसादाची या वाढत्या कामांना खरंच गरज आहे हे काही मी तुम्हाला सांगायला नको. आपल्या मित्रांनाही सांगा आणि या तपश्चर्येला हातभार लावा ही विनंती.

– आपला स्नेहांकित

**कल्याण वर्दे**
कार्याध्यक्ष

❖ ❖ ❖

**समाजरुपी विशाल सागर विभिन्नतेच्या लाटा वरवर । परी अंतरी एकच सुस्वर जागविले हे सत्य सनातन ।।**

## ॐ आशय मुखपृष्ठाचा ॐ

भक्तीमध्ये तल्लीन झालेले तुकोबाराय आणि तुकोबांशी एकरुप झालेली विठोबा माऊली मुखपृष्ठावर अवतरली आहे. या एकरुपतेबद्दल तुकोबा म्हणतात, 'लवण मेळविता जळे, काय उरले निराळे, तैसा समरस जाहलो, तुजमाजी हरपलो । अग्निकर्पुराचे मेळी, न उरे काजळी ।, तुका म्हणे होती, तुझी माझी एक ज्योती ।।' अशीच भावना संत चोखोबांनी व्यक्त केली आहे. ते म्हणतात, 'रुप तुझे कैसे पाहु । आम्ही त्यात लीन ।' तर ज्ञानोबा माऊलींनी आपली भावना व्यक्त करताना म्हटलं आहे, 'ये ज्ञानचिने प्रकाशे, मिटले भेदाभेदाचे कवडसे, मग मी ची जाहलो समरसे, आणि भक्तुहि ते विचि' भक्तीच्या आणि अध्यात्माच्या क्षेत्रात अशी एकरुपतेची शेकडो उदाहरणे आहेत.

भक्तीमार्गाप्रमाणेच समाजपुरुषाला देव मानून समाजातील वेगवेगळे प्रश्न सोडविण्यासाठी अनेकांनी आपले जीवन समर्पित केले. अशा व्यक्तींची त्या त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी असलेली समरसता या संतश्रेष्ठांइतकीच वंदनीय आहे. २०१५ हे वर्ष अशाच समाजसमर्पित श्रेष्ठ पुरुषांच्या स्मरणाचे आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे १२५ वे जयंती वर्ष आहे तर रा. स्व. संघाचे तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस, एकात्ममानवतेचा विचार समाजाला देणारे दीनदयाळजी उपाध्याय, कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद शिलास्मारकाच्या उभारणीद्वारे विवेकानंद केंद्राची पायाभरणी करणारे श्री. एकनाथजी रानडे आणि ज्ञानप्रबोधिनीच्या माध्यमातून एक अभिनव शैक्षणिक संघटन उभे करणारे डॉ. अप्पासाहेब पेंडसे यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात काम केलेल्या या व्यक्तिमत्त्वांनी समाजामध्ये समरसता रुजावी यासाठी प्रचंड काम केले आहे. अशा श्रेष्ठ पुरुषांच्या कामातूनच समाजात समरसतेचा भाव जागा राहतो आणि पुढच्या पिढ्यांना मार्गदर्शक ठरतो. भारतमातेच्या या पुत्रांना अभिवादन म्हणून समरसता आशयावरील मुखपृष्ठ आणि अंकामध्ये समरसता या विषयावरील तज्ज्ञांचे विशेष लेख छापले आहेत. आपल्याला ते आवडतील असा विश्वास वाटतो. संस्कारभारतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते, ग्राफी ॲडव्हर्टायझिंगचे श्री. रवी देव यांनी सिद्ध केलेल्या समर्पक मुखपृष्ठाबद्दल वर्धिनी कृतज्ञ आहे.

समरसता-एकात्मता हा आशय अभिव्यक्त करणाऱ्या गीतपंक्ती तळटीपांच्या रुपाने सादर केल्या आहेत. तसेच हे वार्षिक सिद्ध करण्याकरिता ज्या सर्वांचे हातभार लागले आहेत त्या सर्वांबद्दल वर्धिनी कृतज्ञ आहे.

❖ ❖ ❖

**समाजसेवा ब्रीद आमुचे स्वार्थ सुखाची आस नसे । थोर कारणी देह वहावा एक मात्र हा ध्यास असे ।।**

विशेष लेख

# सामाजिक समरसतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली इतिहासमीमांसा

**श्री. शेषराव बापुराव मोरे –** १९९४ मध्ये शासकीय तंत्रनिकेतनातून अधिव्याख्याता पदावरून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर पूर्ण वेळ सामाजिक विषयांच्या अभ्यास लेखनात श्री. शेषराव मोरे यांनी स्वतःला झोकून दिले. स्वा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, काश्मीर, इस्लाम अशा अनेक विषयांसंबंधी त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. या ग्रंथसंपदेतील अनेक ग्रंथांना पुरस्कारही मिळाले आहेत. गतवर्षीच्या २०१५ च्या चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

---

समरसतेच्या संबंधातील एक मोठा अडथळा आजची जातिव्यवस्था व विषमता कोणी निर्माण केली यासंबंधातील इतिहासमीमांसेचा आहे. यासंबंधात इतिहासाचा उपयोग वर्तमानातील दुजाभाव वाढविण्यासाठी केला जात आहे. तेव्हा समरसतेच्या दृष्टीने या इतिहासाची मांडणी कशी करावी असा प्रश्न मी उपस्थित केला होता. या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी घेतलेली भूमिका मार्गदर्शक ठरणार आहे. समाज परिवर्तनासाठी अनुकूल ठरेल अशा प्रकारे इतिहासाची मांडणी करण्याची त्यांची भूमिका होती. एक संस्कृती, चातुर्वर्ण्य, जातिव्यवस्था, अस्पृश्यतेचा जन्म इत्यादीसंबंधात त्यांनी इतिहाससमीक्षा केली आहे. त्यांपैकी काही विषयांसंबंधात त्यांची भूमिका थोडक्यात समजून घेऊ. (याची सविस्तर (म्हणजे २६४ पृष्ठे) चर्चा 'डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास' या ग्रंथात केली आहे.)

१) १९१६ साली डॉ. आंबेडकरांनी 'कास्टस् इन इंडिया...' हा ग्रंथ लिहिला. वयाच्या २५ व्या वर्षी व समाजसुधारणा कार्याचा अनुभव नसणाऱ्या काळात अमेरिकेत असताना त्यांनी हा ग्रंथ लिहिला आहे. जातीसंस्था कशी निर्माण झाली यासंबंधात त्यात मांडलेले निष्कर्ष असे आहेत :

१) प्राचीन काळात बाहेरून विविध वंशांच्या टोळ्या भारतात आल्या. त्यांचा येथील टोळ्यांशी संबंध येऊन व परस्परांवर परिणाम होऊन येथे एका समान (common) व एकजीव संस्कृती (unity of culture) निर्माण झाली.

२) या एकजीव (homogeneous) समाजाचे नंतर तुकडे होऊन त्यापासून जाती निर्माण झाल्या.

३) पूर्वी समाजात ब्राह्मण ते शूद्र असे चार वर्ण होते. ते जन्मजात नव्हते, तर गुणकर्मावर आधारलेले होते. ते व्यावसायिक वर्ग (classes) होते. व्यक्तीच्या गुणांप्रमाणे वर्णांतर व आंतरवर्णीय विवाह होऊ शकत असे.

४) नंतरच्या काळात ब्राह्मणांनी आपल्याच वर्णातील व्यक्तीशी विवाह करण्याची (enogamy) पद्धत रुढ केली व त्यामुळे ब्राह्मण वर्णाचे वा वर्गाचे जन्मजातीत रुपांतर झाले.

५) ब्राह्मणेतर वर्णांनींही ब्राह्मणांचे अनुकरण केले व त्यांच्याही वर्णांचे जन्मजातींत रूपांतर झाले. नंतर एका जातीच्या अनेक जाती निर्माण झाल्या व आजची जातिव्यवस्था निर्माण झाली.

६) ब्राह्मणांनी स्वतःची जात निर्माण केली असली तरी हिंदू समाजातील अन्य जाती निर्माण करण्यास ते जबाबदार नाहीत.

७) जातिसंस्था ही मनूनेही निर्माण केलेली नाही. ती त्याच्या आधीपासूनच अस्तित्वात होती. ''मनूने जातीचे कायदे-नियम निर्माण केलेले नाहीत. त्याला ते शक्यही नव्हते. मनूच्या खूप पूर्वीपासून जाती अस्तित्वात होत्या. त्याने ती नंतर उचलून धरली. त्याने अस्तित्वात असलेल्या जातिनियमांचे संहितीकरण केले व त्याचा प्रचार केला.'' जातिसंस्था ही अन्य कोणत्या धर्मशास्त्रानेही निर्माण केलेली नाही. मुळात येथील संस्कृती एकजीव होती; चातुर्वर्ण्य हे गुणसिद्ध होते; धर्मशास्त्राने जातिसंस्था निर्माण केली नाही, हे निष्कर्ष समरसतेच्या दृष्टिकोनातून विचार करण्यासारखे आहेत.

२) त्यानंतर सामान्यतः १९३० पर्यंत त्यांची हीच भूमिका असल्याचे दिसून येईल. १९२७ ते २९ या 'बहिष्कृत भारत' काळात पूर्वी एकच वर्ण होता व नंतर चार वर्ण व चार हजार जाती निर्माण झाल्या, अशी त्यांची इतिहासमीमांसा होती. या जाती मोडून समाज एकवर्णी केला पाहिजे असा विचार त्यांनी या काळात मांडला आहे.

३) या वरील काळात त्यांना खात्री वाटत होती की, हिंदू समाजात सुधारणा करता येईल व जातिभेद नष्ट करून समाज समताप्रधान करता येईल. यासाठी ते सुधारक विचारांच्या सवर्णांचे सहकार्य घेऊन सुधारणा चळवळी करण्यास तयार होते. १९२४ साली त्यांनी स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारिणी सभे'चे अध्यक्ष व अन्य काही सदस्य उच्चवर्णीय होते. ''सहानुभूती बाळगणाऱ्या (सवर्ण) लोकांचे साहाय्य असल्याखेरीज अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीच्या अवाढव्य कार्यक्रमाची सिद्धी होणे शक्य नाही... म्हणून सिद्ध आणि साधक यांचा मिलाफ होऊन या राष्ट्रकार्यास मदत होवो याच हेतूने ती संस्था स्थापन केली होती.'' ''जो आमचा माणूस आहे असे आम्हाला खात्रीपूर्वक वाटते तो जातीने ब्राह्मण असो की अब्राह्मण असो, त्याच्याशी आम्ही सहकार्य करण्यास सदैव तयार असतो,'' अशी त्यांची या काळातील भूमिका होती.

या काळातील त्यांची हिंदू धर्माविषयी भूमिका अशी होती की, हा धर्म उच्च तत्त्वांचा, समानप्रधान व चांगला आहे व हिंदू समाज धर्मानुसार वागत नसल्यामुळे विषमता मानणारा व वाईट आहे. हिंदू समाजात सुधारणा होईल असे त्यांना वाटत होते व म्हणून सुधारणेसाठी ते आंदोलन करीत होते.

४) १९३२ नंतरच्या काळात त्यांच्या मतात परिवर्तन झाले व हिंदू समाज बदलणार नाही अशी त्यांची धारणा झाली. हिंदू धर्माकडे पाहण्याची त्यांची दृष्टीही बदलली. धर्मांतराचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. १९३६ च्या 'जातिसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथात त्यांची ही बदललेली भूमिका स्पष्टपणे आली आहे. हिंदू समाज चांगला आहे; पण त्यांना जातिभेद व विषमता शिकविणारी धर्मशास्त्रेच वाईट आहेत अशी त्यांची या ग्रंथातील भूमिका आहे. तरीही या ग्रंथात त्यांनी म्हटले आहे की, येथे एकजीव संस्कृती निर्माण झाल्यावर बऱ्याच कालावधीनंतर जातिव्यवस्था जन्मास आली. ''आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीला अनुरूप असलेले कर्म प्रत्येकाने करावे हा वैदिक वर्णव्यवस्थेचा मूळ गाभा असल्याचे'' मतही त्यांनी मांडले आहे. म्हणजे १९१६ ची यासंबंधीची भूमिका १९३६

लाही कायम होती. या वेळेपर्यंत त्यांनी धर्मांतराची घोषणा केलेली नव्हती.

५) धर्मांतराची घोषणा केल्यानंतर ११ वर्षांनी त्यांनी लिहिलेला ग्रंथ म्हणजे 'शूद्र कोण होते ? ते इंडो-आर्य समाजातील चौथा वर्ण कसे बनले ?' हा होय. या ग्रंथात मांडलेले प्रमुख निष्कर्ष असे आहेत :

१) पुरुष सूक्तातील चातुर्वर्ण्याचा उल्लेख असलेले सूक्त मुळात ऋग्वेदात नव्हते. ते नंतरच्या काळात त्यात घुसडून देण्यात आले. त्या सूक्तातील चातुर्वर्ण्याचा सिद्धांत वेदांच्या पूर्ण विरोधी आहे. ब्राह्मणांनी स्वतःच्या श्रेष्ठत्वासाठी केलेले ही लबाडी आहे. या कृत्यासाठी आरोपात्मक पुढील शब्द त्यांनी वापरले आहेत. 'deception', 'fraud', 'criminal', 'anti-social', 'selfish', 'malice', 'fabrication', 'political jugglery' इत्यादी. (त्यांनी १९३६ च्या लेखातील 'ऐक्यासाठी पुरुषसूक्त' ही भूमिका येथे पूर्णपणे बदलली आहे.)

२) मुळात भारतीय संस्कृती एकजीव होती. ऋग्वेदात या समाजाचा उल्लेख 'इंडो-आर्य राष्ट्र' (Indo-Aryan nation) असा आला आहे. प्रमुख पाच टोळ्या एकजीव (assimiated) होऊन ते राष्ट्र बनलेले होते. त्या सर्व टोळ्यांत समानता होती. कोणतीही टोळी शूद्र नव्हती. ऋग्वेदात एकात्म राष्ट्रवाद मांडला होता. मात्र नंतर पुरुष सूक्ताने विघटक जातीयवाद (communalism) आणला. आर्य मूळचे भारतातीलच होत. आर्य ही वंशवाचक नसून संस्कृतिवाचक संज्ञा आहे. आर्य भारताबाहेरील आहेत हा लोकमान्य टिळकांचा सिद्धांत निराधार व अधांतरी आहे. आर्यांनी भारतावर आक्रमण करून दास व दस्यू यांना जिंकले हे साफ खोटे आहे.

३) मुळात दास व दस्यू हे भारतीय नसून इराणी व परकीय आहेत. आर्य बाहेरून आले हा वंशश्रेष्ठत्वाचा सिद्धांत असून स्वतःला आर्यवंशाचे समजून ब्राह्मणांनी त्यास मान्यता दिली आहे. हा आर्य-आक्रमणाचा सिद्धांत नुसताच खोटा नसून तो द्विराष्ट्रवादी आहे व विषारी साप समजून ठेचून टाकला पाहिजे (like the snake it must be killed).

४) आर्य समाजात मुळात ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीनच वर्ण होते. परंतु नंतरच्या काळात ब्राह्मण व क्षत्रिय राजे यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्यामुळे ब्राह्मणांनी क्षत्रिय राजांचा उपनयन संस्कार बंद केला. क्षत्रियत्वाचा हा संस्कार बंद झाल्याने संस्कारलोप होऊन ते क्षत्रिय राजे पदावनत होऊन त्यांचा चौथा शूद्रवर्ग निर्माण झाला. शूद्र होण्यापूर्वी ते लोक राजे होते; शस्त्रसंपन्न होते, धनवान होते, विद्वान होते. त्यांच्यातील काहींनी ऋग्वेदातील सूक्तेही रचली आहेत. ऋग्वेदकालीन भरत नावाच्या टोळीवरून या देशाला भारत हे नाव पडले.

५) हा ग्रंथ इंडो-आर्यन समाजात चौथा शूद्र वर्ण (original Shudras) कसा तयार झाला याविषयी आहे. आजच्या हिंदू समाजातील शूद्र (present-day Shudras) कसे तयार झाले ? आजचे शूद्र आर्य नसून अनार्यांपैकी आहेत. मूळचे आर्य क्षत्रिय राजांपासून निर्माण झालेले शूद्र वांशिक दृष्टीने त्यांच्यापेक्षा पूर्णपणे वेगळे आहेत.

६) आर्यांनी मनुस्मृतीसारखी धर्मशास्त्रे निर्माण केली व त्यात शूद्रांना शिक्षा करण्यासाठी नियम केले. ते

शिक्षा-नियम इंडो-आर्यन समाजातील शूद्रांसाठी होते; आजच्या हिंदू समाजातील शूद्रांसाठी नव्हते. धर्मशास्त्रातील ते कायदे व नियम आजच्या शूद्रांसाठी लागूच होत नाहीत. मूळ गुन्हेगारांसाठी तयार करण्यात आलेले धर्मशास्त्रातील शूद्रांसाठीचे नियम आजच्या त्यांच्याशी संबंध नसणाऱ्या निर्दोष शूद्रांना लागू करताच कामा नयेत हे दाखवून देण्यासाठी हा ग्रंथ लिहिण्यात आला आहे. अशी ही त्यांची मीमांसा आहे.

थोडक्यात, मनुस्मृतीसारख्या धर्मशास्त्रातील नियम संख्येने ७०-८० टक्के असलेल्या आजच्या शूद्रांना लागूच होत नाहीत हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी हा ग्रंथ लिहिला आहे.

(६) यानंतर दोन वर्षांनी १९४८ मध्ये त्यांचा 'अस्पृश्य मूळचे कोण ? आणि ते अस्पृश्य कसे बनले ?' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. हा ग्रंथ वरील ग्रंथाचा उत्तरार्ध होय असे त्यांनी या ग्रंथाच्या प्रास्ताविकेत म्हटले आहे. यातील प्रमुख निष्कर्ष असे -

१) आजचे अस्पृश्य हे पूर्वी बौद्धधर्मीय होते. ते पूर्वी गावाकुसाबाहेर राहत होते.

२) अस्पृश्यतेचा उगम इ. स. ४०० नंतर झालेला आहे. तत्पूर्वी भारतात अस्पृश्यता नव्हती. त्यापूर्वीच्या कोणत्याही धर्मग्रंथात वा मनुस्मृतीत अस्पृश्यतेचा उल्लेख आलेला नाही. मनुस्मृतीत धार्मिक विधींच्या वेळी पाळायची 'अपवित्रता' आलेली आहे, अस्पृश्यता नाही. मनुस्मृतीत अस्पृश्यता सांगितली आहे काय हा त्यांनी 'गाभ्याचा मुद्दा' (heart of the question) केला आहे.

३) इसवी सनाच्या पाचव्या शतकात ब्राह्मणी गुप्त राजांनी गोहत्याबंदीचा कायदा केला. परंतु गावकुसाबाहेर राहणाऱ्या बौद्ध धर्मीयांनी उपजीविकेसाठी आवश्यक म्हणून मृत गायींचे मांस खाणे सुरू केले. त्यामुळे त्यांना अस्पृश्य मानण्यात आले. अस्पृश्यतेचे कारण मृत गायीचे मांसभक्षण हे होय.

४) इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात निर्माण झालेल्या मनुस्मृतीत वर्ण पदोन्नतीचा नियम (rule of upgradation) आलेला आहे. यासंबंधातील मनुस्मृतीतील श्लोकांचा संदर्भ देऊन डॉ. आंबेडकर लिहितात, ''मनू म्हणतो की, जर शूद्र व्यक्ती (म्हणजे त्यांचे वंशजही) ब्राह्मणांशी सतत सात पिढ्या विवाह करीत गेली तर ती व्यक्ती ब्राह्मण बनू शकते. चातुवर्ण्याच्या सामान्य नियमानुसार शूद्र हा कधीही ब्राह्मण बनू शकत नसे. परंतु हा (वर्ण-पदोन्नतीचा) प्राचीन नियम एवढा प्रबल होता की, मनूला तो स्वीकारणे भाग पडले.

बौद्ध धर्म स्वीकारण्याचे ठरल्यानंतर व अस्पृश्यांना बौद्ध धर्म आपला वाटावा यासाठी लिहिलेला हा ग्रंथ आहे. येथे त्यांनी मनुस्मृतीला व तोपर्यंतच्या सर्व हिंदू धर्मग्रंथांना अस्पृश्यतेच्या जबाबदारीतून दोषमुक्त केले आहे. 'शूद्र कोण होते ?' या ग्रंथात त्यांनी शूद्रांवर अन्याय करण्याच्या आरोपातून मनुस्मृतीला, तो शूद्रांना लागूच नाही म्हणून, दोषमुक्त केले होते तर 'अस्पृश्य कोण होते ?' या ग्रंथात त्यांनी अस्पृश्यतेची शिकवण देणाऱ्या आरोपातून मनुस्मृतीला, तीत तशी शिकवण नाहीच म्हणून, दोषमुक्त केले होते. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, त्यांचे हे निष्कर्ष चूक का बरोबर हा आपल्यासमोरचा प्रश्न नसून त्यांनी वर्तमानातील परिस्थितीनुसार कोणती इतिहासमीमांसा केली आहे एवढेच समजून घेणे हा आहे.

**ममतेने जो हात फिरावा पददलितांच्या पाठीवरती । पशुता दिसता तोच हात क्षणि दृढ वज्राची व्हावी मुष्टी ।।**

(७) धर्मांतर करायचे पक्के झाल्यावर १९५१ नंतरच्या काळात त्यांनी लिहायला घेतलेला पण अपूर्ण राहिलेला 'प्राचीन भारतातील क्रांती व प्रतिक्रांती' हा ग्रंथ होय. या ग्रंथात त्यांनी जातिव्यवस्था कशी निर्माण झाली यासंबंधी आश्चर्यकारक वाटावी अशी पुढील माहिती देऊन निष्कर्ष काढले आहेत :

मुळात वर्ण हे गुणसिद्ध होते आणि ते गुण तपासण्याची पद्धत प्राचीन काळात रुढ होती. आरंभीच्या काळात व्यक्तीचे वर्ण निश्चित करण्यासाठी एक निवड मंडळ होते. त्यास 'मनू व सप्तर्षी' असे नामामिधान होते. 'निःपक्षपाती व स्वतंत्र' असे त्याचे त्यांनी वर्णन केले आहे. मुलाखतीसाठी आलेल्या व्यक्तीचा वर्ण ते निवड मंडळ निश्चित करीत असे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य वा शूद्र या नावाने वर्ण दिले जात. त्यानुसार त्या व्यक्तीचे व्यवसाय निश्चित होत. परंतु हा दिलेला वर्ण फक्त चार वर्षांपुरता असे. त्यानंतर पुन्हा त्या व्यक्तीला नवा वर्ण ठरवून घेण्यासाठी निवड मंडळाकडे जावे लागे. नव्या निवडीनुसार त्या व्यक्तीचा वर्ण बदलू शके.

ब्राह्मणाचा शूद्र वा शूद्राचा ब्राह्मण होई. या वर्णबदलाला 'मन्वंतर' असे म्हटले जाई.

काही काळानंतर यात सुधारणा करण्यात आली. वर्णनिश्चितीसाठी 'गुरुकुल' पद्धत अमलात आली. या पद्धतीत विद्यार्थी आधी आचार्याकडे गुरुकुलात जात असे. तेथे आचार्य त्याला त्याची क्षमता, गुणवत्ता, आवड लक्षात घेऊन शिक्षण देत असे. तेथे त्यांचा गुणविकास करण्याचे, त्याला प्रशिक्षण देण्याचेही काम होत असे. काही वर्षांचे हे शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरु त्या विद्यार्थ्यांचा वर्ण निश्चित करीत असे. त्याला तो वर्ण प्रदान करण्याचा एक कार्यक्रम घेतला जाई. त्याला 'उपनयन' समारंभ असे म्हटले जाई. डॉ. आंबेडकरांनी त्या समारंभास 'पदवीदान समारंभ' (convocation ceremony) असे म्हटले आहे. हा दिलेला वर्ण मात्र त्या व्यक्तीच्या जन्मापुरता असे. अर्थात त्याच्या मुलांना तो वर्ण केवळ जन्मामुळे मिळत नसे. यासाठी त्या मुलांनाही 'गुरुकुला'त जावे लागत असे.

या पद्धतीमुळे ब्राह्मणांच्या मुलांना शूद्र वर्णसुद्धा मिळू लागला. हे त्यांना सहन होईनासे झाले. त्यामुळे त्यांनी एक नवी पद्धत सुरू केली. वर्णप्रदान करणारा जो उपनयन विधी शिक्षणानंतर आचार्याच्या गुरुकुलात होत असे तो आता ब्राह्मण वडिलाच्याच घरी होऊ लागला. बाप आपल्या मुलाचे उपनयन करून व आपलाच वर्ण मुलाला देऊनच त्याला शिक्षणासाठी गुरुकुलात पाठवू लागला. अशा प्रकारे उपनयन विधी घरीच होऊ लागला व वर्ण हा जन्मजातीत रूपांतरित झाला. नंतर मनुस्मृतीने नियम करून या जातिव्यवस्थेस मान्यता दिली. हे सारे ब्राह्मणांनी 'कनिष्ठ व अयोग्य' (mean and worthless) असणाऱ्यांनाही स्वतःचा श्रेष्ठ दर्जा प्रदान करण्यासाठी केलेले होते.

(८) हिंदू समाज सुधारणा स्वीकारणारा आहे व त्यात निश्चितपणे परिवर्तन होईल असे डॉ. आंबेडकरांना मनातून वाटत होते. तो बदलणार नाही असे संतापून काही वेळा त्यांनी म्हटले असले तरी त्या म्हणण्याचा हेतूही समाजाला बदलास प्रवृत्त करावे हाच होता. १९५१ साली 'हिंदू कोडबिला'चे समर्थन करताना लोकसभेत ते म्हणाले होते की, ''आर्य समाज हा विकसनशील समाज होता म्हणूनच तो (हजारो वर्षांपासून) टिकू शकला. वेळोवेळी ज्या सुधारक कल्पना दुसऱ्यांकडून येतील त्या घेऊन आपल्या समाजात ते पचवू शकले.'' हिंदू कोडबिल धर्माविरुद्ध आहे या विरोधकाच्या आक्षेपाला उत्तर देताना नंतर त्यांनी स्पष्ट केली की, या बिलात नवीन असे काहीच नाही. त्यात ज्या तरतुदी आलेल्या आहेत त्या सर्व संस्कृत धर्मग्रंथांत आधीच उपलब्ध आहेत.

**व्यक्ति व्यक्ति भिन्नता, ती मतस्वतंत्रता । घडवु त्यातुनी समर्थ स्नेहशील एकता ।
एकसूत्र सर्व लोक करुनिया खडे ।। करु समर्थ हा समाज होउनी पुढे ।।**

१९५४ ते ५६ या शेवटच्या कालखंडात त्यांनी ‘हिंदू धर्मातील कोडी’ हा ग्रंथ लिहिला. हिंदू समाज व हिंदू संस्कृती अपरिवर्तनीय व स्थितिवादी आहे हा समज खोटा असल्याचे दाखवून देण्यासाठी हा ग्रंथ लिहिला असल्याचे त्यांनी ग्रंथ प्रस्तावनेत म्हटले आहे. एवढेच नाही तर त्यांनी असेही म्हटले आहे की, ‘‘या ग्रंथात मी हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे की, हिंदू समाज वेळोवेळी बदलत गेला आहे व अनेक वेळेला हा बदल अतिशय मूलभूत (radicat) स्वरूपाचा होता. हिंदू धर्म हा सनातन म्हणजेच अपरिवर्तनीय नाही हेच लोकांना मला सांगायचे आहे.’’

या ग्रंथातील कलियुगासंबंधीच्या ‘कोड्या’च्या प्रमाणात त्यांनी अशा क्रांतिकारक सुधारणांची माहिती दिली आहे. सत्य, त्रेता, द्वापर व कली असे चार युगे मानली जातात. सत्ययुगातील समाज कसा असंस्कृत, अनैतिक व रानटी होता याचेही अतिशय प्रत्ययकारी वर्णन त्यात आले आहे. त्यातील स्त्री–पुरुष संबंधाचे वर्णन वि. का. राजवाडे यांच्या ‘भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास’ या पुस्तकातील वर्णनाशी जुळणारे आहे. त्यानंतर आपल्या पूर्वजांनी त्यात सुधारणा केली. त्रेतायुगातील समाज सत्ययुगापेक्षा सुधारलेला होता. त्यानंतर वाढत्या क्रमाने समाजात सुधारणा करण्यात आली. कलियुगाच्या सुरुवातीला समाजात आमूलाग्र सुधारणा झाली होती. या सुधारणेसाठी डॉ. आंबेडकरांनी योजलेली काही विशेषणे अशी आहेत – 'bold reforms', 'reform of the greatest significance', 'a bold and courageous stroke', 'drastic', 'a tremendous improvement almost amounting to a social revolution.' यासाठी ‘कडक कायदे’ (stringent laws) करण्यात आले होते. या क्रांतिकारक सुधारणा केल्या गेलेल्या कलियुगाचा काळ इ. स. पूर्व ११६५ पासून सुरू होतो असेही त्यांनी दाखवून दिले आहे.

बाबासाहेबांनी वर मांडलेले ऐतिहासिक निष्कर्ष एक वास्तव व सत्य इतिहास म्हणून मी येथे मांडलेले नसून सामाजिक इतिहासाकडे पाहण्याची त्यांची भूमिका समजून घेण्यासाठी मांडले आहेत. समाज हा परिवर्तनासाठी तयार आहे की नाही यानुसार त्यांनी या आपल्या निष्कर्षात काही वेळा परिवर्तनही केले आहे. सुधारणा करताना इतिहासमीमांसा कशी करावी यासाठी मार्गदर्शक म्हणून बाबासाहेबांसारखा दुसरा गुरू सापडणार नाही. **त्यांनी केलेली इतिहासमीमांसा केवळ सत्यशोधनाची निर्हेतुक ज्ञानसाधना नव्हती तर विशिष्ट ध्येयाने व परिवर्तनाच्या हेतूने केलेले प्रबोधन कार्य होते. त्यांचे इतिहासलेखन व धर्मचिकित्सा सामाजिक क्रांतीच्या ध्येयाने प्रेरित झालेले होते.**

**त्यांच्या या विचारांवरून आपल्याला धडा घेता येतो तो हा की, चातुर्वर्ण्य, जातिव्यवस्था, अस्पृश्यता इत्यादींची इतिहासमीमांसा करताना ती सुधारणेसाठी कशी अनुकूल ठरेल हा दृष्टिकोन ठेवावा लागतो. ती समाज परिवर्तनासाठी पूरक व पोषक असली पाहिजे. हिंदू समाज बदलण्यास तयार असेल, समाजसुधारणेस प्रतिसाद देत असेल तर ती प्रक्रिया पुढे कशी जाईल या दृष्टीने (अर्थात सबळ पुरावा नसेल तेथे) ती मीमांसा केली पाहिजे.**

**– श्री. शेषराव मोरे**

❖ ❖ ❖

**भेद बेगडी निपटू आता । शुद्ध मनाने करू एकता । हीच यशाची वाट । माघार न जन्मात, सारखे होउ देत आघात ।।**

## सामाजिक समता व हिंदू संघटन

विशेष लेख

दि. ८ मे १९७४ या दिवशी पुण्याच्या सुप्रसिद्ध वसंत व्याख्यानमालेत 'सामाजिक समता व हिंदू संघटन' या विषयावर **प. पू. बाळासाहेब देवरस यांचे भाषण** झाले. भाषण देण्यापूर्वी बाळासाहेबांनी तपशिलात जाऊन विषयाचा अभ्यास केला. स्वतः संस्कृत आणि दर्शनशास्त्राचे विद्यार्थी असूनही बाळासाहेबांनी नागपूरच्या कृष्णशास्त्री बापटांकडून 'पुरुषसूक्त' समजावून घेतले. भाषणाचे प्रारूप काही कार्यकर्त्यांना वाचून दाखविले. भाषण देण्यापूर्वी त्याची टंकलिखित प्रत पुण्याला महाराष्ट्र प्रांत संघचालक बाबाराव भिडे यांना दाखविली. संघाच्याच नव्हे तर देशाच्या समाजप्रबोधनाच्या इतिहासात या भाषणाला असाधारण महत्त्व आहे.

---

सामाजिक समता व हिंदू संघटन या विषयाची मांडणी करताना सुरुवातच 'हिंदू कोण' येथून होते. हिंदू शब्दाच्या अनेक व्याख्या आहेत. पण त्या परिपूर्ण नाहीत. त्यांपैकी काही व्याख्या मान्यही आहेत. परंतु जेव्हा त्या व्याख्यांसंबंधी चर्चा होते, तेव्हा अनेक फाटे फुटतात आणि मोठे वादंग माजते असा अनुभव आहे. कोणतीही व्याख्या कितीही काळजीपूर्वक केली, तरी अव्याप्ती किंवा अतिव्याप्ती टळू शकत नाही; त्यामुळे आम्हाला अनेकदा असा अनुभव येतो की, 'हिंदू'च्या व्याख्येवरच वादंग माजवायचे असा अनेकांचा प्रयत्न असतो. मी स्वतः हिंदू या शब्दाची व्याख्या करायला तयार नाही. कारण व्याख्या करणे फार कठीण आहे. त्यात वरीलपैकी कोणता तरी दोष येण्याची शक्यता आहे. पण हिंदू शब्दाची व्याख्या होत नाही याचा अर्थ 'हिंदू समाज'च नाही असा विचार करणे चुकीचे आहे. व्याख्या होत नसली तरी 'हिंदू समाज' आहे हे निश्चित आहे. हा आपल्या सगळ्यांचा अनुभव आहे. इंग्रजांच्या राज्यात मोठे गमतीदार वर्गीकरण करण्यात आले होते. काही मतदार संघ 'मुसलमान' (Muslim) आणि उरलेले 'बिगर-मुसलमान'(Non-Muslim) अशी ती रचना होती. आपण सारे त्यात 'बिगर-मुसलमान' अशा शब्दाखाली आलो. तथापि, आपण आपल्या समाजाचा अशा पद्धतीने विचार करणार नाही. आपण सारे हिंदू आहोत; मग त्याची व्याख्या करणे शक्य होवो वा न होवो!

**हिंदू कोण ?**

आपण सारे हिंदू आहोत हे निरनिराळ्या प्रकारे प्रकट होते. निरनिराळ्या ठिकाणी, निरनिराळ्या वेळी याचा अनुभवसुद्धा येतो. 'हिंदू समाज' या नावाखाली कोण येतात यासंबंधीही सर्व बंधूंची एक निश्चित व समान धारणा आहे. काही वर्षांपूर्वी आपल्या देशात एक कोड बनविण्यात आले – हिंदू कोड. संसदेने ते संमत केले. ते संमत व्हावे यासाठी ज्यांनी पुढाकार घेतला, त्यामध्ये पं. नेहरू होते, डॉ. आंबेडकर होते. कोड बनविल्यानंतर येथील ज्या बहुसंख्य जमातीला ते लागू करायचे तिला नाव कोणते द्यायचे असा जेव्हा त्यांच्यापुढे प्रश्न आला, तेव्हा त्यांना दुसरे कुठले नाव सुचले नाही. त्यांना या कोडास 'हिंदू कोड'च म्हणावे लागले. हे कोड कोणाला लागू होईल हे सांगताना प्रारंभी त्यांना असे म्हणावे लागले की, ''मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी आणि पारशी हे चार लोक सोडून दिले तर हिंदुस्थानात बाकीचे जेवढे लोक आहेत, त्या सनातनी, लिंगायत, जैन, बौद्ध, शीख, आर्यसमाज इत्यादी सर्व लोकांना हे कोड लागू होईल.'' त्यांनी कोडाला नावही दिले – 'हिंदू कोड'. हिंदू या नामाभिधानाखाली कोणकोण येतील हे सांगताना त्यांनी अगदी स्पष्ट म्हटले आहे की, या सर्व लोकांना हे लागू होईल, आणि याही पुढे जाऊन असे म्हटले आहे की, ''वरील यादीतून राहिलेले आणखीही जर कोणी असतील तर त्या सर्वांनासुद्धा

**व्यक्तित्वाच्या उल्लंघुनिया साऱ्या आकुंचित सीमा । विशाल हृदयी स्थापन केली समाजपुरुषाची प्रतिमा ।**

हे लागू होईल; आणि ज्यांना हे आपल्याला लागू होत नाही असे वाटत असेल त्यांच्यावर 'आपल्याला हे लागू नाही' हे सिद्ध करण्याची जबाबदारी राहील.'' तेव्हा हिंदू शब्दाची व्याख्या करता येत नाही म्हणून 'हिंदू समाजच नाही' असे जे वादंग कधीकधी माजविण्यात येतात, ते बरोबर नाही. येथे 'हिंदू समाज' आहे. हिंदू कोडाखाली हे सर्व लोक येतात असे पं. नेहरूंनी म्हटले, डॉ. आंबेडकरांनी म्हटले, याचा अर्थच असा की यामागे काही ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक कारणे असली पाहिजेत. मोठमोठ्या जाणत्या लोकांनी त्यांचा विचार केला असेल आणि हे निश्चित नाव दिले असेल. कुणा एखाद्याचे फॅड म्हणून हे झालेले नाही. तेव्हा या सर्व लोकसमुदायाचा हिंदू या शब्दामध्ये समावेश होतो असे गृहीत धरूनच या विषयाची मी मांडणी करणार आहे.

**एकतेचा अनुभवही आवश्यक**

या सर्व हिंदूंना आपल्याला संघटित करावयाचे आहे. संघटित करायचे याचा अर्थ असा की त्यांना एकत्रित आणायचे आहे. संघटन म्हणजे गर्दी, मोर्चा वा एखादी सभा नव्हे. संघटन म्हणजे सर्वांना एकत्र आणायचे, त्यांनी एकत्र का रहायचे हे त्यांना समजावून द्यावयाचे, आणि त्यांना एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करावयाचा. हे काम काही सोपे नाही, कठीण आहे. याच्यासाठी काही तरी आवाहन करावे लागेल. काहीतरी 'आधार' घ्यावा लागेल. काही आधार तर भावनात्मक राहणार हे निश्चितच. कारण मनुष्य तसाच बनलेला आहे. त्यामुळे 'ही आपली मातृभूमी आहे, आपण तिचे पुत्र आहोत, हजारो वर्षांपासून आपण इथे नांदत आहोत, हा देश आपण घडविला आहे, आपण बिघडविला आहे, भूतकाळात आपण या देशामध्ये उज्ज्वल इतिहास निर्माण केला आहे; जगालाही आपण काही दिले आहे, त्याचेही श्रेय आपल्याकडे येते; काही बिघडल्याचा दोषही आपल्याकडे येतो, तेव्हा आपण मातृभूमीचे पुत्र असल्याने सगळ्यांनी एकत्र राहिले पाहिजे, नांदले पाहिजे' असे भावनात्मक आवाहन हे आवश्यकच आहे. जे स्वतःला फार 'matter of fact' वाले समजतात, व्यवहारी समजतात, 'रॅशनल' समजतात, त्यांनाही असा भावनात्मक आधार घ्यावाच लागतो. त्यात काही चूक नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी रशियावर फार मोठे संकट आले तेव्हा स्टॅलिनलादेखील 'आपण एक राष्ट्र आहोत' अशी रशियन लोकांना आठवण करून द्यावी लागली. राष्ट्रीयत्वाचे आणि मातृभूमीचे आवाहन करावेच लागले. असे भावनात्मक आवाहन आवश्यक आहे हे निर्विवाद आहे. 'परंतु हे पुरेसे आहे काय ?' हा प्रश्न विचारात घ्यावा लागेल. काम करताना असे लक्षात येते की एवढे पुरेसे नाही. भावनात्मक आवाहनाची आवश्यकता आहेच; परंतु त्याबरोबरच ज्यांना आपण भावनात्मक आवाहन करतो त्या सर्व बंधूंना समाजात वावरतानाही असा व्यावहारिक अनुभव आला पाहिजे की, 'आपण सगळे एक आहोत, आपण सर्व समान आहोत.' या एकतेचा अनुभव नेहमीच सहजपणे आला पाहिजे. भावनात्मक आवाहनाबरोबरच व्यवहारामध्ये असा अनुभव सर्व घटकांना आला तर संघटनेकरिता एकतेचा पाया दृढ होईल, चिरस्थायी होईल. म्हणून भावनात्मक आवाहनाबरोबरच समाजातील सर्व घटकांना असा समतेच्या व्यवहाराचा अनुभव आला पाहिजे हेही निश्चित आहे. त्या दृष्टीने विचार होणे क्रमप्राप्त आहे.

**उणिवांचा शोध घेणे आवश्यक**

मागील अनेक शतकांच्या इतिहासात आपण असा अनुभव घेतला की इथे मूठभर मुसलमान आले, इंग्रजही फार थोडे आले; पण दोघांनीही इथे राज्य केले. त्यांनी आपल्यापैकी अनेक लोकांना बाटविले. त्यांनी आपल्यात

**वैर न कोणाशीही धरिता वागु सदा अभिमानाने । कधी न वाकू शक्तीपुढती सौख्याने फुलवू सदने ।।**

निरनिराळे भेद निर्माण केले. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद निर्माण केला. सवर्ण–अस्पृश्य वाद निर्माण केला. या गोष्टीबद्दल आपण पुष्कळदा मुसलमान आणि इंग्रजांना दोष देतो. त्यांनी काही केले असेल, त्यांचा दोष असेलही, आहेही; पण त्यांना दोष देऊन आपली सुटका होणार नाही. काहीजणांचे असे मत आहे की, असल्या गोष्टींना इंग्रज–मुसलमान जबाबदार आहेत. त्यांनी हे भेद, या विकृती निर्माण केल्या. यात काही थोडे सत्य असण्याची शक्यता आहे. पण सरतेशेवटी आपला जगातील इतर लोकांशी संबंध टळला असता काय ? आज ना उद्या संबंध आलाच असता. बर्लिनमध्ये जशी एक भिंत बांधली आहे, तशीच एखादी भिंत आपण बांधली असती काय की जीमुळे इतर राष्ट्राशी, विचारांशी, संस्कृतीशी आपल्याला संबंध टाळता आला असता ? हे तर अशक्यच होते. आणि भिंत कोण बांधतात ? भिंत ते बांधतात की ज्यांना स्वतःबद्दल अविश्वास आहे, ज्यांना दुसऱ्यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल भय वाटते. जी पद्धती भयामुळे आपल्याभोवती भिंत बांधते ती आपली उणीवच व्यक्त करते. दोन पद्धती जवळजवळ एकत्र नांदत असता जी सरस ठरते तिचे श्रेष्ठत्व लोक मानतात. असो. तर इतरांवर दोषारोपण करण्यापेक्षा आपण अंतर्मुख होऊन आपल्यामध्ये काय उणिवा होत्या, की त्यामुळे इतर लोक आपल्या दोषांचा फायदा घेऊ शकले, याचाच विचार आपल्याला करावा लागेल. संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांचा यासंबंधी एक विशेष दृष्टिकोन होता. जेव्हा–जेव्हा असा विषय उपस्थित होई तेव्हा ते सांगत की मुसलमान वा इंग्रजांना दोष देऊन आपली सुटका होणार नाही; आपल्यात काय उणिवा, दोष आहेत याचा शोध घेतला पाहिजे. त्याच पद्धतीने आपण विचार केला तर **आपल्याला हे मान्य करावे लागेल की, आपल्या समाजामधील विषमता हे एक असे मोठे कारण होते की ज्यामुळे अनेक लोक बाटले, अनेक वाद आपल्या समाजात माजवून परकीय लोक आपल्या समाजाचे विघटन करू शकले**. वर्णभेद, जातिभेद, अस्पृश्यता हे सामाजिक विषमतेचे काही आविष्कार आहेत. हिंदू समाजाचे संघटन करणाऱ्यांचा आणि इतरांचाही असा अनुभव आहे की, समाजात वावरताना आपल्याला या प्रश्नांची क्षणोक्षणी, पदोपदी ठोकर लागते. **तेव्हा इतरांना दोष देण्यापेक्षा सामाजिक विषमता या आपल्या दोषाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.**

### जुन्या–नव्याचा विवेक

हिंदू संघटन करणाऱ्यांनी या गोष्टीचा कसा विचार करावा? त्यांना तर हा विषय थोडा कठीण आहे. कारण, आपण आपल्या संस्कृतीचे अभिमानी आहोत, धर्माचे अभिमानी आहोत. आपल्याला असे वाटते की ज्याचा अभिमान बाळगावा असे पुष्कळसे आपल्याकडे आहे. जगातील लोकांनाही हे मान्य आहे की, आपण इथे असे काही तत्त्वज्ञान निर्माण केले आहे, असा काही जीवनविषयक दृष्टिकोन निर्माण केला आहे की जो मानवी जीवनाच्या दृष्टीने आवश्यक आहे, इष्ट आहे. अनेक शतकांच्या उलथापालथीच्या काळामध्येदेखील या देशातील लोकांनी आपली शाश्वत जीवनमूल्ये टिकवून ठेवली आहेत. ती पुढे टिकून रहावीत अशी आपणा सर्वांची इच्छा आहे. या शाश्वत जीवनमूल्यांचा, संस्कृतीचा अभिमान ठेवावयाचा; अभिमान ठेवण्यालायक ज्या परंपरा आहेत त्यांचा अभिमान ठेवावयाचा; आणि हे पथ्य सांभाळून आपल्यामध्ये आलेले दोष, उणिवा, विषमता यांचा विचार करायचा, अशी ही विचाराची पद्धत आहे. हे उघडच आहे की जुन्या गोष्टींचा अभिमान ठेवतानादेखील 'जुने सर्वच चांगले, ते अपरिवर्तनीय, ते शास्त्रोक्त' असा विचार करून चालणार नाही. 'पुराणमित्येव न साधु सर्वम्।'

एखादी गोष्ट जुनी आहे एवढ्याचमुळे ती चांगली आहे असे ठरत नाही. किंवा कधी कधी हिंदू संस्कृतीचा अभिमानी मनुष्य असाही विचार करतो की, 'अनेक जुन्या गोष्टी आपल्या समाजामध्ये आजवर चालल्याच, आपल्या पूर्वजांनी त्या चालवून घेतल्या. त्यामुळे त्यांचे काही बिघडले नाही. तेव्हा आता नवीन विचार करण्याचे कारण काय ?' पण असाही विचार करून चालणार नाही. 'जुन्या गोष्टींवर आजवर निभले तेव्हा उद्याही का निभणार नाही ? परिवर्तनाची गरजच काय ?' असा विचार करून चालणार नाही. 'तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाण: क्षारं जलं कापुरुषा: पिबन्ति' हे सुभाषित आपण ऐकले असेल. 'आमच्या बापजाद्यांची ही विहीर आहे; त्या विहिरीचे पाणी खारे आहे, पण आमचे बापजादे तर तेच पीत आले; त्यांच्यात तर काही दोष निर्माण झाला नाही, मग आता आम्हीही तेच का पिऊ नये ?' असा जो एक विचार करण्याचा प्रकार आहे तो ठीक नाही. आपल्या सुभाषितकारांनी अशा मनुष्याला चांगले म्हटले नाही, 'कापुरुष'च म्हटले आहे. पाण्याची नवीन काही व्यवस्था झाली असेल, नळ आले असतील, तरीसुद्धा आम्ही आपले जुन्याच विहिरीचे पाणी पिणार आणि 'आमचे वाडवडील ते पीत होते' हे त्याचे कारण सांगणार ! असे करणे इष्ट नव्हे हे उघडच आहे. तेव्हा जुनी प्रत्येक गोष्ट चांगली, आणि जे कालपर्यंत चालत आले ते ज्या अर्थी कालपर्यंत चालले त्या अर्थी उद्याही ते चालेल असा समाजासंबंधी विचार करणे इष्ट नाही, हे हिंदू संघटन करणाऱ्यांनी लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात समाजात सर्वच प्रकारचे लोक राहणार. काही लोक असे असतात की त्यांना कोणतीही नवी गोष्ट आली की ती अगदी घेण्यासारखी, आदर्श, उत्तम अशी वाटते. दुसरा एक वर्ग समाजात असा असतो की त्याला कोणतीही नवीन गोष्ट त्याज्य, बेकार, टाकाऊ वाटते. असे दोन्ही प्रकारचे लोक समाजात असणे स्वाभाविकच आहे. **परंतु ज्यांना समाजातील दोष नाहीसे करायचे आहेत आणि समाजाचे संघटन करायचे आहे, त्यांनी या बाबतीत कोणतीही एकांगी भूमिका न घेता 'परिक्ष्यान्यतरत् भजन्ते' असा दृष्टिकोन घेतला पाहिजे. विवेक करायचा, काय ठेवण्यासारखे आहे ते ठेवायचे, आणि जे गेले पाहिजे असे वाटते ते जाईल, त्यात दुःख करण्यासारखे काही नाही असा विचार करूनच पुढे चालले पाहिजे. जेवढ्या प्रमाणात लोक असा विचार करतील तेवढ्या प्रमाणात आपण हिंदू संघटन अधिक चांगल्या प्रकारे करू शकू, विषमता दूर करू शकू, असे मला वाटते. म्हणून अधिकाधिक लोक अशा पद्धतीने विचार करण्यास आणि वागण्यास उद्युक्त होतील याची काळजी घेतली पाहिजे.**

### आचारविचाराची तपासणी

मी अलीकडे ज्यू लोकांसंबंधीचे एक पुस्तक वाचले. त्या पुस्तकात असे म्हटले आहे की ज्यू लोकांनी दर शे-दोनशे वर्षांनी एकत्र बसून त्यांच्या जुन्या धर्मग्रंथाचा विचार केला आहे. त्या ग्रंथाची आणि स्वतःच्या आचारविचाराची तपासणी केली आहे. अर्थात त्या धर्मग्रंथातील शब्द बदलणे शक्य नसल्याने त्यांनी वेळोवेळी त्या ग्रंथावर नवीन भाष्ये (interpretations) केली आहेत. ही नवीन काळाला अनुसरून केलेली भाष्ये त्यांनी लोकप्रिय केली, समाजात रूढ केली. त्यामुळे, जरी ज्यू समाज जगात सर्वत्र पसरला होता तरी त्यांचा व्यवहार नवीन काळाशी सुसंगत असा राहिला. काही कालखंडानंतर प्रत्येक वेळी नवी भाष्ये करीत राहण्याचा त्यांनी क्रमच ठेवला. म्हणजे, धर्मातील शाश्वत भाग कोणता आणि परिवर्तनीय भाग कोणता याचा त्यांनी विचार

केला. माझी अशी कल्पना आहे की आपल्याही देशात एके काळी असा विचार अवश्य होत राहिला असला पाहिजे. त्याशिवाय इतक्या 'स्मृती' झाल्याच नसत्या. शाश्वत भाग कोणता आणि परिवर्तनीय भाग कोणता हा विचार करून योग्य परिवर्तने पूर्वी झाली असली पाहिजेत. आपल्या देवतांमध्येही किती परिवर्तन झाले आहे! पूर्वी इंद्र, वरुण, अग्नी या देवतांची पूजा होत होती. तर आज विष्णू, शिव आदींची उपासना चालू आहे. एकेकाळी शैव आणि वैष्णव यांच्यामधून विस्तव जात नव्हता. आद्य शंकराचार्यांनी त्यांचा समन्वय साधला, पंचायतन पूजा सुरू केली, आणि आता घराघरातून शिवरात्रीबरोबरच शयनी आणि प्रबोधिनी एकादशीही पाळण्यात येते. जुन्या काळीदेखील असे समन्वय साधण्याचे, नवी भाष्ये करण्याचे प्रयत्न होत असत. जे काही जुने सांगितले आहे ते अक्षरशः, शब्दशः तसेच पाळले पाहिजे असा आग्रह त्या काळीदेखील नसावा असे दिसते. जुन्या ग्रंथांत अनेक कथा आहेत. त्या कथांवर काय आपण शब्दशः, अक्षरशः विश्वास ठेवतो ? उदाहरणार्थ, चंद्रग्रहण आणि सूर्यग्रहण का होते याची एक कथा प्रचलित आहे, ती अशी की राहू-केतू चंद्र-सूर्यांना गिळतात. जुन्या धर्मग्रंथांचा, शास्त्रांचा अभिमान ठेवायचा याचा अर्थ असा करायचा काय की, 'राहू-केतू चंद्र-सूर्यांना गिळतात म्हणून ग्रहणे होतात' असे मुलांच्या पुस्तकात लिहायचे ? जे काही शास्त्रीय, विज्ञानसिद्ध कारण असेल तोच धडा आपण पुस्तकात घालणार.

**अन्य समाजांतही रुढीप्रियता आणि ग्रंथप्रामाण्य**

परंतु रुढीप्रियता आणि ग्रंथावर शब्दशः विश्वास ठेवण्याचा दोष फक्त हिंदू समाजातच आहे असे मानण्याचे मात्र कारण नाही. अमेरिका हा मोठा विज्ञानवादी देश आहे असे आपण समजतो. तिथे १९२५ मध्ये एका राज्यात एक खटला आला होता. 'रीडर्स डायजेस्ट'च्या जुलै १९६२ च्या अंकात त्याची माहिती आली होती. 'The Trial that Rocked The World' असे त्याचे हेडिंग होते. सृष्टीची, माणसाची उत्पत्ती कशी झाली यासंबंधीचा एका धडा एका शालेत पुस्तकात होता. नवीन क्रमविकासाच्या (Evolution) थिअरीला अनुसरून तो धडा होता. एक शिक्षक तो शिकवीत होता. तेव्हा, बायबलमध्ये सृष्टीची आणि माणसाची जी उत्पत्ती सांगितली आहे ती यापेक्षा वेगळी आहे, म्हणून एका ख्रिश्चन माणसाने यासंबंधी खटला भरला. बायबलमधील सिद्धांतापेक्षा विपरीत शिकविले जात आहे असा त्याचा दावा होता. तो खटला मोठा गाजला आणि बायबलच्या विरुद्ध शिकविल्याबद्दल त्या शिक्षकाला शिक्षाही झाली ! आज ख्रिश्चन लोकांनी बायबलमध्ये सांगितलेली सृष्टीच्या व मनुष्याच्या उत्पत्तीची कल्पना सोडून दिली आहे. पण इतके असूनही त्यांच्या मनामध्ये बायबलबद्धल श्रद्धा आहे ! लोकांना हे मोठे विचित्र वाटत असेल; परंतु सृष्टीच्या उत्पत्तीची बायबलमधील कल्पना सोडून देऊनदेखील ख्रिश्चनांनी बायबलवरील श्रद्धा नष्ट करण्याचा प्रयत्न केला नाही. तर इतर देशांतही असे प्रश्न उपस्थित होतात, आणि त्यातून मार्ग काढला जातो. आपल्याला देखील आपल्या देशात यातून योग्य मार्ग काढता आला पाहिजे.

अनेकजण 'या गोष्टी भगवंतांनी निर्माण केल्या आहेत' असे सांगण्याचा प्रयत्न करतात. असे सांगताना त्यांचा हेतू हे ठसविण्याचा असतो की 'हे अपरिवर्तनीय आहे, कारण हे भगवंतांनी सांगितले आहे.' पण असा विचार करणे आपल्याला कितपत चालेल ? तसे तर भगवंतांनी, 'धर्मग्लानी येते तेव्हा मी पुनःपुन्हा अवतार घेतो' असे सांगितले आहे. परंतु याचा अर्थ असा करायचा का की ते जेव्हा अवतार घेतात तेव्हा जुनी परिस्थिती

**वेगळेच जरि वंशपंथ तरि असे एक आदेश ।**

जशीच्या तशीच कायम ठेवतात ? त्यात परिवर्तन करीतच नाहीत ? असा याचा अर्थ घेण्याचे कारण नाही. आवश्यक ते परिवर्तन ते करतात असाही त्याचा अर्थ होऊ शकतो. मुसलमान धर्मात पैगंबरांनी असे म्हटले आहे की 'मी शेवटचा पैगंबर आहे.' त्याप्रमाणे आपल्याकडे कोणत्याही अवताराने 'मी शेवटचा अवतार आहे' असे म्हटलेले नाही. यावरून हे भगवंतांनी म्हटले आहे, हे अपरिवर्तनीय आहे अशी भूमिका घेणे कितपत योग्य, इष्ट आहे याचा विचार केला पाहिजे. जेव्हा जेव्हा पुन्हा धर्मसंस्थापन होते तेव्हा त्यात प्राणतत्त्व जुनेच राहते. पण त्याची अभिव्यक्ती आणि आविष्कारही बदलतात असाच अर्थ आपण काढला पाहिजे, आणि तशा गोष्टींचे स्वागत केले पाहिजे, असे मला वाटते. जुन्या काळामध्ये ज्या व्यवस्था निर्माण झाल्या त्यासंबंधी आपल्याला नीट विचार करता आला पाहिजे. हा विचार करताना पूर्वीच्य लोकांना काही समजतच नव्हते. त्यांनी काहीतरीच केले असे मानण्याचे कारण नाही. तर त्या काळामध्ये समाजाची जी आवश्यकता होती, जीमुळे समाजाची योग्य धारणा होईल, प्रगती होईल असे समाजातील कर्त्या पुरुषांना वाटले, त्याप्रमाणे तो काळ लक्षात घेऊन त्यांनी ते केले हे लक्षात घ्यावे. हे त्या काळाच्या परिस्थितीत करण्यात आले आहे हे ध्यानात ठेवावे. आज त्याची गरज नसेल, उपयुक्तता नसेल, तर आपण ती सर्व पद्धती बदलू शकतो; परंतु त्यांनी त्यावेळी ती पद्धती का निर्माण केली हेदेखील आपण नीट समजावून घेणे आवश्यक आहे.

**वर्णव्यवस्थेची मूळ कल्पना**

असा विचार आपण करतो तेव्हा स्वाभाविकपणेच आपल्यापुढे वर्णव्यवस्थेचा विषय येतो. असे म्हणतात की पूर्वी वर्णव्यवस्था नव्हती; पण पुढे समाजाने व्यवस्थित प्रगती करावी, पद्धतीने प्रगती करावी, असे वाटू लागले तेव्हा त्यावेळच्या थोर पुरुषांनी असा विचार केला की समाजामध्ये चार प्रकारची कामे नीट झाली पाहिजेत; ती जर नीट, व्यवस्थित झाली तरच समाजाची धारणा होईल, असा विचार करून त्यांनी समाजातील व्यक्तीचे गुण पाहून, त्यांची क्षमता पाहून व्यक्तिसमूहांची क्षमता पाहून वर्णव्यवस्था निर्माण केली असावी. 'System entails classification' असे कोणीतरी म्हटले आहे. व्यवस्थेत वर्गीकरण असतेच. पण वर्गीकरण म्हणजे भेद नव्हेत. भेद ही गोष्ट अलग आहे. त्या व्यवस्थेत कल्पना classification ची होती, भेदाची नव्हती; त्यामुळे ती सुरुवातीला 'जन्मावरून' केलेली नव्हती असे अनेकांचे म्हणणे आहे. परंतु या व्यवस्थेत एवढ्या मोठ्या विशाल देशात, एवढी मोठी विशाल लोकसंख्या असताना, जाण्यायेण्याची साधने नसताना, कोणाचा गुण कोणता, कोणाची aptitude काय, असा प्रश्न उपस्थित होणे साहजिक होते. त्याचा निर्णय करण्याची कोणती परीक्षा (test) नव्हती. कदाचित त्यामुळेच 'जन्मानेच हे गुण येतात' अशा भूमिकेवरून ते आले असावेत आणि हाच विचार पुढे रूढ झाला असावा. पण त्या वेळीही त्यांच्या मनात उच्चनीचतेचा भाव नव्हता. समाजाचे वर्णन त्यांनी सहस्रशीर्ष, सहस्रपाद, सहस्राक्ष असे केले व आपण सर्व या समाजाचे अवयव आहोत असा भव्य, उदात्त विचार मांडला. पायापेक्षा काय मांड्या श्रेष्ठ असतात? मांड्यांपेक्षा काय हात श्रेष्ठ असतात ? हातापेक्षा तोंड श्रेष्ठ असते काय ? असे नसतेच. हे सगळे अवयव समाजाच्या धारणेकरिता आवश्यक आहेत, अशीच त्यात कल्पना होती. एकापेक्षा दुसरे कोणी वरचढ वा श्रेष्ठ आहे अशी त्यात कल्पना नव्हती. हे सर्व विराट समाजाचे अवयव आहेत अशी ती भूमिका होती. त्यामुळे आपण जसे आज त्यात भेद पाहतो तसे भेद पाहण्याची कल्पना तेव्हा नव्हती. तसे होते असे

**सहकाऱ्यांवर जीवेभावे राखा दृढ विश्वास ।**

मानणे हे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल. त्यात भेदाची कल्पना नसल्यानेच त्या काळी ही व्यवस्था सर्वांना मान्य होती, आणि सर्वांना मान्य असल्यानेच ती अनेक शतके चालली. ती नीट चालावी यासाठी काही 'checks and balances' ठेवण्याची व्यवस्था होती. उदाहरणार्थ, ज्ञानशक्ती ज्यांना दिली त्यांना दरिद्री ठेवले. दंडशक्ती ज्यांना दिली त्यांना धनशक्तीची जोड मिळू दिली नाही. धनशक्तीला दंडशक्तीची जोड राहू दिली नाही. हे सगळे 'checks and balances' च होते. जोपर्यंत ते नीट काम करीत होते तोवर ही व्यवस्था टिकली.

परंतु कितीही भव्य कल्पना त्या लोकांनी केली असली तरी पुढे त्यांच्या वंशजांना हे सगळे checks and balances नीट सांभाळून ती व्यवस्था चांगली चालविता आली नाही, आणि त्यामुळे तिच्यात दोष निर्माण झाले. असे दोष निर्माण होतात. दोष कुठे निर्माण होत नाहीत ? कम्युनिस्ट लोक जगातील सगळी विषमता नष्ट करायला निघाले आहेत, सगळ्यांना समान करायला निघाले आहेत. आणि हा गेल्या पन्नास वर्षांतला नवीन प्रयोग आहे. असे असूनही मिलॉवन जिलासने लिहिलेल्या 'The new Class' या पुस्तकात म्हटले आहे की, कम्युनिस्ट देशात एक नवीन वर्गच निर्माण झाला. कम्युनिस्ट सिस्टिमसंबंधी अवघ्या पन्नास वर्षांच्या काळातच त्याला हे लिहावे लागले. जे सगळी विषमता संपवायला निघाले आहेत त्यांच्याबद्दल हे लिहावे लागले. तर मनुष्यस्वभाव असा काही आहे. त्याचा व्यवहार असा काही आहे की त्याच्यामध्ये काळाच्या ओघात अशा प्रकारचे दोष निर्माण होतात. कुठेतरी हितसंबंध (vested interest) निर्माण होतात. अशाच काहीतरी दोषांमुळे ही पद्धती कोलमडली, बिघडली, विकृत झाली. परंतु ती सुरू करणारांना तसे अभिप्रेत नव्हते एवढे मान्य करायला हरकत नाही.

एवढ्या मोठ्या विशाल देशात, विशाल समाजात 'aptitude' म्हणजे गुण ओळखण्याकरिता कोणतीही पद्धती न सापडल्याने त्या काळी ते जन्मावर ठरविण्याची पद्धत त्यांनी मान्य केली हे खरे असले, तरी आपल्या पूर्वजांना या गोष्टीची पूर्ण कल्पना होती की, जन्माने येणाऱ्या गुणांनासुद्धा मर्यादा आहे. त्यांची मर्यादा त्यांनी ओळखली होती. जुन्या धर्मग्रंथांत अशी वचने सर्वत्र विखुरली आहेत की त्यांना ही जाणीव असल्याचे त्यातून दिसून येते. 'शूद्रोऽपि शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणो भवेत्, ब्राह्मणोऽपि क्रियाहीनः शूद्रात् प्रत्यवरो भवेत्' अशी वचने जुन्या ग्रंथांत सापडतात. व्यवहारामुळे शूद्रदेखील ब्राह्मण होऊ शकतो आणि ब्राह्मणदेखील शूद्र होऊ शकतो असा त्याचा अर्थ. 'जातिर्ब्राह्मण इति चेत् न' (जन्माने ब्राह्मण होतो असे म्हणाल तर तसे नाही) असे सांगून ऋष्यशृंग, वसिष्ठ, विश्वामित्र, अगस्ती इत्यादी अन्य जातींत जन्मलेल्या व्यक्तीही धर्माचरणामुळे, तपश्चर्येमुळे ब्राह्मण झालेल्या आहेत, असे आपल्या जुन्या ग्रंथांमध्ये म्हटले आहे. शूद्र स्त्रीचा मुलगा महीदास आपल्या गुणांनी द्विज झाला आणि त्याने ऐतरेय ब्राह्मणाची रचना केली. ज्याच्या वडिलांचा पत्ता नाही अशा जाबालाचे उपनयन करून त्याच्या गुरूंनी त्याला द्विज बनविले ही उपनिषदातील कथाही प्रसिद्धच आहे. तेव्हा पूर्वीच्या पद्धतीतही जन्माने येणाऱ्या गुणांची मर्यादा त्यांनी ओळखली होती, आणि म्हणून त्या पद्धतीतही पुरेसा लवचिकपणा होता; आणि म्हणूनच अनेक शतके ही पद्धती नीट चालली असावी.

**विचार कालसुसंगत असावा**

पण आता तर सर्वच परिस्थिती बदलली आहे हे स्पष्ट आहे. असे असल्याने आता या निराळ्या काळात, निराळ्या पद्धतीने, काळाशी सुसंगत असाच विचार करणे अगदी इष्ट आहे. तो काळ असा होता की तेव्हा

छापण्याची कला नव्हती; यंत्रयुग यायचे होते; विद्यार्जनाचे काम गुरूच्या घरी व्हायचे; यंत्रयुग नसल्याने लोहाराचा मुलगा, सोनाराचा मुलगा, विणकराचा मुलगा हा लहानपणापासून आपल्या घरी वडिलांचे काम आपल्या डोळ्यांसमोरच पाहत असायचा. त्यामुळे आनुवंशिकतेबरोबरच त्याच्या सभोवतालचे वातावरणही असे असायचे की तो मुलगा ती विद्या सहजतेने ग्रहण करायचा. आनुवंशिकतेचेही महत्त्व आहे. पण 'heredity' इतकेच 'environment' चेही महत्त्व आहे. केवळ आनुवंशिकतेवर भर देऊन चालणार नाही. पूर्वी आनुवंशिकतेला महत्त्व असे होते की त्याला सभोवतालचे वातावरणही (environment) अनुकूल होते. तेव्हा मुलाचे शिक्षण घरीच व्हायचे. कामधंदे घरीच व्हायचे. आता छापण्याची कला आहे. आता शिक्षण शिक्षणसंस्थेमध्ये मिळते, घरी नव्हे. आता काम कारखान्यामध्ये चालते, घरी नाही. त्यामुळे वातावरण बदलले आहे, सभोवतालची परिस्थिती बदलली आहे. त्यामुळे केवळ आनुवंशिकतेचा आग्रह धरून 'जन्मना वर्णव्यवस्थे'चा आग्रह धरणे हे नवीन काळाशी विसंगत आहे.

नवीन काळाशी सुसंगत असा विचार आपल्याला करता आला पाहिजे. आता नवीन शोध लागले आहेत, नवीन विज्ञान आले आहे, सगळी परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे, त्यामुळे आनुवंशिकतेइतकेच सभोवतालच्या वातावरणाला महत्त्व आलेले आहे, ही गोष्ट आपण लक्षात ठेवायला पाहिजे. काही बंधूंना आनुवंशिकतेने आणि निसर्गाने येणारी विषमता यांचे महत्त्व वाटते. ते म्हणतात, 'आनुवंशिकतेने काही गुण येतात, निसर्गामुळे काही विषमता निर्माण होते.' थोड्या अंशाने हे सत्य आहे, नाही असे नव्हे; परंतु आनुवंशिकतेमुळे आणि निसर्गामुळे जी विषमता येते, त्या विषमतेचे मनुष्याने शास्त्र बनवायचे आहे काय ? काही अंशी आनुवंशिकतेने गुण–अवगुण येत नाहीत असे कोणीच म्हणणार नाही. पण विषमतेचे शास्त्र बनविण्यात मनुष्याचा पुरुषार्थ नाही, थोरवी नाही; तर या निसर्ग नियमांचाच अभ्यास करून ही जी नैसर्गिक किंवा आनुवंशिक विषमता आहे ही कशी कमी करता येईल, कशी सुसह्य करता येईल, असा माणसाने विचार केला पाहिजे. त्यात त्याचा पराक्रम आहे, त्यात त्याची थोरवी आहे. विषमतेचे शास्त्र बनवायला नको. पुष्कळ लोक आनुवंशिकतेच्या या गुणाचे शास्त्र बनवितात, तत्त्वज्ञान बनवितात, हे काही इष्ट नाही. अत्यंत दुर्बल कुटुंबातील मुलांचीदेखील व्यवस्था समाजाने केली पाहिजे असा विचार प्रगत राष्ट्रांमध्ये केला जातो. समाजाने त्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे असा आजकाल विचार चालू आहे. एखाद्या दुर्बल कुटुंबाचा जर असा विचार करावयाचा तर एखाद्या जातीत जन्मल्यामुळे जर काही उणिवा, (handicaps) निर्माण होत असतील तर आनुवंशिकतेच्या नावाखाली त्या handicaps चा, न्यूनांचा पाठपुरावा करणे बरोबर नाही. आनुवंशिकतेचे जेवढे सीमित महत्त्व आहे, तेवढे लक्षात घेऊन पण त्याबरोबरच त्यातून पिढ्यानुपिढ्या चालत आलेले अवगुण व दोष हे सभोवतालचे वातावरण बदलून, विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाने आणि इतर व्यवस्थांनी दूर करण्याचा प्रयत्न करणे ही आपल्या प्रयत्नाची दिशा असली पाहिजे आणि आजच्या काळात हे होऊ शकते.

जपानी लोक हे आनुवंशिकतेने आणि निसर्गतः बुटके आहेत असा समज होता. पण आता हे सिद्ध झाले आहे की दुसऱ्या महायुद्धापासून जपानच्या लोकांचा अमेरिकेशी संबंध आला, त्यांच्या राहणीत आणि खाण्यापिण्यात फरक झाला व त्यामुळे जपानी माणसाची सरासरी उंची वाढली आहे. एके काळी आपल्या देशात व परदेशातसुद्धा

'martial races', 'लढाऊ जाती' असा शब्दप्रयोग फार चाललेला होता. पहिल्या व दुसऱ्या जगड्व्याळ महायुद्धांत 'स्टँडिंग आर्मी' खेरीज सक्तीने इतरांचीही सैन्यभरती करण्याची तीव्र गरज पडली. तेव्हा ज्यांना कधी आपल्याला लढावे लागेल असे वाटले नव्हते, असे लोकसुद्धा सैन्यभरतीत आले. आणि ते राष्ट्राकरिता किती उत्तम रीतीने लढले ! As good as the professional soldier ! As good as the standing army ! तेव्हा आता कुणी मार्शल रेस, 'लढणाऱ्या जाती' ही कल्पना मान्य करीत नाही. त्यामुळे आनुवंशिकतेचे शास्त्र, तत्त्वज्ञान बनविण्याचा कोणी प्रयत्न करू नये. पुढे जाऊन असेही म्हणता येईल की खरे तर समाजधारणेकरिता आवश्यक अशी काही वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आज अस्तित्वात आहे असे म्हणणेदेखील हास्यास्पद आहे. आज जाती असतील, पण त्यांचा समाजधारणेशी काही संबंध राहिलेला नाही. या जाती आता फक्त लग्नसंबंधापुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. मुलगा कुठला पहायचा, मुलगी कुठली पहायची एवढ्या लग्न संबंधापुरत्याच त्या उरल्या आहेत. समाजधारणेची जी कल्पना होती ती त्यात आता मुळीच राहिलेली नाही. तरीही काहीजण शतकानुशतके चालत आलेली हीच आदर्श व्यवस्था आहे असे समजून मोठ्या अभिमानाने तिचा पाठपुरावा करतात किंवा काहीजण तिच्यावर पोटतिडकीने टीका करीत असतात. त्या दोघांनीही असा विचार केला पाहिजे की, **समाजधारणेसाठी जातिव्यवस्था किंवा वर्णव्यवस्था म्हणतात ती आज अस्तित्वातच नाही. आज जे काही आहे ती अव्यवस्था आहे. ती विकृती आहे. समाजधारणेशी तिचा काहीही संबंध राहिलेला नाही. असे असल्यामुळे ही व्यवस्था तुटलेली आहे, जायला लागली आहे. तेव्हा जी जाणे इष्ट आहे, जी जाऊ घातली आहे, ती आता नीट कशी जाईल याचाच सर्वांनी विचार केला पाहिजे आणि त्या दृष्टीने आपण काय करू शकतो हे पाहणे इष्ट आहे, असे मला वाटते.**

**आता बेटी व्यवहार सर्रास व्हावा**

आपल्याकडे रोटी-बेटी व्यवहार असा एक शब्दप्रयोग रूढ आहे. पूर्वीच्या काळी रोटीव्यवहार देखील एका जातीतच होत असे. पण आता रोटीव्यवहार सर्वत्र सुरू झाला आहे हे आपण पाहतो. रोटीव्यवहाराची बंधने आता तुटली आहेत. कुणालाही त्याबद्दल श्रेय द्या. 'इंग्रजी विद्ये'ला श्रेय द्या, निरनिराळ्या पुढाऱ्यांनी जी कामे केली आहेत त्यांना श्रेय द्या, झुणकाभाकर संघाला द्या की सहभोजनाला द्या. आपण काही श्रेय राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही देऊ शकाल; कारण आमचीही शिबिरे होतात, कार्यक्रम होतात. श्रेय कुणालाही द्या, पण आता रोटीव्यवहार सार्वत्रिक झाला आहे. त्याची बंधने तुटली आहेत. त्यामुळे अर्थातच जातिभेदाची तीव्रता कमी व्हायला पुष्कळच मदत झाली आहे. काही प्रमाणात आता बेटीव्यवहारसुद्धा सुरू झाला आहे. हेही आपण पाहतो. निःसंकोचपणे असे म्हणायला काही हरकत नाही की ज्याप्रमाणे रोटीव्यवहार सर्वत्र सुरू झाला आहे त्याप्रमाणे हा बेटीव्यवहारदेखील सर्रास सुरू व्हायला पाहिजे. यासंबंधी संकोच करण्याचे कारण नाही. स्पष्टपणे हे म्हटले पाहिजे. ज्याप्रमाणे रोटीव्यवहाराची बंधने तुटली आहेत त्याप्रमाणे जातिभेदाची तीव्रता दूर होण्याच्या दृष्टीने, हे भेद दूर होण्याच्या दृष्टीने बेटीव्यवहाराची देखील तुटली पाहिजेत. मात्र सर्वांनी हे समजून घेतले पाहिजे की रोटीव्यवहाराची बंधने जितकी लवकर तुटतात तितकी काही बेटीव्यवहाराची बंधने तुटणे सोपे नाही. कारण असे की लग्न म्हटले की चांगला अनुरूप जोडा (good match) जमावा लागतो. कुणीही कुणाशीही लग्न करतो

असे होऊ शकत नाही; किंवा कायदा केला म्हणजे कुणाचे कुणाशीही लग्न होईल, पैसा देतो म्हटल्याने पैशाच्या लोभाने ते होईल असे नाही. त्यातून आपल्याला जे पाहिजे ते निष्पन्न होणार नाही. म्हणून तसे करणे चूक ठरेल. त्यामुळे लग्न म्हटले की 'चांगला जोडा' असाच विषय होतो. शैक्षणिक स्तर, आर्थिक स्तर, राहणीचा स्तर हा समान झाल्यानंतर त्या स्तरावर ही लग्ने होतील. आजही आपल्या परिचितांमध्ये जी आंतरजातीय लग्ने झालेली दिसतात ती सामान्यपणे अशाच स्तरावर झाली असल्याचे दिसून येईल. ज्या प्रमाणात सगळ्या लोकांच्या वस्त्या सरमिसळ होऊन एकत्र राहणे वाढेल, जातीप्रमाणे वस्त्या राहणार नाहीत, त्या प्रमाणात हे होत राहील. जसे एल्आयसी कर्मचाऱ्यांची कॉलनी होते, बँक कर्मचाऱ्यांची कॉलनी होते, शिक्षकांची कॉलनी होते. जातीप्रमाणे वस्त्या न होता याप्रमाणे त्या होतील, सर्व प्रकारचे लोक एकत्र राहतील, शिक्षण सार्वत्रिक होईल व सर्वांचा जातिनिरपेक्ष आर्थिक स्तर समान होईल, तेव्हा त्यातून स्वाभाविकपणे असे विवाह होतील. आदळआपट केली, घाईगर्दी केली, फार प्रचारतंत्र उपयोगात आणले म्हणजे त्यामुळे हे होईल असे नव्हे. हा थोडा नाजूक विषय आहे. त्यासाठी संयम बाळगावा लागेल, समयही द्यावा लागेल. पण हे झाल्याशिवाय राहणार नाही. होईल. आपापल्या परीने सर्वांनी या गोष्टीला हातभार लावून सामाजिक अभिसरण होईल याची काळजी घेतली पाहिजे.

**अस्पृश्यता समूळ नष्ट व्हावी**

यापेक्षाही एक दुःखद विषय आहे. सामाजिक विषमतेचा एक आविष्कार 'अस्पृश्यता' हा आहे. आपल्या समाजातील अत्यंत दुर्दैवी व दुःखदायक असा हा प्रकार आहे. काही विद्वान लोक म्हणतात की पूर्वीच्या काळी ती अस्तित्वात नव्हती; आगंतुकपणे ती पुढे रूढ झाली. पण अनेक शतकांपासून अस्पृश्यता अस्तित्वात असल्याचे आपण पाहत आहोत एवढे खरे. **परंतु आता मात्र सर्वांना हे मान्य आहे की अस्पृश्यता ही चूक आहे. It must go lock, stock and barrel ! ती सर्वतोपरी गेली पाहिजे, ती संपूर्णपणे नाहीशी झाली पाहिजे यासंबंधी आता कोणाच्याही मनात शंका नाही. अमेरिकेतील गुलामगिरी घालविणाऱ्या अब्राहम लिंकनने म्हटले आहे, "If slavery is not wrong, nothing is wrong !" आपणही असेच म्हटले पाहिजे आणि आम्ही म्हणतोही की, "If untouchability is not wrong, nothing in the world is wrong !" अस्पृश्यता वाईट नसेल तर मग जगात काहीच वाईट नाही ! तेव्हा अस्पृश्यता वाईट आहे आणि ती समूळ नाहीशी झाली पाहिजे यासंबंधी दुमत असण्याचे कारणच नाही.** सर्व लोकांनी त्याकरिता प्रयत्न केला पाहिजे. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था यांमुळे आपल्याला जो सामाजिक विषमतेचा अनुभव येतो तो दुःखद आहे. ही विषमता गेली पाहिजे असा भाव आपणा सगळ्यांच्या मनात असला पाहिजे. या विषमतेमुळे समाजात विघटना आली आहे, दुर्बळता आली आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. लोकांसमोर स्पष्ट केले पाहिजे. ती दूर करण्याचे उपाय सांगितले पाहिजेत. सगळ्यांनी या प्रयत्नाला हातभार लावला पाहिजे. त्याने विषमता दूर होईल आणि हिंदू संघटनेच्या मार्गातील अडथळे दूर होतील.

हे काम करताना अनेकांचे सहकार्य मिळविले पाहिजे. संयम राखून आणि नीट वागून हा प्रयत्न केला तरच तो यशस्वी होईल. आपल्या समाजामध्ये धर्मगुरू आहेत, संत आहेत, महात्मे आहेत, विद्वान आहेत. त्यांचा जनमानसावर मोठा प्रभाव आहे. मला असे वाटते की त्यांचे सहकार्य विषमता निवारणाच्या प्रयत्नांत फार आवश्यक आहे.

कधीकधी आपणास वाटते की जुन्या गोष्टींवरच त्यांच्या श्रद्धा आहेत, आणि त्या जुन्या गोष्टी कायम रहाव्यात असा त्यांचा आग्रह आहे. पण एवढ्याच कारणामुळे आपण त्यांच्याविषयी गैरसमज करून घेऊ नये. अन्य देशांतसुद्धा जुन्या गोष्टींवर श्रद्धा असणारे धर्मगुरू असतात. त्यांच्याबद्दल लोक तिरस्काराने बोलतात किंवा वागतात असा अनुभव नाही. **आपणही जर नीट प्रयत्न केला तर त्यांच्यापाशी पोहोचू शकतो. त्यांना प्रार्थना करू शकतो, 'धर्मातील शाश्वत भाग कोणता आणि कालानुरूप परिवर्तनीय भाग कोणता हे आपण लक्षात घ्या आणि आपण त्याचे प्रतिपादन समाजामध्ये करा ! आपण प्रतिपादन केल्याने त्याचा फार खोलवर, व्यापक असा परिणाम होईल.' शाश्वत आणि परिवर्तनीय यांचा विवेक करणाऱ्या आचार्यांचा, संत-महंतांचा आवाज या दृष्टीने सर्व कानाकोपऱ्यांत उमटला पाहिजे, असाही एक प्रयत्न केला पाहिजे. त्यांना सांगितले पाहिजे, 'समाजरक्षणाची जबाबदारी तुमची आहे; मठात बसून हे होणार नाही. मठाच्या बाहेर पडले पाहिजे, बाहेर समाजात मिसळले पाहिजे आणि लोकांपुढे हे विचार तुम्ही आपल्या पद्धतीने मांडले पाहिजेत.'** पुष्कळांना हे कठीण आहे असे वाटते. पण ते कठीण नाही. आपल्या संघाचे परमपूजनीय श्रीगुरुजी यांनी हा प्रयत्न विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून केला. आमचा असा अनुभव आहे की त्यांनी या आचार्य आदी सर्वांना एकत्र आणले, त्यांच्याशी बोलणे केले आणि याचा परिणाम म्हणून हे सर्वजण समाजातील सर्व वस्त्यांत जाऊन सर्व घटकांत मिसळायला लागले आहेत. त्यांच्यात उठायला-बसायला लागले आहेत. आपल्या धर्मातून परधर्मात गेलेल्या लोकांना परत आपल्या धर्मात घेण्यास ज्यांचा विरोध होता त्यांनी तो सोडून देऊन त्यांना स्वधर्मात घेण्यास मान्यता दिली आहे. म्हणजे त्यांना नीट समजावून दिले तर तेही कार्यात सहभागी होऊ शकतात. म्हणून त्यांच्यासंबंधी काहीतरी विचित्र बोलत राहण्याऐवजी त्यांचेही सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असे प्रयत्न केल्यास त्यांचे सहकार्य अवश्य मिळून आपल्या कामात प्रगती होईल असे वाटते.

समाजामध्ये एक फार मोठा समजूतदार वर्ग असा आहे की ज्याला ही जन्माधारित वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, अस्पृश्यता गेली पाहिजे व सगळा समाज एकतेचा सूत्राने बांधला गेला पाहिजे, समता आली पाहिजे असे वाटते. त्यांच्यावरही फार मोठी जबाबदारी आहे. ते जे बोलतात त्याप्रमाणे जबाबदारीने त्यांचा सर्व व्यवहार होतोच असे नाही. उपाय सुचविणाऱ्याने हे लक्षात ठेवले पाहिजे की 'उपायं चिन्तयन् प्राज्ञः अपायमपि चिन्तयेत्।' उपाय सुचविणाऱ्याने त्याने होणारे अपायदेखील लक्षात घेऊन बोलले पाहिजे. **कारण शेवटी आपल्या समाजामध्ये सौहार्द, सामंजस्य, सहकार्य नीटपणे घडवून आणण्यासाठी आपल्याला समता हवी आहे. आपला प्रयत्न त्यासाठी आहे. हे विसरून जे वागतील, बोलतील, लिहितील त्यामुळे आपल्या या उद्दिष्टालाच बाध येईल. म्हणून या समजूतदार लोकांनी वागताना, बोलताना, लिहिताना त्या उद्दिष्टांना बाध येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.** कधी-कधी लिहिताना आपण हिंदूंमधील एखाद्या वर्गाला खूप टाकून बोलतो. 'ते अन्यायाचे व अत्याचाराचे पुतळे आहेत' असे म्हणतो. त्यांना डिवचत राहतो. त्यांना अपमानित करतो, आत्महत करतो, तेजहत करतो, पण हे इष्ट नाही. त्यांचे आत्मबळ कायम ठेवून त्यांच्याशी बोलून, त्यांच्यापुढे चांगल्या सामाजिक आदर्श व्यवहाराचे उदाहरण ठेवून त्यांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणावयाचे असे

**काल्पनिक प्रांताच्या सीमा । भेद इथे ते सरले । जाति-पंथ-भाषेचे अंकुर । कधी न इथे रुजले ।**

हे काम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुर्दैवाने अजूनही या गोष्टी ज्यांना समजत नाहीत, जे अस्पृश्यता-जातिभेद पाळतात, त्यांच्याकडे गेले पाहिजे. त्यांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणणे ही आपली जबाबदारी आहे. जे असले भेद मानतात त्यांच्यावर तुटून पडण्यापेक्षा, संघर्ष निर्माण करण्यापेक्षा, त्यांना भेटायचे, त्यांच्याकडे जाऊन समजावून सांगायचे हे केले पाहिजे. असे करणे हाही कामाचा एक प्रकार होऊ शकतो. कारण हे सर्व बंधू आपलेच आहेत आणि त्यांच्या मनामध्ये परिवर्तन झाले पाहिजे असा आपला प्रयत्न आहे. विषमता सगळ्यांच्याच मनामधून गेली पाहिजे ना ?

**डॉ. हेडगेवारांची अनोखी पद्धत**

संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांचा काम करण्याचा हा प्रकार होता. त्यांच्याबरोबर लहानपणी काम करण्याचे मला सद्भाग्य लाभले आहे. सुरुवातीच्या काळात आम्हाला अनेक मजेदार अनुभव आले. संघाची स्थापना १९२५ सालची. पहिले संघ शिबिर झाले त्यात मी होतो. त्यात पुष्कळ महार बंधूही होते. जेवण्याच्या वेळी काहीजणांच्या मनामध्ये असा संकोच निर्माण झाला की महारांच्या बरोबर कसे जेवायचे ? कारण ते तसे कधी जेवलेच नव्हते. त्यांनी डॉक्टरांपुढे हा प्रश्न उपस्थित केला. डॉक्टरांनी त्यांना शिस्त सांगितली नाही की कँपमधून 'Get out' असे म्हटले नाही. डॉक्टरांनी म्हटले की, ''आपली पद्धती अशी आहे की सगळ्यांनी मिळून जेवायला बसायचे, एकत्र बसायचे; आम्ही तसे बसणार.'' नंतर डॉक्टर मी, बाकी सर्वजण त्या महार स्वयंसेवकांच्या बरोबर जेवायला बसलो आणि ज्या दोन-चार जणांना महार स्वयंसेवकांबरोबर बसायला संकोच वाटत होता. त्यांना म्हटले की ''तुमची पगंत अलग करा !'' ते अलग बसले. दुपारच्या पंगतीला असे झाले, पण रात्रीच्या पंगतीला काय झाले ? हे जे चार स्वयंसेवक अलग पंगतीला बसले होते ते स्वतः होऊन डॉक्टरांकडे आले आणि म्हणाले की 'डॉक्टर, सकाळी आमचे चुकले ! आम्ही असे करायला नको होते !' पुन्हा त्यांना काही म्हणावे लागले नाही. नंतर ते स्वतःच सर्वांबरोबर जेवू लागले. म्हणजे आम्हाला त्यांच्यात जे परिवर्तन पाहिजे होते ते परिवर्तन झाले. डॉक्टरांनी जर त्यांना हाकलून दिले असते तर त्यांच्यामध्ये हे परिवर्तन झाले नसते. आपल्याला समाजामध्ये हे परिवर्तन पाहिजे आहे. परिवर्तन म्हणजे कोणावर तुटून पडणे, टीका करणे, शिस्तभंगाची कारवाई करणे असे काही बंधूंना वाटते. पण प्रयास अनेक प्रकारे करावा लागतो. आणि या मार्गापेक्षाही आणखी काही अधिक परिणामकारक मार्ग आहेत.

यासंबंधी एक उद्बोधक उदाहरण कै. बच्छराजजी व्यास यांचे आहे. मी ज्या शाखेचा कार्यवाह होतो, त्या शाखेचे ते स्वयंसेवक होते. ते शाखेत आल्यानंतर पहिल्या शिबिराच्या प्रसंगी मला म्हणाले, ''मी शिबिरात जेवणार नाही. कोण स्वयंपाक करतो, कोण वाढतो हे सांगता येत नाही.'' त्यांच्या घरची राहणीची पद्धती फारच जुनी होती आणि कट्टर होती. माझे मित्र असूनही ते माझ्या घरीदेखील तेव्हा जेवायला यायचे नाहीत. त्यांना मी म्हटले, ''मी डॉक्टरांना विचारतो.'' मी डॉक्टरांना म्हटले, ''बच्छराजना शिबिरात यायचे आहे, पण त्यांची जेवणाची व्यवस्था काय करायची ? कारण ते फार कट्टर आहेत आणि सगळ्यांबरोबर बसून जेवणार नाहीत.'' तुम्हांला काय वाटते, डॉक्टरांनी बच्छराजना शिबिरात येऊ नको, त्यांना बाहेर काढून लावावे असे सांगितले असेल ? त्यांनी तसे सांगितले नाही. कारण डॉक्टरांना बच्छराजजी काय आहेत हे माहीत होते. त्यांच्या अंगचे

कर्तृत्व माहीत होते. हा फार बुद्धिमान मनुष्य आहे, कर्तबगार, निःस्वार्थी आहे हे डॉक्टर ओळखून होते. डॉक्टर म्हणाले, ''बच्छराजना शिबिरात येऊ दे ! आपण तर सगळे एकत्रच बसू. याला आपण शिधा मोजून देऊ आणि त्याला सांगू की ही भांडी घे आणि तू आपला स्वयंपाक करून जेव !'' त्यामुळे पहिल्या शिबिरामध्ये बच्छराज व्यासांचे जेवण अशाच प्रकारे झाले. आम्ही शिधा द्यायचा आणि त्यांनी स्वतः स्वयंपाक करून जेवायचे. दुसऱ्या वेळी शिबिरात जेव्हा बच्छराजची आले तेव्हा ते स्वतःच डॉक्टरांना म्हणाले, ''घरी काय म्हणतात ते पाहून घेऊ, 'समाजा'तील लोक काय म्हणतात तेही पाहून घेऊ, पण या वेळेला शिबिरात मी सगळ्यांच्या बरोबर जेवणार !'' ते बच्छराजजी पुढे संघाचे कार्यकर्ते झाले, राजस्थान प्रांताचे प्रचारक झाले, अखिल भारतीय जनसंघाचे अध्यक्ष झाले. कट्टर धार्मिक प्रवृत्तीचे असूनदेखील ते सगळ्यांच्या घरी जात असत. पण पुढे कधी त्यांच्या मनात तसला विचार चुकूनसुद्धा आला नाही. तेव्हा विषमता निवारणाचे काम म्हणजे सगळ्यांवर तुटून पडणे नव्हे, तर विविध प्रकारांनी आपण हे काम करू शकतो आणि परिवर्तन आणू शकतो. वरील मार्ग हाही काम करण्याचा एक चांगला प्रकार आहे.

**वितुष्टाला प्रसिद्धी नको**

अनेक वेळा हिंदू समाजाच्या काही घटकांमध्ये वितुष्ट निर्माण होते. मारामाऱ्या होतात. खरे पाहिले तर त्या मारामाऱ्यांची कारणे राजकारणात गुंतलेली असतात. एखादी मारामारी निवडणुकीच्या राजकारणातून झालेली असते. कुठे कुठे स्वार्थाचे वैयक्तिक भांडण असते. शेतीचे, घराचे असे काही भांडण असते. परंतु ते ज्या भांडणात गुंतलेले असतात त्यांचा त्या भांडणाला जातीय रंग देण्यामध्ये स्वार्थ असतो. इतरांना त्यात ओढण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. राजकारणामुळे वा वैयक्तिक स्वार्थामुळे झालेल्या अशा भांडणास लोक जातीय स्वरूप देतात. आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे समाजातील अनेक सत्प्रवृत्त बंधू, पत्रकारदेखील अजाणता या गोष्टीचा नीट विचार न करता त्यास भडक मथळे देऊन त्याची प्रसिद्धी करतात. प्रत्येक पत्रकाराला 'scoop' करण्याची घाई असते. 'scoop' करण्याच्या घाईमुळे वार्ताहर घटनास्थळी प्रत्यक्ष जाऊन, काय घडले आहे हे पाहून येण्याऐवजी ऐकीव माहितीवरच बातमी बनवितो आणि तिला भडक मथळेही दिले जातात, हिंदू-मुसलमानांची मारामारी झाली तर 'एका जमातीची दुसऱ्या जमातीशी मारामारी' असे वर्णन दिले जाते. पण हिंदू समाजाच्या अंतर्गतच जर काही मारामाऱ्या झाल्या तर त्यांना मात्र भडक मथळे दिले जातात. असे करणे इष्ट नव्हे. सामाजिक समता आणण्यासाठी, भेद दूर करण्यासाठी आपल्यावर ही जबाबदारी आहे की आपण वागतो कसे, बोलतो कसे, लिहितो कसे याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे.

**पोषक व्यवहार, भाषा आवश्यक**

**दलित बंधूंना समाजामध्ये शतकानुशतके फार त्रास झाला आहे. त्यांनी त्रास, छळ सोसला आहे. त्याची वेदना त्यांच्या मनात आहे; त्याची पीडा आपल्या सगळ्यांच्या मनात आहे. आता या परिस्थितीतून मार्ग काढायचा आहे. ही विषमता दूर झाली पाहिजे, नष्ट झाली पाहिजे; हे दलितांना, तुम्हा-आम्हा सगळ्यांनाच हवे आहे. म्हणून दलितांचा आणि इतरांचा आपणा सर्वांना मिळून असा व्यवहार असला पाहिजे की ही विषमता नष्ट होईल.** या दृष्टीने, हा अन्याय कसा थांबेल, त्याकरिता उपयुक्त

संप्रदाय मतभेद माजले पाखंडाचा उधळे वारू । अद्वैताचा शंख फुंकुनी पूजी पंचायतन जगद्गुरू ।।

वातावरण कसे निर्माण होईल हे पाहिले पाहिजे. या प्रयत्नांना पोषक असाच व्यवहार, अशीच भाषा असली पाहिजे. दलित बंधूंनीदेखील हे पहावे अशी माझी प्रार्थना आहे. समाजामध्ये जे अन्याय होतात, ज्या वाईट गोष्टी आहेत त्यांवर टीका अवश्य करण्यात यावी; पण टीके–टीकेतही फरक असतो. आपल्याच समाजातील दोषांसंबंधी जेव्हा आपण टीका करतो तेव्हा त्या टीकेतून एक वेदना प्रकट होते. एक पीडा प्रकट होते. उलट परकीय लोक आपल्यावर जेव्हा टीका करतात तेव्हा तिच्यात तुच्छतेचा भाव असतो. टीका करण्याच्या या दोन प्रकारांत फार मोठे अंतर आहे. म्हणून दलितांच्या टीकेमधून अशी आपुलकीची वेदना प्रकट झाली पाहिजे अशी अपेक्षा आहे. **भूतकाळातील लढाया वर्तमानकाळात आणून भविष्यकाळ धोक्यात आणायचा अशा प्रकारचा जर व्यवहार झाला, तर त्यामुळे आपल्याला हे जे अभिप्रेत आहे की, ही विषमता नाहीशी झाली पाहिजे, सगळे एक झाले पाहिजेत, एका स्तरावर आले पाहिजेत त्याच कार्यात बाधा निर्माण होईल.** आपण याच समाजाचे घटक आहोत; आणि सर्व घटकांच्या बरोबर सहकार्याने राहू असा विचार त्यांनी केला पाहिजे. समाजातील इतर जे घटक असाच विचार करतात, त्यांच्याबरोबर ते उभे राहिले तर या कार्याला दोघांची मिळून शक्ती लागेल, त्यामुळे हे काम अधिक सुकर होईल. म्हणून हे कसे करता येईल अशा भूमिकेतून त्यांनी विचार करावा. म्हणजे मग सगळ्यांना इष्ट वाटणारे सामाजिक समतेचे वातावरण या ठिकाणी निर्माण होईल. जुन्या काळी काही थोर पुढाऱ्यांनी काही जातींवर, काही ग्रंथांवर फार कटू टीका केलीही आहे. त्यावेळी ते आवश्यक होते. कारण तो विषय पहिल्यांदा मांडायचा होता, लोकांच्यापुढे आणायचा होता. जेव्हा एखादा विषय प्रथमच लोकांपुढे आणायचा असतो तेव्हा काही कठोर भाषा वापरणे आवश्यक वाटल्याने तशी भाषा वापरली गेली असेल. पण त्यांनी ती वापरली म्हणून सर्वांनीच तशी वापरली पाहिजे, म्हणजे लोकांच्या लक्षात येते असे मानण्याचे कारण नाही. आता काळ बदलला आहे. सगळ्यांच्या लक्षातही हा विषय आलेला आहे. प्रत्यक्ष परिवर्तन घडवून आणायचे आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी इष्ट, योग्य अशी भाषा कशी वापरता येईल याचाच आता सगळ्यांनी विचार केला पाहिजे.

मी असे धरून चालतो की आपले जे दलित बंधू आहेत त्यांना करुणा नको आहे; त्यांना बरोबरीचे स्थान पाहिजे आहे. आणि ते बरोबरीचे स्थान त्यांना आपल्या पुरुषार्थाने मिळवायचे आहे. असे असल्याने ते त्या दृष्टीनेच विचार करतात हे मला माहीत आहे. आतापर्यंत ते मागे राहिले असल्यामुळे त्यांना सर्व प्रकारच्या सवलती देणे आवश्यक आहे. त्या सवलती त्यांनी घ्याव्याही. त्या सवलती मागण्याचा त्यांचा हक्क आहे आणि त्या सवलती किती काळ चालू ठेवायच्या हाही त्यांचाच प्रश्न आहे. ते त्यांनीच ठरवायचे आहे. पण सरतेशेवटी सर्व घटकांच्या बरोबरीने त्यांना रहायचे आहे; आणि त्यांच्या स्वतःच्या योग्यतेमुळे ते सगळ्यांच्या बरोबरीचे आहेत हेच त्यांना सिद्ध करायचे आहे. हे त्यांच्याही मनात आहे हे अनेकांशी बोलणे होत असल्याने मला माहीत आहे. तेव्हा हे कसे करायचे, योग्य काळ कोणता होईल हे त्यांनीच ठरवायचे आहे. पण शेवटी तो दिवस आला पाहिजे की जेव्हा आपण सगळे समान आहोत आणि योग्यतेच्या दृष्टीने समान आहोत, हे या समाजामध्ये प्रस्थापित होईल.

**हिंदू संघटन आणि सामाजिक समता आवश्यक**

**आपल्या हिंदू समाजात काही दोष आहेत हे उघडच आहे. परंतु या दोषांबरोबरच आपल्या**

**पक्ष पंथ वा प्रांतभेद हे मुळी न ठाउक आज अम्हा । मातृभक्त अम्हिं एकच झालो, प्राणांची ना अम्हा तमा ।।**

**समाजाची काही वैशिष्ट्येही आहेत. जगातील विचारवंतांनी ही वैशिष्ट्ये सर्व मानवजातीला उपकारक आहेत हे मान्य केले आहे. ही जीवनमूल्ये मानणारा, त्याप्रमाणे वागणारा, एकरस, समतायुक्त, संघटित हिंदू समाज इथे राहिला तरच ही वैशिष्ट्ये कायम राहणार आहेत, आणि जगाला उपकारक होणार आहेत.** म्हणून या गोष्टींचा विचार करणे हे आपल्या सर्वांचे काम आहे. दुःखाची गोष्ट आहे की आज हिंदू समाज विघटित आहे, दुर्बल आहे. 'सर्व माणसे ईश्वराची लेकरे आहेत' याच्याही पुढे जाऊन 'ते ईश्वराचेच अंश आहेत' असे मानणाऱ्या हिंदू धर्मामध्ये उच्चनीचतेचे भाव आले आहेत. याबद्दल डॉ. आंबेडकरांनी अत्यंत दुःख प्रकट केलेले आहे आणि म्हटले आहे की, ''वास्तविक समानतेचे साम्राज्य स्थापन करण्याकरिता याच्यापेक्षा अधिक मोठा सिद्धांत सापडणार नाही.'' असे असूनही दुर्दैवाने येथे असमानता आली आहे, उच्चनीचतेचे भाव आले आहेत. तेव्हा, या देशाच्या उद्धाराकरिता हिंदू संघटन आवश्यक आहे आणि हिंदू संघटन होण्याकरिता सामाजिक समता आवश्यक आहे ! त्या दृष्टीने आपण काय करू शकतो याच भूमिकेतून सर्वांनी विचार केला पाहिजे.

आपल्या समाजाच्या इतिहासाचा कालखंड फार मोठा आहे. या कालखंडामध्ये आपल्याकडे पूर्णपणे विचारस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य होते. त्यामुळे आपल्या जुन्या ग्रंथांमध्ये सर्व प्रकारची वचने सापडतात. ज्यांचा विपरीत अर्थ करून विपर्यास करता येईल अशीही अनेक वचने सापडतात. या समाजाने स्त्रीवर फार अन्याय केला असे सिद्ध करायचे असेल तर तसा अर्थ काढता येईल अशी वचने सापडतात. जसे 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति !' असे म्हणायचे असेल की येथे स्त्रीला उच्च स्थान होते तर म्हणता येते की 'यत्र नार्युस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।' **विपर्यास करायलाही वचने सापडतात; पण ज्यांना समाजाचे संघटन अभिप्रेत आहे, ज्यांना संघटन आवश्यक आहे असे वाटते, त्यांचे हे काम आहे की या सर्व धार्मिक ग्रंथांतून, इतिहासातून परिवर्तनाला; समतेला अनुकूल अशा बाजू पुढे आणून त्या सर्व लोकांपुढे ठेवल्या पाहिजेत. त्या पुढे ठेवून असे वातावरण निर्माण केले पाहिजे की ज्यामुळे हिंदू समाजातील ही सगळी विषमता नाहीशी होईल आणि हिंदू समाज खऱ्या अर्थाने संघटित होईल.**

लहानपणी वाचलेला एक धडा मला आठवतो. गोष्ट अशी की सकाळी एक माणूस कोट घालून हिंडायला निघाला. तेव्हा सूर्य आणि वारा यांची आपसात पैज लागली की याचा कोट कोण काढायला लावतो ! पहिली पाळी वाऱ्याची आली. वाऱ्याने खूप जोराने सुसाट वाहून त्याचा कोट उडवून लावण्याचा प्रयत्न केला. पण जसजसा वारा जोरात वाहायला लागला, अंगाला झोंबायला लागला तसतसा तो माणूस कोट अंगाभोवती अधिकाधिक आवळून धरायला लागला. शेवटी वाऱ्याला आपली हार मानावी लागली. नंतर सूर्याची पाळी आली. तेव्हा सूर्याने हळूहळू तापायला सुरुवात केली. हळूहळू सूर्य तापायला लागला, उष्णता वाढू लागली, त्या माणसाला घाम सुटायला लागला. त्याबरोबर त्या माणसाने आपण होऊनच कोट काढून टाकला. या कथेचे तात्पर्य, आपण लक्षात घेतले तर आपल्याला समाजातून जी विषमता काढायची आहे, ती काढण्याकरिता सगळ्यांचा व्यवहार कशा प्रकारचा असणे इष्ट आहे हे आपल्या लक्षात येईल.

(सांस्कृतिक वार्तापत्र, पुणे यांच्या सौजन्याने)

❖ ❖ ❖

**एकमुखाने, एकदिलाने मातृभूमिला देऊ साद । दुश्मन भिडला सीमेवरि या, उठवू तोफांचा घननाद ।।**

विशेष लेख

## पं. दीनदयाळ उपाध्याय व समरसता

**– मा. आ. विश्वास गांगुर्डे**

पंचवीस वर्षांहून अधिक काळ भारतीय जनता पक्षाचे सक्रीय कार्य. नगरसेवक, आमदार अशा विविध भूमिकेतून या क्षेत्रात काम. लेखन, वक्तृत्व, गायन अशा विविध क्षेत्रात सक्रीय. 'ध्येय पथिक' आणि 'तेज सूर्याचे' ही दोन पुस्तके प्रसिद्ध. संगीताची आवड. स्वामी विवेकानंद जीवनचरित्रावर तसेच डॉ. हेडगेवार यांच्या जीवन चरित्रावर आधारित गीतगायन कार्यक्रमात सहभाग. या दोन्ही कार्यक्रमात गायल्या जाणाऱ्या काही गीतांच्या चाली त्यांनी बांधल्या आहेत.

---

पंडीत दीनदयाळ उपाध्याय हे अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व थोर विचारवंत होते. त्यांचे जीवन अत्यंत व्यग्र असतानाही त्यांनी धर्म, संस्कृती, समाज, इतिहास, शेती विज्ञान, अर्थकारण, ग्रामविकास, भौतिक राष्ट्रवाद, सांस्कृतिक राष्ट्रवाद अशा कितीतरी विषयांवर मूलभूत चिंतनात्मक विचार अनेक भाषणांमधून, तसेच पांञ्चजन्य, ऑर्गनायझर व अन्य विविध नियतकालिके व वृत्तपत्रांमधून लेख लिहून व्यक्त केले आहेत. त्यांच्या या चिंतनशील स्वयंभू सामर्थ्याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू.श्री. गुरुजींनी म्हटले आहे की,

''पं. दीनदयाळजी तात्कालिक विषयालाही एक सैद्धांतिक बैठक देऊन लिहीत असत. त्यामुळे त्यांच्या लिखाणातून अनेक मौलिक सूत्रे आढळतात.''

अशा मूलभूत विचारक पं. दीनदयाळजी यांनी 'हिंदू धर्मातील सामाजिक विषमता' हा विषय म्हणून वेगळा कुठे मांडल्याचे प्रस्तुत लेखकाला आढळले नाही. परंतु भारतीय समाजाचा किंवा राष्ट्राचा संपूर्ण विचार करताना त्या अंतर्गत विविध ठिकाणी आपोआपच सामाजिक समरसतेचा विचार मांडला गेला आहे असे दिसते. त्यांनी दिलेल्या मूलभूत विचारांमध्ये जे चिंतन आहे, त्यामध्ये त्यांनी पाश्चिमात्य विचार पद्धतीची व भारतीय विचार पद्धतीची साक्षेपी तुलना केलेली आहे. पाश्चिमात्य विचार पद्धतीत कोणत्याही गोष्टीचा विचार तुकड्या तुकड्यांनी केला जातो. व्यक्तीचा विचार त्याच्या शरीराबरोबरच केला जातो. प्रत्येक व्यक्तीला शरीराचे सुख हवे असते. म्हणजे भाकरी मिळाली की मनुष्य हा सुखी होतो. पण एवढेच पुरेसे आहे काय ? व्यक्तीला मन असते. चांगलेसे भोजन देऊन व्यक्तीचा अपमान केला तर ते भोजन त्याला आनंद देत नाही. म्हणजे मनाचे सुखही महत्त्वाचे आहे. अर्थात् हेही पुरेसे नाही. मन सुखी असले, शरीराला चांगले खाद्यपेय देऊन सुखात ठेवले परंतु मनुष्याच्या डोक्यात जर विलक्षण घालमेल होत असेल तर त्याला सुख मिळत नाही. यासाठी बुद्धीचे सुखही आवश्यक आहे. पाश्चिमात्य पद्धतीत केवळ शरीराचा प्रामुख्याने भौतिक सुखाचा विचार केला गेला पण भारतीय विचार पद्धतीत शरीराबरोबरच व्यक्तीच्या मनाचा, बुद्धीचा आणि आत्म्याचाही विचार आणि तोही एकत्रितपणे संपूर्ण विचार केला गेला आहे असे दीनदयाळजी सांगतात.

मनुष्य केवळ एकवचनी व्यक्ती म्हणजे 'मी'ने सीमित नसून तिचा अनेकवचनी 'आम्ही'शी म्हणजे समाजाशी निगडित संबंध आहे. समाज हा व्यक्ती व्यक्तींचा समूह आहे हे खरे असले तरी पाश्चात्य विचारसरणीनुसार समाज व्यक्तींनी निर्माण केला ही धारणा मुळातच चुकीची आहे. भारतीय विचारानुसार समाज 'स्वयंभू' आहे. त्याला

स्वतःचे अस्तित्व आहे, स्वतःचे मन आहे, स्वतःचे जीवन आहे, स्वतःचा आत्मा आहे. या आत्म्याला 'चिती' असे नाव असून तोच राष्ट्राचा आधार आहे. राष्ट्र उभे करण्यासाठी एक भूमी व तीवरील समाज यांचा मिळून होणारा एक देश, सर्वांची इच्छाशक्ती म्हणजेच सामूहिक जीवनसंकल्प, राष्ट्राच्या गरजा भागविण्यासाठी निर्माण झालेल्या व्यवस्था किंवा संविधान किंवा धर्म आणि मानवी जीवनाचा आदर्श या चार घटकांची आवश्यकता असते. या चारही घटकांच्या समुच्चयाला म्हणजेच समष्टीला राष्ट्र म्हटले जाते.

अशा प्रकारे राष्ट्राची व्याख्या करून आपल्या देशाबद्दल बोलताना ते म्हणतात. 'आमचे राष्ट्रजीवन एका विस्तृत भू प्रदेशात पसरलेले आहे. या प्रदेशात खूप विविधता आहे. ती अगदी स्वाभाविकपणे उत्पन्न झालेली आहे. जसा नानाविध फुलांना एका धाग्यात गुंफून सुंदर हार तयार करता येतो, तसेच विविधतेने भरलेल्या देशात एखाद्या तात्विक आधारसूत्रामुळे सुंदरसे एकात्म जीवन निर्माण करता येते. आध्यात्मिकता हे भारतीय जीवनमालेचे आधारसूत्र आहे. अर्थात् सूत्रबद्ध होण्यासाठी वस्तूंची प्रकृती समान असली पाहिजे' हे त्यांचे प्रतिपादन आहे.

आमच्या भाषा, उपासना पद्धती, वेषभूषा, खानपान यांच्यामध्ये सर्व प्रकारची भिन्नता असली तरीही त्यांच्यात समन्वय प्रस्थापित केला जाऊ शकतो. **आमच्या अंतःकरणात जर आपल्या मातृभूमीविषयी अविचल श्रद्धा असेल आणि आमची हृदयवीणा जर समान आदर्शांनी आणि जीवनमूल्यांनी झंकृत होत असेल तर समन्वय होणे मुळीच कठीण नाही.** पण ही श्रद्धा नसेल तर त्याच भिन्नतेमुळे भांडणे निर्माण होतील आणि सगळीकडे विघटन होईल. दुर्दैवाने मातृभूमीभक्तीच्या अभावामुळे आमच्या राष्ट्रीय जीवनात अनेक विकृती शिरल्या. पाकिस्तान निर्मितीपासून समाजात उच्चनीच भाव निर्माण होण्यापर्यंत त्यांची अनेक उदाहरणे आहेत.

या विकृतींचे मूळ विचार करण्याच्या पद्धतीत आहे. पाश्चिमात्य विचारप्रणालीनुसार व्यक्ती आणि समाज हे दोन घटक भिन्न आहेत आणि त्यामध्ये नित्य संघर्ष आहे असे मानले जाते. पाश्चिमात्यांच्या बुद्धीतच द्वैत शिरले आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्टीचा विचार संघर्षाच्या आधारेच केला जातो. भारतीय समाजरचनेत व्यक्ती आणि समाजाच्या संबंधांना संघर्षाच्या चष्म्यातून पाहिले नसून त्यांच्यात अभिन्नता मानलेली आहे. म्हणून परस्परांच्या आवश्यकता पूर्तीसाठी प्रत्येक व्यक्तीला योग्य सहकार्य देता यावे त्याचबरोबर स्वतःचा विकास करता यावा व समाज अधिकाधिक समर्थ व्हावा या हेतूने अनेक व्यवस्था समाजामध्ये निर्माण केल्या गेल्या. त्यातील एक व्यवस्था म्हणजे वर्णव्यवस्था !

ज्यांच्या ठिकाणी पौरुष, पराक्रम, बल इत्यादि गोष्टी होत्या ते लोक समाजाच्या संरक्षणासाठी पुढे सरसावले. जे तपश्चर्येच्या आणि ज्ञानसाधनेच्या क्षेत्रात निपुण होते ते ज्ञानविज्ञानात प्रगती घडविण्यासाठी कटिबद्ध झाले. कला, विद्या, वाणिज्य, गोपालन इत्यादि गोष्टीत पारंगत असलेल्या लोकांनी समाजाच्या भरण पोषणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. ज्यांना यापैकी कोणत्याच गोष्टी येत नव्हत्या त्यांनी समाजाच्या लहान-सहान दैनंदिन आवश्यकतांच्या पूर्तीचे उत्तरदायित्व स्वीकारून सेवाव्रत घेतले. यात कुणी लहान नाही की मोठा नाही. समाजरुपी विराट पुरुषाची ही अंगे आहेत. ही सगळीच आवश्यक व आदरणीय आहेत. शरीरातील अवयवांमध्ये संघर्ष शक्य आहे का ? जर संघर्ष असेल तर शरीर चालणारच नाही. या अवयवात एकात्मता आहे. ते एकमेकांचे केवळ पूरकच नसून त्यांच्यात अभिन्नता व आत्मियता आहे. संपूर्ण शरीराच्या विभिन्न अवयवांपैकी काहींना श्रेष्ठ

**एक दीप दुसऱ्यास चेतवी ऐसे अगणित होती । जागृत हा राष्ट्रास जागवी देउनि जीवनस्फूर्ती ।।**

व काहींना नगण्य मानणाऱ्यांना मूर्खच म्हणावे लागेल. वर्णाची मूळ कल्पना ही एकात्म भावावरच आधारलेली होती. असे भाव नसतील तर ते वर्ण परस्परपूरक न राहता परस्परविरोधी होतील. हा दोष आहे, ही तर अव्यवस्था आहे.

शरीराचे बाह्यरूप व शरीराच्या विविध क्रियांचे संचालन शरीरांतर्गत असलेला प्राणच करीत असतो. हे प्राणतत्त्व क्षीण झाले की शरीर थकून, गळून जाते आणि मग त्या बाह्यरुपात विकृती व दोष निर्माण होतात. अशी मनोविकृती व दोष समाजरूपी शरीरातही निर्माण झाले की समाजात भेद आणि संघर्षाचा उद्‌भव होतो आणि अशा भेद आणि संघर्षावर आधारलेली कोणतीही व्यवस्था नीट उभी राहू शकत नाही. अनेक कारणांमुळे समाजातील संस्थांमध्ये दोष येतो. समाजाचा प्राण दुबळा झाला तर समाजरुपी शरीर दुबळे व निस्तेज होते. देश, काल, परिस्थिती यानुसार संस्थांची उपयुक्तता व आवश्यकता यात फरक पडतो.

परस्परपूरकता व एकात्मता याच व्यवहाराचे मोजमाप होऊ शकतात. कुटुंब, जात, वर्ण, पंचायत, राज्य इत्यादी सर्व संस्था राष्ट्र व मानव यात अंतर्भूत आहेत. त्यांच्यात एकात्मता असली पाहिजे. ते परस्परावलंबी व परस्परपूरक आहेत. यासाठी त्यांच्यात एकमेकांबद्दल अनुकूल वृत्ती उत्पन्न झाली पाहिजे व त्यात परस्परविरोध व तंटा असता कामा नये. यासाठी एकात्मभावाने व तन्मयतेने त्या व्यवस्थेचे चैतन्य जागृत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे म्हणजे विकृती जाऊ शकेल व क्षीणता नाहीशी होऊ शकेल. प्राणांचा संचार होताच सगळे कुविचार पळून जातील व समाजरूपी शरीर निरोगी होईल.

ते पुढे म्हणतात, मानवतेच्या समग्र व संकलित स्वरूपाच्या विचाराच्या आधारावर वाटचाल केल्यास भारतीय संस्कृतीच्या शाश्वत मूल्यांबरोबरच राष्ट्रीयता, लोकशाही, समता व विश्व एकता या आदर्शांना एकात्म रूपात राखू शकू. त्यासाठी राष्ट्राचा 'विराट' जागृत करावा लागेल. ज्या शक्तीमुळे राष्ट्राची उभारणी होते त्याला विराट म्हणतात. 'विराट' ही राष्ट्राची कर्मशक्ती आहे. राष्ट्रात 'विराट' बलशाली असेल तर राष्ट्राचे सर्व अवयव व संस्था समर्थ व कार्यक्षम राहतात. या अवस्थेमध्ये राष्ट्राची विविधता व वैचित्र्य त्याच्या एकतेला बाधक ठरत नाही. भेद असले तरी समाजात संघर्ष होत नाही. यातूनच अधिक गौरवशाली भारत निर्माण होईल.

**अशा प्रकारे पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी देशामधील अनेक भेदाभेदांवर प्रखर राष्ट्रभक्ती व राष्ट्राला शरीररूप मानून त्याचे अविभाज्य घटक असलेल्या विविध जाती, पंथ, भाषा धारण करणाऱ्या सर्वांनी परस्परपूरक व एकात्मतेची भावना जागृत ठेवणे हाच रामबाण उपाय आहे हे त्यांच्या 'एकात्ममानववाद' या सिद्धांतामध्ये सांगितले आहे आणि त्यातूनच समाजात समरसता निर्माण होऊ शकेल.**

**– विश्वास गांगुर्डे**
A3/11, सूर्यप्रभा गार्डन्स, केंजळेनगर,
बिबवेवाडी, पुणे ३७.
भ्रमणभाष – ९४२२३२३२६४

❖ ❖ ❖

**बुद्धिदास्य विषमता विनाशक दानवतेचे दुर्ग भयानक । वारुनि आले वीरव्रती जे चराचराचे करि संजीवन ।।**

विशेष लेख

## श्री. एकनाथजी रानडे आणि समरसता

– श्रीमती निवेदिता भिडे

गेल्या ४० वर्षांपासून विवेकानंद केंद्राच्या जीवनव्रती कार्यकर्त्या. तमिळनाडू प्रांतात अनेक वर्षे शैक्षणिक क्षेत्रात काम. विवेकानंद केंद्राची पूर्वोत्तर राज्यांमधील शैक्षणिक व सांकृतिक विषयात चालणाऱ्या कामांमध्ये अनेक वर्षे काम केले. विपुल लेखन, ओघवती वक्तृत्वशैली. सध्या विवेकानंद केंद्राच्या उपाध्यक्षा या नात्याने कार्यरत आहेत.

**समरसता ही आत्मीयतेचा भाव आणि एकात्म जीवनदृष्टितून आलेली सामाजिक कृती आहे.** विवेकानंद केन्द्राचे संस्थापक श्री. एकनाथजी रानडे हे स्वामी विवेकानंदांचे अभ्यासक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक असल्यामुळे त्यांच्या जीवन व्यवहारात समरसता दिसते.

संघकार्य करीत असताना समाजाला आत्मीयतेने जोडणाच्या कार्याव्यतिरिक्त जेव्हा जेव्हा आवश्यकता पडली तेव्हा समाजाच्या पीडित, वंचित वर्गासाठीसुद्धा त्यांनी विशेष कार्य केले. जेव्हा भारताच्या फाळणीनंतर पूर्व पाकिस्तानातून म्हणजेच आजच्या बांग्लादेशातून अनेक निर्वासित आले, तेव्हा 'वास्तुहारा साहाय्य समिती' स्थापन करून एकनाथजींनी अनेक निर्वासितांना वसविले. निर्वासित छावणीमधील अनेक युवकांना त्यांनी योग्य मार्गी लावले. तसेच १९५० नंतर जेव्हा आसाममध्ये भूकंपामुळे ब्रह्मपुत्रा नदीने अनेक गावं गिळंकृत करत आपला मार्ग बदलला, त्यावेळीही विस्तृत प्रवास करून तिथेही मा. एकनाथजींनी सेवा कार्य सुरू केले.

जेव्हा मा. एकनाथजींना परम पूजनीय श्री. गुरुजींनी विवेकांनद शिलास्मारकाचे दायित्व दिले, तेव्हा त्यांनी त्या कामाला पूर्णपणे स्वत:ला वाहून घेतले. **विवेकानंद स्मारक उभारण्यामागे ज्या मुख्य प्रेरणा होत्या, त्यातील एक प्रेरणा स्मारकाच्या निमित्ताने कन्याकुमारी क्षेत्रात सेवा कार्य उभे करावे ही होती.** कन्याकुमारी येथील सांस्कृतिक पाळेमुळे गमावलेल्या स्थानिक जनतेची दुर्दशा बघून मा. एकनाथजी हेलावले होते. श्री. जुगल किशोर बिर्ला यांना ५ एप्रिल १९६५ रोजी सुंदर हिंदी भाषेत लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपल्या भावनांना वाट करून दिली. ''.... आवश्यकता है, केवल उन उपेक्षित और परतंत्र लोगों के प्रति अकृत्रिम आस्था और आत्मियता रखनेवाले दीर्घोद्योगी चन्द कार्यकर्ताओंकी और अनेक सुनियोजित संगठित प्रयत्नों की । 'विवेकानंद स्मारक' उस महान उद्योग-पर्व का सूत्रपात मात्र है। यदि भविष्य का वैसा स्पष्ट निर्देश मेरी बुद्धि को न मिलता तो केवल पत्थर के ऊपर पत्थर रखने के निर्जीव से कार्य में मुझे कोई रूचि न होती । भविष्य के गर्भ में छिपे हुए उस मंगलमय निर्माण के साक्षात्कार ने ही मुझे अनप्राणित व उत्स्फूर्त किया है ।'

मा. एकनाथजींची कार्यशक्ति इतकी प्रचंड आणि व्यापक होती की विवेकानंद शिलास्मारक फक्त कन्याकुमारीच्या उपेक्षितासाठीच सेवा कार्याची प्रेरणा ठरले नाही तर पूर्ण देशभरातील उपेक्षितांसाठी सेवा कार्याची प्रेरणा ठरले.

स्वामी विवेकानंदांचे स्मारक फक्त शिलास्मारकापर्यंत सीमित न करता स्वामी विवेकांनंदानी ज्या सेवा कार्याची अपेक्षा केली होती, असे सेवा कार्य करणारे जीवंत स्मारक मा. एकनाथजींना उभे करायचे होते. ''ईश्वरावरील श्रद्धेतून लाभलेल्या सामर्थ्यांने संपन्न असे लक्षावधी स्त्री-पुरुष येथील पददलितांविषयीच्या अपार करूणेने प्रेरित

**बंधुभावना हीच प्रेरणा हृदयामधली ज्योत तेवती । या भूमीच्या कणाकणाशी भक्तिभावना जुळवी नाती ।।**

झाल्यामुळे मृगेंद्राचे धैर्य धारण करून, जेव्हा देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत संचार करतील आणि मुक्तिचा, सेवेचा, सामाजिक जागृतीचा आणि एकतेचा संदेश पोहोचवतील तेव्हा हिंदुस्थानच्या पुनरुत्थानाची पहाट उजाडेल'' स्वामी विवेकानंदांचे हे स्वप्न एकनाथजींच्या माध्यमातून साकार होण्याला प्रारंभ झाला. अशा युवक-युवतींना प्रशिक्षण देऊन सेवा कार्यासाठी देशभर पाठवण्यासाठी विवेकानंद केन्द्र अध्यात्म प्रेरित सेवा संघटनेचा जन्म झाला.

अशा प्रशिक्षित युवक-युवतींना कुठे पाठवायचे ? ''गहनारण्ये घनान्धकारे बंधु जना ये स्थिता गव्हरे, तंत्र मया संचरणीयम्, लोकहितम् मम करणीयम्' हा भाव धारण करून या प्रक्षिशित जीवनव्रतींना मा. एकनाथजींनी दूरच्या अरूणाचल प्रदेशात पाठविले. उपेक्षित, पीडित, दुर्गम भागातील आपल्या लोकांमध्ये आपण कसे काम करावे याबद्दल मा. एकनाथजींचे विचार स्पष्ट होते. एखाद्या समाजाचा विकास कसा व्हावा, याची इतरांनी व्याख्या करावी वा तो इतरांनी ठरवावा हे त्यांना मंजूर नव्हते. हा विचार त्या समाजातूनच झाला पाहिजे तेव्हा केंद्राने त्यांची उत्तरे त्यांनी स्वत: शोधून काढण्यासाठी केवळ त्यांना सहाय्य करावे असे त्यांचे स्पष्ट म्हणणे होते. त्यांनी केंद्र कार्यकर्त्यांना मंत्र दिला, की **''उत्तर पूर्वांचलातील त्या आपल्या लोकांबरोबर तुम्ही रहा, त्यांना समजून घ्या. जेव्हा तुम्ही त्यांना आपले म्हणून स्वीकाराल तेव्हाच त्यांच्यासाठी कार्य करण्याची योग्यता तुम्ही प्राप्त कराल. तुम्ही त्यांना शिकवायला नाही तर त्यांच्यापासून शिकायला जात आहात.''** मा. एकनाथजी जणू हा समरतसेचा मंत्रच कार्यकर्त्यांना दिला.

ईशान्य भारतात अनेक पारंपारिक वनवासी जनजाती आहेत. त्या साधारणपणे आदिवासी जनजाती म्हणून ओळखल्या जातात. त्यांची संस्कृती अतिशय समृद्ध आहे. त्यांच्या भाषा, वेष, पूजापद्धती, देवीदेवता वरवर पाहता एकमेकांपासून भिन्न आहेत. पण त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कोणत्याही अन्य भारतीयांप्रमाणेच एकात्म आहे. परंतु दुर्दैवाने या वरपांगी दिसणाऱ्या 'विविधतेला' पाश्चात्य विद्वानांनी 'भेदाचे' स्वरूप दिले. त्यामुळे विभक्त वादाची प्रवृत्ती तिथे वाढू लागली. आपल्या पाळयामुळ्यांपासून जर त्या दूर झाल्या तर या जनजाती आपली अस्मिताच गमावतील आणि संघर्षाबरोबरच एक अशांतीचेही वातावरण वाढेल. हा धोका मा. एकनाथजींनी ओळखला. म्हणूनच त्यांनी 'विवेकानंद केंद्र इन्स्टिट्यूट ऑफ कल्चर' स्थापन करण्याची योजना आखली. ही संस्था समाजातील विविध जाती जनजातींना जोडणारी समानसूत्रे काय आहेत, तसेच संस्कृती आणि विकास दोन्ही एकत्र कसे साधता येईल यावर कार्य करेल. थोडक्यात सामाजिक समरसतेचे भावात्मक, वैचारिक आणि व्यावहारिक अधिष्टान पक्के करण्याचे कार्य ही संस्था करेल असा त्यांनी विचार मांडला. थोडक्यात मा. एकनाथजींनी सेवा कार्यासोबत शाश्वत रूपाने आपल्या समाजाला जोडणारी जी समानसूत्रे आहेत, त्याच्यावरही कार्य करण्याचे दायित्व विवेकानंद केंद्रावर सोपवले.

मा. एकनाथजींनंतर विवेकानंद केंद्र हे कार्य समर्थपणे ईशान्य तसेच देशाच्या अन्य भागातही करत आहे. स्वामी विवेकानंदांनी सांगितलेल्या 'मानव सेवा हीच माधव सेवा', ईश्वराची आराधना आर्त आणि विपन्नांमध्ये केली पाहिजे ही तत्वे केंद्र प्रार्थनेमध्ये शब्दांकित करून एकनाथजींनी केंद्र कार्याला समरसतेचे अधिष्ठान दिले आहे.

❖ ❖ ❖

**स्वार्थाचे ओलांडुन कुंपण व्यक्तित्वाचा कोषहि फोडून । विसरुन अवघे अपुले मीपण विराट साक्षात्कार जागवुन।।**

विशेष लेख

# स्व. डॉ. अप्पासाहेब पेंडसे एक युवाव्रती

– प्रा. राम डिंबळे

प्रा. श्री. रामचंद्र डिंबळे हे मूळ सिंहगड किल्ल्याच्या पायथ्यापाशी असलेल्या कल्याण गावचे रहिवासी. स्व. अप्पासाहेब पेंडसेंनी या चुणचुणीत मुलाला शिक्षणासाठी पुण्यात आणले. ज्ञानप्रबोधिनीत त्यांची सर्वांगीण जडणघडण झाली. संस्कृत विषयात पदव्युत्तर शिक्षण घेऊन काही काळ त्यांनी अध्यापनाचे काम केले. प्रबोधिनीच्या माध्यमातून ग्रामविकास, उद्योग निर्मिती, युवा संघटन या विषयांमध्ये स्वतःला झोकून दिले. सध्या ते प्रबोध उद्योगचे संचालक व 'स्व'-रूपवर्धिनीचे सहकार्याध्यक्ष आहेत. काव्यरचना, वाचन, लेखन, व्याख्याने, प्रवास अशा अखंड व्यापातूनही युवा कार्यकर्त्यांच्या पाठीशी ते भक्कमपणे उभे असतात. प्रत्यक्ष सहवासातून रामभाऊंनी अनुभवलेले कै. अप्पासाहेब पेंडसे यांचे चरित्र संक्षेपाने या लेखात मांडले आहे.

---

बुद्धिमान मुलांना प्रेरक शिक्षण देऊन पूर्ण विकसित करायचे आणि वैयक्तिक भरभराटीच्या नशेत न गुंतू देता त्यांना आपल्या समाजाला उत्तरदायी करायचे या ध्येयवादाने १९६२ पासून वीसेक वर्षे ज्यांनी एक अभिनव शैक्षणिक संघटन बांधले त्या कै. अप्पासाहेब पेंडसे यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे.

ज्ञानप्रबोधिनीचे काम सुरू होण्यापूर्वीच्या काळात अप्पासाहेबांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रचारक म्हणून अनेक वर्षे काम केले. समाजासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करण्याचा ध्येयवादी संकल्प तिथून सुरू झाला. अप्पांच्या आचारविचारात एक विलक्षण आच, उत्कटता तर होतीच. पण त्याबरोबरीने चाकोरीबाहेरच्या, काळाच्या पुढच्या आणि कळपापलिकडच्या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याची धमकही होती. संघाने-हिंदुत्ववाद्यांनी-शाखावृद्धीसह समाजाच्या सर्व प्रश्नांना गवसणी घातली पाहिजे असे ते संघबंदीनंतरच्या काळात आग्रहाने मांडीत राहिले. १९५१ सालच्या दुष्काळात त्यांनी संघाची दुष्काळ विमोचन समिती कार्यरत केली. संघाने खेड्यात जाऊन श्रमदान करावे व ग्रामीण माणसे जोडावीत; त्याकाळच्या भयावह एन्फ्लुएन्झाच्या साथीत होमिओपाथी उपचार केंद्रे चालवावीत असे त्याकाळी ठाऊक नसणारे उपक्रम त्यांनी प्रसंगी कटुता पत्करुन संघात राबविले. आज संघाची परिवारकार्ये चहू अंगांनी समृद्ध झाली आहेत. संघाच्या या अभिमानास्पद सेवाकार्यांचा ओनामा या पर्वात झालेला आहे.

अप्पा अथक चळवळ्ये – ॲक्टिव्हिस्ट् होते. पण त्याचबरोबरीने ते उत्तम विचारप्रवर्तन (थॉट्लीडरशिप) करणारे अभ्यासू वक्ते आणि लेखक होते. स्वामी विवेकानंदांचे विचार हिंदुतेचा उद्घोष करणारे आणि भावी भारतराष्ट्राचे स्वप्न मांडणारे होते असे त्यांनी 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' या चरित्रग्रंथात साधार प्रतिपादन केले. त्यावेळी त्यांच्या या मांडणीने, निव्वळ अध्यात्ममार्गी अर्थ लावणाऱ्या आणि सेक्युलरपंथी लोकांची मोठी पंचाईत झाली. पुढच्या काळात स्वामीजींचे विचार हे उत्कट राष्ट्रवादाचे प्रतीक बनले. असाच व्यासंग त्यांनी शिखांच्या इतिहासाचा केला. महाराणा रणजितसिंहांचे सेनापती हरिसिंह नलुआ यांचे चरित्र लिहून सिक्ख संप्रदाय हा हिंदूंच्या रक्षणार्थ उभारलेल्या वेचक हिंदू शिष्यांचा पंथ म्हणून कसा काम करीत होता ते दाखविले. पुढे १९८२ च्या सुमारास

खलिस्तानी विद्रोह उभा राहिला तेव्हा हिंदू व शिखांमध्ये वैर होणे कसे अनैतिहासिक आहे हे सांगण्यासाठी पंजाबभर प्रबोधिनीची सद्भावयात्रा ही आग विझवीत हिंडत होती. थोडक्यात, या देशात स्वाभिमान व ऐक्य दृढ व्हावे याच्यासाठीचा व्यासंग, लेखन, चळवळी करणे हा त्यांच्या व्यग्रजीवनक्रमाचा भाग होता.

अप्पासाहेबांनी जो शैक्षणिक सिद्धांत मांडला तोही अगदी अभिनव व सहृदयतेचा तर होताच, पण त्याला शास्त्रकाट्याची कसोटीही लावली होती. त्यांचे म्हणणे होते, की बुद्धिमत्ता ही कोण्या चार सवर्णजातींची मक्तेदारी नव्हे. ती सर्व आर्थिक व सामाजिक थरात आहेच. ती शोधली पाहिजे, तिचे संगोपन केले पाहिजे; कारण त्यातूनच उद्याचे सक्षम नेतृत्व घडवता येईल. यासाठी त्यांनी प्रबोधिनीत बुद्धिमापन व संगोपनासाठी संशोधन संस्था काढली. ज्ञानप्रबोधिनी प्रशालेने या संशोधनाचा आधार घेत एक उत्कृष्ट शाळा उभी केली. मग पुढे काळाच्या ओघात खेड्यात तंत्र व कृषिशाळा काढल्या. साळुंब्र्यात ग्रामप्रबोधिनी, हराळी (उस्मानाबाद) येथे कृषिशिक्षण व प्रयोगशाळा, सोलापूर व निगडीत दर्जेदार विद्यालये स्थापन केली. गुरुकुल, क्रीडाकुल काढले. प्रबोधिनीने अशा कितीक प्रकारच्या शाळा काढल्या आणि बुद्धिसंगोपनातून मुले कशी घडवता येतात ते दाखविले.

समाजाच्या प्रश्नांना सामोरे जाणारे कार्यकर्ते घडवण्याचे हे विद्यातंत्र हाच अप्पासाहेब आणि किशाभाऊ पटवर्धन यांचा समान ध्येयधागा होता. दोघेही संघाचे कार्यकर्ते व एकमेकांचे सहकारी. किशाभाऊंनी प्रबोधिनीचा हाच शिक्षणमंत्र त्याला अधिकचा सामाजिक आशय जोडून उपेक्षित बुद्धिमत्तेच्या संवर्धनासाठी 'स्व'-रूपवर्धिनीच्या रूपाने पूर्व पुण्यात राबवला; वाढवला.

अप्पासाहेब केवळ विद्यालये काढून थांबले नाहीत. हे विद्यालय स्वायत्त व स्वावलंबी करण्यानेच स्वाभिमानाचे शिक्षण देणारे होईल, हे ध्यानी घेऊन त्यांनी शासकीय अनुदानाविना संस्था कशी चालवायची याचा प्रयोग उभारला. स्वतःचे अनेक प्रकारचे उद्योग व्यवसाय उभे केले. त्यातून लिफ्टस्, कपॅसिटर्स्, खांडसारी साखर, एंजीनियरिंग असे विविध उत्पादक उद्योग चालवले. त्यातल्या चढउतारांचे धक्केचपेटे सोसून अर्थार्जन केले. उद्यमाचा हा वसा प्रबोध उद्योग समूहाच्या रूपाने गेली २७ वर्षे कार्यरत आहे. याच गोत्रातला 'स्वप्नउद्योग' हा 'स्व'-रूपवर्धिनीच्या तरुणांनी चालवलेला उद्योगसमूहदेखील ध्येयवादी शिक्षणाच्या सेवेस उभा राहिला आहे.

शिक्षणाला अप्पांनी ग्रामविकासाची जोड दिली. गेली ५० वर्षे सुमारे २०० गावात शेती, पाणलोट, उद्योग, महिला संघटन अशा चहूअंगांनी काम करीत प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक प्रयोगशाळेचे अंग सांभाळणारा हा विभाग आहे. प्रबोधिनी विद्यार्थ्यांना आपल्या आध्यात्मिक परंपरेचा अनुभव देते. त्यासाठी लोकसुलभ संस्कारपोथ्या व संस्कृतीचा अभ्यास घडविणारी 'संत्रिका' चालविली जाते.

अप्पांचे १९८३ साली निधन झाले. तदनंतरच्या ३२ वर्षात प्रबोधिनी कितीतरी अंगांनी वाढली, बहरली आहे. अप्पांना नावीन्याचा ध्यास होता. तुम्हाला नवीन काय सुचले ? असा धोशा ते कार्यकर्त्यांच्या मागे लावीत. नवनवीन कल्पना आणि उपक्रम राबवताना अपयश आले तरी त्यांना त्याची तमा नसे. सुरक्षित, जुन्याच कल्पनांच्या कवचाआड लपणे त्यांना नामंजूर होते. सतत प्रयोग करीत राहण्याचा त्यांचा स्वभाव होता. लोक कोणत्याही

नवकल्पनांचा उपेक्षा, उपहास, विरोध अशा अंगांनी प्रतिकार करीत असतात. हिंमत व चिकाटी असली तरच हे अडथळे ओलांडून नवे मार्ग रुढ करता येतात. खुद्द प्रबोधिनीची कल्पनादेखील पुण्यातील काही तज्ज्ञांनी 'अनावश्यक' असा शिक्का मारून उपेक्षिली होती. अप्पांनी आणि त्यांच्या विश्वासू सहकारी, विद्यार्थ्यांनी ती यशस्वी करून दाखवली. 'प्रबोधिनी' हा शब्ददेखील प्रदीर्घ प्रयत्नांतीच लोकमान्य झाला. अप्पांना नेहमीच काळाच्या पुढची आव्हाने खुणावीत असत. त्यामुळेच आजची प्रबोधिनी अनेक नवविचारांची भर घालीत वाढते आहे.

उद्योग, संशोधन, ग्रामविकास, युवा संघटन अशा चार खांबांवर अधिष्ठित शिक्षणपद्धतीच मुलांना 'माणूस घडविणारी' विद्या देऊ शकेल. ती काही मूलभूत श्रद्धांच्याबाबत अगदी सनातनी कडवेपणा शिकवील आणि त्याचवेळी विज्ञानतंत्रज्ञानाचे बाबतीत अत्याधुनिक राहायला सांगेल. मुलांचा वेष भारतीय असला पाहिजे आणि या वेषात जगताना उद्योग, तंत्रज्ञान क्षेत्रात त्यांनी पराक्रम गाजवले पाहिजेत. मुलांनी सामुदायिक ध्यान उपासना केली पाहिजे, वारीत व गणेशोत्सवात जनसामान्यांबरोबर नाचले पाहिजे आणि आपत्तीप्रसंगी देशाच्या कानाकोपऱ्यात मदतीसाठी धाव घेतली पाहिजे व त्याचबरोबरीने मूलभूत संशोधन, आणि उद्योग विश्वात अग्रभागी असले पाहिजे. अशा रीतीने सहृदय, भारतीय वृत्तीचे, विज्ञानवादी तरुण घडवता येतात हे त्यांनी सिद्ध करून दाखविले.

अप्पा आग्रही हिंदुत्वाभिमानी होते. तथापि विविध राजकीय विचारसरणींशी त्यांचा हार्दिक संवाद होता. वैचारिक मतभेद व दऱ्यांवर सौहार्दाचे पूल बांधण्याची त्यांची पद्धत अपूर्व अशीच होती. आपले युवक सखोल अभ्यास करणारे, जाणते व्रती व्हावेत असा त्यांचा ध्यास होता. आपले काम समाजाच्या सर्व थरात आणि भारताच्या सर्व भागात पोहोचवण्याचा त्यांचा प्रयास होता.

त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आपण त्यांचा हा संकल्प सिद्धीला नेण्याचा वसा घेऊ या.

❖ ❖ ❖

## जागतिक योगदिन

**भगिनी निवेदिता शाखा –** पालक व वर्धिका यांची एकत्रित योगासने.

**समर्थ रामकृष्ण शाखा –** वर्धकांच्या गटश: योगासन स्पर्धा युवक वर्धक श्री. किशोर बेलोसे याचे 'योगासनाचे महत्त्व' यावर मार्गदर्शन.

**स्वामी अखंडानंद शाखा –** एकत्रित योगासनांचा कार्यक्रम. २७ व २८ जून सौ. अंजली देशमुख यांचा योगासनांचा वर्ग व व्याख्यान.

**स्वामी अभेदानंद शाखा –** वीर बाजीप्रभू विद्यालयाच्या कार्यक्रमात शाखेचे सर्व वर्धक सहभागी.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –** बाबुराव सणस मैदानावरील कार्यक्रमात शाखेच्या १० वर्धकांची योगासनांची प्रात्यक्षिके.

**सारखी लायकी नको बढायकी कुणी कुणासंग भांडायच नाय । गावकीत अमुच्या ठरलच हाय ।।**

## केंद्रीय वृत्त

### मकर संक्रमण उत्सव

एखाद्या मोठ्या क्रीडा स्पर्धेच्या उद्‌घाटन सोहळ्याप्रमाणे 'स्व'-रूपवर्धिनीचा मकर संक्रमण उत्सव २५ जानेवारीला जनरल अरुणकुमार वैद्य स्टेडियमवर भव्य व नावीन्यपूर्ण क्रीडा प्रात्यक्षिकांच्या सादरीकरणाने साजरा झाला. कसून केलेल्या सरावाने सर्व प्रात्यक्षिके नेत्रदीपक झाली. यामध्ये रिबीन नृत्य, मानवी मनोरे, कमांडो प्रशिक्षण, जिम्नॅस्टिक्स, फुटबॉल, एरोबिक्स, सायकल कसरती, मल्लखांब, ढाल-तलवारी यांचे मर्दानी खेळ, बॅटरी कवायत, जाळातील उड्या या प्रात्यक्षिकांचा समावेश होता.

कार्यक्रमाला टाटा मोटर्स, कार प्लांटचे प्रमुख श्री. अनुपकुमार जैन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. हेमंत भुजबळ यांनी लिहिलेल्या 'Management' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. पाहुण्यांनी सर्व वर्धकांचे कौतुक करून या प्रात्यक्षिकातून अंगी बाणलेल्या एकाग्रता, सांघिक भावना, सफाईदारपणा या गुणांचा उपयोग पुढच्या वाटचालीत करा असे सांगितले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. सचिन सनगरे यांनी तर प्रात्यक्षिकांचे सूत्र संचालन श्री. शुभम जगताप याने केले. श्री. केदार भंडारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. वर्षभर शाखांमध्ये झालेल्या कार्यक्रमांचे वृत्त स्वामी विवेकानंद शाखेचा वर्धक कु. श्रेयस ढेबे व भगिनी निवेदिता शाखेची वर्धिका कु. समृद्धी यादव यांनी सादर केले. वर्धिनीत वर्षभर नव्याने सुरू केलेल्या क्रीडा प्रकल्पाची माहिती व त्यामागील उद्देश प्रकल्प प्रमुख डॉ. विनेश नगरे यांनी सर्वांसमोर ठेवला. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते क्रीडादिनामध्ये वेगवेगळ्या खेळांतील 'उत्कृष्ट खेळाडू' म्हणून निवडलेल्या खालील वर्धकांना बक्षिसे देण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| १) कु. राकेश चांभार | - नरवीर तानाजी मालुसरे शाखा | - इ. ५ वी, ६ वी | - लंगडी |
| २) कु. चिराग भगत | - स्वामी ब्रह्मानंद शाखा | - इ. ७ वी, ८ वी | - खोखो |
| ३) कु. तुषार काबदुले | - स्वामी दयानंद शाखा | - इ. ९ वी, १० वी | - कबड्डी |
| ४) कु. केतन खेडकर | - स्वामी ब्रह्मानंद शाखा | - इ. ११ वी, १२ वी | - हँडबॉल |
| ५) कु. अक्षय जगताप | - स्वामी श्रद्धानंद शाखा | - महाविद्यालयीन गट | - कबड्डी |
| ६) श्री. चेतन कुसाळकर | - भाग ४ | - व्यावसायिक गट | - व्हॉलीबॉल |

या कार्यक्रमात माडगावकर पुरस्कारही देण्यात आले. याबद्दलची माहिती श्री. विश्वास कुलकर्णी सरांनी सांगितली. श्री. अरविंद केळकर यांच्या आभार प्रदर्शनानंतर प्रार्थना होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. हा सोहळा पाहण्यासाठी पालक, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मकर संक्रमण उत्सव प्रमुख म्हणून अभेदानंद शाखेचे युवक श्री. अमोल शेलार यांनी काम पाहिले.

❖ ❖ ❖

**गावात बेकी घरात बेकी बेकीन भरली सारी मनं । नुकसानीचा पाया खोदला घेउनिया हे ध्यानात ।।**

## शुभेच्छा समारंभ

‘‘प्रतिकूलता हीच जीवनातील सर्वात मोठी अनुकूलता असते. या प्रतिकूलतेला सामोरे जाऊन आपण यश संपादन केले पाहिजे’’ असे मत शिक्षणतज्ज्ञ डॉ. अ. ल. देशमुख सर यांनी १०वी, १२वी शुभेच्छा समारंभात मांडले.

ते पुढे म्हणाले की, ‘आपली उत्तरपत्रिका ही देखणी असली पाहिजे. उत्तरपत्रिका तपासणाऱ्याचे मानसशास्त्र लक्षात घेऊन उत्तरे लिहिली पाहिजेत. उत्तम हस्ताक्षर हे आपल्या गुणांमध्ये वाढ घडवून आणते.’

डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या जीवनातील अनुभव सांगत ते म्हणाले, ‘‘तुम्हीही सर्वजण अशाच गरीब घरांमधून शिकत आहात. परंतु तुमच्या पाठीशी वर्धिनी आहे. त्यामुळे तुम्हाला भरपूर संधी उपलब्ध आहे. या शेवटच्या दिवसांमध्ये १०-१२ तास अभ्यास करून उत्तम गुण मिळवू शकाल. त्यासाठी खूप कष्ट घेतले पाहिजेत.’’

वर्धिनीच्या भावी कार्यकर्त्यांना त्यांच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी ‘स्व’-रूपवर्धिनीतर्फे पेन भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. मुलांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ‘वर्धिनीने सुट्टीच्या कालावधीत घेतलेले पूर्वपीठिका शिबिर सर्वांना अभ्यासाचे नियोजन करण्यासाठी उपयोगी ठरले. त्याचप्रमाणे शाखेवरील दादांनी उत्तम नियोजन करून घेतले.’ परीक्षेत वर्धिनीला अभिमान वाटावा असेच गुण मिळवण्याचा संकल्पही वर्धकांनी यावेळी व्यक्त केला.

## विज्ञान दिन

दि. १ मार्च रोजी केंद्रीय विज्ञान दिन संपन्न झाला. **पाऊस खूप जोरात पडत होता तरीसुद्धा सर्व बालवैज्ञानिक पावसाची तमा न बाळगता विज्ञान दिनाच्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.** लहान गटामधून एकूण १३ तर मोठ्या गटामधून एकूण १२ प्रयोग अंतिम फेरीसाठी पात्र ठरले होते.
लहान गटामध्ये खालीलप्रमाणे प्रयोग होते :

१) नैसर्गिक वनस्पती व औषध केंद्र
२) अवकाश तारांगण
३) Mobile Charging Without Electricity
४) Robotic Cleaner
५) धोक्याच्या सूचनेचा गजर
६) जलप्रदूषण
७) Pepsi मधील $CO_2$
८) विद्युत चुंबक प्रक्रिया
९) मजेदार अंडे हवा जागा व्यापते का ?
१०) बॅटरीवर चालणारी गाडी
११) स्टेथोस्कोप
१२) बॅटरी मोबाईल चार्जर
१३) प्रोजेक्टर

मोठ्या गटाचे प्रयोग पुढीलप्रमाणे होते :

१) इलेक्ट्रीक आसारी
२) Advance Parking
३) कीटकनाशक जाळे
४) Automatic Street Light
५) Biogas Plant
६) Water Treatment Plant

इथे निनादे सहस्रवदनी ‘सहनाववतु’ एकचि वाणी । समान सकलां जीवनसरणी रंक असो वा ते अधिराजे ।।

७) जलविद्युत
८) Crude Oil Collecting System
९) थर्माकोलचा पुनर्वापर
१०) Electric Motor Pump
११) उर्जेपासून पाणी गरम करणे
१२) पेरिस्कोप

**युवक गटामधील पॉवरपॉईंट सादरीकरण :**

* स्वामी दयानंद शाखा : Heat pump for Agri Product Drying, * स्वामी श्रद्धानंद शाखा : कृष्णविवर या प्रकारे सर्व मुलांनी मोठ्या उत्साहाने विज्ञान दिनामध्ये सहभाग घेतला.

वेगवेगळ्या प्रयोगांमध्ये एकूण १५० मुलांचा सहभाग होता. या विज्ञान दिनासाठी लहान गटाला सौ. दीप्ती डोळे व सौ. इंदुमती दराडे हे परीक्षक लाभले होते तर मोठ्या गटासाठी सौ. कल्पना वर्तक व श्री. कौस्तुभ देशपांडे हे परीक्षक लाभले होते. कौस्तुभ दादाने काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. प्रथम मुलांच्या संकल्पना स्पष्ट केल्या पाहिजेत. त्यांनी आधी स्वत: तो प्रयोग केलेला पाहिजे व त्यांना नेहमी ''का'' हा प्रश्न पडला पाहिजे जेणेकरून मूलभूत संकल्पना स्पष्ट होतील. मुलांचे कुतुहल एका दिवसापुरते न राहता कायम रहावे हाच या विज्ञान दिन घेण्यामागचा मुख्य उद्देश आहे. सौ. दराडे यांनी मुलांच्या शिस्तीचे व प्रामाणिकपणाचे कौतुक केले. सर्जनशीलता वाढावी यासाठी प्रयोग करीत राहिले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

**-: विजेते :-**

**लहान गट :**

| | प्रयोगाचे नाव | शाखा |
|---|---|---|
| १. | Mobile Charging Without Electricity | स्वामी श्रद्धानंद शाखा |
| २. | Projector | स्वामी ब्रह्मानंद शाखा |
| ३. | मजेदार अंडे<br>हवा जागा व्यापते | भगिनी निवेदिता शाखा |

**मोठा गट :**

| प्रयोगाचे नाव | शाखा |
|---|---|
| Crude Oil Collecting System | स्वामी अभेदानंद शाखा |
| इलेक्ट्रीक आसारी | समर्थ रामकृष्ण शाखा |
| उर्जेपासून पाणी गरम करणे | स्वामी ब्रह्मानंद शाखा |

विजेत्या गटांमधील स्वामी अभेदानंद शाखेच्या हर्षल पेंढार या वर्धकाने त्याची Crude Oil Collecting System समजावून सांगितली. त्याला मुंबईच्या समुद्रामध्ये झालेल्या तेलगळतीवरून ही कल्पना सुचली.

❖ ❖ ❖

## माडगावकर पुरस्कार मानकरी

मुंबईच्या माडगावकर ट्रस्ट द्वारा प्रतिवर्षी 'माडगावकर पुरस्कार' देण्यात येतो. वर्षभरामध्ये क्रीडा, शिक्षण, नेतृत्व, सेवा यामध्ये सर्वार्थाने कर्तृत्व गाजविणाऱ्या वर्धक - युवकांना निरीक्षण, मूल्यांकन, मुलाखती यांच्याद्वारे पुरस्काराचे मानकरी ठरवले जातात.

**-: यावर्षीचे पुरस्कार विजेते :-**

१) कु. अक्षय अशोक कदम - शालेय गट - स्वामी विवेकानंद शाखा

२) कु. अमोल बाबूराव गोरे - कनिष्ठ महाविद्यालय गट - स्वामी ब्रह्मानंद शाखा

**रात्र भयानक ही वैऱ्याची जाणीव होई कर्तव्याची । घेउ प्रतिज्ञा एकजुटीची नको आता माघार ।।**

## वर्षारंभ उपासना

गुढीपाडव्याच्या वर्षारंभ उपासनेने वर्धिनीच्या नववर्षाची सुरुवात होते. ओंकारेश्वराच्या मंदिरात शुर्चिभूत होऊन पहाटे वर्धिनीचे युवक-युवती कार्यकर्ते, हितचिंतक सर्व विभागातील कार्यकर्ते सामूहिकरित्या गायत्री मंत्राची उपासना करतात. २१ मार्च रोजी झालेल्या उपासनेनंतर ज्ञानप्रबोधिनीच्या संस्कृत संस्कृती संशोधिका विभागाचे प्रमुख श्री. यशवंतराव लेले यांनी मार्गदर्शन केले.

''सामाजिक कार्यामध्ये त्याच्या विकासाबरोबरच त्या कामाचा विस्तारदेखील खूप महत्त्वाचा असतो. संघ हा राजकीय व आंतरराष्ट्रीयदृष्ट्या विस्तारित होण्यामागे प्रचारक म्हणून घराबाहेर पडलेल्या सर्व स्वयंसेवकांचा सहभाग महत्त्वाचा होता. त्याचप्रमाणे वर्धिनीदेखील गेली ३५ वर्षे शैक्षणिकदृष्ट्या उपेक्षित अशा समाजात उत्तम नेतृत्व घडविण्याचा प्रयत्न सतत करत आहे. पण या कामाला आता विस्ताराची गरज आहे.

संघाने युद्धांच्या वेळप्रसंगी, नैसर्गिक अपघाताच्या वेळी सतत आपल्या स्वयंसेवकांना त्या ठिकाणी मदतीकरिता नेहमी पाठविले, ज्यामुळे देशात कोणत्याही प्रकारचे संकट असल्यास त्याला तोंड देण्यासाठी संघ स्वयंसेवक नेहमी तयार असेल अशी भावना प्रत्येकाच्या मनात दृढ झालेली आहे. त्याचप्रमाणे वर्धिनीचे सर्व युवा कार्यकर्तेदेखील अशा प्रसंगी अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी सदैव तयार असतील.''

अशा प्रकारचे विकासाबरोबरच विस्ताराचे काम देखील पुढील काही वर्षात वर्धिनीचे असावे असा विषय श्री. यशवंतराव लेले यांनी त्यावेळी उपस्थितांसमोर मांडला.

## रक्तदान शिबिर

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा ध्येयमंत्र देणाऱ्या परमपूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२४ व्या जयंतीनिमित्त वर्धिनीने रक्तदान शिबिरे तीन ठिकाणी घेतली. तीनही ठिकाणी उत्तम प्रतिसाद मिळाला. विशेषतः स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिकेतील भावी अधिकाऱ्यांनी यामध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदविला. वर्धिनीच्या युवा कार्यकर्त्यांनी पुणे स्टेशन येथील बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. पुढील वर्षी डॉ. आंबेडकरांचे १२५ वे जयंती वर्ष आहे. म्हणून पुढील वर्षी तीनही ठिकाणी १२५ रक्तदाते रक्तदान करतील यासाठी 'स्व'-रूपवर्धिनीचे युवा कार्यकर्ते प्रयत्न करणार आहेत.

| परिसर | रक्तदाते संख्या |
|---|---|
| १) गोखलेनगर, वडारवाडी परिसर | ४२ |
| २) बिबवेवाडी, अप्पर इंदिरानगर परिसर | ८८ |
| ३) 'स्व'-रूपवर्धिनी इमारत | ८५ |
| एकूण रक्तदाते | २१५ |

❖ ❖ ❖

बुजवून दुहीच्या खाचा ऐश्वर्ये नटवू आई । लेकरे तिची सहतील काय हा तिजवरील अन्याय ? ।।

## शाखा विभाग – शिबिर वृत्त : मोठा गट

**विषय :** चला, लघुपट बनवू या ! **कालावधी :** १८ एप्रिल ते २२ एप्रिल,

**स्थळ :** भावे प्राथमिक विद्यालय. **संख्या :** वर्धक – १६४, युवक – २१.

सध्याच्या सोशल मीडियाचे लहान मुलांवर होणारे चांगले–वाईट परिणाम दिसत आहेत. त्यांनी काय पहावे, काय पाहू नये, ही साधने कशी हाताळावीत ? यावर चर्चा होत असते. घरातल्या स्मार्ट फोनमुळे इंटरनेट सहजगत्या उपलब्ध झाले आहे. त्याचा सदुपयोग कसा करता येईल या हेतूने या शिबिराचा विषय ठरला.

पूर्वतयारी म्हणून शिबिरात सहभागी होण्याआधी प्रत्येक शाखेला निदान एक लघुपट (Short Film) बनवून आणण्यास सांगितले होते. त्यामुळे त्यांचा लघुपट बनवण्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या तंत्राचा थोडा तरी अभ्यास झाला. यासाठी प्रत्येक शाखेचे अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शन, छायाचित्रण व संकलन या गटात वर्गीकरण करून आपल्या आवडीचा गट प्रत्येकाने निवडला. यामुळे लघुपट निर्मितीतील प्रक्रिया व सर्व टप्पे मुलांपर्यंत योग्य रीतीने पोहोचवण्याचा प्रयत्न साध्य झाला.

श्री. सुनील नाईक यांनी लघुपटाची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. यानंतर मुलांनी शाखा, घर, शाळेचा परिसर, मंदिरे, पर्वती, डॉ. विनेश नगरे यांचे क्लिनीक अशा अनेक स्थळांचा लघुपट तयार करताना उपयोग केला. वेगवेगळ्या विषयांवर २० लघुपट शिबिरात तयार झाले. त्यातील काही निवडक लघुपट शिबिराच्या समारोप कार्यक्रमात दाखवण्यात आले. लघुपट निर्मितीत प्रत्येक गटाने अतिशय परिश्रम घेऊन ही प्रक्रिया उत्तम रीतीने जाणून घेतली.

| शाखा | लघुपटाचे शीर्षक/विषय | शाखा | लघुपटाचे शीर्षक/विषय |
|---|---|---|---|
| स्वामी विवेकानंद शाखा | फुलपाखराचा जन्म | स्वामी शिवानंद शाखा | शांततेचा आवाज |
| | The Helping Nature | राजर्षी शाहू शाखा | नेत्रदान |
| स्वामी अभेदानंद शाखा | हरवलेला मी कोण ? | स्वामी दयानंद शाखा | गुन्हेगारी व आव्हाने |
| स्वामी सुबोधानंद शाखा | जिद्द, Golden Five Stars | स्वामी ब्रह्मानंद शाखा | व्यसन |
| स्वामी श्रद्धानंद शाखा | HIV ग्रस्त मुलाची कहाणी | स्वामी योगानंद शाखा | रहस्यकथा |

प्रत्येक विभागाच्या लेखन, दिग्दर्शन, अभिनय, छायाचित्रण, संकलन, नेपथ्य कार्यशाळा झाल्या.

* **लेखन** विभागातील कु. पार्थ कश्यप यांनी शब्द व क्रियापदाचे खेळ घेतले. प्रसिद्ध पटकथा, कथा लेखकांचे जीवनपट मुलांसमोर मांडले. सौ. विनिता पिंपळखरे म्हणाल्या, ''लेखनासाठी वाचन खूप महत्त्वाचं. जे मिळेल ते वाचायची सवय लावा. येता जाता भेटणाऱ्या, दिसणाऱ्या माणसांना वाचायला शिका.'' लेखनाच्या कार्यशाळेत पटकथा लेखक श्री. प्रवीण तरडे यांनी ससा–कासवाची कथा घेऊन त्यावर लघुपट ते चित्रपट कसा होऊ शकतो हे अगदी हसतखेळत सांगितले.

* **दिग्दर्शन** विभागात श्री. माधव किल्लेदार यांनी मुलांना दिग्दर्शनाची विविध अंग, नाटकांचे व चित्रपटांचे प्रकार, उत्तम दिग्दर्शक होण्यासाठी नवनवीन पुस्तकांबरोबर गीता, दासबोध यांसारख्या ग्रंथांचाही अभ्यास केला पाहिजे हे सांगितले. श्री. महेश पाटणकर म्हणाले, ''नाटक हे शब्दाचे तर चित्रपट हे चित्रांचे माध्यम आहे. म्हणून जो सिनेमा नुसत्या चित्रांवरून ८०% समजतो तो चांगला सिनेमा समजला जातो.''

* **संकलन** विभागात श्री. वसीम पठाण, श्री. लक्ष्मण जगताप, श्री. शुभम जगताप, श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी

संगणकाचा उपयोग कसा कसा केला जातो हे मुलांना शिकवले.

* **नेपथ्य** विभागात श्री. दादा पासलकरांनी रंगभूषा, वेशभूषा, केशभूषा, प्रसंगानुरुप स्थळं यांचे महत्त्व सांगितले.

रात्र कार्यक्रमाचे शिबिराच्या विषयानुसार नियोजन होते. मुलांना पूर्वतयारी म्हणून तयार केलेले लघुपट दाखवले. प्रत्येक शाखेने लघुपटाच्या विषयावर नाट्य सादरीकरण केले. 'लघुपट बनत आहे, त्यात मी पण आहे.' या विषयावर प्रत्येक विभागातील वर्धकांनी आपले विचार मांडले.

शिबिराचे उद्‌घाटन १८ एप्रिलला 'बबई' या सर्वोत्कृष्ट लघुपटाचे दिग्दर्शक श्री. अमित सोनावणे यांच्या हस्ते झाले. त्यांनी वर्धिनीच्या उपक्रमाचे व विशेष करून शिबिराच्या विषयाचे कौतुक केले. मुलांना त्यांनी या वेगळ्या संधीचा, ज्ञानाचा पुढे चांगला उपयोग करून घ्या असे सांगितले. तसेच समारोपाला प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक श्री. उमेश कुलकर्णी, श्री. श्रीरंग ढवळे, श्रीमती योगिता आपटे, श्री. अनिल वळसंगकर व श्री. रामभाऊ डिंबळे उपस्थित होते. श्री. उमेश कुलकर्णी यांनी 'दर्शन' हा अंधश्रद्धेवर आधारित त्यांचा लघुपट मुलांना दाखवला तर श्री. श्रीरंग ढवळे यांनी मुलांना गणेश उत्सवात वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर लघुपट तयार करून समाज प्रबोधन करावे असे आवाहन केले. शिबिर प्रमुख म्हणून विवेकानंद शाखेचे श्री. हर्षल सोनार याने काम पाहिले.

| वेळ/दिनांक | स. ६.१५ ते ६.४५ - प्रबोधन | स.९ ते १२.३० कार्यशाळा | दु. ३ ते ५ सरावसत्र | संध्या. ७ ते ८ प्रेरणासत्र | रात्र कार्यक्रम |
|---|---|---|---|---|---|
| शनि. १८ एप्रिल | - | - | - | उद्‌घाटन सत्र<br>श्री. अमित सोनावणे<br>(दिग्दर्शक-बबई लघुपट) | शाखा लघुपट |
| रवि. १९ एप्रिल | लघुपट | १) अभिनय - संजय डोळे<br>२) लेखन - कार्यशाळा<br>३) दिग्दर्शन - माधव किल्लेदार<br>४) नैपथ्य- कार्यशाळा<br>५) छायाचित्रण-कुणाल श्रीगोंदेकर<br>६) संकलन - वसीम पठाण | लघुपट कसा पहावा?<br>अक्षय इंदिकर | लघुपट संकल्पना बांधणी - अमोल कचरे | लघुपट चालू आहे - स्पर्धा |
| सोम. २० एप्रिल | लघुपट | १) अभिनय - श्रीराम रानडे<br>२) लेखन - प्रवीण तरडे<br>३) दिग्दर्शन - महेश पाटणकर<br>४) नैपथ्य- दादा पासलकर<br>५) छायाचित्रण-वीरेंद्र वळसणकर<br>६) संकलन - ज्ञानेश पुरंदरे | १) अभिनय-संदीप मोरे<br>२) लेखन - कार्यशाळा<br>३) दिग्दर्शन- कार्यशाळा<br>४) नैपथ्य - कार्यशाळा<br>५) छायाचित्रण- लक्ष्मण जगताप व सागर शेंडे<br>६) संकलन- शुभम जगताप | स्पर्धा तयारी | नाट्यस्पर्धा |
| मंगळ.२१ एप्रिल | लघुपट | लघुपटाची प्रक्रिया-सुनील नाईक | लघुपट निर्मिती | लघुपट निर्मिती | विविध गुणदर्शन |
| बुध.२२ एप्रिल | लघुपट | लघुपट निर्मिती | लघुपट निर्मिती | गटशः आढावा -<br>श्री. महेश लिमये<br>श्री. अन्वय बेंद्रे | - |
| गुरु. २३ एप्रिल | लघुपट | समारोप - श्री. उमेश कुलकर्णी (वळू, देऊळ, मसाला या चित्रपटांचे दिग्दर्शक) | - | - | - |

संप्रदाय भेदातित तनुमन । घालवुया भिन्नता ।।

**लहान गट (५ वी ते ७ वी). संख्या :** १७५ मुले, ३० युवक.

**स्थान :** भावे प्राथमिक विद्यालय, पेरुगेट, पुणे **कालावधी :** दि. २४ एप्रिल ते २९ एप्रिल **विषय :** नवनिर्मिती

| दि./वेळ | २४ एप्रिल | २५ एप्रिल | २६ एप्रिल | २७ एप्रिल | २८ एप्रिल |
|---|---|---|---|---|---|
| | | **साहित्य** | **कला** | **प्रतिकृती** | |
| सत्र १ (९.३०-१०.३०) | | सौ. मोहिते (शब्दकोडे) श्री. कोळपकर (कविता) | एस.पी.कुलकर्णी (विज्ञान) कल्याणी ताई (हस्तकला) विक्रांत दिघे (हस्तकला) | श्री. टोले (प्रतिकृती) अशोक रुपनेर | समारोप सत्र |
| सत्र २ (११.००-१२.००) | | सौ. मोहिते (शब्दकोडे) श्री. कोळपकर (कविता) | चित्रकला (संस्कार भारती) रांगोळी (संस्कार भारती) पल्लवी निफाडकर (मूर्ती) | विलास अंडिल (प्रतिकृती) | |
| कार्यशाळा (३.३०-५.००) | | ज्ञानेश पुरंदरे (शब्दखेळ) निलेश धायरकर (शब्दखेळ) | हरीश पैठणकर (चित्रकला) केळकर गट (हस्तकला) | प्रणाली साळी(हस्तकला) विवेक खटावकर (मूर्ती) | |
| प्रेरणासत्र (७.३०-८.३०) | उद्घाटन सत्र आगाशे सर | श्री. संदीप मोरे | श्री. निलेश धायरकर | श्री. रामभाऊ डिंबळे | |
| रात्र कार्यक्रम (९.३०-१०.३०) | पद्यस्पर्धा | शक्ती बुद्धी | चित्रपट | जाहिरात | |

पूर्व प्राथमिक शाळेपासून सर्वांना 'कला' हा विषय परिचित असतो. पण वाढत्या वयानुसार/इयत्तेनुसार यातील खरी संकल्पना, नाविन्य, सौंदर्य माहित व्हायला लागते. मुलांच्या कलेविषयक सुप्त गुणांना वाव मिळावा या हेतूने शिबिरात हस्तकला, मूर्तिकला, चित्रकला या विषयांबरोबर विज्ञानातील प्रतिकृती बनवणे, रद्दी कागदापासून पिशव्या, टोपल्या बनवणे, शब्दकोडी सोडवणे, कविता कशा कराव्यात असे उपक्रम झाले.

शिबिराचे उद्घाटनाला श्री. प्रदीप आगाशे सर व समारोपाला श्री. ज्ञानेश पुरंदरे सर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. श्री. विलास अंडिल सरांनी वास्तूंच्या प्रतिकृती करताना त्यांची मापे कशी घ्यावीत ? रचना कशी करावी हे समजावून सांगितले तर श्री. विवेक खटावकर सरांनी कार्डशीटच्या इमारती, बाग, मंदिरे याबरोबरच प्रत्यक्ष मूर्ती बनवून दाखविल्या. अशा विविध प्रतिकृती मुलांकडून बनवून घेतल्या. पल्लवी ताईंनी मुलांना शाडूच्या गणपतीच्या मूर्ती तयार करायला शिकवले. सर्व सत्रांमध्ये मुलांनी उत्साहाने भाग घेतला व नवीन गोष्टी शिकताना त्यात रंगून गेली होती.

**कौतुकाची थाप**

विवेकानंद शाखेतील १० वीत गेलेला रवी गुलनोर हा वर्धक शिबिरामुळे पाच दिवस शाळेत उपस्थित राहू शकला नाही. परंतु रवीने जेव्हा सर्वांना शिबिराचा वृत्तांत सांगितला तेव्हा मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत हारगुडे सरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. शाखेचे युवक हर्षल सोनार व अभिजित दोडके यांनी शाळेत ८ वी, ९ वीच्या निकालाच्या दिवशी शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना शाखेतील मुलांनी बनवलेल्या 'जन्म फुलपाखराचा' व 'The helping nature' हे लघुपट दाखवले. सर्वांनी मुलांचे व उपक्रमाचे कौतुक केले. शाखेला अनेक मदतीचे हात पुढे आले.

**मानवाचा धर्म माझा, हीच माझी प्रेरणा । संत-मुनि-ऋषि येथ वदले, विश्व एकच भावना ।।**

## विस्तार विभाग – कलाकौशल्य शिबिर वृत्त

**कालावधी :** १८ ते २१ एप्रिल २०१५ **शिबिरार्थी संख्या :** ११२
**शिबिर स्थान :** डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे इंग्लिश मीडियम स्कूल, कोटेश्वर मैदान, सातारा

'लक्ष्मीकेशव प्रतिष्ठानचा विद्यार्थी सर्वांगीण विकास प्रकल्प' 'स्व'-रूपवर्धिनीचे उपकेंद्र म्हणून गेल्या वर्षीपासून वर्धिनीला जोडला गेलेला आहे. त्यामुळे या शिबिराच्या संयोजनात वर्धिनीचा सहभाग नियोजनापासूनच होता. या पहिल्याच निवासी शिबिराचा 'कलाकौशल्य' हा विषय नक्की झाला. या विषयाच्या बरोबरीने वैचारिक विकासाचे दृष्टीने सकाळी एक व्याख्यान आणि संध्याकाळी एक प्रेरणासत्र घ्यावे असे ठरले. प्रेरणासत्राचे सूत्र होते 'क्रांतिकारक-कालचे, आजचे आणि उद्याचे', तर सकाळच्या व्याख्यानासाठी 'जल, ऊर्जा आणि पर्यावरणपोषक जीवनशैली' असे तीन विषय ठरविण्यात आले. या शिबिराच्या सर्व व्यवस्था लक्ष्मीकेशव प्रतिष्ठानच्याच युवक युवतींनी समर्थपणे सांभाळल्या. त्यांना मदत करायला म्हणून वर्धिनीचे पाच युवती व युवक गेले होते. मुलींच्या शाखा विभागातून ३३ मुली शिबिरात सहभागी झाल्या होत्या.
कला कौशल्य विकास या शिबिरामध्ये झालेल्या कला कौशल्य प्रशिक्षणाचा तपशील :

| क्र. | कलाप्रकार | मार्गदर्शक |
|---|---|---|
| १. | ओरिगामी | सौ. आठल्ये |
| २. | मूर्तीकला | श्री. देविदास मोरे |
| ३. | शुभेच्छापत्रे | श्री. तात्यासाहेब भांडवलकर |
| ४. | वारली चित्रकला | श्री. तात्यासाहेब भांडवलकर |

विशेष व्याख्यान खालीलप्रमाणे दररोज सकाळी झाले.

| क्र. | व्याख्यानाचा विषय | व्याख्याते |
|---|---|---|
| १. | ऊर्जा (प्रकार, समस्या इ.) | श्री. हे. गो. देशपांडे, उपप्राचार्य, न्यू इंग्लिश स्कूल, सातारा |
| २. | जल (उपलब्धता, आवश्यक अनावश्यक वापर इ.) | जलतज्ज्ञ डॉ. अविनाश पोळ |
| ३. | पर्यावरणपूरक जीवनशैली | वैद्य श्री. मोहन तांबे |

प्रेरणासत्रातील व्याख्याने दररोज संध्याकाळी खालीलप्रमाणे झाली.

| क्र. | व्याख्यानाचा विषय | व्याख्याते |
|---|---|---|
| १. | क्रांतिकारक कालचे (१८५७ ते १९४७) | सौ. वैदेही कुलकर्णी |
| २. | क्रांतिकारक आजचे (१९४७ ते २०१५) | श्री. अनंतराव जोशी |
| ३. | क्रांतिकारक उद्याचे | सौ. स्नेहल दामले |

शिबिराचे उद्‌घाटन सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाने झाले तर शिबिर समारोप परांजपे आटोकास्ट कंपनीच्या संचालिका सौ. नेहाताई परांजपे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

**शिबिराची उपलब्धी :**

१. लक्ष्मीकेशव प्रतिष्ठानच्या युवक युवतींनी शिबिरातील सर्व व्यवस्था आत्मविश्वासाने सांभाळल्या.

२. प्रतिष्ठानच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांची खूप मोठी फळी युवक युवतींच्या मदतीला उभी होती.

३. कला कौशल्याच्या शिबिरामुळे कला विषयात गती असलेली मुलं मुली नजरेत आली.

४. नवीन खेळांचा परिचय झाल्याने मैदानावर उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

५. पालकांनी शिबिरातील वातावरण पाहून आमच्यासाठी सुद्धा शिबिर घ्या, अशी विनंती लक्ष्मीकेशवच्या कार्यकर्त्यांना केली.

**शाखा विभाग – १० वी पूर्वपीठिका शिबिर : दि. ५ मे ते ८ मे २०१५**

**स्थळ :** अपंग कल्याणकारी संस्था, वानवडी. **संख्या :** मुले ७१, युवक : ४

१० वीचा टप्पा सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातला महत्त्वाचा असल्याने त्याची भीती न बाळगता तो उत्तम रीतीने कसा पार पडेल हे महत्त्वाचे असते. शिबिराच्या उद्‌घाटन सत्रात श्री. विजय नवले सरांनी अभ्यासासाठी वेळेचे नियोजन कसे करावे हे स्पष्ट केले. शिबिरात पुढील सर्व शिक्षकांनी वेगवेगळ्या विषयाचे मार्गदर्शन केले.

| विषय | शिक्षक | विषय | शिक्षक |
|---|---|---|---|
| मराठी | श्रीमती कोल्हटकर | भूमिती | श्री. मोने सर |
| संस्कृत | श्रीमती सुवर्णा बोरकर | विज्ञान | श्रीमती गौरी देव |
| इंग्रजी | श्री. माळी सर | इतिहास | श्रीमती दीपाली निकम |
| बीजगणित | श्रीमती पिसाळ | भूगोल | श्री. मालुसरे सर |

श्री. बुरसे सर व श्री. आगाशे सरांच्या प्रेरणादायी व्याख्यानातून मुलांची या परीक्षेकडे बघण्याची मानसिकता बदलली, त्यांचा आत्मविश्वास वाढला.

शिबिराच्या शेवटी शाखाश: अभ्यासाचे सादरीकरण स्पर्धा झाली. छोट्या नाटिकांतून, तक्ते तयार करून, पद्य सादरीकरण, चित्रफीत तयार करून, PPT तयार करून इतिहास, विज्ञान, गणित असे विषय मांडले गेले. या शिबिरात येरवडा भागातील सुराज्य प्रकल्पाची ११ मुले सहभागी झाली होती. त्यांनी 'दुसरे महायुद्ध' ह्या विषयावर छोटे नाटक बसवले होते.

**दीनबंधुला हृदयी धरुनी । दारिद्र्याचे पाश तोडुनी । हातामध्ये हात घालुनी । पूर्ति कर्तव्याची ।।**

## गुणगौरव व स्वातंत्र्यदिन कार्यक्रम

'स्व'-रूपवर्धिनीचा झालेला विस्तार, त्याद्वारे संघटनेची वाढलेली शक्ती याचे दर्शन यंदाच्या गुणगौरव समारंभात दिसून आले. एका ठिकाणी होणारा हा कार्यक्रम यावर्षी १६ शाखा, ३०७ बक्षिसपात्र वर्धक-वर्धिका व युवा कार्यकर्ते यांसह चार ठिकाणी झाला. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर १० प्रकारच्या विविध स्पर्धा अशा उपक्रमातून गुणगौरव समारंभ पार पडला.

| भाग | बक्षीसपात्र संख्या | प्रमुख वक्ते |
|---|---|---|
| भाग १- मध्य पुणे परिसर | ३८ | प्रा. विजय नवले<br>श्री. रघुनाथ गौडा |
| भाग २- बिबवेवाडी, अप्पर इं. नगर | १३० | ॲड. अभिजित देशमुख |
| भाग ३-४<br>कर्वेनगर, सिंहगड रोड<br>वडारवाडी, गोखलेनगर | १११ | ॲड. मुरलीधर कचरे |
| भाग ५ - मध्य पुणे परिसर<br>बालशाखा, वर्धिका विभाग | ६६ | सौ. स्वाती गाडगीळ |

प्रतिवर्षीप्रमाणे काका हलवाई स्वीट सेंटर, टिळक रोड पुणेचे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी पेढ्यांच्या रुपाने देणगी देऊन उपस्थितांचे तोंड गोड केले. याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

## विद्याधनम् योजना

टाटा मोटर्स लिमिटेड कंपनीच्या समाजविकास विभागाने वर्धिनीच्या एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या विविध कार्यक्रमास यथाशक्ती मदत केली. यावर्षी १५० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, अभ्यास तासिका शिक्षकांचे मानधन, विद्यार्थी सर्वांगीण विकासाच्या अभिनव कार्यक्रमांसाठी आणि काही पायाभूत संरचना उभारणीसाठी समाज विकास विभागाने सहकार्य केले.

आर्थिक मदतीच्याही पलीकडे जाऊन अनेक वक्ते, प्रशिक्षक, खेळाडू, छायाचित्रकार अशा टाटा मोटर्सच्या तज्ज्ञ मंडळींनी प्रत्यक्ष कामात सहभागी होऊन खारीचा वाटा उचलला आहे. अनेक अधिकाऱ्यांनी वर्धकांच्या घरी प्रत्यक्ष भेटी दिल्या. या भेटीत मुलांच्या घरची बिकट परिस्थिती पाहून पण त्यातूनही मुलांनी केलेली प्रगती ऐकून अनेकांचे डोळे पाणावले.

वर्धिनीच्या कामाचे कौतुक करत त्यांनी यापुढेही कामात सहभागी होण्याची इच्छा दर्शविली.

❖ ❖ ❖

**मनी लेवुनी माया ममता । आणू समता अन् समरसता । मातृभक्तीने भारून टाकू । भूमि भारताची ।।**

### भात लावणी

'एक दिवस शेतीसाठी, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी'. ३००-३५० वर्धक-वर्धिका आणि युवक-युवती विंझर गावी २ ऑगस्टला भातलावणीला गेले होते. प्रत्यक्ष चिखलात पाय रोवून भाताची पिके लावताना जी कंबरेची कसरत झाली आणि अनुभव आला, त्यातून सर्वजण बरेच काही शिकले.

**प्रतिक्रिया :**

- भात लावणी एवढी अवघड असते हे माहीतच नव्हते.
- आजपासून भात वाया घालविणार नाही.
- शेतकऱ्यांना रविवारी पण सुट्टी नसते.
- शेतात जेवण्याची मजा काही वेगळीच.

या उपक्रमामागे ग्रामीण भागांशी देवाणघेवाण करण्याचा, त्या भागाविषयी आपुलकी, बांधिलकी रुजविणे हा हेतू आहे. शेतीविषयी, त्यांच्या जीवनाविषयी परिचय करून तर घ्यावाच पण त्यांच्या जगण्याची प्रेरणा काय, ते एवढी कष्टाची कामे कशी करतात, हेही जाणून घ्यावे व या साऱ्यातून त्यांच्या कामाविषयी आदर आणि सन्मान वाढावा हाही उद्देश होता.

❖ ❖ ❖

### गणेशोत्सव

**उत्सवप्रमुख –** चेतन वाघमारे

**पथक विभाग –**

* **झांज पथके –** सुबोधानंद शाखा, रामकृष्ण शाखा, विवेकानंद शाखा, शाहू शाखा आणि अखंडानंद शाखा.

* **लेझीम –** घोरपडे पेठ शाखा * **टिपरी –** बालशाखा

* **ध्वज –** श्रद्धानंद, युवती आणि शिवानंद शाखा

एकूण सात मंडळांसमोर या पथक विभागाने वादन आणि सादरीकरण केले. यंदाच्या वर्षी अनेक पथकांनी नावीन्यपूर्ण प्रकार बसविले. माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणारे तसेच राज्यघटनेचे महत्त्व सांगणारे नवीन प्रकार सादर केले.

**पथनाट्य विभाग –**

* **योगानंद शाखा –** यंग इंडिया * **अभेदानंद शाखा –** अशी हवी तरुणाई

* **भगिनी निवेदिता शाखा –** 'आपण सारे बदलू या'

पथनाट्यात तरुण युवा शक्तीने समाज समस्या सोडविण्यासाठी का आणि काय प्रयत्न करावे याची अत्यंत जिवंत मांडणी केली. विशेष म्हणजे भगिनी निवेदिता शाखेच्या मुलींनी सहज रीतीने २३ ठिकाणी हा अवघड विषय प्रभावीपणे मांडला.

योगानंद शाखेने ९ ठिकाणी सादरीकरण केले तर ब्रह्मानंद, दयानंद आणि शंभुराजे शाखा यांनी बालगुन्हेगारी या विषयावर प्रबोधन करणारी पथनाट्ये मंडळ आणि वस्त्या यांच्यासमोर सादर केली. सर्व शाखांनी मिळून १२० ठिकाणी पथनाट्ये सादर केली.

## हिवाळी शिबिरे

**भाग १ : शाखा** – समर्थ रामकृष्ण, स्वामी योगानंद, स्वामी श्रद्धानंद.

**दिनांक** – १५ नोव्हेंबर २०१५ ते १९ नोव्हेंबर २०१५ **ठिकाण** – खंडोबा मंदीर, जवण, ता. मुळशी

**संख्या :** १५० **विषय** – सहज शिक्षण

| | १५ नोव्हेंबर | १६ नोव्हेंबर | १७ नोव्हेंबर | १८ नोव्हेंबर | १९ नोव्हेंबर |
|---|---|---|---|---|---|
| सत्र १ | | प्रतिकृती तयार करणे | ग्रामस्वच्छता अभियान (काशीग गाव) | कृतीसत्र अंदाज बांधणी | समारोप सत्र (किल्ले तिकोणा पदभ्रमण) |
| सत्र २ | | प्रतिकृती विक्री | खानाखजाना स्पर्धा | कन्नड लिपी शिका (श्री. विनायक गोगटे) | |
| प्रेरणासत्र | उद्घाटन सत्र व्यावहारिक कौशल्य (श्री अप्पा टेमघरे) | मुलाखत (श्री. उमेश बिबवे) | कथाकथन (श्री. ज्ञानेश पुरंदरे) | शिबिरांचा अनुभव (श्री. राकेश शेंडगे) | |

- भौमितिक संकल्पना मुलांना स्पष्ट व्हाव्यात यासाठी शिबिरामध्ये मैदानाच्या वेळेत लंबदुभाजक, कोन, समद्विभुज त्रिकोण, वर्तुळाचा व्यास इ. संकल्पना शिकवण्यात आल्या.
- दि. १६ नोव्हेंबरला वर्धकांना आर्थिक व्यवहार समजण्यासाठी शिबिरातील ‘वर्धिनी सहकारी बँक’ प्रतिकृती बनवण्यासाठी कर्ज देत होती. विविध वस्तू विकत घेऊन एक प्रतिकृती तयार करणे अशी स्पर्धा झाली. कर्ज कसे घ्यायचे, खाते कसे उघडायचे इ. व्यवहार मुले यामध्ये शिकली. ती प्रतिकृती तयार करून त्याची विक्रीही त्यांनी केली.
- दि. १८ नोव्हेंबरला दैनंदिन व्यवहारातील मापन पद्धतीची अंदाजबांधणी तसेच शास्त्रीय मापन पद्धत कृतीतून मुलांना समजून सांगितली.
- दि. १९ नोव्हेंबरला वर्धक व युवक तिकोणा किल्ल्यावर दुर्गभ्रमंतीसाठी गेले. श्री. निशिकांत वाईकर यांनी गडावरील विविध झाडे, गडाची माहिती अनौपचारिक पद्धतीने सांगितली.

❖ ❖ ❖

### ग्रंथतुला

‘पुस्तके हे खरे गुरु, मित्र व मार्गदर्शक असतात’ हा सुविचार कृतीत आणून वर्धिनीचे ग्रंथालय अनेक पुस्तकांनी सुसज्ज आहे. या ग्रंथालयात या महिन्यात आणखी ११० नवीन पुस्तकांची भर पडली. महालक्ष्मी मंदीर ट्रस्ट, सारसबाग मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त ५ फेब्रुवारीला देव-देवतांच्या धातूंच्या मूर्तींची ग्रंथतुला झाली. मा. श्री. भरत अग्रवाल सर यांनी ही तुला केली. ही सर्व पुस्तके त्यांच्याकडून वर्धिनीला भेट मिळाली. वर्धिनी त्यांच्या या अनमोल भेटीबद्दल कृतज्ञ आहे.

**विज्ञानाने वैभव आणू अध्यात्माने शांती मेळवू । समन्वयाने समरसतेने एकसंघ जीवन घडवू ।।**

**भाग २ : शाखा** – स्वामी अखंडानंद, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी शिवानंद, धर्मवीर शंभूराजे.

**दिनांक** – १८ नोव्हेंबर २०१५ ते २२ नोव्हेंबर २०१५ **ठिकाण** – नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ.

**संख्या :** १५० **विषय** – मोठा गट – लोकशाहीचे चार स्तंभ

| | १८ नोव्हेंबर | १९ नोव्हेंबर | २० नोव्हेंबर | २१ नोव्हेंबर | २२ नोव्हेंबर |
|---|---|---|---|---|---|
| प्रबोधन | | कायदेमंडळ (कु. आकाश देशमुख) | पत्रकार (श्री.निलेश धायरकर) | न्यायव्यवस्था (श्री. निलेश धायरकर) | प्रशासन श्री. कृष्णा पिंगळे |
| सत्र १ | | पुणे महानगरपालिका ओळख (श्री.नंदकुमार जगताप) | रानडे इन्स्टिट्यूट भेट | वकील भूमिका (श्री. संजय चितळे) | समारोप सत्र सामान्य माणसाची भूमिका (श्री. विवेक वेलणकर) |
| सत्र २ | | पुणे महानगरपालिका भेट | पत्रकार भवन भेट | पोलिस निरीक्षक मुलाखत | |
| कृती सत्र | | गब्बर इज बॅक (चित्रपट) | चला वृत्तपत्र बनवूया (स्पर्धा) | विमान पडते आहे (स्पर्धा) | |
| प्रेरणासत्र | API (श्री. बापू पिंगळे) | नेते समाजाचे नेतृत्व वर्धिनीचे (श्री.संजय शिंदे, श्री. कैलास अंडील) | लोकशाहीच्या स्तंभात वर्धिनी रणांगणात (श्री. शिरीष पटवर्धन) | हिरो प्रशासनाचे कर्तृत्व अधिकाऱ्यांचे (उमेश मगदूम, अतुल पटेकर) मुलाखत | |
| रात्रकार्यक्रम | गटचर्चा | दीपोत्सव | गप्पा पत्रकारांशी | विविध गुणदर्शन | |

**लहान गट –हस्तलिखित बनवू या**

| **विषय** | **वक्ते** |
|---|---|
| हस्तलिखिताचे लेखन करताना... | श्रीमती अश्लेषा महाजन |
| कोलाज काम | श्रीमती शोभना साठे |
| हस्तलिखितासाठी वाचन | श्री. सबनीस |

**हस्तलिखिताचे विषय –**

१) शाळा २) डॉ. अब्दुल कलाम ३) 'स्व'–रूपवर्धिनी ४) चरित्र ५) पाणी ६) सण व उत्सव ७) कविता

❖ ❖ ❖

**अम्हीच अमुच्या क्षुद्रपणाने अमुचा बांधव क्षुद्रियला । कलंक हा जरी शेवाळ्यासम जाइल रसातळाला ।।**

**भाग ३ : शाखा –** स्वामी सुबोधानंद , स्वामी ब्रह्मानंद, राजर्षी शाहू, नरवीर तानाजी मालुसरे

**दिनांक –** १४ नोव्हेंबर २०१५ ते १८ नोव्हेंबर २०१५ **ठिकाण –** 'जलशिवार' भूगाव, मुळशी, पुणे.

**संख्या :** १५० **विषय –** आपत्ती व्यवस्थापन

| | १५ नोव्हेंबर | १६ नोव्हेंबर | १७ नोव्हेंबर | १८ नोव्हेंबर |
|---|---|---|---|---|
| प्रबोधन | श्री. संदीप मोरे | श्री. नकुल थावरे | श्री. प्रसाद गजमल | श्री. शिवाजी खरात |
| सत्र १ | आपत्ती व्यवस्थापनाची ओळख (श्री. अर्हत वाकोडे) | NDRF भेट (मोठा गट) ग्रामपंचायत भेट (छोटा गट) | आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण | समारोप सत्र आपत्ती निर्माण झाल्यावर असलेली मानसिकता (श्री. महेश पवळे) |
| सत्र २ | प्रथमोपचार प्रशिक्षण (श्री. अमित प्रभू) अग्निशामकदल प्रात्यक्षिक (श्री.योगेश पैठणकर व सहकारी) | | | |
| प्रेरणासत्र | माळीण दुर्घटना बचावकार्य (श्री. बाळासाहेब लोहकरे) | छत्रपती शिवाजी महाराज (श्री. निलेश धायरकर) | आपत्तीमधील वर्धिनीचे सहकार्य (श्री. ज्ञानेश पुरंदरे) | |
| स्पर्धा / रात्रकार्यक्रम | PPT सादरीकरण दहशतवाद, उत्तराखंड महाप्रलय, भोपाळ–माळीण दुर्घटना | पद्यमंजूषा | प्रश्नमंजूषा | |

- अग्निशामक दलाचे प्रात्यक्षिक शिबिरामध्ये झाले. आग कशा प्रकारे विझवली जाते तसेच पाण्याचा मारा करताना आगीच्या मुळाशी पाणी कसे मारायचे असते हे त्यांनी मुलांना सांगितले.
- शिबिरामध्ये लहान गटाने ग्रामपंचायतीला भेट दिली. गावाबद्दलची माहिती घेत असताना मुलांनी विचारलेले काही प्रश्न –

  १) तुमच्या गावाला आयएसओ ॲवॉर्ड का मिळाला ? २) गाव आदर्श करताना तुम्हाला कोणकोणत्या अडचणी आल्या ? ३) ग्रामपंचायत कशा प्रकारे स्थापन करतात ? इत्यादी.
- श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी त्सुनामी, लातूर भूकंप अशा आपत्तीमध्ये वर्धकांनी केलेल्या कामाचे अनुभव सांगितले.

**भाग ४ : शाखा –** स्वामी विवेकानंद, स्वामी अभेदानंद.

**दिनांक –** १८ नोव्हेंबर २०१५ ते २२ नोव्हेंबर २०१५
**ठिकाण –** शिशुविहार शाळा, पुणे विद्यापीठ
**संख्या :** ८५
**विषय –** लहान गट – वन्यजीवन
मोठा गट – तंत्रशिक्षण

| लहान गट | मोठा गट |
|---|---|
| समुद्राकाठील पाणीजीवन (श्री. विलास कान्हे) | तांत्रिक शिक्षणाची गरज (श्री. सुभाष इनामदार) |
| गोमाता (श्री. मिलिंदभाऊ एकबोटे) | इलेक्ट्रॉनिक्स (श्री. बी.एन.लोणकर) |
| पक्षीजीवन (डॉ. अनिल महाबळ) | प्लंबिंग (श्री. आर. बी. मनकर) |
| मधुमक्षिका (डॉ. नाना क्षीरसागर) | सीपीयू माहिती आणि दुरुस्ती (श्री. निशिकांत वाईकर) |
| समारोप सत्र (कर्नल पराग मोडक) | ऑटोमोबाईल (श्री. नितीन रानडे) |

**भाग ५ : शाखा –** भगिनी निवेदिता, घोरपडे पेठ, साप्ताहिक शाखा.

**दिनांक –** १५ ते १९ नोव्हेंबर २०१५
**ठिकाण –** ज्ञानप्रबोधिनी, निगडी
**संख्या :** ७५
**विषय –** क्रीडा

| | १५ नोव्हेंबर | १६ नोव्हेंबर | १७ नोव्हेंबर | १८ नोव्हेंबर | १९ नोव्हेंबर |
|---|---|---|---|---|---|
| सत्र १ | | आहार (श्रीमती प्रियदर्शिनी जोशी) | खेळाडूंचे चरित्र (श्री.ओंकार वानखेडे) | खेळातील करिअर (श्री. इम्रान शेख) | समारोप सत्र (श्री. मनोज देवळेकर) |
| स्पर्धा | | खेळांचे वर्गीकरण (श्री. ज्ञानेश पुरंदरे) | क्रीडा वृत्तपत्र तयार करणे | खजिनाशोध | |
| प्रेरणासत्र | उद्घाटन सत्र (श्री. मिलिंद डांगे, श्री. आनंद मुंजे) | वर्धिनी का ? (श्री. सुमीत डोळे) | वर्धिनीची वाटचाल (श्री.शिरीष पटवर्धन) | वर्धिनीतील अनुभव (श्री. संतोष काळे) | |
| रात्रकार्यक्रम | लघुपट | शक्तीबुद्धी | नवीन खेळ तयार करणे | प्रश्नमंजूषा | |

- ॲथलेटिक्स आणि कबड्डी यांचे प्रशिक्षण वर्धिकांना देण्यात आले.
- शिबिरामध्ये पद्यसत्राच्यावेळी शाहीर अशोक कामठे यांनी लोकगीताचे काही प्रकार मुलींना शिकवले.

❖ ❖ ❖

**अभिमानाने मातृभूमिच्या समाज भारूनि जावा । समरसतेच्या युगमंत्राने समाज जागृत व्हावा ।।**

## क्रीडा दिन

यावर्षी वाढलेली स्पर्धांची संख्या आणि साहजिकच त्यामुळे होणारी चुरस यामुळे क्रीडादिन तीन टप्प्यात घेतला. दि. २९ नोव्हेंबरला वैयक्तिक स्पर्धा व सूर्यनमस्कार स्पर्धा, १२ डिसेंबर रोजी युवक गट तर १३ डिसेंबर रोजी वर्धकांच्या सांघिक मैदानी स्पर्धा झाल्या.

### १) वैयक्तिक मैदानी स्पर्धा –



सर्वोत्तम सुविधा असणाऱ्या बाबुराव सणस मैदानात स्पर्धा घेण्यात आल्या. १०० मी., १५०० मी. धावणे, लांब उडी, गोळा फेक अशा विविध स्पर्धा ज्ञानदा प्रशालेच्या सहकार्याने घेण्यात आल्या. राष्ट्रीय, राज्यस्तरीय तसेच जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणारे खेळाडू व प्रतिभा विकसन प्रकल्पातील खेळाडूंच्या हस्ते एक भव्य मशाल फेरी काढून स्पर्धेचे भव्य उद्घाटन झाले. एकूण ४५० विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते.

२९ नोव्हेंबरला दुपारी ३ ते ४ या वेळेत या मैदानावर सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात आली. सूर्यनमस्कार स्पर्धेचे हे सलग चौथे वर्ष. स्पर्धात्मक दर्जा असल्यामुळे विद्यार्थ्यांनी कसून सराव केला होता. मंत्रोच्चार, श्वसनाची पद्धत, सुनियोजित हालचाली, सांघिक हालचाली, उभ्या राहण्याच्या आणि सादरीकरणाच्या वेगवेगळ्या रचना यावर मुलांनी विशेष मेहनत घेतली होती. परीक्षकांनी याचे खूप कौतुक केले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. सुभाषराव कुलकर्णी, श्री. अभिजित माने, श्री. पंकज मुंडे, श्री. अश्विन शाह हे उपस्थित होते.

### २) सांघिक स्पर्धा –

१२ डिसेंबरला पेरुगेट भावे शाळेत युवकांच्या सांघिक स्पर्धा घेण्यात आल्या. यात कबड्डी आणि व्हॉलीबॉल या खेळांचा समावेश होता. युवकांचे सर्व सामने अतिशय चुरशीचे झाले.

१३ डिसेंबरला भारत स्काऊट गाईडच्या मैदानावर वर्धकांच्या सांघिक स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात लंगडी, डॉजबॉल, कबड्डी या खेळांचा समावेश होता. एकूण ४ गटांमध्ये या स्पर्धा घेण्यात आल्या. एकूण ५५० विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. सर्वच स्पर्धा अतिशय चुरशीने पार पडल्या. ५ वी, ६ वीच्या गटावर यावर्षी राष्ट्रीय स्पर्धांच्या नियमानुसार लंगडीचे सामने झाले. नवीन नियम व नवीन मैदानामुळे सामन्यांमध्ये आणखीनच चुरस पाहायला मिळाली. ७ वर्षांनंतर यावर्षी क्रीडादिनात डॉजबॉल या खेळाचा पुन्हा समावेश करण्यात आला आणि याच खेळात सर्वाधिक ३० गडी बाद करून नरवीर तानाजी मालुसरे शाखेने निर्विवाद वर्चस्व गाजवले.

पुत्र क्षमेचे शोभू आपण क्षमाशीलता दावू । चुकलेल्यांच्या हृदयी शिरुनी सांगू समजावू ।
सूड नको संघर्ष नको परि उचित समन्वयभाव ।।

कबड्डीचे सामनेही अतिशय चुरशीचे झाले. बक्षीस समारंभ ज्ञानदा प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. विठ्ठल शिंदे सरांच्या हस्ते पार पडला. यावर्षीपासून वर्धिनीचा 'उत्कृष्ठ खेळाडू' या पुरस्काराची सुरुवात झाली. यावर्षीचा उत्कृष्ठ खेळाडू नरवीर तानाजी मालुसरे शाखेचा कु. राकेश चांभार हा ठरला. शिंदे सरांच्या हस्ते रोख ५०१ रु. देऊन त्याला गौरवण्यात आले. या सर्व स्पर्धांसाठी मुलांच्या चारही भागातील भागप्रमुखांनी व मुलींच्या मैदान प्रमुखांनी विशेष मेहनत घेतली. वैयक्तिक स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या सर्वच स्पर्धकांच्या गुणवत्ता वाढीसाठी यावर्षी विशेष लक्ष दिले जाईल. यात त्यांचे प्रशिक्षण, विशेष आहार आणि इतर साहाय्य उपलब्ध केले जाईल.

❖ ❖ ❖

**क्रीडा दिन :** सूर्यनमस्कार स्पर्धा विजेते -

१) लहान गट - स्वामी दयानंद सरस्वती शाखा २) मोठा गट - स्वामी अभेदानंद शाखा

३) युवक गट - स्वामी विवेकानंद शाखा.

**सांघिक स्पर्धा विजेते -**

सर्वोत्कृष्ठ खेळाडू २०१५-१६ : कु. राकेश चांभार - नरवीर तानाजी मालुसरे शाखा

| स्पर्धा | विजयी | उपविजयी |
|---|---|---|
| ५ वी - ६ वी लंगडी | स्वामी दयानंद सरस्वती शाखा | स्वामी ब्रह्मानंद शाखा |
| ७ वी - ८ वी डॉजबॉल | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | स्वामी दयानंद सरस्वती शाखा |
| ९ वी -१० वी कबड्डी | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | स्वामी दयानंद सरस्वती शाखा |
| ११ वी - १२ वी कबड्डी | समर्थ रामकृष्ण शाखा | भाग ३ |
| महाविद्यालयीन गट - कबड्डी | समर्थ रामकृष्ण शाखा | स्वामी योगानंद शाखा |
| व्यावसायिक - व्हॉलीबॉल | भाग ३ | स्वामी योगानंद शाखा |
| ५ वी - ७ वी लंगडी (मुली) | घोरपडे पेठ शाखा | |
| ८ वी - १० वी खो-खो (मुली) | कर्वेनगर (साप्ताहिक शाखा) | |

**वैयक्तिक स्पर्धा विजेती - मुले**

| स्पर्धा | १०० मी. | १५०० मी. |
|---|---|---|
| ५ वी - ६ वी | प्रथम कोळी १४ से. | राकेश चांभार ५.५८ मि. |
| ७ वी - ८ वी | प्रथम चव्हाण १३.२५ से. | रवी महतो ६ मि. |
| ९ वी - १० वी | दिलीप अटाडे १३.१३ से | मयुर ढवळे |
| ११ वी - १२ वी | सोहम महाजन १२.८४ से. | पार्थ कश्यप ५.०९ मि. |
| F. Y. - T. Y. | योगेश नराल १२.१० से. | तुषार मुढे ५.१३ मि. |
| व्यावसायिक | आशिष बडदे १३ से. | |

**नसे विषमता परि विविधिता मोहक ही अनुभूती । उच्चनीचता नसे मुळीही देहावयव प्रचीती ।**
**रुतला काटा जरी पायी तरी नयनी येई स्राव ।।**

## वैयक्तिक स्पर्धा विजेते – मुले

| स्पर्धा | लांब उडी | गोळा फेक |
|---|---|---|
| ५ वी – ६ वी | राकेश चांभार ४.३९ मी. | – |
| ७ वी – ८ वी | संतोष चव्हाण ४.३० मी. | – |
| ९ वी – १० वी | कुणाल घाडगे ५.११ मी. | शेखर अमरावती ८.८० मी. |
| ११ वी – १२ वी | अमित आदवडे ५.२० मी. | शिवप्रसाद पनेकर १०.५० मी. |
| F. Y. - T. Y. | जितेंद्र काळे ५.३७ मी. | अक्षय पिसाळ – ९.९० मी. |
| व्यावसायिक | | हिमांशु भारती – ८ मी. |

## वैयक्तिक स्पर्धा विजेत्या – मुली

| स्पर्धा | १०० मी. | लांब उडी | गोळाफेक |
|---|---|---|---|
| ५ वी – ६ वी | ऐश्वर्या जाधव | साक्षी खताळ | ९ वी – १० वी : |
| ७ वी – ८ वी | वर्षा कुगाटे | समृद्धी थोरात | पायल जिरेसाळ |
| ९ वी – १० वी | दिव्या घारे | समृद्धी यादव | ११ वी – १२ वी : |
| ११ वी – १२ वी | दिपाली साका | पुजा बत्तीन | निकिता शासम |


*With Best Compliments From*

# M/S. D. PRATAP

***IRON MERCHANTS***

***DEALERS IN BEAM, CHANNELS, ANGLES, SHEETS & PLATES***

**1196, BHAWANI PETH,**
**PUNE 411 042.**
**■ TEL. : 26383585, 26383595 (Office)**
**■ 2426 4847 (Residence)**


**परस्परांच्या सुखदुःखाशी समरस आपण होऊ । दुःखावरती फुंकर घालू सुखामृताने न्हाऊ ।।**

## ꕤ शाखा विभाग ꕤ

'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाची सुरुवात ज्या शाखा विभागापासून सुरू झाली तो शाखा विभाग आज वेग, व्यापकता, विस्तार या तिन्ही आघाड्यांवर जोरदार वाटचाल करीत आहे.

"Concentrated Efforts on Selected Few" ह्या पद्धतीचा स्वीकार करून त्याद्वारे नेतृत्व विकसनाचे काम शाखा विभाग करीत आहे.

आज १६ शाखांमध्ये एकूण ६५० वर्धक-वर्धिका दैनंदिन येत आहेत. पुण्यातील ६०-६५ सेवा वस्त्यांमधून 'स्व'-रूपवर्धिनी शिक्षण माध्यमातून परिवर्तनाचे काम करीत आहे. या दैनंदिन कामात आज १५० पेक्षा जास्त युवक-युवती विविध जबाबदाऱ्या घेऊन स्वयंसेवी वृत्तीने काम करीत आहेत. या शाखा विभागाचा वर्षभरातील कामाचा संक्षिप्त वृत्तांत -

### मैदान व्यवस्था वृत्त

**स्वामी श्रद्धानंद शाखा :**

जागतिक सूर्यनमस्कार दिन ३० जानेवारीला शाखेत साजरा झाला. एकूण ५५ वर्धकांनी ९,०४३ सूर्यनमस्कार घातले.

**भगिनी निवेदिता शाखा :**

१० जानेवारीला चैतन्य योग साधना यांनी अखंड २४ तास सूर्यनमस्कार आहुती देणारा चौथा आदित्य योग आयोजित केला होता. त्या आहुतीसाठी शाखेतील १५ वर्धिका व २ युवती उपस्थित होत्या. वर्धिकांनी एकूण ५४५ सूर्यनमस्कार घातले होते. चैतन्य योग साधना यांच्याकडून सर्व वर्धिकांना सूर्यनमस्कारासाठी प्रमाणपत्र देण्यात आले.

**स्वामी अभेदानंद शाखा -** शाखेत दर रविवारी **योग प्रशिक्षण वर्गा**ची सुरुवात झाली आहे. विद्यार्थी सहाय्यक समितीतील श्री. रणजित भाईक योगासने शिकवण्यास येत आहेत.

### अभिनंदन

- नरवीर तानाजी शाखेतील वर्धक **चि. शकील शेख** व **चि. शहिद शेख** यांनी आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली तर **चि. राकेश चांभार** याची आंतरशालेय कबड्डी स्पर्धांमधून जिल्हा पातळीवर निवड झाली.
- युवक विभागाचे कार्यकर्ते **श्री. चेतन कुसाळकर** हे व्हॉलीबॉल खेळामध्ये पुणे विद्यापीठाच्या संघातील एक खेळाडू आहेत. नुकत्याच झालेल्या अ. भा. विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेमध्ये त्यांच्या संघाला सुवर्णपदक मिळाले.
- समर्थ रामकृष्ण शाखेचा वर्धक **कु. आरबाज पठाण** याला 'किक-बॉक्सिंग'मध्ये सुवर्णपदक मिळाले. या पुढील भूतानमधील स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

**मने मनांशी जाती जुळुनी । भेदभाव ते पडता गळुनी । संघभाव ये मनी उजळुनी । समरसतेचे सहज सूत्र हे ।।**

**क्रीडा स्पर्धेचा अनोखा अनुभव -**

कासारवाडी, सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे १ मार्चला झालेल्या मैदानी स्पर्धेत 'स्व'-रूपवर्धिनीच्या खालील वर्धकांनी भाग घेतला :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. संदीप जगधने | स्वामी श्रद्धानंद शाखा | १०० मी. पळणे |
| २) | कु. योगेश नराल | स्वामी श्रद्धानंद शाखा | १०० मी. पळणे |
| ३) | कु. अक्षय कदम | स्वामी विवेकानंद शाखा | १०० मी. पळणे |
| ४) | कु. पार्थ कश्यप | समर्थ रामकृष्ण शाखा | १५०० मी. पळणे |
| ५) | कु. जयेश यमुल | समर्थ रामकृष्ण शाखा | १५०० मी. पळणे |
| ६) | कु. आकाश येनपुरे | स्वामी दयानंद शाखा | गोळा फेक |

स्पर्धेचे मैदान आंतरराष्ट्रीय दर्जाचे असल्याने या स्पर्धेचा चांगला अनुभव मिळाला. १ मार्चला स्पर्धेचे उद्‌घाटन आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत यांच्या हस्ते झाले.

सर्वांची पात्रता चाचणी फेरीतून अंतिम फेरीसाठी निवड झाली. कु. योगेश नरालला १०० मी. धावण्यात दुसरे बक्षीस मिळाले.

या स्पर्धेमुळे इतर खेळाडूंचे नैपुण्य, कसब व आमच्यातील त्रुटी लक्षात आल्या. त्यामुळे खेळातील प्रगती होण्यास निश्चित सहाय्य होईल.

## 'सुवर्ण' बातमी

**संतोष घाडगे** वर्धिनीच्या समोरील वस्तीत राहणारा आजोळ व रामकृष्ण शाखेचा वर्धक. वर्धिनीचे २००५ साली क्रीडा शिबिर झाले. त्या शिबिरातून संतोषला प्रबोधिनीच्या क्रीडा शाळेत पाठविण्याचे ठरले... आणि त्यानंतर संतोषने पाठीमागे वळून पाहिले नाही. अनेक स्पर्धा, अनेक विजय हे चक्र असेच सुरू राहिले. वर्धिनी भरभक्कमपणे पाठीशी सदैव उभी होती आणि आहेही.

सामान्य कुटुंबातून आलेल्या संतोषच्या कौशल्याला वर्धिनीने संधी उपलब्ध करून दिली. संतोषने त्याच्याबरोबर रामकृष्ण शाखेच्या वर्धकांना आपली कला शिकवली आणि गुजरात येथे सैन्य दलासमोर या शाखेने मल्लखांब प्रात्यक्षिके सादर केली.

मध्य प्रदेश येथील 'राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत' **महाराष्ट्र संघाला सुवर्णपदक** मिळाले. त्या विजेत्या संघाचा **सदस्य** असलेल्या **संतोषचा** वर्धिनीला अभिमान वाटतो. पुण्यातील अशा अनेक वस्त्यांमधून अशीच अनेक सुवर्णरत्नं बाहेर पडावीत आणि वर्धिनी त्याला एक निमित्तमात्र असावी.

**समतेमधुनी पाऊल जुळता । सहज साधते मनी एकता । नित्य नवनवी गीते गाता । ध्येयास्तव हे एकतानता ।।**

## कार्यक्रम व्यवस्था वृत्त

**स्वामी ब्रह्मानंद शाखा :**

- शाखेच्या परिसरातील प्रगती विद्यालयात २६ जानेवारीच्या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांचे सूर्यनमस्कार व लेझीम यांचे प्रात्यक्षिक सादर झाले. शाखेच्या युवकांनी यासाठी मार्गदर्शन केले होते. सुट्टीत शाखेत वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. त्याचा समारोप सिंहगडावरच्या सायकल सहलीने झाला. सर्व वर्धकांनी गडाची स्वच्छता केली.
- १५ ऑगस्टनिमित्त झालेल्या केंद्रीय कथाकथन स्पर्धेत शाखेचा युवक वर्धक चि. शंकर कुमावत यास प्रथम क्रमांक मिळाला.
- दर रविवारी होणाऱ्या मानसिक विकसन बैठकीत 'राजा शिवछत्रपती' या चित्रपटाचे काही भाग दाखवले जातात. या प्रत्येक प्रसंगातून होणाऱ्या प्रबोधनावर चर्चा होते. त्यामुळे वर्धकांची इतिहास विषयाची गोडी वाढली आहे.
- मोठ्या गटातील मुलांची पुण्यातील वैशिष्ट्यपूर्ण देखावे बघण्यासाठी 'गणपती सहल' झाली. शाखेत होणारे उपक्रम अधिकाधिक रंजक, उपयुक्त, माहितीपूर्ण व्हावेत या हेतूने दर रविवारी वर्धक 'सूचनापेटीच्या' मार्गाने त्यांच्या कल्पना, सूचना मांडतात. याचा उपयोग शाखेतील कार्यक्रम प्रमुखाला निश्चितच होत आहे.
- 'क्रांतिरत्न विष्णु गणेश पिंगळे' यांच्या बलिदानाला १०० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने शाखेत श्री. प्रसाद मोरे यांनी क्रांतिरत्न विष्णु गणेश पिंगळे यांचे चरित्र सांगितले.

**स्वामी विवेकानंद शाखा :**

- विवेकानंद जयंतीनिमित्त श्री. सुरेश पवार यांचे व्याख्यान झाले. त्यांनी विवेकानंदांचे विविध गुण गोष्टींतून सांगितले. विवेकानंद उत्तम अर्थतज्ज्ञ होते हे वेगळे वैशिष्ट्य यानिमित्ताने सर्वांना समजले. १४ फेब्रुवारीला शाखेतर्फे विद्यानिकेतन शाळा क्र. १३ या पालिकेच्या शाळेत शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी मातृ-पितृ पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. श्री. हर्षल सोनार यांनी कार्यक्रमाची संकल्पना पालकांसमोर मांडली. मुलांनी दिलेल्या साहित्यातून स्वत:च्या आई-वडिलांचे पूजन केले. यावेळी आईवडिलांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रू भरून आले होते. पालकांना हा अनुभव संस्मरणीय वाटला.
- दि. २६ फेब्रुवारीला शाखेत (मराठी भाषा दिन) 'कुसुमाग्रज जयंती' साजरी झाली. मुलांनी संग्रहित केलेल्या कुसुमाग्रजांच्या २० कवितांचे शाखेत वाचन झाले. त्यातील 'कणा' ही कविता खूप प्रेरणादायी होती.
- 'शिवरायांची युद्धनीती' या विषयावर श्री. विठ्ठल कराळे यांचे व्याख्यान झाले.
- दि. २२ मार्चला 'वाईल्ड कोल्हापूर' या चित्रफितीच्या साहाय्याने मुलांना कोल्हापूर जिल्ह्यातील अभयारण्यांची सफर झाली. निरनिराळ्या पशुपक्ष्यांची माहिती मुलांना मिळाली. याच विषयावर निबंधस्पर्धा झाली. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.

- २३ जूनला 'युगप्रवर्तक डॉ. आंबेडकर' ही छोटी चित्रफीत दाखवली. त्यातून मुलांना डॉ. बाबासाहेबांचे चरित्र थोडक्यात समजले. पूजनीय डॉ. बाबासाहेबांच्या चरित्राचा सखोल अभ्यास करायचे मुलांनी ठरविले.
- २२ जून हा दिवस 'शौर्यदिन' म्हणून साजरा करण्याचे शाखेने ठरवले. या दिवशी गणेशखिंडीतल्या चाफेकर स्मारकाला भेट दिली. श्री. मोहन शेटे सरांनी 'रँडचा वध' ही घटना भाषणातून जिवंत उभी केली. या कार्यक्रमास ४० वर्धक व २० युवक आणि सभोवतालचे निवासी नागरिक व मुले सहभागी झाली होती.
- दसऱ्याच्या दिवशी २२ ऑक्टोबरला शाळेत स्वच्छता अभियान झाले. माझी शाळा विद्येचे मंदिर आहे आणि ते नेहमी स्वच्छ व सुंदर असले पाहिजे ही भावना मुलांच्या मनात रुजवण्यासाठी हा उपक्रम झाला. सर्व शाळा मुलांनी स्वच्छ केली व यापुढे अशीच स्वच्छता राखू असे सर्वांनी मनोमन प्रतिज्ञा केली.
- सतत कामात असणाऱ्या आपल्या महिला पालकांना मनोरंजनातून काहीतरी शिकता यावं, आपलं बालपण त्यांनी परत अनुभवावं या हेतूने दि. २६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने 'आनंद मेळावा' घेतला. वर्धिनीच्या महिला विभाग प्रमुख श्रीमती पुष्पाताई नडे व सौ. मंजुषाताईंनी महिलांना प्रोत्साहित करून त्यांचे खेळ घेतले. भोंडला व मजेदार खेळ यात सर्व पालक रंगून गेले होते. कार्यक्रमाच्या शेवटी पुष्पाताईंनी महिला सबलीकरणाच्या दृष्टिकोनातून बचतगटाच्या माध्यमातून आपण सतत एकत्र येऊयात असे सांगितले.

**स्वामी दयानंद शाखा :**

- 'लाईफ ऑफ पाय' हा चित्रपट वर्धकांना दाखवण्यात आला.
- ज्योर्तिविद्या परिसंस्था, पुणे यांच्या कार्यकर्त्यांनी शाखेतील वर्धकांना दुर्बिणीच्या सहाय्याने अवकाशातील शनीची कडी, धूमकेतू, तारे, इतर ग्रहांचे उपग्रह, पृथ्वीचा उपग्रह चंद्र दाखवला.
- ५ वी ६ वीतील वर्धकांची पर्यावरण, दुष्काळ या विषयांवर गटश: मूकनाट्य स्पर्धा झाली. पर्यावरणाचा असमतोल, प्रदूषण, दुष्काळाचे परिणाम यातील प्रसंग मुलांनी कल्पकतेने मांडले.

  गणेशोत्सवात 'बालगुन्हेगारी' या विषयावर पथनाट्य अनेक ठिकाणी सादर झाले. हे सादरीकरण बिबवेवाडी पोलिस स्टेशनमधील पोलिस निरीक्षकांनी बघितले. त्यांनी कार्यक्रम झाल्यावर सर्व वर्धकांचे विषय उत्तम रितीने मांडल्याबद्दल कौतुक केले आणि पथनाट्य सादरीकरणासाठी आमंत्रण दिले.

**स्वामी अखंडानंद शाखा :**

- विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने श्री. शशिकांत मांडके यांचे 'विवेकानंदाचे बालपण' या विषयावर व्याख्यान झाले. त्यातून त्यांची एकाग्रता, बंधूप्रेम, गुरुभक्ती हे पैलू मुलांना समजले. त्यांचे वडील गेल्यावर बिकट परिस्थिती असताना त्यांनी देवीचे दर्शन झाल्यावर तिच्याकडे काहीही मागितले नाही. त्या अनुभूतीचे समाधान त्यांना सामान्य गोष्टींपुढे तुच्छ वाटले. या आणि अशा अनेक गुणांमुळे ते युवकांचे स्फूर्तिस्थान बनले आहेत.
- दि. २० मार्चला छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त श्री. निलेश धायरकर यांनी संभाजी

महाराजांचे चरित्र, त्यांनी गाजवलेला पराक्रम व्याख्यानातून मांडला.

- दि. २१ मार्चला गुढीपाडवा, हिंदू नववर्षदिन, आदर्श देवत्वस्वरूप व्यक्तिमत्त्वाचे म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण करून साजरा झाला. श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी शिवाजी महाराजांच्या बालपणापासून त्यांनी बांधलेल्या संघटनात्मक कामाचे महत्त्व विस्तृतपणे मांडले.
- १३ जूनला वर्षाची सुरुवात चांगली व्हावी व शाखेत होणाऱ्या सर्व कार्यक्रमांत सर्व वर्धक सहभागी व्हावेत या हेतूने पालकसभा झाली. सौ. नेहा साठे यांनी पालकांना दृकश्राव्य माध्यमाद्वारे मुलांमध्ये मानसिक बदल कसे घडून येतात व तेव्हा पालकांनी त्यांचे पालकत्व कसे पार पाडावे याचे मार्गदर्शन केले. याच दिवशी सौ. साठेताईंच्या हस्ते शाखेतील वर्धकांच्या ताईंनी १० वीच्या परीक्षेत उत्तम यश मिळवले म्हणून त्यांचे कौतुक करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**स्वामी अभेदानंद शाखा :**

- १३ फेब्रुवारीला मुलांच्यातील वक्तृत्वाचा विकास होण्यासाठी 'बोलायचे कसे' यावर श्री. लक्ष्मण जाधव यांनी मार्गदर्शन केले.
- दि. १७ फेब्रुवारीला महाशिवरात्रीनिमित्त शाखेने मोठ्या गटाची 'नीळकंठेश्वर' येथे सायकल सहल नेली होती. १३ वर्धकांनी यात भाग घेतला. सकाळी ६ वाजता शाखेतून सर्वजण निघून संध्याकाळी ५.३० वाजता परत आले. दोघांची सायकल पंक्चर झाली. साहित्य बरोबर असल्याने पंक्चर काढून पुढे प्रवास सुरू झाला. रोजचा सायकल सराव नसल्याने काही जण दमले पण सर्वांनी जिद्दीने सहल पूर्ण केली.
- 'शिवरायांची युद्धनीती' या विषयावर श्री. विठ्ठल कराळे यांचे व्याख्यान झाले.
- ९ जूनला सर्व वर्धकांची 'महात्मा फुले संग्रहालय' व 'राजा रविवर्मा आर्ट गॅलरी' येथे सहलभेट झाली. संग्रहालय बघताना इतिहासात शिकलेल्या पाठांची उजळणी झाली. आर्ट गॅलरीमध्ये श्री. अतुल वाघ यांनी 'पर्यावरण' चित्ररूपातून मांडले होते. यातील चित्रांची 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये निवड झाली आहे.
- २० जूनला गटश: 'पाककला स्पर्धा' झाली. मुलांनी त्यात उत्साहाने भाग घेतला. बनवून आणलेल्या पदार्थांतील पौष्टिकता परीक्षकांना समजावून सांगताना मुलांचा नकळत विज्ञानाचा पाठ झाला.
- उन्हाळी शिबिरात झालेल्या विषयाला अनुसरून श्री. मनीष वाघेला यांनी चित्रपट कसे तयार होतात याची सविस्तर माहिती सांगितली. याआधी शिबिरात तयार केलेला लघुपट दाखवला.
- वर्धकांना वृत्तपत्र वाचनाची सवय लागावी या हेतूने ठराविक वृत्तपत्रातील रोज ५ प्रश्न मुलांना देऊन त्यांची उत्तरे शोधून सांगण्याचा उपक्रम सुरू आहे.
- ८ व ९ ऑगस्ट रोजी शाखेची पावसाळी सहल किल्ले रायगड व शिवथरघळ येथे गेली होती. ४४ वर्धकांनी पावसात धबधब्यात भिजायचा, धुक्यातून चालायचा आनंद लुटला. निवास शाखेतल्याच युवक वर्धकाच्या घरी होता.
- रक्षाबंधनाच्या निमित्ताने शाखेजवळील वेताळ टेकडीवर फिरायला येणाऱ्या ज्येष्ठ मंडळींशी संवाद झाला.

त्यांना राख्या बांधून वर्धिनीच्या कार्याची माहिती देण्यात आली.

- 'नवरात्र' म्हणजे 'स्त्रीशक्तीचा उत्सव' हे जाणून दि. १७ ऑक्टोबरला शाखेत महिला पालक मेळावा झाला. भोंडल्याच्या कार्यक्रमानंतर महिला पालकांचे मनोरंजनात्मक खेळ झाले. त्यात सर्वजण उत्साहाने सहभागी झाले. श्रीमती मंजुळा बनगार, श्रीमती विमल जाधव, श्रीमती कल्याणी पेंढार या पालकांमुळे सर्व महिलांना कार्यक्रमाचा आनंद लुटता आला.

**समर्थ रामकृष्ण शाखा :**

- दि. १४ फेब्रुवारीला लोहियानगर येथील महात्मा फुले यांच्या वाड्याला मुलांनी भेट दिली. वर्धकांना मोहनदादा व अनिकेत दादा यांनी वाड्याची माहिती सांगितली. या स्थळभेटीवर मुलांकडून निबंध लिहून घेण्यात आले.
- रात्री चांदणी भोजनाचा कार्यक्रम झाला व रविवार १५ फेब्रुवारीला पहाटे ४ वाजता उठून मुलांना पर्वतीवर नेण्यात आले. अंधारात पर्वती चढण्याचा व पर्वतीवरून पुणे बघण्याचा आनंद मुलांनी लुटला.
- वर्धकांना लाल महाल व शनिवारवाडा येथे नेण्यात आले. शनिवारवाड्यातील ध्वनी-प्रकाश कार्यक्रम बघितला. पुरातन पेशवे मंदिरात मुलांना पुजाऱ्यांनी मंदिराची माहिती सांगितली.
- पुण्यात पालखी येते तेव्हा दरवर्षी शाखेच्या परिसरातील वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी मुले त्यांना जाऊन भेटत. त्यांच्याशी गप्पा मारत. मात्र यावर्षी मुलांनी वारकऱ्यांना घरी बोलावले होते. त्यांनी मुलांना स्वतःचे पालखीतील अनुभव सांगितले. त्यानंतर भजनाचा कार्यक्रम झाला.

**धर्मवीर शंभूराजे शाखा :**

- मोठ्या गटाची 'शिवाजी महाराज' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा झाली. १० वर्धकांनी भाग घेतला. कु. संकेत खोपडे यास प्रथम व कु. दत्ता वाघमारे यास द्वितीय क्रमांक मिळाला. लहान गटाची 'शिवाजी महाराज' या विषयावर निबंध स्पर्धा झाली. २५ वर्धकांनी भाग घेतला. कु. गणेश नांदे यास प्रथम तर कुमार खराडे यास द्वितीय क्रमांक मिळाला. दोन्ही स्पर्धेसाठी सौ. सुवर्णाताई शिंदे यांनी परीक्षक म्हणून काम केले.
- शाखेच्या स्थानावर, 'प्रेरणा माध्यमिक विद्यालय' येथे २३ ऑगस्ट रोजी स्वच्छता अभियान झाले. मैदान व सर्व वर्गांची स्वच्छता करण्यात आली. कार्यक्रमानंतर मुलांनी मनोगत व्यक्त केले, ''स्वच्छतेची सवय प्रत्येकाने बाळगली तर स्वच्छ भारताचे स्वप्न लवकरच प्रत्यक्षात साकारलेले दिसेल. प्रत्येकाने आपले घर व परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे.''

**घोरपडे पेठ शाखा :**

- शाखेत चार गटांमध्ये प्रसंग नाट्य स्पर्धा घेण्यात आली. 'स्वराज्याची शपथ', 'गड आला पण सिंह गेला' अशा वेगवेगळ्या विषयांवर सादरीकरण झाले. सौ. माल्विकाताई सुदामे यांनी परीक्षण केले.
- पालखी सोहळ्याच्या निमित्ताने ११ जुलैला शाखेजवळील विठ्ठल मंदिरात चार गटात अभंग स्पर्धा झाली. मंदिरात आलेल्या दिंडीतील वारकरी सहभागी झाल्याने स्पर्धा खूपच रंगली.

- आषाढी एकादशीच्या दिवशी 'कथा संतांच्या' या विषयावर आधारित गटश: बाहुल्यांचा खेळ (पपेट शो) स्पर्धा झाली. याची तयारी म्हणून १८ जुलैला बाहुल्या तयार करणे व त्याचे सादरीकरण याची कु. दिपाली साका या युवतीने कार्यशाळा घेतली. स्पर्धेचे परीक्षण श्री. निलेश धायरकर व कु. प्रियंका दाभाडे यांनी केले. कार्यक्रमाला पालकांनी उपस्थित राहून मुलींचे कौतुक केले. या कार्यक्रमात कु. गौरी यद्रे व कु. सायली तांबट या युवती वर्धिकांचे पदव्युत्तर परीक्षेत यशस्वी झाल्याबद्दल कौतुक करण्यात आले.
- गुरुपौर्णिमेचा उत्सव ४ ऑगस्टला घेण्यात आला. मुलींना मार्गदर्शन करताना श्री. इम्रान शेख सर म्हणाले, 'शाखेत, शाळेत लावलेली शिस्त आपले दैनंदिन व्यवहार सुखकर करते. यामुळे पुढे आपण जे काम करू ते उत्तम होते.' युवतींच्या कामाचे त्यांनी कौतुक केले आणि युवतींना काम करताना येणाऱ्या काही समस्यांचे निराकरण उदाहरणे देत केले.
- नागपंचमीनिमित्त १८ ऑगस्टला 'मेंदी रेखाटन' स्पर्धा घेण्यात आली. नागपंचमीचे महत्त्व सांगितले. मुलींचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला.
- रक्षाबंधन सण ससून हॉस्पिटलमधील 'सोफोश' या अनाथ मुलांच्या संस्थेत साजरा झाला. तेथील मुलांना मुलींनी स्वत: तयार केलेल्या राख्या बांधल्या. यासाठी २३ ऑगस्टला कु. प्राजक्ता सामल या युवतीने राख्या बनवण्याचे कृतीसत्र घेतले.

**स्वामी श्रद्धानंद शाखा :**

- दि. २१ मार्चला गुढीपाडव्याच्या दिवशी श्री. मारुती शिंदे आजोबांनी मुलांना पौराणिक गोष्टीतून गुढीपाडव्याचे महत्त्व सांगितले. या गोष्टी नव्याने ऐकताना मुले रंगून गेली होती.
- दि. २८ मार्चला रामनवमीनिमित्त पन्नास मनाच्या श्लोकांचे सांघिक वाचन झाले. वाचताना तयार झालेल्या तालामुळे मुलांना हे श्लोक पटकन पाठ झाले.
- 'सायकल दुरुस्ती व देखभाल' याची कार्यशाळा झाली.
- श्री. अविनाश कुलकर्णी सरांनी 'खेळातून संस्कार' हा विषय विविध मनोरंजनात्मक, व्यवस्थापनात्मक खेळांतून मांडला. हरणे-जिंकणे या पलीकडे खेळातून स्वत:ची कौशल्य ओळखणे, वेळेचे व परिस्थितीचे भान राखून वागणे, गटाने काम करणे अशा गोष्टी आपण नकळत शिकत असतो याचा अनुभव मुलांना खेळताना आला.
- १७ जुलैला चित्रकला स्पर्धा झाली. ७० मुलांनी त्यात भाग घेतला. शाखेत नवीन प्रवेश घेतलेल्या मुलांसाठी मनोरे स्पर्धा झाली. त्यांनी खूप उत्साहाने रोज सराव करून, कल्पकतेने मनोरे उभे केले.
- सध्या सर्वत्र चर्चेत असलेल्या 'स्मार्ट सिटी' या विषयावर शाखेत प्रश्नोत्तर रूपात चर्चासत्र झाले. 'स्मार्ट सिटी' याची संकल्पना शाखेचा युवक कु. महेश ढवळे याने मुलांना समजावून सांगितली.

**स्वामी सुबोधानंद शाखा -**

मोठ्या गटातील मुलांनी 'आदर्श शहर' हा प्रकल्प तयार केला. 'ऊर्जा बचत' ह्या विषयाला अनुसरून शहरात

वीजव्यवस्था कशी असावी याचे सादरीकरण सर्व वर्धकांसमोर झाले. पवनऊर्जा, सौरऊर्जा यांचा वापर सोप्या पद्धतीने आपण करू शकतो हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचला.

**भगिनी निवेदिता शाखा –**

- २१ जूनला शाखेत गटश: 'पाककला स्पर्धा' झाली. 'पदार्थ तयार करताना किंवा सजवताना जास्तीत जास्त नैसर्गिक रंगांचा वापर करा' या सूचनेला अनुसरून पाणीपुरी, छोले पराठे, जिरा राईस असे पदार्थ उत्तम रीतीने बनवून, सजवले होते. मुलींची कल्पकता यातून दिसून आली.
- २१ जुलैला शाखेत 'वाचन कट्टा' उपक्रम झाला. यामध्ये गटश: वेगवेगळी पुस्तके व वर्तमानपत्रे यांचे वाचन झाले. यामुळे मुलींना वाचनाची आवड लागण्यास मदत होईल.
- रक्षाबंधन 'भीमनगर' वस्तीतील घरातील प्रत्येक व्यक्तीला राखी बांधून साजरे करण्यात आले. यामुळे १०० घरी संपर्क झाला. काही मुलींचा हा पहिलाच अनुभव होता. संभाषण कौशल्याचे तंत्र मुलींना समजण्यास मदत झाली.

**नरवीर तानाजी मालुसरे शाखा –**

श्री. निलेश धायरकर यांनी गुरुपौर्णिमेच्या दिवशी वर्धकांशी संवाद साधला. कळत नकळत आपण अनेक गोष्टीतून शिकत असतो हे मुलांना लक्षात यावे म्हणून शाळेत दिसणाऱ्या विविध गोष्टींचे त्यांना निरीक्षण करून कोणत्या गोष्टी तुम्हाला काय शिकवतात याची नोंद करायला सांगितले. त्यातील काही निवडक नोंदी –

*** पक्षी – सर्व ठिकाणी फिरत रहा. एका जागी थांबू नका.**

*** ढग – सर्वांमध्ये मिळून मिसळून रहा.**

*** मुंग्या – सतत मेहनत करा, कामात व्यग्र रहा.**

*** काच – काचेतून तिच्या पलिकडचे सर्व दिसते. त्याप्रमाणे आपणही आतून बाहेरून स्वच्छ रहावे. (नितळ असावे).**

**स्वामी शिवानंद शाखा –**

शाखेतील वर्धकांनी पंचवटी मित्रमंडळ, मोहननगर–धनकवडी येथे मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर केले. या कार्यक्रमास पुण्याचे उपमहापौर श्री. आबा बागुल उपस्थित होते. त्यांनी मुलांचे कौतुक केले.

- दि. ४ ऑक्टोबर रोजी मानसिक विकास बैठकीत कागदापासून खेळणी व इतर वस्तू बनवण्याची छोटी कार्यशाळा झाली. मुलांनी खूप उत्साहाने वस्तू बनवल्या.

❖ ❖ ❖

## अभिनंदन

धर्मवीर शंभूराजे शाखेतील वर्धक **कु. एकनाथ खराडे** याला आंतरशालेय इंग्रजी संभाषण स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**संघटनेचा मंत्र घेउनी, चला चला रे पुढे पुढे । दीन असो वा दुबळा कोणी, मदतीसाठी हात पुढे ।।**

## तासिका व्यवस्था वृत्त

**स्वामी विवेकानंद शाखा :**

- दि. २८ फेब्रुवारीला विज्ञान दिनानिमित्त निवडक मुलांनी आयुका येथील सायन्स पार्क व विज्ञान प्रयोग प्रदर्शनास भेट दिली. मुलांच्या प्रत्येक प्रश्नाला तिथे समर्पक उत्तर मिळाल्याने त्यांचा उत्साह द्विगुणित झाला.
- दर सोमवारी होणाऱ्या 'कुतुहल विज्ञाना'चे या उपक्रमात सर्वजण उत्साहाने सहभागी होतात. श्री. प्रियदर्शन दादा मोकळ्या मैदानावर हा वर्ग घेतात. शास्त्र अभ्यासक्रमातील महत्त्वाच्या संकल्पना, तत्त्वे, नियम रंजक पद्धतीने उदाहरणांतून स्पष्ट केल्याने मुलांना विज्ञानाची गोडी लागली आहे.

**स्वामी श्रद्धानंद शाखा :**

शाखेच्या ३८ वर्धकांनी शिवचरित्रावरील निबंध स्पर्धेत भाग घेतला.

**स्वामी अखंडानंद शाखा –**

- १० वीच्या मुलांना पूर्वपीठिका अभ्यास शिबिराचा चांगला फायदा झाला. त्यांच्या मासिक परीक्षेच्या निकालातून हे जाणवले.

**स्वामी सुबोधानंद शाखा –**

- सौ. सोनावणे ताई शाखेची ओळख करून घेण्यासाठी आल्या आणि त्यांनी ५ वी ते ७ वी साठी आपणहून दोन तासांची जबाबदारी घेतली. त्यांच्याच संपर्कातून सौ. चैत्राली खेर व श्री. वृषभ खेर यांनीही काही तासांची जबाबदारी घेतली आहे.

**भगिनी निवेदिता शाखा –**

- १८ जुलैला शाखेत शिकवायला येणाऱ्या नवीन शिक्षिकांची वर्धिनीशी जवळीक वाढावी, वैचारिक देवाणघेवाण व्हावी या हेतूने बैठक झाली. या बैठकीआधी सगळ्यांनी एक माहितीपट बघितला. चर्चेचे संचालन श्री. संदीप मोरे सरांनी केले. बैठकीला १० शिक्षक व युवती वर्धिका उपस्थित होत्या.
- इतिहास व भूगोल या विषयांसाठी 'स्वयंअध्ययन' सत्र ८ ऑगस्ट रोजी झाले. प्रश्नोत्तरांच्या तासात मुलींचा प्रतिसाद उत्तम होता.
- 'वैज्ञानिक संकल्पना खेळण्यांमधून' हे कृतीसत्र दि. ९ ऑगस्ट रोजी युवती वर्धिका कु. निकिता शासम हिने घेतले. चुंबकीय क्षेत्र (Magnetic Field), वनस्पती पेशी (Plant Cell), प्रकाश वर्णपंक्ती (Light Spectrum) या संकल्पना वेगवेगळ्या वस्तू हाताळून प्रयोगातून समजून घेतल्या.

❖ ❖ ❖

हे समतेचे विराट दर्शन । पुरुषार्थाचे रूप असे । अनंत हृदयांतरिचे स्पंदन । अपूर्व संगम साधतसे ।।

## ''तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला, तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा''

**राजर्षी शाहू शाखेतील** लहान गटातील वर्धकाच्या घरी संपर्काला गेलो असताना आलेला अनुभव...

घर म्हणजे अर्धवट बांधकाम झालेल्या एका मजल्यावर भाड्याची खोली. शाखेचा युवक अमेय बरोबर होता. घरात सगळ्यांची विचारपूस झाल्यावर आमच्या छोट्या वर्धकाला विचारले, ''शाळेतील जिगरी दोस्त कोण ?''

''गणेश शिंदे'' ''का ?'' मी विचारले.

''आम्ही एकमेकांच्या मदतीला धावून जातो म्हणून'' तो उत्तरला. ''अच्छा, तू काय मदत केलीस ?''

अतिशय शांत आणि विनम्रपणे छोटा वर्धक बोलू लागला. ''अभ्यासात अडचण आली की एकमेकांना मदत करतो. बऱ्याचदा त्याच्याकडे पेन नसते. काही साहित्य नसते. त्याला मी देत असतो.'' त्याची आई म्हणाली, ''अहो सर, एकदा याने शाळेच्या दोन पँटपैकी एक पँट गणेशला दिली कारण त्याच्याकडे पँट नाही.'' ''अहो सर, तो फार गरीब आहे. एका इमारतीच्या तळघरात ते राहतात. वडील घरीच असतात. आई धुण्याभांड्याची कामे करते. त्याच्या घरी बऱ्याचदा लाईट नसते. गणेश आणि त्याची ताई खूप हुशार आहेत. घरात वीज नसताना तिने १० वी मध्ये ८१% मिळवले.''

अवाक होऊन सगळं ऐकत होतो. रोजच्या कामातील कार्यकर्त्याला वर्धकाची माहिती नसावी तेव्हढी माहिती. बांधिलकी या छोट्या वर्धकाला होती. स्वत: पुष्करची परिस्थिती बेताचीच आहे. वा रे बेटा ! भले शाब्बास !... मग त्याला घेऊन गणेशच्या घरी गेलो. अंधुक घर, वडील पलंगावर बसलेले. एक स्टोव्ह, थोडीशी भांडी, आजूबाजूला इमारतीच्या बांधकामाचा पसारा होता. समोरच्या भिंतीवर गणेशने काढलेली सुरेख चित्रे. ताई एका बाजूला अभ्यास करत होती. कला शाखेत आहे IAS बनायचे असे तिचे स्वप्न आहे.

वडिलांना म्हणालो, ''या दोघांनाही उद्यापासून शाखेत पाठवा.''

असे अनेक 'गणेश' वर्धिनीत यावेत... म्हणूनच आजचा संपर्क पुढील काम करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल. सामाजिक बांधिलकी जपणारे तरुण कार्यकर्ते वर्धिनीच्या कामातून तयार व्हावे ही संस्थापक किशाभाऊ यांची इच्छा आपला छोटा वर्धक नव्हे 'कार्यकर्ताच' ८ वीतल्या पुष्कर सागडे याच्याकडे पाहिल्यावर पूर्ण होईल असे वाटते.

**– निलेश धायरकर**

❖ ❖ ❖

## अभिनंदन

समर्थ रामकृष्ण शाखेचा युवक कु. पार्थ कश्यप याला इ. १० वी मध्ये संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले. त्याची ही संस्कृतची उत्तरपत्रिका यंदाच्या दहावीच्या दिवाळी अंकात छापून आली आहे. पार्थ फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेत आहे. शाखेचा कार्यक्रमप्रमुख म्हणून कार्यरत आहे.

**हीच एकता समता ममता, पथ ऐक्याचा चालुया ।**

## तरी शाखा चालू राहिली...

शाळेच्या पदाधिकाऱ्यांनी जुलै महिन्यात सांगितले की महिन्यानंतर तुमची शाखा शाळेत भरवू नका. ५ सप्टेंबरपासून आम्ही शाखा शाळेत भरवली नाही. शाळेच्या मागच्या बाजूला एक मैदान होते तेथे शाखा भरवायला सुरुवात केली. शाखेला वर्ग नाही याचा विचार करून मग मुलांच्या आवडीने खेळ घ्यायला सुरुवात केली. हेच मुख्य कारण असावं की शाखा महिन्याभरानंतरही संख्या टिकून राहिली. सप्टेंबर महिना आला की गणपती हा वर्धिनीचा मोठा उत्सव आणि या वर्षी शाखेला पथनाट्य होते आणि त्याचा विषय बालगुन्हेगारी हा होता. मग प्रश्न असा निर्माण झाला की नाटकाचा सराव कुठे करायचा ? मला काही सुचत नव्हते. मग जवळच्या मंदिरात सराव सुरू झाला.

हे सगळं शाखेसाठी चालू होतं. उपस्थिती कमी अधिक व्हायची. कधी २८ तर कधी ८. एक दिवस असं झालं की शाखेत फक्त युवकच आले. अशा परिस्थितीत मी निराश झालो होतो. पण मी स्वतःला समजावत होतो की मी पुन्हा मुलांना शाखेत आणेन. या काळात एकदा निलेश धायरकर नाटकाचा सराव घ्यायला आले होते. युवकांच्या सहकार्यामुळे संपर्क करून तो सराव शक्य झाला. याच काळात कबड्डीच्या मॅचेस नेहरु स्टेडियमला होत्या. कबड्डीचा सराव घ्यायला सुरुवात केली व त्यामुळे संख्या वाढायला मदत झाली. युवकांनी पण ह्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यात मुलांना कबड्डी खेळण्याचा वेगळा अनुभव आला.

शाखेतील काही वर्धक जिल्हा स्तरावरील स्पर्धांमध्ये वेगवेगळ्या खेळांसाठी शाळेकडून खेळले व त्यातील काहींची निवडही झाली. कु. राकेश चांभार (कबड्डी), कु. शकील शेख (बुद्धिबळ), कु. निरंजन पोकळे (कबड्डी), कु. विशाल खंडागळे (कबड्डी), कु. योगेश गायके (कबड्डी), कु. शाहिद शेख (बुद्धिबळ).

पण यामुळे नाटकाचा सराव व्यवस्थित होऊ शकला नाही. मग ठरवले की मुलांचा आरतीचा संच करून एकमेकांच्या घरी आरतीला जायचं. यामुळे मला एक कळलं की शाखेला संपर्काशिवाय पर्याय नाही. या पूर्ण काळात ओंकार, शेखर, निरंजन, नितीन आणि कौस्तुभ या युवकांचे पूर्ण सहकार्य लाभले. तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते सतत शाखेत येत होते. त्यामुळे आमचा उत्साह टिकून राहिला.

शाखेला शाळा मिळत नव्हती तेव्हा संपर्क करताना पालकांच्या नवीन तक्रारी कानावर पडायच्या, आमचा मुलगा लवकर घरी का येतो ? शाखेत फक्त खेळच का होतात ? मुलगा शाखेच्या वेळेत मला बाहेर दिसला होता, अभ्यास कमी करायला लागलाय, शाखेचं ठिकाण बदलायचं कारण काय ?

शाळा मिळण्याच्या एक आठवडा अगोदर निलेश सरांनी एक बैठक घेतली. या पूर्ण महिन्याच्या आधी मला वाटले नव्हते की मी या प्रसंगाला तोंड देऊ शकेन. ही शाखा मला नवीन होती. त्यात मुले पण नवीन आणि युवकही नवीन. पण त्यांनी मला उत्तर प्रकारे साथ दिली. सुरुवातीला केलेल्या नियोजनाप्रमाणे सर्व व्यवस्था

युवकांनी नीट समजावून घेऊन आलेल्या अडचणीला सामोरे जात मुलांना शाखेशी चांगले बांधून ठेवले. अखेर आम्हाला ८ ऑक्टोबर या दिवशी महानगरपालिकेच्या हरिभाऊ पोकळे प्रशालेत शाखा घेण्याची परवानगी मिळाली. आता सर्व युवकांच्या मदतीने पुन्हा एकदा नव्या उमेदीने शाखा सुरू झाली आहे.

– **अभिजीत कामठे,** शाखाप्रमुख

नरवीर तानाजी मालुसरे शाखा

❖ ❖ ❖

## वर्धापनदिन

**स्वामी ब्रह्मानंद शाखा –**

९ ऑगस्ट शाखेचा **वर्धापन दिन** उत्साहात साजरा झाला. शाखा स्थानावर रक्तदान शिबिर घेण्यात आले. या उपक्रमासाठी परिसरात केलेल्या संपर्काने प्रतिसाद चांगला मिळाला. ५७ पिशव्यांचे संकलन झाले. प्रत्येक रक्तदात्यास रक्तपेढीकडून आरोग्य विमा काढून देण्यात आला. संध्याकाळी वर्धकांना व पालकांना **मार्गदर्शन करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेविका माननीय सिंधुताई सपकाळ उपस्थित होत्या.** त्यांच्या अनुभव कथनातून संकटांना न भीता, न खचता सामोरे जा, चांगल्या कामास समाज नेहमीच मदत करतो असे अनेक संदेश लक्षात राहिले.

**स्वामी दयानंद सरस्वती शाखा –**

शाखेचा **वर्धापन दिन** विश्वकर्मा महाविद्यालयाच्या सभागृहात १८ ऑगस्ट रोजी **श्रीमंत दगडूशेठ ट्रस्टचे विश्वस्त मा. श्री. सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत साजरा झाला.** कार्यक्रमाच्या नेटक्या आयोजनाचे कौतुक करून ते म्हणाले, ''ज्याप्रमाणे तुम्हाला वर्धिनीचा फायदा झाला आहे त्याप्रमाणे तो अजून गरजू मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व वर्धकांनी कार्यरत राहिले पाहिजे.'' कार्यक्रमात आकर्षक व मनोरंजनात्मक विविध गुणदर्शन सादर झाले.

**स्वामी अखंडानंद शाखा –**

१२ ऑक्टोबर शाखेच्या २९ व्या वर्धापनदिनाच्या दिवशी युवक वर्धक हर्षद कुलकर्णी यांनी शाखेची सुरुवात कशी, कोणी केली ? यातून कार्यकर्ते कसे घडले याची माहिती मुलांना सांगितली. शाखेचा २९ वा वर्धापनदिन म्हणून मैदान, तासिका, कार्यक्रम व संपर्क या व्यवस्थांचे वेगवेगळे २९ उपक्रम करायचे ठरले आहे.

**भगिनी निवेदिता शाखा –**

शाखेचा वर्धापनदिन  १ जून मुठा नदीपात्राशेजारील रस्त्याची स्वच्छता करून साजरा झाला.

❖ ❖ ❖

**मुलींची साप्ताहिक शाखा :**

वर्धिनीची मुलींची पहिली साप्ताहिक शाखा ९ नोव्हेंबर २०१४ पासून पंडीत दीनदयाळ शाळा, अभिनव शाळेशेजारी (इंग्रजी माध्यम) सुरू झाली. वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. विश्वास कुलकर्णी व शाहू शाखेचे पालक श्री. शेखर इनामदार यांनी कर्वेनगर भागातील केळेवाडी, गोसावी वस्ती, ओटा वसाहत, एरंडवणा येथील वस्तींमध्ये संपर्क करून, मुलींशी व त्यांच्या पालकांशी बोलून शाखेचे महत्त्व त्यांना पटवून देऊन हे काम सुरू झाले. मुलींच्या अभ्यासातील प्रगतीबरोबर शारीरिक व व्यक्तिमत्त्व विकास व्हावा या उद्दिष्टाने दर रविवारी उपक्रम घेतले जातात. यासाठी राणी लक्ष्मीबाई सैनिकी शाळेच्या निवृत्त शिक्षिका सौ. प्रतिभा शाळीग्राम, सुबोधानंद शाखेच्या पालक सौ. संजीवनी महाजन, वनवासी पाड्यांवरील प्रशिक्षणाचा अनुभव असलेल्या कु. नीलम पंडीत, ब्रह्मानंद शाखेतील शिक्षिका सौ. संगीता कुलकर्णी व वर्धिका कु. तेजश्री शिंदे या सर्वांचे सहकार्य या शाखेसाठी होत आहे. १ फेब्रुवारीपासून ही शाखा कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या नळस्टॉपजवळील शिशुविहार शाळेत स्थलांतरित झाली आहे. मुलींचा उत्साह व पालकांचे सहकार्य यामुळे ही शाखा आता नियमित चालू आहे. उन्हाळी व हिवाळी शिबिरात मुलींनी उत्साहाने भाग घेतला. उन्हाळी शिबिर एक दिवसाचे झाले. त्यात खेळांबरोबर झालेली व्याख्याने –

| **विषय** | **वक्ते** | **विषय** | **वक्ते** |
|---|---|---|---|
| उद्घाटन | सौ. विद्या देशपांडे (कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या संचालिका) | नासा येथील प्रशिक्षणातील अनुभव | सौ. कांचन करंदीकर |
| | | 'एक होता कार्व्हर' – कथाकथन | सौ. बागेश्री पोंक्षे |
| प्रतिभा जागरण | श्री. ज्ञानेश पुरंदरे | | |

वेगवेगळ्या उपक्रमांमुळे मला शाखेची गोडी लागली. निगडीच्या हिवाळी शिबिराचा 'क्रीडा विषय' आवडीचा असल्याने शाखेत खेळ घेण्यासाठीचे मार्गदर्शन मिळाले. शिबिरातील प्रेरणादायी व्याख्यानातून व शिबिरातून सगळ्यांबरोबर समरसून राहणे, स्वावलंबनाचे महत्त्व, शिबिराची शिस्त या गोष्टी शिकायला मिळाल्या. याचा उपयोग शाखेच्या कामात मला निश्चित होईल. – कु. प्रणाली भंडारे

तसेच वर्षभर साप्ताहिक शाखेत अन्य वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

| **वक्ते** | **विषय** | **वक्ते** | **विषय** |
|---|---|---|---|
| श्री. संकेत लिमये | भाषा शिकणे एक कला | श्री. राहुल पायगुडे | पद्य, पोवाडा सादरीकरण |
| सौ. सायली कदम | संवाद कौशल्य | डॉ. श्री. राम साठे | विद्यार्थ्यांसाठी मनाचे श्लोक |
| श्री. थोरबोले | आरोग्यासाठी खेळाचे महत्त्व | श्री. ओमकार बाणाईत | वैज्ञानिक संकल्पना प्रयोगातून |
| श्री. हरिष | बँकेतील कामाचे अनुभव कथन | | ध्वनी संकल्पनेवरील प्रयोग |

**समाजजीवन भारुनि टाकू चैतन्याने, मानाने । वैभवशाली भवितव्याला नटवू निज कर्तृत्वाने ।।**

## ॐ युवा विभाग ॐ

**१० वी सहल (हरिश्चंद्रगड)** दि. २७-२९ मार्च.

आयुष्यातील शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाच्या टप्प्यांपैकी एक म्हणजे १० वीची शालांत परीक्षा. ही परीक्षा यावर्षी दिलेले वर्धिनीचे एकूण ४४ वर्धक हरिश्चंद्रगडावर सुट्टीतील नियोजनासाठी तीन दिवस गेले होते. परीक्षेचा ताण तर नक्कीच दूर झाला तसेच भविष्यातील वाटचालीची दिशा स्पष्ट होण्यासही या सहलीमुळे मदत झाली.

रात्री ९ वाजता सुरू केलेली चढाई मध्यरात्री १.३० वाजता संपली. पहाटेच्या वाऱ्याने आपोआप जाग आली. मैदानात दंडगोल, कबड्डी व ध्वजयुद्ध हे खेळ झाले. त्यानंतर मैदानी ताकत आणि विविध प्रसंगी शारीरिक सुदृढता आवश्यक असते याविषयी मार्गदर्शन झाले.

दुपारच्या जेवणानंतर वर्धिनीला आवश्यक असा शाखा कामाचा विस्तार याविषयी विलास कुलकर्णी सरांची मुलाखत त्याठिकाणी असलेल्या गणपती गुहेत मुलांनी घेतली. त्यामध्ये त्यांनी केलेले पुण्यातील शाखा विस्ताराचे काम, संभाजीनगरमधील शाखा विस्तार आणि रक्तपेढीचे काम, त्यानंतर बजाज कंपनीत कामाला असताना देखील शाखा कामाचा घेतलेला ध्यास, अनेक जबाबदाऱ्या-आव्हाने व त्या कामामधील आनंद त्यांनी किती अनुभवला हे मुलांच्या लक्षात आले. सामाजिक आणि वैयक्तिक आयुष्यात समतोल कसा साधावा याचे जिवंत उदाहरण सर्वांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले.

कोकणकडा बघताना कु. शुभम जगताप यांनी गडाची भौगोलिक रचना, गडांची वैशिष्ट्ये, मनुष्यनिर्मित गडांची बांधणी, अशा विषयी माहिती देताना 'मनुष्य कोणत्याही मर्यादा ओलांडून अविश्वसनीय कामगिरी करू शकतो' या प्रेरक विचारानं शेवट केला.

त्यानंतर श्री. निलेश धायरकर यांनी 'वर्धिनीचा युवक हा वर्धिनीत असताना व समाजात वावरतानाही नेतृत्व करणारा असावा. कॉलेजच्या जीवनात बहुआयामी नेतृत्व असलेला, कौटुंबिक जीवनात यशस्वी असलेला, आणि शाखा कामात सातत्य असलेल्या युवकांची रचना ही वर्धिनीच्या कामाची वैशिष्ट्ये त्याने जोपासली पाहिजे' असा विषय मांडला.

गड उतरताना काळी मैना, जांभळे, चिंचा यांचा शोध चालू होता. या सहलीतून मुलांनी अनेक महत्त्वाच्या विषयांची माहिती घेतली व सहभागही उत्तम दाखविला.

सहलीत मुलांना विचारलेला प्रश्न - **वर्धिनीत कशासाठी यायचे ?**

लहानपणापासून फक्त खेळण्याच्या आसक्तीने येणारा वर्धक जेव्हा १० वीचा टप्पा यशस्वीरित्या पार करतो तेव्हा त्याच्या मनातली साकारलेली वर्धिनी म्हणजे 'व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणारी, सामाजिक बांधिलकी जपायला शिकवणारी, जीवाभावाचे हितसंबंध जपायला शिकवणारी, समाजात एक मनाचे स्थान निर्माण करून देणारी संस्था' असा अर्थ त्याला उमजू लागतो आणि म्हणून वर्धिनीत यावेसे वाटते.

**भेदभावना भिंती पाडू समतेची गाथा गाऊ । उच्चनीचता गाडुनि टाकू नवी दिशा नव गति घेऊ ।।**

**शाखा विभाग – १२ वी सहल (ढाक) – संख्या :** १० युवक. दि. ११-१२ मार्च २०१५ - सायं. ५.३० वाजता ढाकच्या मंदिरात पोहोचलो. रात्रीच्या गटचर्चेत सर्वांनी स्वत:च्या आयुष्यातील चांगले, वाईट, अविस्मरणीय अनुभव सांगितले. विविध समस्यांच्या चर्चा व त्यावर प्रभावी उपाय सुचवण्यात आले. त्यामध्ये मित्रांच्या संगतीमुळे भरपूर काही नवीन शिकण्याची इच्छा निर्माण होते. पण मित्रांची निवड ही प्रभावित करणाऱ्या गुणांच्या आधारावर केल्याने त्याचे काही सुपरिणाम अनुभवता आले आणि जेथे ही निवड चुकली तेथे काही विपरीत परिणाम देखील अनुभवायला लागले. मित्रांची निवड केवळ 'प्रभावित होणे' या निकषावर न होता 'प्रेरक आणि चांगल्या विचारांच्या देवाणघेवाणीच्या दृष्टीने' करणे आवश्यक असते असे लक्षात आले.

सकाळी ७ वाजता गुहेच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. गुहेत पोहोचल्यावर वर्धिनीचा वैयक्तिक जीवनावर झालेला परिणाम याविषयी चर्चा झाली. त्यानंतर पुढील पाच वर्षांचे नियोजन, वैयक्तिक व वर्धिनीच्या कामातील योगदान याविषयी चर्चा झाली. चढताना उत्साह होता तर उतरतानाचा थरार युवकांना जाणवत होता. ढाक भैरीचा अवघड, अविस्मरणीय ट्रेक पूर्ण केल्याचे समाधान सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

## युवक मेळावा –

१८ ऑक्टोबर रोजी कर्वेनगर, सिंहगड रोड (भाग ३) शाखांमधील युवकांचा मेळावा झाला. ११० युवक उपस्थित होते. युवकांना वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे, सहकार्यवाह श्री. अमोल उंदरे व ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. श्रीकांत यादव यांनी मार्गदर्शन केले. श्री ज्ञानेश पुरंदरे म्हणाले, 'आपल्या देशात जर बदल घडवायचा असेल तर भगवंताने दिलेल्या मनुष्यजन्माचा उपयोग देशकार्यासाठी व्हायलाच हवा. त्यासाठी स्वार्थाच्या चाकोरीतून बाहेर पडून प्रत्येक युवकाने विविध माध्यमातून दैनंदिन शाखेत व वर्धिनीत सक्रीय होणे गरजेचे आहे. शिकून मोठे होत असताना समाजाला आपली गरज आहे हे विसरता कामा नये. आपला दैनंदिन कामाचा व्याप सांभाळून समाजातील समस्या जाणून त्यासाठी व समाज प्रबोधनासाठी आपला काही वेळ निश्चित केला पाहिजे. युवकांची संघटित शक्ती समाजात आमूलाग्र बदल आणू शकते.'

श्री. अमोल उंदरे दैनंदिन शाखेच्या कामाचे महत्त्व सांगताना म्हणाले, 'शाखेमध्ये नवनवीन उपक्रम राबवले की मुलांचा उत्साह ही वाढत राहतो. आपल्या कामाची माहिती प्रसारमाध्यमाच्या साहाय्याने जास्तीत जास्त लोकांपर्यंत कशी जाईल याचा प्रयत्न व्हायला हवा. आपण याच शाखेतून मोठे झालो आहोत. आपल्या अनुभवातून आठवड्यातील एक तास शाखेसाठी द्यायला पाहिजे.'

श्री. श्रीकांत यादव चित्रपट अभिनेते आहेत. शाखेत झालेल्या संस्कारांचा उपयोग त्यांना कलाक्षेत्रात कसा झाला हे सांगताना ते म्हणाले, 'वस्त्यांमध्ये जाऊन वर्ग घेतल्याने नेतृत्व करण्याची संधी मिळाली. शाखांमधील पद्य व वेगवेगळ्या विषयांवरील नाट्यस्पर्धांमुळे कल्पनाशक्ती व सादरीकरणातील आत्मविश्वास वाढला.'

❖ ❖ ❖

## युवा अधिवेशन – 'अशी हवी आहे आम्हाला लोकशाही'

स्थळ – आबासाहेब गरवारे महाविद्यालय, दिनांक – २९ मे ते ३१ मे २०१५

आपल्या समाजासाठी, आपल्या देशासाठी काही तरी करावं असा तरुण पिढीच्या मनात विचार असतो. पण नेमकं काय करावं ? कसं करावं ? आपण एकटे काय करणार ? असे अनेक प्रश्न त्यांच्यापुढे असतात. गेल्या वर्षा–दीड वर्षात देशात जे महत्त्वाचे बदल झाले आहेत, जे चैतन्याचे वातावरण निर्माण झालं आहे ते होण्यामागे देशातील तरुण पिढीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

आणि म्हणूनच या होतकरू, उत्साही तरुण पिढीची लोकशाहीविषयी कल्पना सुस्पष्ट करावी, सजग नागरिक या नात्याने ते समाजासाठी, पर्यायाने देशासाठी किती महत्त्वाची भूमिका वठवू शकतात हे त्यांना विस्ताराने समजावून सांगावे यासाठी एक युवा अधिवेशन आयोजित करण्याचे संस्थेने नक्की केले. ही कल्पना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, ग्राममंगल संस्था, लेंड–अ–हँड इंडिया व सजग नागरिक मंच या संस्थांनी उचलून धरली. वेगवेगळ्या युवक संस्था, संघटना, अभ्यासिका, विविध वृत्तपत्रे, युवक युवती एकत्र येतात असे कट्टे, अशा ठिकाणी युवक–युवती आणि अन्य ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी जाऊन या अधिवेशनाचा प्रचार केला. आकाशवाणी पुणे केंद्राच्या युववाणीनेही या विषयाच्या प्रसाराला साथ दिली. या सर्व प्रचाराला युवा पिढीने भरभरून प्रतिसाद दिला.

हिंगोली, जळगाव, नांदेड, गडचिरोली अशा जिल्ह्यांपासून ते अगदी डहाणूसारख्या वनवासी क्षेत्र असलेल्या गावातील युवक–युवती मोठ्या संख्येने या अधिवेशनाला पूर्ण वेळ उपस्थित होते. लोकशाही समजावून घेण्यासाठी १७० हून अधिक युवक युवती तीन दिवस एकत्र येतात ही एकच गोष्ट भारतीय लोकशाहीचे भवितव्य सुरक्षित आहे असा विश्वास जागवणारी आहे. युवा पिढी आणि मोबाईल हे एक अतूट नाते आहे पण अडीच दिवस चाललेल्या या अधिवेशनाच्या एकाही सत्रात एकदाही एकाही युवा प्रतिनिधीचा मोबाईल वाजला नाही की सत्राच्या विषयाकडे दुर्लक्ष करून ते सर्फिंगमध्ये, चॅटिंगमध्ये मग्न आहेत असे दिसले नाही. युवा पिढी लोकशाही समजावून घेण्यासाठी, समाजासाठी सक्रीय योगदान द्यायला किती उत्सुक आहे हेच यातून जाणवले.

सर्वांसाठी शिक्षण, सर्वांसाठी आरोग्य, अर्थकारण समजावून घेऊ या, देशविकासासाठी सुशासन, सामाजिक चळवळी कशा उभ्या राहतात अशा पाच विषयांवर युवक युवतींना मार्गदर्शन करण्यासाठी अनेक ज्येष्ठ शासकीय अधिकारी, तज्ज्ञ अभ्यासक, अनुभवी कार्यकर्ते उपस्थित होते. प्रा. रमेश पानसे, माजी कुलगुरु डॉ. धनागरे, महाराष्ट्र ज्ञान आयोगाचे श्री. विवेक सावंत, श्रीमती प्रतिभा भराडे, प्रा. डॉ. गणेश राऊत, डॉ. अशोकराव कुकडे, डॉ. नरेंद्र कुलकर्णी, डॉ. चंद्रशेखर कर्वे, डॉ. माया तुळपुळे, डॉ. जयंत नवरंगे, श्रीमती लीना मेहेंदळे, श्री. इंद्रजीत देशमुख, श्री. प्रल्हाद कचरे, श्री. विजय कुंभार, श्री. मिलिंद थत्ते, श्री. विवेक वेलणकर, डॉ. अनंत फडके, डॉ. प्रसाद देवधर अशा मान्यवरांनी उपस्थित युवक युवतींना मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रश्नांना मोकळेपणाने उत्तरे दिली तसेच समाजासाठी तरुणांनी सक्रीय होणे किती आवश्यक आहे हे जाणवेल असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माणही केले.

**भेद भाव जेथ तेथ, शक्ति कोठली असे ?। शक्तिहीन जो तयास, न्याय या जगी नसे ।।**

प्रत्येक विषयाच्या मांडणीनंतर प्रश्नोत्तरे आणि मंथनसत्रे होत होती. मंथनासाठी या सर्वांचे सहा गट करण्यात आले होते. दीड दोन तास विषय ऐकल्यानंतरही तेवढ्याच उत्साहात सर्व युवक युवती सामुहिक मंथनासाठी एकत्र जमत होते.

अधिवेशनाच्या उद्‌घाटन प्रसंगी आपल्या बीज-भाषणात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. विश्वंभर चौधरी यांनी शासकीय धोरणांमधील अनेक विसंगती दाखवत त्यामागे असलेल्या भ्रष्टाचारासारख्या कारणांचा पट उलगडवत उपस्थितांमध्ये अस्वस्थता निर्माण केली व लोकशाही सुदृढ होण्यासाठी कसा विचार करावा लागेल याविषयी आपली मते मांडली. या उद्‌घाटन सत्राचा यथोचित समारोप म.ए.सो.च्या नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. रवींद्र वंजारवाडकर यांनी केला तर अधिवेशनाच्या समारोपात तरुणांना प्रेरणा देत श्री. अविनाश धर्माधिकारी यांनी 'अच्छे दिन' आणणे ही केवळ सरकारची जबाबदारी नसून आपण प्रत्येकाने त्यासाठी सक्रीय होण्याची आवश्यकता आहे हे बिंबवले.

या अधिवेशनामध्ये उपस्थित युवा प्रतिनिधींचा प्रतिसाद सकारात्मक जाणवत होताच पण अधिवेशन संपताना त्यांनी ज्या लेखी प्रतिक्रियेतून आपले अभिमत व्यक्त केले आहे ते अधिक उत्साह देणारे आहे.

* लोकशाहीचा खरा अर्थ कळला आणि प्रत्येक नागरिकाचं त्यातलं महत्त्व आणि स्थान कळलं.
* स्वत:च्या हक्कांपेक्षा कर्तव्याची, सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली.
* जो बदल अपेक्षित आहे तो स्वत:पासून व्हायला हवा हे पुरेपूर पटलं.
* युवकांचा सहभाग महत्त्वाचा आहे, त्यासाठी ठिकठिकाणी संघटित व्हायला हवे आहे.
* प्रश्नांचा गांभीर्याने विचार, अभ्यास करून कृती करायला हवी.
* 'सुशासन' म्हणजे नेमकी काय भानगड आहे याची बहुतांश लोकांना आजही काहीच माहिती नाही. 'राजाने मारले आणि पावसाने झोडपले' तर दाद कुणाकडे मागायची ? जनता ही खरी मालक आणि प्रतिनिधी - नोकरशाही ही प्रशासकीय सोय आहे हेच माहीत नाही. लोकशाहीत कोणीच लहान - मोठा नाही. सर्व समान आहेत हेच माहीत नाही. जनताच न्याय्य हक्कांपासून कोसो दूर आहे. हे सारं थांबवायचं असेल, बदलायचं असेल तर संघटित होऊन चळवळ करायला हवी.
* ''अधिवेशनात मिळालेल्या वैचारिक शिदोरीवर मी यापुढे माझ्या भागातील पाच गावे निवडून तिथल्या समस्यांचा अभ्यास करून, सर्व परिस्थितीचा सखोल अभ्यास करून गावातील युवकांना कौशल्य आणि स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्याचा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीन.''
* ''या अधिवेशनामुळे प्रत्येक व्यक्ती आपल्या योगदानातून थोड्याफार प्रमाणात परिस्थिती बदलू शकते असा विश्वास प्राप्त झाला.''
* अर्थकारण, आरोग्य, शिक्षण, सुशासन, चळवळ ह्या पाचही विषयांवर लोकशाही अवलंबून आहे हे कळले, पटले.

❖ ❖ ❖

**कष्ट करुनि पुष्ट हा करू समाज आपुला । कोटि कोटि हात लावु, मेरु उचलण्या चला ।।**

## अधिवेशन पाठपुराव्यासाठी प्रवास –

दि. ३० जून रोजी लातूर येथे श्री. शिरीष पटवर्धन व डॉ. श्री. सतीश राजमाचीकर यांनी भेट दिली. या भेटीचे दोन मुख्य हेतू होते – १) वर्धिनीने आयोजित केलेल्या पहिल्या राज्यस्तरीय युवा अधिवेशनाला लातूरहून आलेल्या युवक युवतींची भेट घेणे आणि २) लातूर येथे जनभारती सेवा संस्थेच्या मदतीने वर्धिनीची शाखा सुरू करणे.
लातूरहून युवा अधिवेशनाला आलेल्या युवक युवतींची भेट अर्थभारती पतपेढीच्या कार्यालयात झाली. पाचजण उपस्थित होते. अधिवेशनाहून आल्यावर लातूरमध्ये युवकांचा एक गट स्थापन करण्याचा विचार या युवकांच्या मनात पक्का आहे. चार ते पाच महाविद्यालयात प्रत्यक्ष संपर्क करून २५–३० युवकांचा एक गट लवकरात लवकर स्थापन करण्याचे या मित्रांनी ठरवले आहे व तसा त्यांचा प्रयत्नही सुरू झाला आहे. या गटाची लातूरमधील ज्येष्ठ कार्यकर्त्यांबरोबर एक बैठक घेऊन आगामी काळामध्ये लातूर शहरात एका दिवसाची लातूर शहराच्या महत्त्वाच्या विषयावर 'युवा पंचायत' घेण्यासंबंधीचा प्राथमिक विचार करण्यात येईल.
लातूरच्या भेटीचा दुसरा महत्त्वाचा विषय होता तो म्हणजे जनभारती सेवासंस्थेच्या सहकार्याने लातूरमधील उपेक्षित वस्तीत वर्धिनीच्या धर्तीवर शाखा प्रकल्प सुरू करणे. यासाठी श्री. राहुल गायकवाड या कार्यकर्त्याची नियुक्ती जनभारतीने केली असून एसओएस बालग्राम संस्थेच्या जवळील जयनगर या वस्तीमध्ये छोट्या प्रमाणात हे काम सुरू झाले आहे. एका छोट्या कार्यक्रमाचे आयोजन करून हे केंद्र ३० जून २०१५ रोजी सुरू झाले आहे.

## युवा नेतृत्व विकास शिबिरे (सिद्धनेर्ली व वाई) –

लातूरनंतरचा पुढचा प्रवास ठरला तो सिद्धनेर्ली या गावाचा. कागल तालुक्यातील या गावातून आठ युवक युवती अधिवेशनाला आले होते. सप्टेंबर महिन्यात त्यांची भेट घेण्यासाठी श्री. शिरीष पटवर्धन व डॉ. सतीश राजमाचीकर हे दोघेजण सिद्धनेर्ले येथे गेले होते. श्री. उमेश मगदूम याच्या पुढाकाराने सक्रीय असलेल्या समाज विकास केंद्र आणि स्वामी विवेकानंद अभ्यासिकेचे पंचवीस कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्वांशी चर्चा करून दोन ऑक्टोबर रोजी एका दिवसाचे युवा नेतृत्त्वविकास शिबिर घेण्याचे नक्की करण्यात आले.

या नियोजनानुसार दोन ऑक्टोबर रोजी सिद्धनेर्ले येथे हे एक दिवसीय शिबिर संपन्न झाले. सिद्धनेर्ले आणि परिसरातल्या पाच गावातील ७० युवक युवती या शिबिराला उपस्थित होते. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पुण्यातून व्यवस्थापन कौशल्ये, ग्रामविकास अशा विषयांतील ज्येष्ठ तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. शरदराव सुंकर हे उपस्थित होते. नेतृत्वाचे पैलू आणि एखाद्या सामाजिक प्रश्नाचा अभ्यास कसा करावा हे दोन्ही विषय त्यांनी फार सहजपणे आणि सर्व युवक युवतींना बोलके करीत मांडले. भोजनानंतरच्या सत्रात चार छोट्या छोट्या खेळांच्या माध्यमातून श्री. अरविंद केळकर यांनी 'संघभावनेतून काम कसे करावे, आपल्यातील आणि इतरातील गुण ओळखून गुणांची बेरीज करीत एखादे काम यशस्वी कसे करता येते' याचा प्रत्यय उपस्थितांना दिला. यवतमाळ जिल्ह्यातील मन्याळी गावाचे रूप पालटून टाकणारा युवक संतोष गवळेने ही परिवर्तनाची कथा स्लाईडच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे मांडली. स्वत:च्या घरातील विरोधापासून ते गावाचाही विरोध असलेल्या परिस्थितीवर, कोणालाही दोष न देता पण ठामपणे काम कसे करता येते व एकदा समोरच्या व्यक्तीचा विश्वास बसला की चित्र कसे बदलते



याचे रोकडे उदाहरण संतोषने उपस्थित युवक युवतींसमोर मांडले.

या सत्राला जोडूनच उमेश मगदूम यांनी सिद्धनेर्ली गावात समाज विकास केंद्राच्या माध्यमातून केल्या गेलेल्या विकास कामांचा परिचयही उपस्थित युवकांना प्रभावीपणे करून दिला.

१३ डिसेंबर रोजी वाई येथील सुरभी इन्स्टिटयूटच्या पुढाकाराने व रोटरी क्लबच्या सहकार्याने एकदिवसीय युवा नेतृत्वविकास शिबिर संपन्न झाले. ७० युवक युवती उपस्थित होते. डॉ. सतीश राजमाचीकर, श्री. शरदराव सुंकर या तज्ज्ञ मार्गदर्शकांबरोबर या शिबिराला माहिती अधिकार कायदा विभागाचे तज्ज्ञ कार्यकर्ते श्री. विवेक वेलणकर यांनी तरुणांना प्रेरित केले. श्री. कल्याण वर्दे यांनी शिबिराचा समारोप केला.

## दिवाळीचा बौद्धिक फराळ –

अज्ञानरूपी अंधाराकडून ज्ञानमय प्रकाशाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा व संदेश देणारा उत्सव म्हणजे दीपावली. यासाठी प्रथमच प्रेरणादायी बौद्धिक फराळाची व्याख्यानमाला दि. ११ व १२ ला प्र. ल. गावडे सभागृह, पेरुगेट भावे स्कूल येथे आयोजित केली होती.

दि. ११ नोव्हेंबर रोजी ज्ञानप्रबोधिनी संस्थेचे संचालक वाचस्पती श्री. गिरीशराव बापट यांनी 'घडवू राष्ट्र उद्याचे' हा विषय मांडला. त्यातून सामाजिक कामातील कार्यकर्त्याची मानसिकता, वैचारिक अधिष्ठान, व्यक्तिमत्त्व, गुण–कौशल्य, दूरदृष्टी, कार्यातील नावीन्यता आणि आदर्श व्यवहार, नित्य उभी राहणारी आव्हाने आणि राष्ट्रघडणीची प्रक्रिया या गोष्टींचे युवकांना मार्गदर्शन मिळाले. विषय स्पष्ट करताना ते म्हणाले, **'समाजात सकारात्मक बदल होण्यासाठी समाजातील अनेक व्यक्तींच्या मनात तसा बदल आधी व्हावा लागतो. व्यक्तीचे मन घडवण्यास वेळ लागतो तसे राष्ट्राचे मन घडविण्यासाठी वेळ लागतो. राष्ट्र बदलवण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणासोबत राष्ट्र घडवण्याचे शिक्षण देणेही महत्त्वाचे आहे. यासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येकाकडे धैर्य असणे गरजेचे आहे आणि हे त्याला सततच्या अभ्यासपूर्ण कार्यातून व दैनंदिन उपासनेतून मिळते.'**

दि. १२ नोव्हेंबर रोजी 'व्यापक अर्थाने करिअर संकल्पना' हा विषय प्राध्यापक श्री. विजय नवलेसरांनी मांडला. करिअरचा व्यापक अर्थाने विचार कसा व का करावा याचे मार्गदर्शन करताना ते म्हणाले, **''करिअरचा समानार्थी शब्द म्हणजे आयुष्य. फक्त पैसा कमाविणे हा करिअरचा उद्देश कधीही असू नये. कामावर निष्ठा, प्रेम असेल तर त्या करिअरमध्ये आनंद मिळतो. करिअर जगत असताना सामाजिक भान व जाणीव जिवंत ठेवायला हवी. करिअर घडविताना राष्ट्र घडविण्याचा, देशाला जगात महाशक्ती म्हणून निर्माण करण्याचा व्यापक दृष्टिकोन ठेवला तर करिअर समृद्ध होईल.''**

❖ ❖ ❖

## शाखा व युवक विभाग – वार्षिक नियोजन शिबिर

दिनांक : ४ ते ७ जून २०१५ एकूण संख्या : १२०. स्थान : लोकसेवा ई-स्कूल, पाषाण.

| | ५ जून | ६ जून | ७ जून |
|---|---|---|---|
| सत्र १ | युवक विभाग रचना<br>श्री. रामभाऊ डिंबळे | बदलती सामाजिक परिस्थिती<br>श्री. चंदन हायगुंडे | बाल मानसशास्त्र<br>व युवक भूमिका<br>– सौ. नेहा साठे |
| गटचर्चा | स्वयंमूल्यांकन<br>११ वी ते पदवीधर युवक | सोशल मीडिया, कॉलेज<br>आणि मी | |
| कृतीसत्र | माझ्या कल्पनेतील<br>शाखा<br>(नाट्यरुपात) | संभाषण कौशल्ये<br>कार्यशाळा<br>(श्री. सुहास क्षीरसागर) | करिअर मॅपिंग |
| प्रेरणासत्र | ओळख 'स्व'ची<br>(श्री. विवेक पोंक्षे) | परिस्थितीचे ज्ञान व भान<br>श्री. श्रीकांत भोजकर | शाखाश: व<br>व्यवस्थाश: बैठक |
| रात्र कार्यक्रम | सोशल मीडिया<br>(श्री. निखिल वाळिंबे<br>श्री. संजय भंडारे) | गप्पांगण –<br>ज्येष्ठ युवकांशी<br>अनौपचारिक गप्पा | समारोप<br>श्री. यशोवर्धन वाळिंबे |

श्री. रामभाऊ डिंबळे यांनी 'स्व'-रूपवर्धिनीचा युवक विभाग आपल्या युवकांसाठी कोणकोणते कार्यक्रम आखत आहे याची माहिती दिली. या सर्व कार्यक्रमातील युवकांच्या अपेक्षा, कल्पना व त्यांचा सहभाग या विषयीच्या गप्पा मारल्या. श्री. विवेक पोंक्षे यांनी सरांनी 'मी कोण ?' या प्रश्नाचे उत्तर शोधतानाचा प्रवास कसा असावा याचे अतिशय साध्या शब्दात परंतु प्रभावी भाषेत मार्गदर्शन केले. जातीव्यवस्था, धर्मांध आक्रमणे, राजकीय परिस्थिती, शहरी समस्या यांचा मागोवा घेताना माझी 'युवक' म्हणून सक्रीयता वाढली पाहिजे असे श्री. चंदन हायगुडे यांनी सांगितले. याच विषयाचा पुढचा भाग श्री. श्रीकांत भोजकर यांनी मांडला. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पटलावरील घडामोडी, त्या संदर्भातील माझे ज्ञान व त्याचे भान या संदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले. सौ. नेहा साठे यांनी बालमानसशास्त्र हा विषय जाहिराती, चित्रकला व स्वानुभव या माध्यमातून मांडला. रात्र कार्यक्रमात सोशल मीडियाचा आपण सकारात्मक कामासाठी प्रभावी वापर कसा करू शकतो हे श्री. संजय भंडारे व निखिल वाळिंबे यांनी सत्रात स्पष्ट केले. तसेच मूलाधार गटातील ज्येष्ठ युवकांनी सध्या कार्यरत युवकांना त्यांनी त्यांची जडणघडण कशी झाली व यासाठी शाखा तंत्र कसे प्रभावी ठरले याचे अनेक अनुभव सांगितले.

समारोप प्रसंगी पुणे महानगर प्रचारक श्री. यशोवर्धन वाळिंबे यांनी आपल्या कामाचे नेमके नियोजन

गरजेचे असते आणि त्याची कार्यवाही त्याहूनही महत्त्वाची असते असे सांगितले. शाखा प्रमुखांनी आपल्या शाखेची पुढील वर्षाची उद्दिष्टे सांगितली.

**आम्ही हॅण्डपंप**

सौ. नेहा साठे यांनी युवकांना त्यांची शाखेतील मुलांसंदर्भातील भूमिका चित्ररूपात काढायला सांगितली. किशोर बेंडगे याने हॅण्डपंपचे चित्र काढून त्याचे वर्णन करताना म्हणाला, 'हॅण्डपंप ज्याप्रमाणे जमिनीच्या तळाशी असलेले पाणी वर आणून लोकांची तहान भागवतो त्याप्रमाणे समाजाच्या तळागाळातील वंचित मुले निवडून त्यांचे रूप पालटून, त्यांना पुन्हा समाजाच्या कामासाठी प्रवाही करणे आमचे काम आहे.'

## विस्तार विभाग – शिबिर वृत्तांत – गांव सुखी तर देश सुखी

**कालावधी –** २२ ते २४ नोव्हेंबर २०१५, **स्थान –** रामेश्वर विद्यालय, विंग, ता. खंडाळा, जि. सातारा

विंग गावच्या रामेश्वर विद्यालयातील **दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी** मे. नायक्रोम इंडिया लि. पुरस्कृत **विशेष शिबिराचे** आयोजन करण्यात आले होते. 'गांव सुखी तर देश सुखी' असे या शिबिराचे सूत्र होते. विंग गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. शेंडे सर त्यांचे सहकारी शिक्षक यांच्या उपस्थितीत शिबिर उद्‌घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

शिबिरार्थी विद्यार्थ्यांचे पाच गट करण्यात आले होते. परिसरातील चढ-उतार, शेतातील पिके, घरे या सर्वांच्या नोंदी विद्यार्थी आपापल्या गटात करीत होते. शिबिर स्थळी आल्यावर त्यांनी त्यांच्या भागाचा नकाशा तयार करून आपापल्या नकाशाचे व नोंदीचे सादरीकरण केले.

एक अंध आणि एक पंगू व्यक्तींच्या एका कथेचे रूपक वापरून श्री. प्रसादराव देशपांडे यांनी खेड्यांची व शहरांची नेमकी स्थिती मुलांसमोर मांडली. प्राधान्याने शेतीची पार्श्वभूमी असलेल्या या गावातील विद्यार्थ्यांशी बोलताना श्री. देशपांडे यांनी एकेका धान्याच्या आधारे किती प्रकारचे उद्योग व्यवसाय करता येतात हे विस्तृतपणे सांगितले.

नंदुरबार जिल्ह्यातील जेमतेम १०० उंबरे असलेल्या व पूर्णपणे आदिवासी समाज रहात असलेल्या बारीपाड्याची यशोगाथा सांगण्यासाठी त्याचे शिल्पकार श्री. चैत्रामभाऊ पवार हे स्वतः आले होते. त्यांनी बारीपाड्याची अत्यंत प्रेरणादायी यशोगाथा सांगितली.

अनेक समस्यांनी ग्रासलेल्या बारीपाड्याचा कायापालट करण्याचे ध्येय चैत्रामभाऊंनी डोळ्यासमोर ठेवले होते. हळूहळू बदल घडवायला सुरुवात केली. गावाला एकत्र केले. पडणाऱ्या पावसाचे पाणी अडवले, जिरवले. त्यामुळे गावातील विहिरांना पाणी आले.

शिबिरार्थींनी गावातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. श्री. साहेबराव तात्या महांगरे आणि श्री. रामचंद्र काळू महांगरे यांच्याकडून गावचा इतिहास जाणून घेतला. निवृत्त शास्त्रज्ञ आणि निसर्गसेवक संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती विनयाताई घाटे यांनी PPT च्या साहाय्याने देवराई ही संकल्पना मुलांसमोर साकारली.

कापूरव्होळ परिसरातील डॉ. प्रवीण दबडघाव यांनी समारोप करताना देशी गायींचे, तालमीतल्या व्यायामाचे महत्त्व सांगितले.

**क्षुद्र ना कुणीही हीन दीन नाही । सर्व प्राणिमात्री साम तत्त्व राही । विश्व जोडण्याची संघ मंत्र शक्ती ।।**

# ❧ पाकोळी बालवाडी ❧

**संक्रांत उत्सव :**

'पाकोळी' बालवाडीचा संक्रांत उत्सव दि. २७ जानेवारी २०१५ रोजी प्रमुख पाहुणे प्राचार्या सौ. तरुजा भोसले यांच्या उपस्थितीत साजरा झाला. सूत्रसंचालन सौ. राणीताईंनी केले. सौ. अपर्णाताईंनी 'स्व'-रूपवर्धिनी व बालवाडीचे काम प्रास्ताविकांतून मांडले. बालशाखेच्या वर्धकांनी कार्यवृत्त वाचन केले. सौ. संगीतातार्इंनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

मनोरंजनाच्या कार्यक्रमात सौ. तरुजाताईंनी लिहिलेल्या 'गीत व्याकरण' पुस्तकातील गाण्यांवरील छोटी छोटी नृत्ये सादर झाली. सौ. अश्विनीताई व शिक्षिकांनी मिळून केलेल्या गाण्याच्या अर्थपूर्ण सजावटीने कार्यक्रमाला उठाव आणला. रंगीबेरंगी कपडे घालून, न घाबरता, समरस झालेल्या सर्व गटातील मुलांच्या नृत्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

सौ. तरुजाताईंनी शिक्षिकांचे मनापासून कौतुक केले. त्यांनी लिहिलेल्या गाण्यांवर प्रथमच नृत्याचा कार्यक्रम सादर झाला. सौ. तरुजाताई मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, 'कोणतेही मूल स्वत:च्या मातृभाषेतून चांगले शिकते म्हणून मराठी भाषेतून शिक्षणाचा आग्रह आपण धरला पाहिजे. मुलांच्या शिक्षणात शिक्षकांच्या बरोबर पालकांचाही योग्य तो सहभाग असला तर त्याचा फायदा पाल्यास निश्चित होईल.'

'गीत व्याकरण'मधील गीतांचे संगीतकार डॉ. केदार वळसंगकर, गायक श्री. निनाद सोलापूरकर, आसावरी गोडबोले हेही उपस्थित होते. त्यांचाही या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. सौ. छायाताईंनी सर्वांचे आभार मानले. प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

**सहल –**

दि. १४ फेब्रुवारी रोजी पाकोळी बालवाडीची सहल 'राजमाता जिजाऊ डायनासोर पार्क, पिंपळे गुरव' येथे गेली. पालकांनी फुगे, फुले लावून बस सजवण्यास मदत केली. वर्गात शिकलेल्या सहलीच्या गाण्याप्रमाणे बस दिसताच मुलांचे चेहरे खुलले. गाडीत बसल्यावर मुलांच्या घोषणा, गाणी, कविता सुरू झाल्या. यामुळे बाग कधी आली ते समजलेच नाही. बागेत अनेक प्रकारची खेळणी होती. बोगदा, रेलींग घसरगुंडी, सापशिडीची घसरगुंडी ही खेळणी मुलांना नवीनच होती. त्यामुळे

बाग येताच मोठ्या गटातील स्मिता म्हणाली, ''चला पटकन डायनासोर बघायला.'' ''अगं तो खूप मोठा आहे, मला लई भीती वाटते'' ऋतिकाचे त्यावर उत्तर. डायनासोरच्या जवळ जाताच वृषभ तिला म्हणाला, ''अगं कळत नाही का तुला तो खोटा आहे. आपल्याला काय करतोय का ? जरा हात लाव.'' घसरगुंडीवर चढताना समर्थ म्हणाला, ''ताई, शिवाजीराजे कसे डोंगरावर चढतात, तसं मी पण चढतोय बघा. मी पण शिवाजी दिसतोय ना ?'' येताना मधल्या गटातल्या प्राचीला झोप लागली. जाग आल्यावर अपर्णाताईंना म्हणाली, ''चला ना परत बागेत.'' हे मुलांचे संवाद आठवल्यावर ही सहल सगळ्यांच्याच आठवणीत राहणारी झाली असे वाटते.

**ध्येय एक हे उरी घेउनी । मार्ग चालीलो व्रतस्थ आम्ही । या भूमिवर स्वर्ग आणण्या। सिद्ध होउनी पुढे जाउया ।।**

मुलांनी खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला. मोठा डायनासोर बघताच काहीजण घाबरले. पण हा खोटा आहे हे कळल्यावर त्याला हात लावून बघू लागले. मुलांसाठी मोठ्या गटाच्या शिक्षिका सौ. कविताताईंनी मक्याच्या दाण्यांची पौष्टिक भेळ करून आणली होती. सौ. अनुराधाताईंच्या वडिलांनी श्री. धरोटे यांनी गोळ्या, बिस्किटे, जिलेबी पाठवली होती. खाऊ खाऊन परत घरी जायचे असे शिक्षिकांनी सांगितले तरी मुलांची बाग सोडायची तयारी नव्हती.

**वाढदिवस –**

बालवाडीत दर महिन्याला सर्व मुलांचे वाढदिवस साजरे केले जातात. बालवाडी वर्षाअखेरीला मार्च, एप्रिल, मे या तीन महिन्यात ज्यांचा वाढदिवस येतो अशा ४५ मुलांचा वाढदिवस दि. २७ मार्चला उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमात पालकांचा सहभाग उत्तम होता. मुलांना औक्षण करण्यास तीनही गटातील पालक आले होते. या दिवशी शाळेत छान 'डोसा पार्टी' झाली. बालवाडीचा माजी विद्यार्थी नितीन गायकवाड याने अल्प दरात मुलांना गरम गरम डोसे करून दिले. त्याचा हाच व्यवसाय आहे. या मेजवानीचा खर्च पालकांनी स्वखुशीने दिला. शिक्षिकांनी उपासना मंदिर फुगे, चित्रे, माळा यांनी सजवले होते.

**शुभेच्छा समारंभ व शिबिर –**

१५ मार्चला बालवाडीच्या मोठ्या गटाचा शुभेच्छा समारंभ उत्साही व आनंदी वातावरणात साजरा झाला. माडगावकर सभागृह शिक्षिकांनी सुंदर रीतीने सजवले होते. मोठ्या गटाचे सर्व पालक या कार्यक्रमास उपस्थित होते. वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी पालकांशी संवाद साधला. त्यांनी पालकांना वर्धिनीच्या बालशाखेचे महत्त्व सांगितले. तसेच अन्य उपक्रमातून वर्धिनीच्या संपर्कात राहण्याचे आवाहन केले. पालकांनी आपल्या उत्स्फूर्त मनोगतातून बालवाडीचे आवडलेले उपक्रम, मुलांमध्ये झालेले बदल, शाळेत आंघोळ करूनच यायचे, जेवताना आधी हात धुवायचे अशा अनेक चांगल्या सवयी लागल्याचे सांगितले. छोट्या वैभवीला नीट बोलता येत नव्हते म्हणून दुसऱ्या बालवाडीत प्रवेश मिळाला नाही. पण पाकोळी बालवाडीत मधल्या गटात नव्याने आली आणि तिच्यात खूप चांगला बदल झाल्याचे तिच्या आईने सांगितले. सर्व पालकांना मुलांची प्रगती पुस्तके, त्यांनी वर्षभर केलेले हस्तव्यवसायाचे साहित्य दिले. हे साहित्य ठेवण्यासाठी पालकांनी कागदी पिशव्या स्वत: बनवून सुशोभन करून दिल्या होत्या. बालवाडी शिक्षिकांनी मुलांना बचतीची सवय लागावी या हेतूने सर्वांना 'पिगी बँक' सुशोभन करून भेट दिल्या. अल्पोपहारानंतर कार्यक्रम संपला.

या कार्यक्रमानंतर लगेचच मोठ्या गटातील मुलांचे दोन दिवसांचे (१५ व १६ मार्च) निवासी शिबिर झाले. एकूण ५१ मुले यात सहभागी झाली होती. शिबिराचे उद्घाटन वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. सुनिल कुलकर्णी सरांनी केले. त्यांनी मुलांना मनोरंजनात्मक विज्ञानाचे प्रयोग करून दाखवले. मुले उत्सुकतेने सर्व प्रयोगात सहभागी झाली होती. जेवणानंतर मुलांचे सज्जनगड, रायगड व प्रतापगड असे गट पाडून त्यानुसार चित्र रंगवणे, भेटकार्ड बनवणे हे उपक्रम झाले. यानंतर मुलांना अल्पोपहार देऊन संध्याकाळी शाहू उद्यानात खेळण्यासाठी नेले. तेथेच उपासना, श्लोक, गाणी, प्रार्थना झाली. दुसऱ्या दिवशी मुलांना सकाळी ६ वाजता

उठवताच 'ताई, आम्हाला आंघोळ पण करायची' स्मिताने आग्रही स्वरात सांगितल्याने शिक्षिकांचा काही उपाय चालेना. नंतर गच्चीत ओंकार उपासना, प्रार्थना, सूर्यनमस्कार व खेळ झाले. न्याहारीनंतर नवीन पद्य, गाणी झाली. गटश: झाड, घर, भेटकार्ड बनवून घेण्यात आले. 'बालांच्या गोष्टी' ही ध्वनीचित्रफित दाखविली. गोष्टी ऐकताना व बघताना मुले तल्लीन झाली होती. दुपारच्या गोडाच्या जेवणानंतर काही मुलांनी कापसाची टेडी बेअर बनवला तर काहींनी त्याला सजवला. दगडकारी रंगकामात ही मुले रमली होती. स्वत:चे सामान नीट आवरून मुले ४.३० वाजता समारोपाच्या कार्यक्रमात सहभागी झाली. आपल्या पालकांसमोर ''वाल्याचा वाल्मिकी कसा झाला ?'' हे नाटुकले सादर करताना मुलांना खूप उत्साह आला होता. मुलांनी मनोगतातून शिबिरात आवडलेल्या गोष्टी सांगितल्या व बालशाखेत यायचे कबूल केले. आपण केलेल्या वस्तू व ताईंचा निरोप घेऊन मुले घरी परतली.

**बालवाडी शिक्षिका प्रेरणा शिबिर –**

मुलांना शिकवताना नवनवीन तंत्रांचा अभ्यासपूर्ण वापर व्हावा यासाठी २ जून ते ८ जून प्रेरणा शिबिर झाले.

| वार | तारीख | वेळ | वक्ते | विषय |
|---|---|---|---|---|
| मंगळवार | ०२-०६-२०१५ | १० ते ११<br>११ ते १२.३०<br>२ ते ३ | श्रीमती विद्या बापट<br>श्रीमती संगीता येवले<br>श्रीमती भडसावळे | उद्‌घाटन<br>प्रसंगनाट्य, गटचर्चा<br>कला |
| बुधवार | ०३-०६-२०१५ | १० ते ११<br>११ ते १२.३०<br>२ ते ३ | सौ. मालन वाकडे<br>सौ. उमराणीकर<br>श्रीमती स्वाती कारेकर | गप्पागोष्टी<br>मूल्यशिक्षण, गटचर्चा<br>कल्पना कशा सुचतात ? |
| गुरुवार | ०४-०६-२०१५ | १० ते ११<br>२ ते ३ | श्रीमती सुषमा साठे<br>सौ. संगीता मावळे | संवाद साधणे<br>कीर्तन कसे लिहावे ? |
| शुक्रवार | ०५-०६-२०१५ | १० ते १२.३०<br>२ ते ३ | श्रीमती वीणा संत<br>श्रीमती पुष्पाताई नडे | कार्यवृत्त व पत्रलेखन, कृतीसत्र<br>बालकल्याण |
| शनिवार | ०६-०६-२०१५ | १० ते ११<br>११ ते १२.३० | कु. अहिल्या धायगुडे<br>श्रीमती सुरेखा आगरकर | कीर्तन (सद्‌गुरु)<br>कागदाच्या लगद्याच्या वस्तू |
| सोमवार | ०८-०६-२०१५ | | सौ. शुभांगी संजय तांबट | समारोप |

शिबिराचे उद्‌घाटन श्रीमती विद्या बापट यांच्या हस्ते झाले. त्या म्हणाल्या, 'शिक्षिकेने उपजत असलेले मातृत्व नेहमी जागे ठेवले पाहिजे. त्यामुळे मुलांचा भावनिक, बौद्धिक व शारीरिक विकास होण्यास मदत होते. शाळेत समभाव राखत शिकवा. वातावरणाचा परिणाम मुलांवर पटकन होतो. म्हणून कोणताही पाठ घेताना वातावरण निर्मिती महत्त्वाची असते.'

दुष्ट रूढि गाडुनी सकल भेद निपटुनी । संघशक्तिने नवे विभव आणु खेचुनी । भविष्यकाळ घडवुया हिमाद्रिहूनि उंचसा ।।



सौ. शुभांगी तांबट यांच्या मार्गदर्शनाने शिबिराचा समारोप झाला. त्या म्हणाल्या, 'शैक्षणिक जीवनात ४ ते ६ हा वयोगट संवेदनशील व महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुमच्या आजपर्यंतच्या अनुभवातून, सतत मिळणाऱ्या नव्या कल्पनांतून तुम्ही तन, मन, धन अर्पून हे काम करत रहा. तुमच्या समोरचे प्रत्येक मूल जणू अक्रोडाचे झाड आहे असे माना. अक्रोडाच्या झाडाला १०० वर्षांनी फळ येते. त्याप्रमाणे तुम्ही वाढवलेले, संस्कारित केलेले प्रत्येक मूल हे नंतरच बहरणार आहे. पण त्याचा पाया पक्का करण्याचे काम आपले आहे.'

**बालवाडीचे नवीन वर्ष –**

बालवाडीचा नवीन वर्ग १५ जूनला सुरू झाला. बालवाडीचे सर्व वर्ग चित्रांनी सजवले होते. मोठ्या गटातील काही मुले महात्मा गांधी, चाचा नेहरू, सावित्रीबाई फुले, पंतप्रधान नरेंद्र मोदी अशा वेशभूषा करून स्वागताला उभी होती. नवीन मुले शाळेत रमावी म्हणून वर्गांमध्ये खेळणी मांडून ठेवली होती. सायकल, घोडा खेळायला मिळाल्यावर नवीन मुले नव्या वातावरणात रमली.

बालवाडीत आपल्या संस्कृतीची, सणांची माहिती व्हावी म्हणून वर्षभर मुलांच्या सहभागातून, उपक्रमातून सर्व सण साजरे होतात. त्यातील विशेष : **पालखी –** आषाढी एकादशीला (२७ जुलै) पालखी सोहळा उत्साहात साजरा झाला. सोमवार पेठेतील 'कण्वाश्रम विठ्ठल मंदिरा'त पालखी नेली. बालवाडीच्या मधल्या व मोठ्या गटाबरोबर बालशाखेतील वर्धक दिंडीत सामील झाले. चौकाचौकात रिंगण व नामगजर झाला तेव्हा उपस्थित प्रेक्षकही त्यात सामील झाले. मोठ्या गटातील मुले संतांच्या व विठ्ठल रखुमाईच्या वेशभूषा करून चालताना सगळेजण त्यांचे कौतुक करत होते. विठ्ठल मंदिरात 'आपली मराठी भाषा' या विषयावर बालशाखेतल्या वर्धकाने कीर्तन केले. हे कीर्तन बालवाडीच्या शिक्षिका श्रीमती छायाताई धायगुडे यांनी लिहून बसवले होते.

**स्वातंत्र्यदिन –**

१५ ऑगस्ट आपला स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा झाला. पौड रोड ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. रमण शहा यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. ज्येष्ठ नागरिक, संघाचे इतर सभासद, पालकवर्ग, स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी, सहाय्यक परिचारिका वर्गातील विद्यार्थिनी, सर्व शिक्षिका व वर्धिनीचे कार्यकर्ते कार्यक्रमास उपस्थित होते. बालवाडीतील काही मुले झाशीची राणी लक्ष्मीबाई, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, भारतमाता इत्यादी वेशभूषेत आली होती. मोठ्या गटातील मुलांनी 'जिंकू किंवा मरु' हे समूहगीत सादर केले. 'आम्ही बालके छोटी छोटी, कामे करू मोठी मोठी' अशा अनेक कृतीशील घोषणांमध्ये उपस्थित सर्वजण

**सर्व वाद संपतील । राष्ट्रभाव जागता । नकोत व्यर्थ वल्गना । गर्वही नको वृथा । समाजप्रेम, राष्ट्रप्रेम हाच आपुला वसा ।।**

सामील झाले.



**शिक्षक दिन व दहीहंडी –**

५ सप्टेंबर 'शिक्षक दिन' मोठ्या गटातील मुलामुलींनी छोट्या गटाचा वर्ग घेऊन साजरा केला. परिपाठात बडबडगीते, अभिनय गीते, खेळ ताईंच्या मदतीने घेतले. यातून त्यांचा वाढलेला आत्मविश्वास दिसून येत होता. याच दिवशी शाळेत दहीहंडीचा कार्यक्रम झाला. पाकोळी बालवाडीला गोकुळाचे रूप आले होते. दहीहंडीचा उत्सव समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन साजरा केला जातो. यासाठी बालवाडीची प्रभातफेरी काढली जाते. 'स्व'-रूपवर्धिनीच्या परिसरातील पालकांनी, दूध डेअरीच्या काकांनी गोपिकांच्या मडक्यात दही, लाह्या घातल्या. 'हाथी घोडा पालखी, जय कन्हैयालाल की', 'आला रे आला, गोविंदा आला' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. बालवाडीत आल्यावर गोप-गोपिकांची अभिनय गीते सादर झाली. दहीहंडी फोडून सर्वांना काल्याचा प्रसाद दिला.

**गणेशोत्सव –**

गणपती उत्सवात मोठ्या गटातील मुलांनी कसबा गणपती, दत्त मित्रमंडळ, सूर्योदय मित्रमंडळ, सलोखा मित्रमंडळ व काही शिक्षिकांच्या घरी अथर्वशीर्षाचे पठण केले. वर्गामध्ये 'आमचा घरचा गणपती' याचे मुलांनी छान वर्णन केले. 'मी रंग द्यायला, भांडी घासायला, सजावटीला मदत केली' असं मुलं अगदी उत्साहानं, अभिमानानं सांगत होती.

**पालकसभा –**

यावर्षी मुलांच्या संगोपनातील नवीन गोष्टी, मातृभाषेचे महत्त्व, आहाराचे महत्त्व पालकसभेत सांगितले गेले. नवीन पालकांसाठी ७ जुलैला पालकसभा झाली. या सभेत वर्धिनीच्या कार्यालय विभागातील सौ. मेघाताई नगरे यांनी 'मराठी भाषेतून शिक्षणाचा फायदा' व 'मुलांशी पालकांचा सुसंवाद' हा विषय मांडला. दि. २८ ऑगस्ट रोजी सौ. नेहाताई साठे यांनी चित्रफित व दृकश्राव्य माध्यमातून पालकांना आपण मुलांशी कसे वागले पाहिजे, त्यांच्या गुणांना वाव कसा दिला पाहिजे हे सोप्या भाषेत सांगितले. डिसेंबर महिन्यात सिम्बॉयसिस संस्थेच्या आहारशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी दृकश्राव्य माध्यमातून गटशः मुलांचा आहार कसा असावा हे सांगितले. विशेष मार्गदर्शन होत असल्याने सर्व सभांना पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

❖ ❖ ❖

**माणुसकीची जेथे चणचण, दारिद्र्याचे भीषण नर्तन । आपुलकीचे तेथे वर्षण, करिती सरसावून महान् ।।**

## ꧁ कार्यालय विभाग ꧂

**संस्था भेट –**

समाजातील वेगवेगळ्या समस्यांची व या समस्यांवर काम करणाऱ्या संस्थांची ओळख व्हावी या उद्देशाने कार्यालय विभागाने दिनांक २ मार्च २०१५ ला 'मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रा'ला व दिनांक २९ ऑक्टोबर २०१५ ला 'चैतन्य महिला मंडळा'ला भेट दिली. व्यसनमुक्ती केंद्राची श्री. प्रकाश वैंगणकर यांनी सविस्तर माहिती दिली. त्यांच्याशी बोलताना जाणवले की, पालकांनी आपल्या मुलांशी उत्तम संवाद ठेवला, तर तरुण पिढी व्यसनांकडे आकर्षिली जाणार नाही. चैतन्य महिला मंडळाच्या संस्थापिका श्रीमती ज्योती पठानिया म्हणाल्या, ''प्रत्येक स्त्रीने स्वतःमधील शक्तीला जाणून ती अधिकाधिक सबला कशी होईल याचा प्रयत्न सर्वत्र झाला पाहिजे.''

**रक्षाबंधन जनहिताकरिता –**




**गेले दोन वर्षे कार्यालय विभाग नागनाथ पार चौक येथे प्रवेश बंद (नो–एन्ट्री)मध्ये घुसणाऱ्या लोकांना वाहतुकीचे नियम समजावून सांगून त्यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा करत आहे.** नियमभंग केलेल्या वाहन चालकांनी नियम पुन्हा न तोडण्याचे वचन दिले. तिथल्या रहिवाशांनीही टाळ्या वाजवून आणि वेगवेगळ्या घोषणा देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. तिथल्या रिक्षावाल्यांनी या कामगिरीबद्दल कौतुक केले. तसेच आपल्याच दयानंद शाखेतील वर्धकाचे पालक श्री. मारणे यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. गुजराथ येथील एका सामाजिक संस्थेत काम करणारा श्री. भूषण पाटील यांनी आपल्या संस्थेची माहिती विचारली व कौतुक केले. तासाभरात ८५ जणांना राख्या बांधल्या व इतर लोकांनाही वाहतुकीचे नियम पाळण्यास सांगितले.

**वाचन प्रेरणा दिवस –**

दि. १५ ऑक्टोबर २०१५ हा दिवस महाराष्ट्र राज्य सरकारने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करावा असे सर्वांना आवाहन केले होते. कार्यालय विभागाने वर्धिनीमध्ये वाचन प्रेरणा दिवस साजरा केला. विविध विषयांवरील सुमारे १०० पुस्तके यासाठी निवडण्यात आली. सकाळी ११.३० ते २.०० या वेळात झालेल्या या उपक्रमात ६६ जणांनी भाग घेतला. वर्धिनीच्या वास्तूत चालणाऱ्या सर्व उपक्रमातील विद्यार्थी/विद्यार्थिनींचाही यात सहभाग होता. ज्यांनी कधी पुस्तक हातात धरले नाही अशांनीसुद्धा एका जागी बसून वाचनाचा श्रीगणेशा केला व वाचन पुढे चालू ठेवण्याचा संकल्पदेखील केला. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे वर्धिनीत सुरक्षारक्षकाचे काम करणारे श्री. वैद्य काका आणि स्वच्छतेचे काम करणाऱ्या सौ. चिव्हे मावशींनीसुद्धा यात स्वयंप्रेरणेने भाग घेतला.

❖ ❖ ❖

## ৯০ महिला विभाग ৫৪

### आणि पंखांना बळ मिळाले...

सामाजिक, मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या अशा सर्व बाजूंनी खचलेल्या स्त्रिया. बुद्धिमत्ता आहे पण ती वापरण्याची कधी संधी मिळाली नाही, गुणवत्ता आहे पण ती कधी दाखवण्याची संधी मिळाली नाही, कल्पकता आहे पण ती कधी स्वतःसाठी आणि समाजासाठी वापरता आली नाही. सर्वांनाच उंच भरारी घेता येत नाही. कित्येक वेळा आपले आप्त, नातेवाईक, समाज प्रगतीचे दोर मुळापासून कापतात आणि त्यातूनही उठून जोमानं उभं रहायचं तर तेवढ्या प्रखर ताकदीची मानसिकता नसते. लोक काय म्हणतील? आपल्याला नावं ठेवतील, आपल्यामुळे घरच्यांना रोष पत्करायला लागेल. अशा विचारांनी स्वतःला कधी महत्त्व दिलं जात नाही आणि असं केलं तर मोठं पाप करणं अशी भावना. सारखी घुसमट, घुसमट आणि घुसमटच...

अशा परिस्थितीतल्या मुली, महिला संपर्कात आल्या. आणि नंतर तर नजर अशांचाच शोध घेत राहिली. कारण खरी गरज अशाच महिलांना आहे. अशा मुली/महिला संपर्कात आल्या की त्यांना म्हणायचे, 'आपण नवीन चांगलं शिकूया ज्यातून आपला विकास होईल, आत्मविश्वास वाढेल' असं म्हणून त्याच्यातील 'स्व' जागृत करून सामाजिक विषमता दूर करून समरसता साधायचा गेली २७ वर्ष केलेल्या प्रयत्नांना थोडंसं यश आलं आहे. दोन अडीच हजार महिला संपर्कात आल्या आणि घरातील, समाजातील एक कर्तबगार स्त्री म्हणून त्या वावरू लागल्या आहेत. शिवणवर्ग, फॅशन डिझायनिंग वर्ग, सहाय्यक परिचारिका वर्ग, प्रौढ साक्षरता वर्ग, उर्दू महिलांसाठी मराठी भाषेचे वर्ग, बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग, प्लंबिंग वर्ग, कौटुंबिक सल्ला केंद्र अशी विविध माध्यमं या महिलांना पुढे आणण्यासाठी वर्धिनीनं सुरू केली. काही महिलांच्या यशोगाथेतून झालेला बदल निश्चित लक्षात येईल.

* पानशेतला राहणारी साधना १० वीला असतानाच तिचं लग्न झालं. नवरा पुण्यात मार्केटयार्डमध्ये हमाली करणारा. पाठोपाठच्या पाच मुली. मोठी सातवीत तर सर्वात धाकटी पाळण्यात. रोज एकीनं शाळा बुडवून बाळाला सांभाळायचं मगच 'आईला' वर्गात जायला मिळायचं. दोन डोंगर उतरून एसटी स्टँडला येणं. तेथून पुणे स्टेशन आणि 'स्व'-रूपवर्धिनी असा छान मेळ बसून वर्ग सुरू झाला. एक दिवस पहिलीतल्या मुलीचा नंबर होता बाळाला सांभाळण्याचा. खेळायच्या नादात बाळाला तोंडात चघळायला भाकरीचा तुकडा द्यायला विसरून गेली. भुकेपोटी बाळ खूप रडायला लागलं. छोटी त्याला झोके देऊन शांत करायचा प्रयत्न करीत होती आणि बाळाचा आवाज येत नाही म्हणून ती परत खेळायला गेली. साधना घरी गेल्यावर बाळाला घ्यायला गेली तर बाळ पाळण्यात 'शांत' झालेलं ! नियमित येणारी साधना तीन दिवस आली नाही म्हणून तिच्या घरी गेल्यावर ही हकीकत समजली. अशा परिस्थितीत स्वतःचं दुःख गिळून साधना पाचव्या दिवशी वर्गात आली आणि वर्ग पूर्ण करून पानशेतच्या आरोग्य केंद्रात कामाला लागली. डॉ. बानू कोयाजींच्या हस्ते प्रमाणपत्र घेताना म्हणाली, **''माझ्या चारही मुलींना खूप शिकवणार. त्यांना त्यांच्या पायावर उभं केल्याशिवाय त्यांची लग्नं करणार नाही.''**

* मालदार नावाची मुस्लिम महिला दोन मुलींना घेऊन कायमची माहेरी आलेली. मॅट्रिक झालेली पण

भेदभाव विसरून अंतरी बंधुभाव रुजवू । हवे कशाला वेगवेगळे जाती धर्म नि पंथ ।।

मराठी लिहिता-वाचता येत नव्हते. म्हणून उर्दू महिलांसाठीच्या मराठी भाषेच्या वर्गात येऊन सहाय्यक परिचारिका वर्ग पूर्ण केला. सध्या हडपसरला खोली घेऊन दवाखान्यात नोकरी करून मुलींना उत्तम रीतीनं शिकवत आहे.

* बालवाडीचे पालक म्हणून सौ. सुदर्शना त्रिगुणाईत वर्धिनीच्या संपर्कात आल्या. वर्धिनीत चालणाऱ्या वेगवेगळ्या वर्गांची माहिती मिळाल्यावर त्यांचे मन त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. घरी एकत्र कुटुंबपद्धत वीस-पंचवीस जणांचं एकत्र कुटुंब, पण सासऱ्यांनी त्यांना प्रोत्साहन दिलं. आधी गृह परिचर्या वर्ग केला. नंतर शिवणवर्ग पण झाला. शिवणात जास्त गोडी असल्यानं बाहेरील शिवणकाम करून, खाजगी फॅशन डिझायनिंगचा वर्ग करून वर्धिनीत हा वर्ग त्यांनी सुरू केला. हळूहळू आत्मविश्वास खूप वाढला. नवीन लोकं, महिला संपर्कात येऊ लागल्या आणि वर्धिनीच्या कामानंतर धनकवडी भागातील गरजू महिलांसाठी शिवणवर्ग सुरू केला. त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. समाजातल्या अन्य लोकांशी ओळख वाढल्यानं आता राजकीय पक्षाचं पण काम करत आहेत आणि हे सर्व करताना त्यांचं कुटुंबाकडे कधीही दुर्लक्ष झाले नाही.

* बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गातून शंभर एक महिला आता निरनिराळ्या शाळांमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. सौ. वर्षा जोशी, न्या. रानडे बालक मंदिरमध्ये मुख्याध्यापिका आहेत तर सौ. बागाईतकर खाजगी कंपनीतील नोकरी सोडल्यानंतर वर्धिनीतल्या वर्गाची माहिती मिळाली म्हणून इथला वर्ग पूर्ण करून कोथरुडमधील इंग्रजी माध्यमाच्या बालवाडीत पर्यवेक्षिका म्हणून काम करत आहेत. सौ. फुलावरे ताईंनी काही वर्ष बालवाडीत काम करून आता हडपसरमध्ये स्वतःची बालवाडी व बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग सुरू केला आहे.

* घरातून बाहेर पडायला, वेगळे काम करण्यासाठी परवानगी मिळत नाही अशा साक्षर व उत्साही पालकवर्गाच्या घरी संपर्क करून त्यांना संजीवन रुग्णालयाच्या आरोग्य सेवेत सामील करून घेतले. या वीस महिलांनी याचे प्रशिक्षण घेतले. परिसरातल्या वस्त्यांमध्ये फिरून काम करायचे अवघड काम पण तिथे मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे हे काम पाच वर्ष चालले. या महिला स्वतःच्या आरोग्याची उत्तम काळजी घ्यायला लागल्या आणि काम थांबल्यावरही वस्तीवरच्या लोकांच्या आरोग्याच्या अडचणी दूर करायला मदत करत आहेत.

**– पुष्पा नडे**

## अभिनंदन

'शक्ती' ही विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी कार्य करणारी संघटना आहे. ह्या संस्थेच्या वतीने सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांना **'शक्ती प्रेरणा' पुरस्कार** देण्यात येतो. यावर्षीच्या या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या 'स्व'-रूपवर्धिनीच्या सहकार्यवाह, बाल व महिला विभागप्रमुख **श्रीमती पुष्पाताई नडे.** ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी मा. आमदार श्रीमती मेधाताई कुलकर्णी, संस्थेच्या राष्ट्रीय सचिव डॉ. लीना बावडेकर, शारदा शक्ती अध्यक्ष डॉ. राजश्री कशाळकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक श्री. बापू घाटपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. श्रीमती पुष्पाताई मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, ''मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग करून सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने काम केले, यापुढे करत राहीन. या पुरस्काराचे सर्व श्रेय सहकाऱ्यांचे आहे.''

**माणूस आहे जात एकली माणुसकी हा धर्म । काम रोजचे राष्ट्रासाठी हेच आपुले कर्म ।।**

**प्लंबिंग वर्ग :**

बदलत्या काळानुसार 'महिला प्लंबर'ची खूप आवश्यकता आहे हे जाणून २६ जानेवारीला भारतातील पहिल्या महिला प्लंबींग वर्गाचे उद्घाटन 'इंडियन प्लंबिंग असोसिएशन' पश्चिम विभागाचे अध्यक्ष श्री. प्रवीण बोरा यांच्या हस्ते झाले. हा उपक्रम 'स्व'-रूपवर्धिनी व ज्ञानदा प्रतिष्ठान संयुक्तरीत्या विनाशुल्क चालवणार आहे. उपक्रमास शुभेच्छा व आवश्यक सुविधा देण्यासाठी 'जग्वार कंपनी' पुणे विभागाचे प्रमुख श्री. उमेश यादव, 'नांदेड सिटी कन्स्ट्रक्शन'चे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर श्री. उमेशजी मगर उपस्थित होते. या उपक्रमासाठी १५ महिलांनी प्रवेश घेतला. हा वर्ग ३ महिन्यात यशस्वीरीत्या पूर्ण झाला. या वर्गाचा प्रशस्तीपत्रक वितरण समारंभ ज्ञानदा प्रतिष्ठानचे व या वर्गाचे प्रमुख श्री. सुभाष इनामदार यांच्या हस्ते एप्रिलमध्ये झाला.

**साहाय्यक परिचारिका वर्ग :**

निवासी शिबिर - दि. २७ व दि. २८ डिसेंबरला पुणे व माले वर्गाचे निवासी शिबिर 'स्व'-रूपवर्धिनीत झाले. शिबिरात त्यांच्या विषयाशी संबंधित माहितीपर अशी खालीलप्रमाणे व्याख्याने झाली :

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| जनकल्याण रक्तपेढी माहितीपट | डॉ. काळे | स्त्रियांचे योगदान - | श्री. पांडुरंग बलकवडे |
| सरोगेट मदर | डॉ. लीना बावडेकर | कुटुंब व समाज | |
| आईच्या भूमिकेतून | श्रीमती शारदाताई मुंडे | विज्ञानातील गमतीजमती | श्री. सुनील कुलकर्णी |
| सहजीवनाच्या उंबरठ्यावर | ज्ञानप्रबोधिनी संवादिनी | अंधश्रद्धा निर्मूलन | श्रीमती नंदिनी जाधव |
| | गटाच्या श्रीमती गुर्जर | आदर्श माता | डॉ. मालती आगटे |
| | व डॉ. आपटे | लैंगिक शिक्षण | माहितीपट |
| अर्थकारण | श्री. प्रशांत एडवी | कचराकुंडी | माहितीपट |

'सरोगेट मदर' म्हणजे काय ? त्याची शास्त्रीय माहिती मुलींना प्रथमच समजली. त्यांच्या शंकांचे निरसन डॉ. लीनाताईंनी चांगल्या पद्धतीने केले. 'विज्ञानातील गमतीजमती' व 'अंधश्रद्धा निर्मूलन' ह्या व्याख्यानातील प्रयोगांनी विषयामागील हेतू साध्य झाला. तरुण वयात मार्गदर्शन करणारा विषय म्हणजे 'सहजीवनाच्या उंबरठ्यावर'. दोन तास सर्वजण या व्याख्यानात रंगून गेले होते. 'कचराकोंडी' या माहितीपटातून कचऱ्याची विल्हेवाट लावणे हे खूप अवघड काम आहे, स्वच्छता करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याची जबाबदारी कोणाची ? हे प्रश्न सर्वांच्या मनात उभे राहिले. यातूनच प्रत्येकाने कचरा व्यवस्थापनात योग्य तो सहभाग घेतला पाहिजे हे जाणवले.

शिबिराचा समारोप श्री. संजय तांबट सरांनी केला. अनेक अडचणींवर मात करून शिक्षण घेणाऱ्या मुलींचे त्यांनी कौतुक केले. या वर्गानंतरही पुढे शिकण्याचा प्रयत्न करा असे सांगितले.

**लसीकरण मोहीम –**

दि. २२ फेब्रुवारी ते दि. २७ फेब्रुवारीपर्यंत चाललेल्या पोलिओ लसीकरणाची मोहीम पुण्याच्या सहाय्यक परिचारिका वर्गाच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे पूर्ण केली. ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात मुलींनी काम केले. मिळालेल्या मोबदल्यातून सर्वांनी एकत्रितपणे रु. १५००/– रक्कम वर्धिनीला देणगी म्हणून दिली.

**वार्षिक पारितोषिक वितरण –**

१५ जुलैला साहाय्यक परिचारिका वर्ग, माले व पुणे यांचा प्रशस्तीपत्रक वितरणाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला महाराष्ट्र मेडिकल फौंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. चंद्रशेखर कर्वे व टाटा पॉवर कंपनीचे C.S.R. प्रमुख श्री. अविनाश द्विवेदी, श्री. कवडे व सौ. कल्पनाताई हबडे, वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे उपस्थित होते. सर्व पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे व प्रशस्तिपत्रके विद्यार्थ्यांना देण्यात आली.

(अ) विभागानुसार प्रथम पारितोषिक –

१) कु. शीतल उजगरे, पुणे २) माधुरी तोरणे, माले ३) श्री. विराज गायकवाड, पुणे

(ब) विषयानुसार पारितोषिक – १) कु. शीतल उजगरे, प्रसुतीशास्त्र २) कु. पूजा सावर्डेकर, शरीरशास्त्र ३) सौ. माधुरी तोरणे, परिचर्या कला ४) कु. नागुबाई पाटील, प्रात्यक्षिक.

(क) विभागानुसार आदर्श विद्यार्थी –

१) कु. रोशनी परब, पुणे २) कु. सुशिला वाळंज, माले ३) श्री. भगवान बनसोडे, पुणे

(ड) उत्तेजनार्थ बक्षीस – १) कु. मनिषा वाल्हेकर, माले २) श्री. दीपक वाघमोडे, पुणे

या सर्व विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना श्री. चंद्रकांत कुलकर्णी व श्री. बी. जी. नातू यांनी दिलेल्या कायमनिधीतून रोख बक्षीसे देण्यात आली. परिचारिका वर्गाच्या वर्गशिक्षिकांनीही मुलींना बक्षिसे दिली.

डॉ. कर्वे मुलींना मार्गदर्शन करताना म्हणाले, 'ज्ञान व कौशल्य मिळवण्यासाठी प्रत्येकामध्ये जिद्द हवी. त्यामुळे आपण ठरविलेले ध्येय गाठण्यासाठी आलेल्या कोणत्याही अडचणी पार करू शकतो. हॉस्पिटलमध्ये 'परिचारिके'ची कामगिरी डॉक्टरांइतकीच महत्त्वाची असते. हॉस्पिटलमध्ये मिळणाऱ्या सेवेने त्याचे नाव लोकांच्या लक्षात रहाते. रुग्णांशी आपुलकीने, मायेने केलेला संवाद त्यांच्या जास्त लक्षात राहतो. म्हणून मला वाटते, 'Nursing' is more important than 'healing'.

याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले –

श्री. विराज गायकवाड – हा वर्ग करण्याच्या आधी दवाखान्यातील कामाचा अनुभव होता. पण वर्गातील

**जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा**

धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये डॉ. अंजलीताई पाटील यांच्या आई उपचार घेत होत्या. तिथे काम करणाऱ्या परिचारिकांनी त्यांची चांगली सेवा केली. या परिचारिका 'स्व'–रूपवर्धिनीच्या वर्गातील होत्या.

त्यांचे कौतुक करताना पाटीलताई म्हणाल्या, 'B.Sc. नर्सिंगच्या विद्यार्थिनींपेक्षा तुमच्या मुली सेवाभावी वृत्तीने, मन लावून काम करतात.' या कौतुकाने शिक्षिकांना खूप आनंद झाला.

**आसेतु हिमाद्री नसानसातुन एक रक्त वाहे । कोटि कोटि जन इथे परंतू, एक रूप आहे ।।**

**मला वर्गाने काय दिले ?**

* श्रीमती आशा गवांडे – यजमान गेल्यानंतर स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी हा अभ्यासक्रम केला. दवाखान्यात अनेकांशी आलेल्या संपर्काने जगाची ओळख झाली व शिक्षणाचे महत्त्व समजले.

* श्री. कुंदन प्रक्षाळे – वंचित विकास संस्थेमध्ये वाढलो आणि इथे आलो. इथले शिबिर खूप वेगळे होते. या वर्गातून माझा आत्मविश्वास खूप वाढला आहे. त्यामुळे मी चांगले काम करेन.

* कु. नंदा वाळंज – खेडेगावातून शहरात रुग्णालयात प्रत्यक्ष सराव करता आल्याने शहराची ओळख झाली. एकट्याने प्रवास करायचा आत्मविश्वास वाढला. गुप्ते रुग्णालयात काम केल्याने वागण्यात सफाईदारपणा आला.

* कु. सुशिला वाळंज – महाविद्यालय सोडून या वर्गात आले. 'नर्सिंग, डॉक्टर' या व्यवसायाचे आकर्षण होते. या वर्गात खूप नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. त्यामुळे विषयाची आवड वाढली आणि आता जास्त जागरुकतेने काम करेन.

* कु. रितू कोहरे – मी हिंदी भाषिक असल्याने प्रथम खूप जड गेले. रोज साक्षरतेच्या वर्गात बसून मराठी भाषेचा सराव केला. त्यामुळे वर्गाचा अभ्यास करणे सोपे झाले.

अभ्यासामुळे स्वत:च्या शरीराची माहिती मिळाली व अधिक आत्मविश्वासाने काम करू शकलो.

माले वर्गाला या वर्षी टाटा पॉवर, मुळशी येथील कर्मचाऱ्यांनी मदत केली. काहींनी मुलींचा राहण्याचा, जेवणाचा आर्थिक भार उचलला तर काहींनी घरचे धान्य दिले.

**नवीन वर्गाची सुरुवात –**

१ जुलै २०१५ ला पुणे येथे तर १५ जुलै २०१५ ला माले येथे नवीन वर्गाची सुरुवात झाली. एकूण ४० मुलींनी प्रवेश घेतला आहे. अभ्यासाला पूरक अशा अन्य विषयांचे मार्गदर्शन वर्गात होत असते. मालेच्या वर्गात डॉ. सौ. नगरकर यांनी 'स्तनपान' व डॉ. मोरे यांनी 'स्त्रियांचा आहार' हे विषय मांडले. पुण्याच्या वर्गात जनकल्याण रक्तपेढीच्या श्रीमती भंडारी यांनी 'परिचारिकेचे महत्त्व' व 'आपले रक्त', सौ. प्रतिभा कुलकर्णी व निवृत्त कर्नल पेंडसे यांनी 'ॲक्युप्रेशर' हे विषय मांडले. सप्टेंबर महिन्यात पुणे वर्गाने ससून हॉस्पिटलमधील शरीरशास्त्र (Anatomy) विभागाला भेट दिली. डॉ. अंजलीताई पाटील यांच्या सहकार्याने ही भेट झाली. श्री. सुनिल कुलकर्णी सरांनी मुलींना मराठीतून हा विषय समजावून सांगितला. जतन करून ठेवलेले सर्व अवयव मुलींनी उत्सुकतेने बघितले. त्यांनी विच्छेदन कक्षाची पण माहिती सांगितली. 'ॲक्युप्रेशर' या विषयाची विद्यार्थिनींची आवड बघून डिसेंबरमध्ये या विषयाची चार दिवसांची प्रात्यक्षिकासह कार्यशाळा झाली.

**शिवणवर्ग –** गेल्या वर्षापासून फॅशन डिझायनिंग वर्गाचा कालावधी ६ महिन्यांऐवजी १२ महिन्यांचा केला आहे. त्यामुळे महिलांना कपड्यांचे विविध प्रकार, भरतकाम इ. शिकायला मिळत आहे.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी तयार कपड्यांची या वर्गाने प्रदर्शनी मांडली होती. शिवणाऱ्या सगळ्या महिलांचे सर्वांनी खूप कौतुक केले.

यावर्षी बेसिक वर्गासाठी १५ तर फॅशन डिझायनिंगसाठी १५ महिलांनी प्रवेश घेतला आहे.

शिवणवर्गाच्या शिक्षिका सौ. संगीताताई पाटील यांनी पुढाकार घेऊन वर्गाच्या माजी विद्यार्थिनींच्या मदतीने मे महिन्यात जे.एस.पी.एम. वाघोली या शाळेचे २५० गणवेश शिवून दिले. या अनुभवातून प्रथमच पाकोळी बालवाडीचे व साहाय्यक परिचारिका वर्गाचे गणवेश शिवणवर्गातील व बचत गटातील महिलांच्या मदतीने तयार झाले. यातून महिलांना कापड खरेदीपासून वितरणापर्यंतचा अनुभव मिळाला. या उपक्रमाचा मौखिक प्रसार झाल्याने शिवणवर्गाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

**साक्षरता वर्ग –** या वर्षी १५ नवीन महिलांनी या वर्गात प्रवेश घेतला. एकूण ३० महिला वर्गाचा लाभ घेत आहेत. परिसरातील एक कानडी भाषिक महिला भाषेच्या अडचणीमुळे शिवणवर्ग करू शकत नव्हती. पण या वर्गात आल्याने तिला आता मराठी लिहिता व बोलता येऊ लागले आहे. त्यामुळे पुढील वर्षी शिवणवर्गासाठी तिचा प्रवेश सुलभ झाला आहे.

**बचत गट –** 'स्व'–रूपवर्धिनीमध्ये एकूण १८ बचतगट चालू आहेत. यावर्षी २०१२ ते २०१५ या तीन वर्षाच्या मुदतीत दोन गटांची मुदत संपली. सुगंधा गटाला त्यांच्या बचतीशिवाय प्रत्येकी ५०० रुपये तर परिमल गटाला प्रत्येकी ११२५ रुपये मिळाले. महिलांच्या आर्थिक गरजा भागून हा नफा मिळाल्याने गटावरचा विश्वास वाढला. त्यामुळे हे गट परत नव्याने सुरू झाले आहेत.

गटांची गरज पूर्ण करून उरलेली रक्कम मुदतठेव योजनेत ४ गटांनी गुंतवली आहे. सर्व गटांचे मिळून २०१४–१५ वर्षात एकूण २३ लाख रुपयांचे कर्जवाटप झाले आहे.

बचतगटाच्या माध्यमातून महिलांसाठीच्या सरकारी योजनांची – निराधार महिला, सुकन्या, बेटी बचाओ–बेटी पढाओ यांची माहिती त्यांना दिली जाते. त्याचा सतत पाठपुरावा केल्याने गरजू महिलांना आर्थिक लाभही झाला आहे.

## – महिला विभागाचे अन्य कार्यक्रम –

**सहल –**

महिला विभागातील कार्यकर्त्यांची मार्च महिन्यात श्रीरामपूरला सहल गेली. वर्धिनीच्या श्रीरामपूरवासी हितचिंतक प्रा. सौ. सुनिता गायकवाडताई यांच्या सहकार्याने अशोक सहकारी साखर कारखाना व प्रभात मिल्क प्रोसेसिंग प्रा. लि. या दोन्ही ठिकाणी भेट दिली. साखर कारखान्यात साखर उत्पादनाच्या पहिल्या टप्प्यापासून म्हणजे ऊस गव्हाणीत टाकण्यापासून साखर प्रतवारीप्रमाणे पोत्यात भरण्यापर्यंत सर्व प्रक्रिया व ऊसाच्या चोथ्यापासूनचा वीजनिर्मिती प्रकल्प बघायला मिळाला.

**महिला दिन –** दि. १० मार्चला महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतिदिन उपक्रमातील ५० महिलांनी एकत्र येऊन साजरा केला. महिलांच्या २–२ मिनिटांच्या मनोरंजनात्मक खेळाच्या स्पर्धा दोन गटात घेण्यात आल्या.

सर्व महिला आपले वय विसरून त्यात सहभागी झाल्या. खेळता खेळता काहीजणी पडल्या पण त्यांनी हार न मानता खेळातील आनंद मनसोक्त लुटला. विजयी गटाला बक्षिसे देण्यात आली. अल्पोपहारानंतर बिबवेवाडीच्या समर्थ बचतगटाच्या सौ. संगीताताई व सौ. छायाताईंनी क्रांतीज्योती सावित्रीबाईंचे चरित्र ओव्यांतून सादर केले. वर्धिनीच्या कार्यकर्त्या व हितचिंतक सौ. संध्याताई साबणे मार्गदर्शन करताना म्हणाल्या, '८ मार्च' या जागतिक महिला दिनाकडे आपण प्रातिनिधिक दिवस म्हणून बघितले पाहिजे. स्त्री असणं ही आपली ताकद आहे, हे ओळखून आपल्या शक्तीशी प्रामाणिक राहून आपली व आपल्या कुटुंबाची प्रगती साधायचा प्रयत्न करा. बदलती सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन घराचे भान ठेवून समाजात वावरा. सावित्रीबाईंनी धीरोदात्तपणे स्त्री शिक्षणाचे बीज रोवले. त्याचा आज मोठा वटवृक्ष झालेला आपण सर्वजण अनुभवत आहोत.' त्यांनी आपल्या एकपात्री प्रयोगातून सावित्रीबाईंचे शिक्षणाचे कार्य व त्यामागची परिस्थिती सर्वांसमोर मांडली. 'आपली प्रगती साधताना समोर आलेल्या बिकट प्रसंगांना तोंड देत पुढे गेले पाहिजे' हा विचार घेऊन प्रत्येकजण घरी गेल्या.

**महिला मेळावा –**

श्रावण महिन्यातील शेवटच्या शुक्रवारचे औचित्य साधून दि. ११ सप्टेंबरला महिला विभागाचे हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. शिवण वर्गातील महिलांनी त्यांनी केलेल्या कामाची, कलाकुसरीची सर्वांना माहिती व्हावी यासाठी प्रदर्शनी मांडली होती. ह्या प्रदर्शनीमुळे शिवणवर्गाचे कार्य सर्व महिलांच्या समोर आले. त्यांच्या कामाचे सर्व महिलांनी कौतुक केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. बागेश्रीताई पोंक्षे लाभल्या होत्या. अनेक वर्षे त्यांनी वर्धिनीच्या कार्यकर्त्या म्हणून काम पाहिले. महिलांच्या समस्यांशी एकरूप होऊन महिलांना स्वत:ची एक ओळख निर्माण व्हावी म्हणून त्यांनी खेड शिवापूर येथे बचतगट सुरू केले. याशिवाय दारुबंदीबाबत त्यांनी जनजागृतीचे प्रभावी काम केले आहे. त्यांनी महिलांशी एकरूप होऊन कृतीशील चर्चासत्र घेतले. बचतीचे महत्त्व महिलांना कळावे ह्यासाठी त्यांनी गंगूबाईची सत्यकथा महिलांना सांगितली. कशा प्रकारे एका अशिक्षित महिलेने बचतगट सुरू केले व तिला रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया येथून बोलावणे आले आणि तेथील अधिकाऱ्यांसमोर आवेदन पत्र (फॉर्म) इंग्रजीत असल्यामुळे अशिक्षित लोकांची किती धावपळ होते हे त्यांनी पटवून दिले व बँकेतील आवेदन पत्र (फॉर्म) हे प्रादेशिक भाषेत करावे अशी सूचना अधिकाऱ्यांना दिली. तेव्हापासून बँकेतील फॉर्म हे मराठीत दिसतात असे बागेश्रीताईंनी सांगितले. ताईंच्या बोलण्यामुळे कार्यक्रम रंगतदार झाला.

## 'कठीण समय येता...'

सन २००६ सालापर्यंत माझ्या संसाराची ग्रहदशा वाईट होती. अवघडकाळ होता तो. कष्टाला आम्ही दोघेही कमी नव्हतो, परंतु आर्थिक पाठबळ नव्हते. इच्छा प्रबळ होती : ध्येयसुद्धा मोठे होते; परंतु मानसिक व आर्थिक हातभार देणारे कोणीही नव्हते. अशा वेळेला 'स्व'–रूपवर्धिनी' संस्था देवदूतासारखी समोर आली. आणि ! आणि ! आमचे नशीबच बदलले.

मी संस्थेच्या बचतगटाची सभासद झाले. तेव्हा लक्षात आले की, ह्यापूर्वी कोणत्याही बँकेत कमीत कमी १०,०००/– रुपये जरी कर्ज काढायचे असेल तर एक स्त्री म्हणून आपणाला ते कर्ज देताना कानाडोळा

दैन्य दु:ख दीनतादि शत्रू सारे जीवनी । संपतील, शंखनाद ऐकुनी रणांगणी ।।

करतात व आपली मानहानीही होते आणि कुटुंबाचा आपण कणा असूनसुद्धा आपली काहीच किंमत राहत नाही. इथे मात्र सर्वच वेगळे आहे; माणुसकीला पहिले प्राधान्य आहे. तिथेच मनाचा निश्चय पक्का झाला व नाते वृद्धिंगत होत गेले. कोमेजलेल्या स्वप्नांना संजीवनी देण्याचे काम स्वरूपवधिनीने केले.

गट चालू करताना आम्ही १०० रुपयांनी चालू केला तो ३ वर्षे चालवला नंतरचा २०० चा गटसुद्धा आम्ही ३ वर्षे चालवला परंतु कोणताही त्रास झाला नाही. सर्व महिला सदस्या ह्या 'माझ्या आयुष्याच्या जोडीदारीण झाल्या' सर्वजणी मिळूनमिसळून कार्य करतो. नुसता व्यवहार करण्यापेक्षा 'हा गट आपला आहे' ह्या गोष्टीला प्राधान्य असते आज आम्ही ५००/- रुपयांचा गट चालवतो आमची उलाढाल वार्षिक २ ते ३ लाख रुपये एवढी आहे. आम्हाला अभिमान आहे की एवढे करीत असूनसुद्धा १ रुपयाचीही अफरातफर होत नाही. ना भांडणतंटण होते. होते ती सुविचारांची देवाण-घेवाण.

''जन्मतर सगळेच घेतात परंतु जगावे कसे? हे सांगण्यासाठी कोणीतरी भेटावे लागते.''

**'स्व'-रूपवर्धिनीच्या रूपाने आम्हाला तो लाभ झाला. आमच्या जगण्याला ऊर्जा देण्याचे कार्य 'स्व'-रूपवर्धिनीने केले आहे.**

**स्वरूप म्हणजे 'स्वत:चे रूप', 'स्वत:चे अस्तित्व' आणि वर्धिनी म्हणजे 'त्या रूपाचे, अस्तित्वाचे विकास करणारी'**, आम्ही तिचे ऋणी आहोत. ही मी संस्थेची स्तुती करत नसून सत्यकथन करत आहे. माझा अनुभव सांगत आहे.

२००७ सालापासून आम्ही गरीबीचे चटके सोसले नाहीत व ह्यापुढेही सोसणार नाही. कारण स्वरूपवर्धिनीसारखी आई आमच्याबरोबर आहे. मागील जन्माची पुण्याई ही स्वरूपवर्धिनी संस्थारूपी आई जगदंबा आम्हाला भेटली. ही संस्था म्हणजे आता आमचे छप्पर झाले आहे. याशिवाय घराला घरपण नाही आणि खऱ्या अर्थाने तिने आम्हाला मायेचे, ममतेचे, जिव्हाळ्याचे छप्पर दिले आहे. मुलांचे संगोपन, शालेय खर्च, त्यांचा वाढदिवस, सणवार, जीवनावश्यक वस्तूंची खरेदी, व्यवसायासाठी लागणारे भांडवल अशा एक नाहीतर अनेक गोष्टींची पूर्तता विश्वास व फक्त व्यवहार पाहून झाली, ती ह्या संस्थेमुळेच.

माझ्या पतीला मी पूर्णपणे सहकार्य करू शकते. पारंपारिक सोन्याचे दागिने तयार करण्याचा व्यवसाय सुरू केला. माझ्यातील नेतृत्वगुणाला चालना ह्या संस्थेमुळे मिळाली.

''सहकार्यातून समृद्धीकडे'' कसे जायचे हा ''कानमंत्र'' ह्या संस्थेमुळे मिळाला. ती संस्था नसती तर काय झाले असते? हा विचारच न केलेला बरा!

माझ्यासारख्या साध्या गृहिणीला ''सक्षम गृहिणी'' करण्याचे अलौकिक कार्य ह्या स्वरूपवर्धिनीने केले आहे. त्याला तोड नाही.

आम्हा भेटली 'स्व'-रूपवर्धिनी, तिने दिली जीवनाची संजीवनी ।<br>
माता तू, पिता तू, तूच आमची रक्षिणी ।<br>
तूच जगण्या बळे दिले, माते 'स्व'-रूपवर्धिनी ।।

**- सौ. कल्पना रमेश पंडित**<br>
(पद्मावती बचतगट, बिबवेवाडी)

❖ ❖ ❖

**एकतानता अशी असावी । सप्तसुरांची साथ घुमावी । ध्येयधुंदही जीवन होता । राहे आता कसले अंतर ।।**

## स्पर्धा परीक्षा विभाग व अभ्यासिका

दि. १३ फेब्रुवारी रोजी अभियंत्यांसाठी 'अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी' हे प्रा. विजय नवले सरांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. यात अभ्यासिकेतील व परिसरातील महाविद्यालयांमधील ७० विद्यार्थी सहभागी झाले होते. सध्याच्या अभियांत्रिकी क्षेत्रातल्या संधी व एक उत्तम अभियंता होण्यासाठीची तयारी यासाठी मार्गदर्शन करताना श्री. नवले सर म्हणाले की, 'अभियंत्यांनी उद्योजक होण्याच्या दृष्टीने वाटचाल केली पाहिजे. त्यामुळे आपल्या बरोबर इतर जणांना रोजगार उपलब्ध होईल. अभियांत्रिकी क्षेत्रातील नवीन बदल, संधी व आव्हाने यांचा अभ्यास करून नवनवीन शोध लावले पाहिजेत, नवीन मार्ग धुंडाळले पाहिजेत. हे सर्व करताना माझा भारत देश प्रगत, संपन्न, विकसित कसा होईल हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून मार्गक्रमण केले पाहिजे.

दि. २८ फेब्रुवारी रोजी राजकीय, सामाजिक आणि संरक्षण विषयाचे अभ्यासक ज्येष्ठ पत्रकार श्री. भाऊ तोरसेकर यांनी 'Deep Assets' हा विषय अतिशय सोप्या भाषेत मांडला. ते म्हणाले, 'Deep Assets म्हणजे एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रामध्ये आपले गुप्तहेर पाठवणे आणि त्यांच्या राष्ट्रातील गुप्त माहिती आपल्या राष्ट्रात घेऊन येणे व या माहितीच्या आधारे आपल्या राष्ट्रातील संरक्षण यंत्रणा अधिक प्रभावी बनवणे होय. अशा प्रकारे माहिती गोळा करण्याच्या गुप्तहेर पद्धतीला Deep Assets ही संकल्पना वापरली जाते.' भारतासह आज अनेक राष्ट्रांमध्ये ही यंत्रणा प्रभावीपणे वापरली जाते. इस्त्राएल, फ्रान्स, रशिया, अमेरिका या देशांमध्ये या यंत्रणेचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे.'

**सत्कार समारंभ –**

पदवी मिळाल्यानंतर सलग दोन-तीन वर्षे कठीण परिश्रम करून महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या (MPSC) पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत असे टप्पे पार करून जेव्हा अधिकारपद मिळते तेव्हा त्या विद्यार्थ्याचा आनंद अवर्णनीय असतो. त्यांच्या परिश्रमांचे कौतुक करण्यासाठी, त्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी २५ एप्रिल रोजी त्या सर्वांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता.

यावर्षी वर्धिनीच्या ११ विद्यार्थ्यांची राज्य सेवेत वर्ग अ व वर्ग ब पदांवर निवड झाली आहे. केंद्राचे मार्गदर्शक श्री. सतीश पाटील सरांचे चार विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी झाले. त्यांचाही या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धिनीचे कार्याध्यक्ष श्री. कल्याण वर्दे सर, प्रमुख पाहुणे म्हणून केंद्राचे मार्गदर्शक श्री. सतीश पाटील सर उपस्थित होते. सहाय्यक विक्रीकर आयुक्त श्री. विजय गोते व सौ. सारिका गोते, समाजकल्याण अधीक्षक श्री. मल्लिनाथ कांबळे विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यास विशेष उपस्थित होते. यशस्वितांचे प्रतिनिधी म्हणून श्री. कैलास अंडिल (तहसीलदार) व डॉ. मंजुश्री गायकवाड (सहाय्यक गटविकास अधिकारी) यांनी मनोगत व्यक्त केले. श्री. कैलास अंडिल म्हणाले, 'बालपणापासून अत्यंत प्रतिकूल परिस्थिती अनुभवल्याने मी प्रशासकीय अधिकारी होण्याचा निर्णय घेतला. वर्धिनीचा वर्धक असल्याने येथील संस्कारांमुळे प्रामाणिक व सचोटीचा अधिकारी म्हणून कार्यरत राहीन.' डॉ. मंजुश्री गायकवाड म्हणाल्या, 'सलग चार वर्षे अभ्यास

**जावो विलया गतकालासह । व्यथा विघटना दारुण दुःसह । एकात्मियता हृदयि फुलावी सकल मिटावे संघर्ष ।।**

करताना बऱ्याचदा नैराश्य आले. पण वर्धिनीत पुन्हा नवे बळ मिळत राहिले आणि आज यश मिळाले. वर्धिनीशी माझे भावनिक नाते निर्माण झाले आहे.' डॉ. मंजुश्रीचे वडील व श्री. अंडिल यांच्या आई कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होत्या.

**अभ्यास दौरा –**

यंदाचा अभ्यास दौरा ९ मे ला औरंगाबादपासूनच १५ किलोमीटर जवळ असलेल्या पाटोदा गावाचा अभ्यास करण्यासाठी आयोजित केला होता. पाटोदा या गावाला यंदाचा 'निर्मलग्राम पुरस्कार' मिळाला. तसेच भारतातील पहिला 'ISO Certified Village' हा पुरस्कारही मिळाला. माजी सरपंच श्री. भास्करराव पेरे यांनी आम्हाला संपूर्ण गावात फिरवून माहिती सांगितली. साधारण तीन हजार लोकवस्तीच्या या गावाने संपूर्ण देशात एक वेगळाच ठसा उमटवलेला निदर्शनास येत होता. ऑनलाईन ग्रामपंचायत, २४ तास वीज, गावाचा स्वत:चा आरो पाणी शुद्धीकरण प्रकल्प, गावात ४२ सीसीटीव्ही कॅमेरे. यासह ग्रामसेवक, सरपंचाचा दूरध्वनी क्रमांक ठळक अक्षरात भिंतीवर लिहिलेला पाहिला. तसेच कचऱ्याचे व्यवस्थापन, सांडपाण्याची व्यवस्था, नळांना बसविलेले मीटर हे उपक्रम तर वाखाणण्याजोगे होते. गावाचे २ सोलर प्रकल्पसुद्धा पाहायला मिळाले. एक होता गावातील माणसांना गरम पाणी मिळवण्यासाठी तर दुसरा होता अंगणवाडीतील मुलांचा स्वयंपाक करण्यासाठी. गावात स्वच्छतेच्या दृष्टीने जागोजागी वॉश बेसीन पहायला मिळाले. गावातील स्वच्छता लक्ष वेधत होती. हे सर्व उपक्रम ग्रामस्थांच्या सहकार्याने व खर्चाने चालू आहेत. येथली कोणतीही गोष्ट श्री. भास्करराव पेरेंनी मोफत दिलेली नाही. सातवी पास झालेला मनुष्य केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर गावाचा कायापालट कसा करू शकतो हे आम्ही अनुभवत होतो. यानंतर वेरुळची लेणी पाहून निवासस्थानी पोहोचलो. आमची निवासाची व्यवस्था 'सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाजमंडळ, संभाजीनगर' येथे केलेली होती. ही संस्था महिला व मुलांच्या शिक्षण व आरोग्यासाठी तसेच महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी गेल्या ३५ वर्षांपासून कार्यरत आहे. १० मे ला सकाळी चहापान झाल्यावर आम्ही औरंगाबादपासून दक्षिणेला १२ किमी अंतरावर असलेल्या सिंदोन या गावात गेलो. ग्रामविकास संस्थेच्या पुढाकाराने सिंदोनसह १२ गावात प्रकल्प राबवला जात आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश चिले नदी पुनरुज्जीवित करून दुष्काळावर कायमस्वरुपी मात करणे. या ठिकाणी आम्हाला माहिती देण्यासाठी श्री. नरहरी शिवपुरे हे शासकीय अधिकारी तसेच श्री. रमेश पांडव सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शासकीय अधिकारी असलेले शिवपुरे सरांनी आपल्या अधिकाराच्या जोरावर एक अधिकारी गावाचा कसा कायापालट करू शकतो हे येथे आम्हाला दाखवून दिले. तेथील महिलांना लांबून पाणी आणावं लागायचं, ते अंतर कमी झालं. पाण्याच्या मुबलकतेमुळे वेगवेगळी पिके घेता आली. उत्पादन वाढले. दूध उत्पादनात वाढ झाली. सिंदोन गावातील श्री. दादासाहेब शिंदे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. कारण महात्मा गांधींनी संदेश दिला होता, 'खेड्याकडे चला'. याचं चालतंबोलतं उदाहरणच आहेत दादासाहेब. एका नामांकित कंपनीतून राजीनामा देऊन येथे आले, शेती घेतली. योग्य तो अभ्यास करून डाळिंबाची बाग त्यांनी लावली. ठिबक सिंचन, शिरपूर पॅटर्न, गोट फार्मिंग, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शासकीय मदत, शासकीय योजना यांसारख्या अनेक विषयांवर चर्चेच्या माध्यमातून आम्हाला खूप काही शिकता आले.

**जातिपंथ प्रांतियता, हे सारे क्षुद्र भाव । स्वार्थाचे त्यजुनि नाव, ध्यानिमनी राष्ट्रदेव । कोटि कोटि भक्त असे, राष्ट्ररूप हो खरे।।**

यानंतर डॉ. हेडगेवार रुग्णालयाला भेट दिली. या रुग्णालयाच्या निर्मितीची संकल्पनाच सामाजिक जाणिवेची होती. आर्थिक अपेक्षांचा लाभ न धरता समाजाची खऱ्या अर्थाने आरोग्यसेवा घडावी यासाठी विविध उपक्रमांची योजना येथे केली आहे. रुग्णमित्र योजना तसेच गरीब वस्त्यांमधील व ग्रामीण भागात आरोग्य केंद्रांचे जाळे उभारण्यात आले आहे. या अभ्यास दौऱ्याने लोकसहभाग, शासकीय अधिकाऱ्यांची इच्छाशक्ती पाहायला मिळाली. तसेच आपल्या शिक्षणातून समाजसेवेची धडपड करणारे कार्यकर्तेही पाहायला मिळाले. या परतीच्या प्रवासात कवी विंदा करंदीकरांची कविता आठवली,

'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हातच घ्यावे.'

**विशेष मार्गदर्शन सत्र –**

दि. २९ जुलै २०१५ ला श्रीमती अबोली नरवणे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या परीक्षार्थींना मार्गदर्शन केले. केंद्रीय नागरी लोकसेवा आयोगाच्या (UPSC) सन २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या केंद्रीय नागरी लोकसेवा परीक्षेत श्रीमती अबोली नरवणे या देशात ७५ व्या तर महाराष्ट्रात प्रथम आल्या आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) पद प्राप्त करण्यापर्यंतचा प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविला आणि त्याद्वारे वर्गाला मार्गदर्शन केले. अभ्यास करत असताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात व कोणत्या गोष्टींवर जास्त भर द्यावा. हेदेखील त्यांनी आपल्या मृदू भाषेत समजावून सांगितले. प्रत्येक दिवसाचे योग्य नियोजन, नियोजनात थोडीशी लवचिकता, समाजात घडणाऱ्या प्रत्येक बाबींचा सर्व बाजूंनी विचार या गोष्टींना जास्त महत्त्व त्यांनी दिले. आपण कितीही यश प्राप्त केले तरी, सदैव जमिनीवर पाय ठेवून राहणे, स्वत:शी प्रामाणिक असणे ह्या गोष्टींचा त्यांना मुलाखतीमध्ये फायदा झाला. त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसनही केले.

**कारगील विजय दिवस –**

दि. २६ जुलै २०१५ – यावर्षी कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. शेषराव मोरे हे उपस्थित होते. सरांचे एका विद्यार्थ्याने काढलेले रेखाचित्रच त्यांना देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सरांनी सांगितले की, ''काश्मीरचा प्रश्न हा केवळ काश्मीरवासियांचा नसून तो पूर्ण भारताचा प्रश्न आहे. इंग्रजांनी जाता जाता भारताचे तुकडे पाडण्याच्या उद्देशाने त्याचे तीन विभाग केले १) भारत २) पाकिस्तान ३) संस्थाने. भारताने अनेक संस्थाने विलीन करून घेतली पण जुनागड आणि काश्मीरबाबत प्रश्न निर्माण झाले. काश्मीरवासियांना काश्मीर हा स्वतंत्र पाहिजे होता. शेख अब्दुल्ला यांची त्यांच्या राजाविषयीची भूमिका आक्रमक होती. काश्मीरने स्वतंत्र राहण्याचा निर्णय तर घेतला होता पण पाकिस्तानकडून होणाऱ्या सततच्या हल्ल्याने आणि 'पाकिस्तानात विलीन व्हा' या दबावाने काश्मीर त्रस्त झाला होता. शेवटी पाकिस्तानने हद्द पार करत काश्मीरवर हल्ला करून हाहाकार माजवला.... याक्षणी राजा हरिसिंगानी भारतात विलीन होण्याचा निर्णय घेतला.''

**गणेशोत्सव –**

स्पर्धा परीक्षा केंद्र गेल्या दोन वर्षांपासून वेगळ्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा करते. यंदाच्या वर्षी 'श्रमिकांचा

गणपती’ व डॉ. एपीजे अब्दुल कलाम स्मृती प्रबोधन सत्र’ याचे आयोजन करण्यात आले. रोज सकाळी व संध्याकाळी श्रींच्या आरतीचा मान श्रमिक वर्गाला देण्यात आला. त्यासाठी वर्धिनीची स्वच्छता करणाऱ्या सौ. चिवे मावशी, सुतारकाम करणारे श्री. दुर्गादास घट, वर्धकाचे पालक सौ. अश्विनी भांड, वर्धिनीचे सुरक्षारक्षक श्री. प्रदीप मोरे काका, श्री. वैद्य काका, वर्धिनीच्या परिचयातील वेल्डिंग व्यावसायिक श्री. नारायण गायकवाड, अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना डबे देणारे श्री. मुंडे काका व काकू, वर्धिनीचे पालक व शिवणकाम करणाऱ्या श्रीमती संगीताताई गाढवे, बचतगटाच्या सभासद सौ. सुगंधा शासम, पारगे चौकातील चहावाले काका, श्री. सुदाम वाघोले, वर्धिनीच्या युवकांचे पालक श्री. कांतीलाल देशमुख व रिक्षाचालक श्री. इराप्पा कुर्ले यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

डॉ. एपीजे अब्दुल कलाम स्मृती प्रबोधन सत्रात खालीलप्रमाणे व्याख्याने झाली –

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| १७-९-१५ | श्रमिकांचे जीवन आणि आपण | श्री. शिरीष पटवर्धन (सहकार्याध्यक्ष) |
| १८-९-१५ | सेवा कार्य | श्री. सुरेश पवार (वर्धक) |
| १९-९-१५ | अंधश्रद्धा आणि विज्ञान | श्री. ओंकार वानखेडे (समन्वयक) |
| २१-९-१५ | प्रश्न तुमचे उत्तर डॉ. दाभोलकरांचे | अंनीस कार्यकर्ते |
| २२-९-१५ | भूमी अधिग्रहण कायदा | श्री. दिनेश कुलकर्णी (भारतीय किसान संघ) |
| २३-९-१५ | शहरी नक्षलवाद | श्री. चंदन हायगुंडे (पालक, स्पर्धा परीक्षा केंद्र) |
| २४-९-१५ | आहार व प्राणायाम | श्री. अनिरुद्ध घाग |
| २५-९-१५ | वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांचे शिक्षण – एक प्रश्न | सौ. ज्योतीताई पठानिया (समाजसेविका) |
| २६-९-१५ | भारताची जगाला देणगी – आयुर्वेद | श्री. सचिन लोंढे (विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा केंद्र) |

या सत्राचे उद्घाटन वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन सरांनी केले. त्यांनी विषय स्पष्ट करताना सांगितलेला कार्यकर्त्याचा अनुभव मनाला चटका लावणारा होता. वनवासी पाड्यांवर भेटायला गेलेल्या एका ज्येष्ठ प्रचारकांना जाणवले की आई व मुलगी एकच साडी नेसून आळीपाळीने घरातून ओसरीवर येत आहेत. हे बघून त्यांनी त्या वनवासी भगिनींसाठी भाऊबीज भेट योजना सुरू करून साडी चोळी भेट देण्याची योजना साकारली. या तळमळीने काम करणारे युवक सामाजिक कार्यात आले तर दिसणारे प्रश्न सोडवले जातील व समाजाचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाही.

‘‘आधी केले मग सांगितले’’ या उक्तीप्रमाणे वागणाऱ्या सौ. ज्योतीताईंचे काम खूप आगळेवेगळे व बहुमोलाचे आहे. त्या म्हणाल्या, ‘या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवण्यास प्रत्येकाने नागरिक म्हणून आपले कर्तव्य बजावले पाहिजे. भावी अधिकारी म्हणून तुम्ही प्रत्येकाने नुसते विचार ऐकून न थांबता आपण सर्वांनी एकजुटीने प्रयत्न केले पाहिजेत. या महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. स्वत:ची संवेदना जागृत ठेवून कधी स्वयंसेवक म्हणून, आर्थिक मदत संस्थांना केली पाहिजे. वर्धिनीची प्रार्थना ‘नमस्कार देवा...’ ही यासाठी आपल्या सर्वांना

नेहमीच मार्गदर्शक आहे.'

**अनंत चतुर्दशी**च्या दिवशी अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांनी **पर्यावरण पूरक उपक्रम** राबवला. गणपती विसर्जनाच्या दिवशी मूर्तीचे थेट नदीमध्ये होणारे विसर्जन व त्यामुळे पाण्याचे होणारे अतोनात प्रदूषण थांबवण्यासाठी 'संगम घाट' येथे जाऊन अशा लोकांना महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या हौदामध्ये मूर्तींचे विसर्जन करण्यास आवाहन केले.

२०-२५ विद्यार्थी घोषणाफलकांसह व उत्साहासह साधारण दहा-साडेदहा वाजता घाटावर थांबलो आणि नंतर 'गणपतीचा मान राखा, स्वच्छ पाण्यात विसर्जन करा। पर्यावरण वाचवा, गणपती बाप्पा हौदात विसर्जित करा।' अशा घोषणांसह मोठ्या उत्साहाने उपक्रमाला सुरुवात केली. सुजाण नागरिकांच्या स्वयंप्रेरणेने थोड्याच वेळात अनेक मूर्तींचे हौदांमध्ये विसर्जन होऊ लागले. काही जण गणपतीचे विसर्जन नदीतच करण्याचा आग्रह धरत होते. समजावून सांगण्याचे काम कठीण आहे असे वाटल्यानंतर आपल्या उपक्रमाला हरताळ फासला जातो की काय अशी भीती वाटू लागली... सर्वांनी एका ठिकाणी न थांबता चार-पाच गट तयार केले व गणपती बाप्पा विसर्जनासाठी घेऊन येणाऱ्या लोकांशी अगदी प्रेमाने बोलून त्यांना आरतीसाठी जागा करून देऊन त्यांच्यासोबत मोठ्याने आरती म्हणून त्यांना उत्साही करायचे व मग प्रेमाने समजावून सांगायचे. ते हौदात विसर्जन करायला तयार झाले की घोषणा देऊन फोटो काढून त्यांच्यासोबत विसर्जनात सहभागी व्हायचे. असा कार्यक्रम सुरू केला. मधूनच काही हट्टी लोक परंपरेचे कारण सांगून तर काही बोलण्याकडे लक्ष न देता हौदात विसर्जन करण्याचे नाकारून नदीकडे जात. पण त्यातील काही लोक काळे खराब झालेले अस्वच्छ पाणी पाहून माघारी येत व हौदात मूर्ती विर्सजन करीत. तेव्हा होणारा आनंद शब्दात व्यक्त करणे अगदीच अशक्य. अशा प्रकारे ३-४ तास तेथे कसे गेले ते कळलेच नाही. उन्हाची तीव्रता, लागणारे चटके कुठल्या कुठे पळून गेले. खरंच काहीतरी सत्कार्य हातून घडल्याचा आनंद नक्की मिळाला.

**'ज्ञानामृत' प्रश्नमंजुषा स्पर्धा –**

'मोठी स्वप्ने पाहणारेच मोठी स्वप्ने सत्यात उतरवतात' या विचारांचे प्रणेते माजी दिवंगत राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची ८४ वी जयंती 'वाचन प्रेरणा दिवस' आणि नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून 'स्व'-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र अंतर्गत 'ज्ञानामृत' प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे आयोजन विद्यार्थ्यांमधील काही प्रतिनिधींनी केले होते.

ही स्पर्धा एकूण दोन टप्प्यांत पार पडली. प्रथम टप्पा अत्यंत चुरशीचा होता. कारण १०० प्रश्न ४० मिनिटांमध्ये सोडवून सहभागी ३१ गटांपैकी ६ गट अंतिम टप्प्यासाठी निवडण्यात येणार होते. त्यानंतर हिमालय, अरवली, सह्याद्री, राजगड, तोरणा आणि शिवनेरी या गटात ७ फेऱ्यामध्ये ज्ञानमाला गुंफण्यात आली.

प्रथम क्रमांक – शिवनेरी गट – १) प्रेमकुमार दांडेकर २) विशाल काटे

द्वितीय क्रमांक – राजगड गट – १) सागर जाधव २) गणेश खारतोडे

तृतीय क्रमांक – तोरणा गट – १) शिल्पाराणी जाधव २) जान्हवी जानकर

वरील विजेत्या गटांचा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांच्या हस्ते पार पडला. श्री. पुरंदरे यांनी अगदी कमी वेळेत ६ गटांच्या नावांचा योग्य वापर करून अप्रतिमरित्या भारतीय

संस्कृतीची सांगड घालून ज्ञानाची पातळी कशी वाढवावी हा मोलाचा संदेश विद्यार्थ्यांना दिला.

**संविधान दिन –**

दि. २६ नोव्हेंबर रोजी स्पर्धा परीक्षा केंद्र, अभ्यासिका व लोकशाही जागर मंच यांनी संयुक्तरीत्या मा. श्री. शेषराव मोरे यांचे 'संविधान निर्मिती आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. संविधानाच्या प्रतिमेचे व ओंकार प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. 'स्व'–रूपवर्धिनीचे कार्याध्यक्ष श्री. कल्याण वर्दे सरांनी श्री. मोरे सरांचे स्वागत केले. श्री. सागर शिंदे यांनी प्रास्ताविकातून या कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

कु. शिल्पाराणी जाधव यांनी संविधान वाचन केले व सर्वांनी त्यांच्यामागून संविधानाचे पुनरुच्चारण केले. श्री. मोरे सरांच्या व्याख्यानातून तत्कालीन भारतासमोरच्या अडचणी आणि संविधान निर्मिती प्रक्रिया, संविधान विकासाचे टप्पे, स्वातंत्र्य चळवळ व संविधान निर्मिती प्रक्रिया यांचा सहसंबंध, इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, तत्कालीन समस्यांवर घेतलेल्या निर्णयांचे विश्लेषण ह्या विशेष गोष्टी सर्वांना लक्षात आल्या. मार्गदर्शनानंतर प्रश्नोत्तरांचे सत्र झाले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रदूषणमुक्त दिवाळी दौड –**

स्पर्धा परीक्षा केंद्र, शाश्वत इकोसोल्युशन्स आणि कमिन्स इंडिया कंपनी यांच्या सहयोगाने ५ नोव्हेंबरला 'प्रदूषणमुक्त दिवाळी' याबद्दल समाजजागृती व्हावी या उद्देशाने लक्ष्मी रस्ता ते अलका चौक या दरम्यान दौड आयोजित केली होती.

या उपक्रमात स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी सामील झाले होते. सर्वांच्या हातामध्ये 'पर्यावरण वाचवा, जीव वाचवा', 'प्रदूषण टाळा, देश वाचवा', 'स्वच्छ पुणे, सुंदर पुणे' ह्या घोषवाक्यांचे फलक होते तर काहीजण हे संदेश दाखवणारे कपडे परिधान करून आले होते. या व अशा अनेक उत्स्फूर्त घोषणांना रस्त्यांवरून जाणारे सर्वजण प्रतिसाद देत होते. त्यांना व वाटेतील दुकानदारांना विद्यार्थी प्रदूषण मुक्त दिवाळी 'फटाके न फोडता साजरी करा', हा संदेश देत होते. नागरिक, व्यापारी व दुकानदार यांची सकारात्मक प्रतिक्रिया विद्यार्थ्यांना उत्साह देत होती.

अलका चौकात दौड थांबली तेव्हा तिचे रूपांतर एका छोट्या सभेत झाले. सामील झालेल्या संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यांचे अनुभव मांडले. स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थी श्री. बापू शिंदे ह्यांनी पर्यावरणाचे प्रदूषण टाळण्यासाठी, कमी होण्यासाठी लोकांच्याच विचारांतील झालेला बदल मांडला. सुप्रसिद्ध अभिनेते श्री. राहुल सोलापूरकर यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी स्वतःपासूनच सुरुवात व्हायला हवी हा विचार **'एका शाळेच्या विद्यार्थ्यांनी फटाके न आणण्याचे ठरवून ते पैसे आणि स्वतःच्या खाऊचे पैसे एकत्र करून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना मदत म्हणून ५१,००० रु. ची मदत केली,'** या कृतीशील घटनेतून सांगितला.

'मी फटाके फोडणार नाही व इतर नागरिक बांधवांना प्रदूषणमुक्त दिवाळीचे महत्त्व समजावून देईन.' ही शपथ घेऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

❖ ❖ ❖

यशस्वी झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन.

| क्र. | नाव | निवड |
|---|---|---|
| १. | श्री. संतोष गायकवाड | पोलिस उप अधीक्षक |
| २. | श्री. कैलास अंडिल | तहसीलदार |
| ३. | कु. ज्ञानेश्वरी आहेर | उप अधीक्षक उत्पादन शुल्क |
| ४. | श्री. रामकृष्ण शेणेकर | नायब तहसीलदार |
| ५. | श्री. संजयकुमार डव्हळे | नायब तहसीलदार |
| ६. | श्री. ओंकारेश्वर कांचनगिरे | नायब तहसीलदार |
| ७. | श्री. राहुल वाघ | नायब तहसीलदार |
| ८. | कु. मंजुश्री गायकवाड | सहाय्यक गट विकास अधिकारी |
| ९. | श्री. शेखर देशमुख | सहाय्यक गट विकास अधिकारी |
| १०. | श्री. अमोल भालके | समाज कल्याण अधीक्षक |
| ११. | श्री. सुरेंद्र उपरे | पोलिस उप निरीक्षक |
| १२. | श्री. संदेश नाळे | पोलिस उप निरीक्षक, मंत्रालय सहायक |
| १३. | श्री. विठ्ठल आटोळे | औषध निर्माण अधिकारी |
| १४. | श्री. नवनाथ सुळ | बँक लिपिक (IBPS. CLERK) |
| १५. | श्री. प्रवीण कोळी | मंत्रालय सहाय्यक |
| १६. | कु. प्रिया देहेडकर | मंत्रालय सहाय्यक |
| १७. | श्री. अमोल आमले | मंत्रालय सहाय्यक |
| १८. | श्री. सोमनाथ कांबळे | मंत्रालय सहाय्यक |
| १९. | कु. प्रियांका साबळे | मंत्रालय सहाय्यक |
| २०. | कु. श्वेता सावदेकर | मंत्रालय सहाय्यक |
| २१. | श्री. भारत गोसावी | पोलिस उपनिरीक्षक |
| २२. | श्री. विठ्ठल बडे | पोलिस उपनिरीक्षक |
| २३. | श्री. वैजिनाथ केदारे | पोलिस उपनिरीक्षक |
| २४. | श्री. सदाशिव खरात | सहाय्यक M.I.D.C. |
| २५. | श्री. चंद्रहंस पाटील | सहाय्यक M.I.D.C. |
| २६. | श्री. अमोल बावीस्कर | तलाठी |
| २७. | श्री. सन्मय चव्हाण | P.O.(Bank of Hyderabad) |
| २८. | श्री. नागेश कारंडे | सहाय्यक (मध्य रेल्वे) |
| २९. | श्री. नितीन बळवंत गावित | सहाय्यक अभियंता (यांत्रिकी) - गट ब |
| ३०. | श्री. नामदेव पाखरे | तलाठी |
| ३१. | श्री. सोमनाथ गावडे | तलाठी |
| ३२. | श्री. विनोद गुरव | L.I.C. (D.O.) |

**जीवनाच्या वाळवंटी स्वार्थरूपी वालुका । स्वप्रयत्ने रगडिल्यावर तैलही झिरपे न का ?**
**स्नेहरूपी तेल घालुन नष्ट करू हो घर्षणा।।**

## फिरती प्रयोगशाळा

राजगुरुनगर परिसरातील दहा गावांमधील ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम सुरू आहे. एकूण १२०० मुले ह्याचा लाभ घेत आहेत. आठवड्यातील तीन दिवस, एका दिवशी दोन शाळा ह्या पद्धतीने हा प्रकल्प चालतो. वर्धिनीची गाडी शाळेत आली रे आली की काय साहित्य आणले, कोणते खेळ आणलेत हे बघण्यासाठी मुलांचा भोवती गराडा पडलाच म्हणून समजा !

खेळण्यातील मोटारीचा वेग काढताना, उंचीचा अंदाज, वेळेचा अंदाज (उदा. १ मिनिट), आम्ल-आम्लारींमधील रंगांचा खेळ अशा पाठांवरील खेळांमध्ये मुले खूप रंगून जातात.

प्रयोग, खेळांशिवाय प्रश्नमंजुषा, प्रासंगिक व्याख्याने, शैक्षणिक सी.डी. हेही उपक्रम घेतले जातात. ह्या उपक्रमात श्री. सुनिल कुलकर्णी व सौ. भारती देशपांडे यांचे योगदान आहे तर ह्या प्रकल्पासाठी राजगुरुनगरमधील बिलकेअर फौंडेशनचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन –**

मुंबई विज्ञान शिक्षक संघातर्फे दरवर्षी इयत्ता ६ वीतील विद्यार्थ्यांसाठी बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा घेतली जाते. ह्यासाठी मार्गदर्शन वर्ग 'स्व'-रूपवर्धिनीत आयोजिले जातात. यंदा ह्या वर्गात एकूण ९ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. सर्व विद्यार्थी इंग्रजी माध्यमातील होते. परीक्षेस संपूर्ण महाराष्ट्रातून ४०,००० विद्यार्थी बसले होते. त्यातील ७.५% विद्यार्थी पुढील प्रात्यक्षिक परीक्षेस पात्र ठरतात. वर्धिनीतून एकूण ३ विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले. त्यातून पुढील मुलाखत व प्रकल्पासाठी (१०%) निवडले जातात. **अंतिम स्पर्धेत वर्धिनीच्या वर्गातील कु. मानस अभिजीत चिटणीस या सहावीतील विद्यार्थ्याला सुवर्णपदक मिळाले तर एका विद्यार्थ्याचे कांस्यपदक अर्ध्या गुणाने हुकले.** विद्यार्थ्यांना श्री. सुनिल कुलकर्णी सरांनी मार्गदर्शन केले.

❖ ❖ ❖

## मानाचा मुजरा

* सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ६६ व्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्कार देण्यात आले. वर्धिनीचे ज्येष्ठ सदस्य प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर यांना पुणे विद्यापीठाचे 'नावीन्यपूर्ण शैक्षणिक कामगिरी' पुरस्काराचे सुवर्णपदक मिळाले.
* आपल्या लेखनातून हसवता हसवता मानवी स्वभावातील उणिवा उलगडवून दाखविणारे ज्येष्ठ साहित्यिक श्री. द. मा. मिरासदार यांना महाराष्ट्र शासनाचा 'विं. दा. करंदीकर जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. वर्धिनीच्या विद्यार्थ्यांना आणि कार्यकर्त्यांना त्यांचे अनेकदा मार्गदर्शनही लाभले आहे. वर्धिनीच्या परिवारातीलच या ज्येष्ठ साहित्यिकाला मानाचा मुजरा.

**जातीपंथा देउनि माती । समभावाची ज्योत जागवू । जळक्या रूढींची ही ताटी । फेकुनि देण्या मन हे धावे ।।**

## विस्तार विभाग - क्रीडाकौशल्य आणि प्रेरणा शिबिर

कालावधी - १५ ते १८ नोव्हेंबर २०१५, संख्या - ७०

शिबिर स्थान - डे. ए. सोसायटीचे इंग्लिश मीडियम स्कूल, कोटेश्वर मैदान, सातारा.

सातारा येथील लक्ष्मीकेशव प्रतिष्ठान संचालित विद्यार्थी सर्वांगीण विकास प्रकल्पातील मुलामुलींचे दिवाळी सुट्टीतील निवासी शिबिर नोव्हेंबर महिन्यात संपन्न झाले. शिबिरातील सर्व व्यवस्था लक्ष्मीकेशव प्रतिष्ठानच्याच युवक युवतींनी आत्मविश्वासपूर्वक सांभाळल्या. कु. सायली मोरे ही ११ वीमधील युवती शिबिरप्रमुख होती. कोल्हापूर येथे नव्याने सुरू झालेल्या कामातील दहा विद्यार्थी/विद्यार्थिनी आणि दोन युवती शिबिरात सहभागी झाले होते.

**क्रीडाकौशल्य विषयक झालेली सत्रे**

| क्र. | विषय | मार्गदर्शक |
|---|---|---|
| १. | रोज का खेळले पाहिजे ? | श्रीमती सायरा शेख (संचालक, क्रीडाभारती महाराष्ट्र) (सदस्य, राष्ट्रीय कबड्डी असो.) |
| २. | यशापर्यंतच्या प्रवासातील खाचखळगे (अनुभवकथन) | कु. स्नेहल कदम (आंतरराष्ट्रीय जलतरणपटू) |
| ३. | खेळण्यातून विकसित होणारे गुण | श्री. भरत दामले |
| ४. | शरीरशुद्धीची विविध साधने | योगाचार्य बन्सीशेठ |
| ५. | षड्रसपूर्ण आहार | वैद्य अनंत निमकर |

**प्रेरणासत्रे**

| | | |
|---|---|---|
| १. | आपली प्रार्थना : एक नित्य प्रेरणास्रोत | श्री. शिरीष पटवर्धन |
| २. | शाळेतील प्रतिज्ञा : एक प्रेरणास्रोत | श्री. विजय वैद्य |
| ३. | न्यूझीलंडमधील मार्क इंग्लिस या गिर्यारोहकाची प्रेरणादायी जीवनकथा | डॉ. संदीप श्रोत्री |

**अन्य व्याख्याने व उपक्रम**

| | | |
|---|---|---|
| १. | खेळांची आवश्यकता | डॉ. अभय देशपांडे |
| २. | कोळ्यांची अजब दुनिया | श्री. विशाल देशपांडे |
| ३. | केनियाची जंगल सफर | श्री. मिलिंद हळबे |
| ४. | बोलक्या पताका (कृतीसत्र) | श्री. अवघडे सर |
| ५. | आर्य चाणक्याची कथा | श्री. विजय वैद्य |

रोजच्या मैदानात रोज खेळल्या जाणाऱ्या खेळांचे प्रशिक्षण झाले. शिबिराचा समारोप भैरोबाच्या डोंगरावरील पदभ्रमणाने झाला. शिबिराचे उद्‌घाटन दै. लोकसत्ताचे सहसंपादक श्री. अभिजित बेल्हेकर तर समारोप आयडीबीआय ट्रस्टीशिप कंपनीचे सल्लागार श्री. दिलीप पाठक यांच्या उपस्थितीत झाला. या शिबिरात युवक युवतींच्या मदतीला ज्येष्ठ कार्यकर्त्यांची खूप मोठी फळी उभी राहिली. तसेच पालकही शिबिर व्यवस्थेत उत्साहाने सहभागी झाले होते.

**संसाराचे क्षितिज तोकडे, दृष्टि फेकता त्याही पलिकडे । एकत्वाची अनुभूति घडे, भेदाच्या ढासळती भिंती ।।**

# आर्थिक वृत्त

Do all the goods you can, By all the means you can, In all the ways you can, In all the places you can, At all the times you can, To all the people you can, As long as ever you can - Jon Wesley

‘स्व’-रूपवर्धिनीची सर्वच क्षेत्रात जोरदार घोडदौड होत आहे. मागील वर्षी टाटा मोटर्स, पर्सिस्टंट फाऊंडेशन, टाटा पॉवर, श्यामची आई फाऊंडेशन व अन्य अनेक ट्रस्ट, कंपन्या, वैयक्तिक देणगीदार यांनी केलेल्या अर्थसहाय्यामुळे औद्योगिक मंदीच्या काळातही निधि संकलनाचे उद्दिष्ट पूर्ण करू शकलो. भारतातील तसेच भारताबाहेरील निधीच्या समावेशाने या वर्षी १ कोटी २० लाखांचा निधी जमा करून मूळ उद्दिष्टासाठी ९६ लक्ष रुपये उपयोगात आले. यावर्षी निधी संकलनासाठी अर्थसमिती, कार्यालय, सर्व विभाग कार्यकर्ते, वर्धिनीचे शुभचिंतक या सर्वांनीच चांगल्या प्रकारे प्रयत्न करून हा निधी उभारला आहे. या सर्वांप्रती ‘स्व’-रूपवर्धिनी कृतज्ञ आहे. दरवर्षी कामाची वाढ होत आहे आणि त्याबरोबर लागणाऱ्या निधीतही वाढ होत आहे. चांगल्या कामामुळे दरवर्षी सहाय्य करणाऱ्यांची संख्या ही वाढत आहे. यामध्ये वर्धिनीतून शिकून मोठे झालेल्यांची संख्याही वाढत आहे. याचा विशेष उल्लेख करावा लागेल.

यावर्षी वर्धिनीच्या सर्व प्रकल्पांनी आपले अंदाजपत्रक तयार केले व कार्यकारणीत सखोल चर्चा होऊन ते मंजूर झाले. यावर्षी ‘स्व’-रूपवर्धिनीच्या सर्व विभागांना मिळून १ कोटी २४ लाख रुपये लागणार आहेत. त्याचप्रमाणे नवीन इमारतींच्या बांधकामासाठी साधारणपणे ३ कोटी रुपयांची गरज आहे. हा सर्व खर्च केवळ देणग्यांमधूनच जमा करायचा आहे. ‘स्व’-रूपवर्धिनीने आतापर्यंत कुठलेही शासकीय अनुदान घेतलेले नाही व भविष्यातही घेणार नाही. आपल्यासारख्या अनंत शुभचिंतकांच्या सहाय्याने हा गोवर्धन सहज उचलला जाईल अशी सर्वांना खात्री आहे.

जसे काम वाढते त्याचप्रमाणे आर्थिक शिस्त व नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अर्थविभाग सुधारणा करत आहे. यासाठी आतापर्यंत उचललेली पावले याप्रमाणे -

१) ऑनलाईन डोनेशनसाठी वेबसाईटवर सुविधा केली आहे.

२) Corporate Social Responsibility माध्यमातून निधी संकलनासाठी कार्यालय विभागाकडून विशेष प्रयत्न केले जातात.

३) प्रत्येक विभागाला दर महिन्याला त्यांचा जमाखर्च ताळा दिला जातो व पुढील महिन्याचा अंदाज घेतला जातो. अपेक्षित जमाखर्चात बदल झाला तर त्याची कारणमीमांसा करून त्यात सुधारणा केली जाते.

४) सर्व आर्थिक व्यवहार अर्थसमिती व खरेदी समितीच्या सजग मार्गदर्शनानुसार केले जातात.

अशा प्रकारे ‘स्व’-रूपवर्धिनीच्या कामाचा विस्तार होत असताना अर्थविभाग यासाठी प्रयत्नशील आहे. हे काम निरंतर असेच चालण्यासाठी आपणास शक्य असेल तेवढी आर्थिक मदत तसेच कामासाठी स्वतःचा वेळ व असे वेळ देणारे कार्यकर्ते ‘स्व’-रूपवर्धिनीला जोडून द्यावेत ही नम्र विनंती.

टाटा मोटर्स, पर्सिस्टंट फाऊंडेशन, टाटा पॉवर, श्यामची आई फाऊंडेशन यांच्या भरीव सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

| | मिळालेल्या देणग्या | खर्च-मूळ उद्देश | प्रशासकीय खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | १२० लक्ष | ८३ लक्ष | १३ लक्ष | ९६ लक्ष |
| | | अंदाजपत्रकीय | | |
| | आवश्यक देणग्या | मूळ उद्देश खर्च | प्रशासकीय खर्च | एकूण खर्च |
| २०१५-१६ | १२४ लक्ष | १०९ लक्ष | १५ लक्ष | १२४ लक्ष |
| २०१६-१७ | १९० लक्ष | १६२ लक्ष | २८ लक्ष | १९० लक्ष |

**वैषम्याची भिंत फोडुनी । भेदाभेदा गाडुनि टाकू । हिंदू हिंदू सारे बंधू । ललकारी ही पुन्हा सादवे ।।**

## आठवणी दाटतात

'स्व'-रूपवर्धिनीच्या परिवारातील कार्यकर्ते, हितचिंतक, देणगीदार व विद्यार्थी अशांपैकी काहींच्या घरामध्ये या वर्षभरात ज्या व्यक्तींचे दुःखद निधन झाले त्या सर्व कुटुंबियांच्या दुःखात वर्धिनीचा सर्व परिवार सहभागी आहे.

* श्री. प्रभाकरपंत जोशी
* श्री. गोविंदराव फडणीस
* श्रीमती विजयालक्ष्मी नारायण वडके
* श्रीमती माधुरी गोविंद केतकर
* श्रीमती सुमती इनामदार
* श्रीमती मालतीबाई कानडे
* श्री. सुधाकर काळे
* श्री. बी. के. खरे
* श्रीमती सिद्धम्मा शासम
* श्रीमती निर्मला सबनीस
* श्री. शशिकांत मांडके
* श्री. अरुणचंद्र कोंडेजकर
* श्रीमती विद्याताई केतकर
* श्रीमती लक्ष्मीबाई निचीत
* सौ. इंदुमती कश्यप.
* श्री. रवींद्र देसाई

---

याच कालावधीत काही श्रेष्ठ व्यक्तींचेही दुःखद निधन झाले.
अशा सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात 'स्व'-रूपवर्धिनीचा परिवार सहभागी आहे.

* भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम
* डॉ. वसंतराव गोवारीकर
* श्री. बिंदूमाधव जोशी
* श्री. मधुजी लिमये
* ॲड. सौ. शालिनीताई बापट
* श्री. निनाद बेडेकर
* श्री. विजय कापरे
* श्री. मुकुंदराव पणशीकर
* श्री. अशोकजी सिंघल





# आदरांजली

दिवंगत भारतरत्न **डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम** हे राष्ट्रपती म्हणून कार्यरत असताना त्यांचे कार्यवाह (सचिव) या नात्याने काम करणारे निवृत्त सनदी अधिकारी श्री. पी. एम. अय्यर यांनी डॉ. कलाम यांच्या आठवणी अलीकडेच एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितल्या. अत्यंत प्रेरणादायी अशा या आठवणी सांगताना श्री. अय्यर यांचा कंठ अनेकदा दाटून येत होता.

❖ राष्ट्रपती या नात्याने डॉ. कलाम जेव्हा जेव्हा विदेश दौऱ्यावर जायचे त्यावेळी त्या त्या देशांच्या राष्ट्रप्रमुखाकडून डॉ. कलाम यांना अत्यंत किमती अशा वस्तू भेट म्हणून मिळायच्या. दोन देशांमधील आत्मियतेचे संबंध प्रकट करण्याचा हा एक सर्वमान्य शिष्टाचार आहे. अत्यंत निर्मोही असणारे डॉ. कलाम या सर्व भेटवस्तूंचा आनंदाने स्वीकार करीत असत. आपण भेट देत असलेल्या देशाच्या प्रमुखाने अगत्याने दिलेली भेटवस्तू नाकारणे हे एक प्रकारे त्यांचा अवमान करणारे होईल म्हणून ते या भेटवस्तूंचा स्वीकार करीत असत. परंतु दौऱ्यावरून परत आल्यावर ते लगेचच या भेटवस्तूचा फोटो काढायला सांगत, त्याची नोंद करायला सांगत, फोटो फाईलला तपशीलासह लावला जाई आणि नोंद झालेली ही भेटवस्तू राष्ट्रपती भवनाच्या वस्तुसंग्रहालयात ठेवली जात असे. या नंतर पुन्हा कधीही या भेटवस्तूकडे डॉ. कलाम वळून पहातही नसत. राष्ट्रपतीपदाचा कालावधी संपल्यावर राष्ट्रपती भवन सोडताना व्यक्तिश: त्यांना म्हणून भेट मिळालेल्या वस्तूतील एखादी छोटी वस्तू, एखादी पेन्सिलसुद्धा त्यांनी बरोबर नेली नाही.

❖ २००२ साली जेव्हा डॉ. कलाम यांनी भारताचे राष्ट्रपती म्हणून पदभार स्वीकारला त्यावर्षी जुलै-ऑगस्ट महिन्याच्या कालावधीत रमजान होता. भारताच्या राष्ट्रपतींनी रमजानच्या कालावधीत इफ्तार पार्टीचे आयोजन करणे ही एक नियमित गोष्ट होती. डॉ. कलाम यांनी श्री. नायर यांना विचारले की ज्यांचे पोट आधीच व्यवस्थित भरलेले आहे अशा लोकांसाठी त्यांनी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्याची आवश्यकताच काय आहे. पुढे जाऊन डॉ. कलाम यांनी श्री. नायर यांना असेही विचारले की अशा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यासाठी किती खर्च येतो ? श्री. नायर यांनी डॉ. कलाम यांना सांगितले की सुमारे बावीस लाख रुपये खर्च येतो. डॉ. कलाम यांनी ही रक्कम अनाथाश्रमांसाठी खर्च करायला सांगितली व हा खर्च अन्न, कपडे व ब्लँकेट्सवर खर्च करावा असे सुचविले. एवढे सांगितल्यावर अनाथाश्रमांची निवड करण्याचे काम राष्ट्रपती भवनाच्या कार्यालयीन गटाकडे सोपविले व त्यांनी स्वत: त्यात पुढे अजिबात लक्ष घातले नाही. अनाथाश्रमांची निवड केल्यावर श्री. नायर यांनी डॉ. कलाम यांना तसे सांगितले. डॉ. कलाम यांनी श्री. नायर यांना आपल्या खोलीत बोलावले आणि स्वत:च्या बचतीतून एक लाख रुपयांचा धनादेश त्यांच्या हातात दिला आणि अनाथाश्रमांसाठी होणाऱ्या खर्चासाठी वापरायला सांगितले. त्यापुढे जाऊन हेही सांगितले की त्यांनी एक लाख रुपये स्वत:चे खर्च केले आहेत ही गोष्ट कोणाला समजता कामा नये. हे ऐकून श्री. नायर यांना धक्काच बसला व ते तात्काळ म्हणाले, नाही. बाहेर गेल्यावर सर्वांना ही गोष्ट सांगणार आहे. लोकांना समजले पाहिजे की राष्ट्रपती भवनात अशी एक व्यक्ती या पदावर आहे की ज्या व्यक्तीने इफ्तार पार्टीसाठी अधिकृतपणे खर्च करता येणारी सर्व रक्कम अशा एका स्तुत्य कामासाठी तर वापरलीच पण त्यामध्ये स्वत:चेही योगदान दिले. अत्यंत श्रद्धावान मुस्लीम असूनही राष्ट्रपती असेपर्यंत कधीही डॉ. कलाम यांनी इफ्तार पार्टीवर पैसे खर्च केले नाहीत.

**परंपरेतिल दुष्ट रुढिंना गाडू भगिरथयत्ने । साकारवू या अेक दिलाने समानतेची स्वप्ने ।**

- ❖ 'हां जी' 'जी साहेब' अशा प्रवृत्तीची माणसे डॉ. कलाम यांना आवडत नव्हती. एकदा भारताचे सरन्यायाधीश डॉ. कलाम यांच्याशी काही मुद्द्यांवर बोलण्यासाठी आले होते. त्या संदर्भात आपले मत सरन्यायाधीशांना सांगितल्यावर श्री. नायर यांचेकडे वळून ते म्हणाले, काय माझ्याशी तुम्ही सहमत आहात ना ? नाही सर ! मी आपल्या मताशी सहमत नाही असं श्री. नायर यांनी उत्तर दिले. हे उत्तर ऐकून सरन्यायाधीशांना धक्काही बसला आणि आश्चर्यही वाटले. कुणी सरकारी कर्मचारी राष्ट्रपती पदावरच्या व्यक्तीला मी आपल्या मताशी सहमत नाही असं कसं म्हणू शकतो आणि तेही इतक्या उघडपणे याचे आश्चर्य सरन्यायाधीशांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. श्री. नायर यांनी सरन्यायाधीशांना सांगितले की आपल्या भेटीनंतर राष्ट्रपती महोदय मला बोलावतील व मी त्यांच्या मतांशी का सहमत नाही हे विचारतील. जर माझं म्हणणं संयुक्तिक आहे, पटण्यासारखे आहे असे त्यांना जाणवले तर ९९ टक्के ते आपलं मत बदलतील.

- ❖ एकदा डॉ. कलाम यांनी आपल्या जवळजवळ पन्नास एक नातेवाईकांना दिल्ली येथे बोलावले होते. हे सर्वजण राष्ट्रपती भवनात राहिले. डॉ. कलाम यांनी आपल्या नातेवाईकांसाठी एक बस बुक केली होती. या बसने हे सर्व नातेवाईक दिल्ली दर्शन करून आले. या बसचा खर्च अर्थातच डॉ. कलाम यांनी स्वतःच्या खिशातून केला. या सर्वांच्या निवासाचा आणि खाण्यापिण्याच्या खर्चाचा हिशेब राष्ट्रपती भवनाच्या नियमानुसार तयार करायची सुचना डॉ. कलाम यांनी कार्यालयाला केली आणि या खर्चाची रुपये दोन लाख ही रक्कमही त्यांनी कार्यालयाकडे जमा केली. देशाच्या इतिहासात यापूर्वी असं कधीही घडलेलं नव्हतं. या घटनेचा कळस तर पुढेच आहे. डॉ. कलाम यांचे ज्येष्ठ बंधू हे सुमारे एक आठवडा डॉ. कलाम यांच्या समवेत त्यांच्याच खोलीत राहिले आणि डॉ. कलाम यांचीही तशीच इच्छा होती. आपले बंधू दिल्लीहून गेल्यानंतर आपल्या बंधूच्या राहण्याचा खर्चही कार्यालयात जमा करण्याची डॉ. कलाम यांची इच्छा होती. राष्ट्रपती या नात्याने आपण ज्या खोलीत राहतो आहोत त्या खोलीत राहणाऱ्या आपल्या भावाचा खर्च आपण करावा असा विचार करणं हीच गोष्ट किती धक्कादायक आहे याचा विचार करा. अर्थात कार्यालयाने डॉ. कलाम यांचा हा विचार स्वीकारला नाही. प्रामाणिकपणाचे हे टोक होते जे पचविणेसुद्धा सर्वांना अवघड होते.

- ❖ राष्ट्रपतीपदाचा कार्यकाळ संपण्याच्या वेळी त्यांच्या कार्यालयातील प्रत्येकजण त्यांची भेट घेऊन त्यांच्या प्रती आपला आदरभाव प्रकट करीत होता. अपघातात पाय फ्रॅक्चर झाल्याने पत्नीला न घेता श्री. नायर एकटेच डॉ. कलाम यांना भेटायला गेले. सोबत पत्नीला का आणले नाही असं डॉ. कलाम यांनी विचारले. श्री. नायर यांनी त्यांना सांगितले की पत्नीचा पाय फ्रॅक्चर झाल्याने ती घरीच आहे. दुसऱ्या दिवशी श्री. नायर यांना दिसले की त्यांच्या घराबाहेर आणि परिसरामध्ये प्रचंड पोलिस बंदोबस्त आहे. श्री. नायर यांनी तेथील अधिकाऱ्यांकडे चौकशी केली की काय घडलं आहे ? त्यांनी नायर यांना सांगितले की राष्ट्रपती महोदय आपल्या घरी भेटायला येत आहेत. डॉ. कलाम घरी आले, पत्नीला भेटले. काही वेळ त्यांच्याशी त्यांनी गप्पा मारल्या. श्री. नायर म्हणतात, 'कुणीही राष्ट्रपती आपल्या कार्यालयातील एखाद्या कर्मचाऱ्याच्या घरी असा जाणार नाही आणि तेही अशा एखाद्या छोट्याशा कारणासाठी. पण डॉ. कलाम हे व्यक्तिमत्त्वच अलौकिक होते म्हणून असं घडू शकलं.

❖ ❖ ❖

**प्रवाही असे जो चिरंजीव आहे । अनेकातुनी एकता जेथे राहे । प्रतीक स्वरूपात ती व्यक्त होते ।**
**नमस्कार त्या भारती संस्कृतीते ।**

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागपालक–श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२ शाखा विभागप्रमुख–**श्री. निलेश धायरकर ✆ : ९०२९०७४५२१

## ग्रामीण शाखा

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **ग्रामीण शाखा** | रामेश्वर विद्यालय, मु. पो. विंग<br>ता. खंडाळा, जि. सातारा | **श्री. अमोल लोखंडे**<br>✆ : ७७०९६४२१०१ |

## भाग १ (शहर विभाग)

**भागप्रमुख : श्री. वेदांग बेहेरे** ✆ : ८६००१६५१६७

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **समर्थ रामकृष्ण शाखा** | बाबुराव सणस कन्याशाळा,<br>२२/१, मंगळवार पेठ, पुणे - ११. | **कु. अक्षय देशमुख**<br>✆ : ९१५८१५०८६४ |
| **स्वामी योगानंद शाखा** | एम. ई. एस. भावे हायस्कूल, (पेरुगेट)<br>सदाशिव पेठ, पुणे - ३० | **कु. अजय सोमवारे**<br>✆ : ७७४३८६८२२९ |
| **स्वामी श्रद्धानंद शाखा** | म. गांधी विद्यालय<br>घोरपडे पेठ, पुणे - ४२ | **कु. संदीप जगधने**<br>✆ : ९१५६८४७४३५ |
| **वीर अभिमन्यू बालशाखा** | 'स्व'-रूपवर्धिनी वास्तू<br>२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,<br>पुणे - ११ | **कु. निलेश चव्हाण**<br>✆ : ८४१२०२०३२४ |

## भाग २ (बिबवेवाडी विभाग)

**भागप्रमुख : श्री. आकाश जाधव** ✆ : ९६३७७९८०८०

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **स्वामी अखंडानंद शाखा** | सिताराम आबाजी विद्यालय,<br>बिबवेवाडी, पुणे - ३७ | **कु. अजय हवाले**<br>✆ : ८८०५५७११५२ |
| **स्वामी दयानंद सरस्वती शाखा** | विश्वकर्मा विद्यालय,<br>अप्पर इंदिरानगर, पुणे - ३७ | **कु. किरण बेंडगे**<br>✆ : ९६२३३८५८९१ |
| **स्वामी शिवानंद शाखा** | कै. वि. स. खांडेकर शाळा<br>सहकारनगर, पुणे-९. | **कु. गणेश कांबळे**<br>✆ : ८२३७२४४९६४ |
| **धर्मवीर शंभू राजे शाखा** | प्रेरणा माध्यमिक विद्यालय,<br>गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | **श्री. प्रतीक कोंडे**<br>✆ : ९५२७५३१४२३ |

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।**

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. शिवाजी खरात** ✆ : ९८८१२०४०३७

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **स्वामी सुबोधानंद शाखा** | पंडित दिनदयाळ उपाध्याय विद्यालय, एरंडवणे गावठाण, पुणे - ५२ | **कु. सिद्धार्थ जांभुळकर** ✆ : ८१४९४३८४३२ |
| **स्वामी ब्रह्मानंद शाखा** | म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे - ५१ | **कु. हेमंत राजगुडे** ✆ : ९६२३२०७८३९ |
| **राजर्षी शाहू शाखा** | सम्राट अशोक विद्यालय, कर्वेनगर, पुणे - ५२ | **श्री. मनोज जायगुडे** ✆ : ८३०८४०७२७१ |
| **नरवीर तानाजी मालुसरे शाखा** | हरिभाऊ पोकळे प्रशाला, धायरी. पुणे ४१ | **कु. अभिजीत कामठे** ✆ : ९६२३०१८२९२ |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : कु. विपुल शेलार** ✆ : ९७६४०४७६९०

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **स्वामी विवेकानंद शाखा** | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे-१६ | **कु. अभिजीत दोडके** ✆ : ९९७५६५६३१६ |
| **स्वामी अभेदानंद शाखा** | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे - १६ | **कु. राहुल इंगळे** ✆ : ७७९८४७७१२३ |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : कु. गौरी यद्रे** ✆ : ९३२६२४४१०२

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **भगिनी निवेदिता शाखा** | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११ | **कु. निकिता शासम** ✆ : ९७६३७०२०१४ |
| **घोरपडे पेठ शाखा** | महर्षी शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे - ४२ | **कु. पूजा बत्तीनी** ✆ : ९६६५९९४८८३ |
| **साप्ताहिक शाखा, कर्वेनगर** | शिशुविहार प्रशाला, कर्वे रोड, पुणे ४ | **सौ. संगीता कुलकर्णी** ✆ : ८६००१०१३०७ |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार - सायं. ६ ते ८.३०, शनिवार- दु. ४.३० ते ७.३०, रविवार- स. ७.३० ते १०.३०

**उपासनेचा मार्ग न एकच । साऱ्या पंथे ईश्वर भेटच । ईश्वरास ही नाव न एकच । येई ऐकता हाक भक्तिमय ।।**

## शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे** ✆ : ९८२२८२३७५७

महिला विभाग सहाय्यक – **सौ. सुनिता गंगावणे, सौ. मंजूषा कुलकर्णी**

'पाकोळी' बालवाडी प्रमुख – **सौ. संगीता शेडगे** बचतगट समन्वयक – **सौ. उषाताई पोफळे**

## उद्योगशिक्षण वर्ग

१) सहायक परिचर्या (पुणे वर्ग) – **सौ. लता सत्तूर, सौ. कुंदा जोशी**

सहायक परिचर्या (माले वर्ग) – **सौ. दुर्गा केणी, सौ. साधना सातपुते**

२) शिवण वर्ग (पुणे) – **सौ. संगिता पाटील, सौ. मनिषा कुलकर्णी**

३) साक्षरता प्रसार – **श्रीमती सुगंधाताई कबीर**

## प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**
सौ. मनिषाताई नरडेकर

**अभ्यासिका केंद्र**
श्री. स्वप्निल काटकर

**ग्रंथालय**
श्रीमती नीला कुडलिंगार

## विस्तार विभाग

**शाखा उपक्रम – वर्धिनीची उपकेंद्रे**

१) लक्ष्मीकेशव प्रतिष्ठान, सातारा २) जनभारती प्रतिष्ठान, लातूर ३) सेतू चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर

**सहाय्यक परिचारिका वर्ग**

योगेश्वरी हॉस्पिटल, दौंड

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

**पुणे मनपा शिक्षण मंडळ आणि 'स्व'–रूपवर्धिनी संचालित संयुक्त अभ्यासिका केंद्र**

सरदार कान्होजी आंग्रे विद्यालय,

शुक्रवार पेठ – श्री. वसंतराव भिडे ✆ : (०२०) २४४७१५०८

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

**व्यक्ती–व्यक्तीच्या मनात नांदणार आर्यता । भेदभाव सोडुनी वरील विश्वबंधुता ।।**

# असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
२) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) – प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र – प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
३) साक्षरता वर्ग
४) सहाय्यक परिचर्या वर्ग
५) शिवण वर्ग
६) बचतगट
७) कुटुंब सल्ला केंद्र
८) सेवावस्ती संस्कार वर्ग
९) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
१०) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळांमध्ये चालतात.

**कार्यालयीन व्यवस्थापक**

सौ. मेघा नडे-नगरे

**कार्यालय विभाग**

कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट,
श्रीमती नीला कुडलिंगार, श्री. अशोकराव चिपळूणकर
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०)

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११

**संपर्क**

सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०


**आदरितो मी तव उपासना । निजश्रद्धेसह विश्वमानवा । आमंत्रितो मी तव कल्याणा । अक्षयवट हा शांत सुखालय।।**



# प्रार्थना



नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।



हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।। ३ ।।



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।

लोक योम क्षेम हो राष्ट्र अभय गान है । सेवारत व्यक्ति व्यक्ति कार्य का ही प्राण है ।।

# जनकल्याण रक्तपेढी, पुणे

**विभागीय रक्तसंक्रमण केंद्र**

१००३, शुक्रवार पेठ, स्वारगेट बस स्थानकाजवळ, पुणे ४.

दूरभाष - २४४४९५२७/२४४४४५०२




**गरीब व गरजू बालकांसाठी रक्तपेढीची विशेष सवलत योजना**

समाजातील गरीब व गरजू बालकांस सवलतीच्या दरात रक्तपिशवी मिळावी यासाठी जनकल्याण रक्तपेढीने ‘बालसंजीवनी’ ही योजना कार्यान्वित केली आहे. अशा बालकांसाठी जनता बँकेच्या कुठल्याही शाखेत खाते क्र. २२०१/८४७८६ या खात्यात किमान रु. १००० चे योगदान आपण देऊ शकता. आपले हे योगदान कुणाला तरी पुनर्जीवन देऊ शकते.

**बालसंजीवनी योजनेमध्ये अवश्य सहभागी व्हा !**

**अधिक माहितीकरिता संपर्क : ९८६०२२५४१०, ७३५०००२४६०**



CHEM-TECH **With Best Compliments From**

***M/s. Chemtech Laboratories Pvt. Ltd.***

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

Off. No. 501 to 504, Rajdhani Complex,
Pune-Satara Road,
Near Shankar Maharaj Math, Pune - 411009.
Tel. : 020-24366994/24377515, Telefax : 24366996
Email : chemtechlabs@yahoo.com



# नील इंजिनियर्स

*सिव्हील इंजिनियरींग, Construction*
*वॉटर अॅण्ड एनर्जी मॅनेजमेंट सर्व्हिसेस*

**श्री पराग लकडे**

फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

751, Kasba Peth,
Sattoti Chowk,
Pune 411 011


**हीन दीन सेवा ही परमेष्टि अर्चना । केवल उपदेश नहीं कर्मरुप साधना ।।**

निरामय योगचिकित्सा केंद्र
Programming Yogic Lifestyle!

MULTIDIMENSIONAL HEALTH CURE & PREVENTION CENTRE



पाठ दुखी / संधीवात / हृदयरोग / रक्तदाब / मधुमेह / दमा / स्त्रियांच्या व्याधी / पचनाचे विकार / तणाव यांसाठी

Medical Yog व नैसर्गिक उपचार चिकित्सा
(१० दिवसांचा Effective Course)

वाढते वजन - तणाव व Complications यांसाठी

POWER YOG BATCH
DIET | DETOX | HERBS यांसहीत

संपर्क : ९८८११४४६३२ । ९९२२४६५६९५ । ०२०-३२५१६८२२
Websites : www.yog4you.com, www.backpaintreatment.co.in
Like us : www.facebook.com/yogtherapy Email : niramay_yog@yahoo.com

*With Best Compliments From*

**THE POONA MOTOR GOODS TRANSPORT**

** Fleet-Owners & Transport Contractors*
** Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa*
** Full truck load service for Maharashtra & Gujrath State*

❖ ❖ ❖

**Head Office :** 780, Sadashiv Peth, Pune 411 030.
Phone : 24473222, 24477621, 24476914

❖ **Branch** ❖

137, Transportnagar, Sector 23, Nigdi, Pune 44.
Phone : 27656925, 27656935

❖

13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi, Girgaon, Mumbai 4,
Phone : 23822538, 23862210

❖

Ramraj Yadav Chal, Gala No. 2, 90 Ft. D.P. Road, Sakinaka, Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400 072, Phone : 28513018

हार्दिक शुभेच्छा !

मनकर्णिका

With Best Compliments From

**PROTOTYPE ENGG. CO.**

*Govt. Approved Valuers for Plant Equipment/Machinery Consulting / Chartered Engineers*

**Tel. : 22662496, 22631214,**
**Cell : 9820302436**

**E-mail : vijayswar@hotmail.com**


मन वाचा कर्म से सदैव एकरुप हो । शिवसुंदर नव समाज विश्व वंद्य हम गढे ।।

## संपदा सहकारी बँक लि.,पुणे

**मुख्य कार्यालय :** ७१७, बुधवार पेठ, डी.आय.सी.बिल्डींग, कसबा गणपती मंदिराजवळ, पुणे ४११००२
**फोन नं.**(०२०)२४४३३१५५ **फॅक्स:** २४४९३२६१ **ई-मेल :** sampadabank@rediffmail.com

*** मानाचा 'बँको' पुरस्कार प्राप्त बँक * सतत ऑडिट 'A' वर्गातील लाभांश देणारी बँक**

**बँकेची २०१५ ची आर्थिक स्थिती–**

ठेवी : रु. १३१.३९ कोटी, कर्जे–रु. ८१.५४ कोटी, नफा–रु.१.९० कोटी, लाभांश–१२.००%

**सुभाष रावळ, मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अप्पाजी आपटे, उपाध्यक्ष** | **सी.ए. विवेक मठकरी, अध्यक्ष**

**ग्राहकसेवेचा ध्यास, तेथे संपदेचा वास !!! सेवा माध्यमातून याची प्रचीती म्हणजेच संपदा सहकारी बँक !**

**वैशिष्ट्ये :** १) मुख्य कार्यालय व सर्व शाखा संपूर्णतः संगणकीकृत २) पारदर्शक व्यवहार व सुस्मित ग्राहकसेवा ३) CBS प्रणाली अंतर्गत कोणत्याही शाखेमध्ये बँकिंग व्यवहार करता येतात. ४) सर्व प्रकारचे कर online भरण्याची सुविधा ५) RTGS/NEFT द्वारे त्वरित पैसे पाठविण्याची सोय. ६) विविध प्रकारच्या कर्ज योजना.

**स्पर्धात्मक व्याजदराने कर्ज, * व्यवसायाच्या आर्थिक मूल्यमापनानुसार विशेष व्याजदर, * व्यवसायाच्या पतमानांकनानुसार किमान व्याजदर, * कर्ज प्रकरणांची जलद छाननी करून त्वरित मंजुरी.**

**आजच आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा :**

* बुधवार पेठ शाखा, पुणे. फोन : २४४५६०८३, २४४५१८३०
* चाकण शाखा, जिल्हा पुणे. फोन : ०२१३५–३००५९०, २४९७३३
* सुभाषनगर शाखा, पुणे. फोन : २४४९५०२२, २४४९५४३४
* कर्वे रोड शाखा, पुणे. फोन : २५३९५८७६, २५३९४०६२
* धायरी शाखा, पुणे. फोन : २४३९१४७०, २४३९१४७१
* कोरेगाव भीमा शाखा. फोन : ०२१३७–२५२००३, २५२००४

**लवकरच शिरवळ, जि. सातारा येथे शाखा व सणसवाडी, ता. शिरुर येथे विस्तारित कक्ष ग्राहकांच्या सेवेमध्ये**

*With Best Compliments From*

# M/S KBC Systems

- Cold Storage and Refrigeration Engineers
- Manufactures of Surface Coating Systems
- Authorized Distributor for TTK Healthcare Ltd. Panipuri and other Fryums product for Maharashtra

**Vijay Bane**
9422301700

**Satish Chapekar**
9422031071


सर्वधर्म मिळवुनी एक सौख्य चालते । एक राष्ट्र भावना अंतरात नांदते । स्फूर्तिदायी चेतना अणुअणूत जागती ।।




## जनता बँकेच्या सहाय्याने
# बँकिंग व्यवहार एका क्लिकवर...
# केव्हाही, कोठूनही!

- अत्यंत सोपी, गतिमान आणि सुरक्षित सेवा
- कोणत्याही बँकेच्या बचत खाते, चालू खाते अशा खात्यावर रक्कम पाठविणे सहज शक्य
- आपल्या खात्यावरून इलेक्ट्रीसिटी, टेलिफोन, मोबाईल अशा सर्व घरगुती बिलांचे पेमेंट शक्य
- मुदत ठेव, आवर्त ठेव, चेकबुक विनंती अशा सर्व व्यवहारांची सुविधा
- इंटरनेट बँकिंगसाठी कोणतीही भौगोलिक मर्यादा नाही
- या व अशा अनेक अद्ययावत सुविधांसह...

*अटी लागू

# जनता बँक JANATA BANK

**जनता सहकारी बँक लि., पुणे (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)**

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९

टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 (बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून) www.janatabankpune.com


NOVEL
SEWING MACHINES
Reg. TM No. 533716
Since 1955 ®
NOVEL
Mark of a Quality Sewing Machine
FOR HOME & INDUSTRIAL USE SEWING MACHINES
Delux Model
Link Model
Designer Auto Zigzag Portable Models DA 33 / 39 / 55
TA-1 Umbrella Model
NL 1377 Chainstitch Buttonstitch with 2 type operation Machine
Designer Model (with chain & gear)
NL-737/747/757 Novel 3/4/5 Thread High Speed Machine Overlock
95 T - 10 Model
NL - 5550 Single Needle Lockstich High Speed Auto Lubrication Machine Complete Set.
NL-781 Button Hole Machine
NOVEL SEWING MACHINES
777, Raviwar Peth, Pune - 411002. | Tel : 020 - 24458207. 24458318 Fax : 24472797 Email : novelsm@gmail.com | Website : www.novelsm.com
Tel. : - 020 - 24464946 / 47, Fax : 24461895. | Email : novel.bharat@gmail.com
Pimpri : 206, Mumbai Pune Road, Pimpri Chowk, Pimpri, Pune - 18. Tel : 27426853. 27424504. email : novel.pimpri@gmail.com
Kolhapur : 464, Shahu Rd., Shahupuri, Kolhapur - 01. Tel : 0231 : 2657115 / 2653528 / 2652365.
South India Offices : Bengaluru, Hosur, Palakkad, Vijaywada. Email : novelsmblr@gmail.com

**With**
**Compliments**
**From -**

# M/s. Baldota Samal & Asso.

"Krutanjali"
Shangrila Restaurant Lane,
65/20, Erandavana,
Law College Road,
PUNE - 411 004

**Tel. : 2543 3000 / 2543 3200**

उच्चनीच भेद भूल एक हम सभी रहे । सहज बंधुभाव हो राग द्वेष ना रहे ।।




जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती । परि अभंग असू द्या सदैव अपुली माणुसकीची नाती ।।

*With Best Compliments From Deodhar Bros*

**DECENT DECORATORS**
*PROTECTIVE AND DECORATIVE PAINTING*

**GURUPRASAD CONTRACTORS**
*CIVIL ENGINEERS AND CONTRACTORS*

**PRODUCT COATING**
*SHELL CORE AND ASSEMBLIES*
*AN ISO 9001 : 2008 CERTIFIED COMPANY*

***

**DECENT INTERIORS & DECORATORS (PVT) LTD**
*INTERIOR DECORATORS*

***

**RAMRAI**
*FARMING - HORTICULTURE - NURSERY*

***

**JANSEVA BHOJANALAYA**
*AUTHENTIC MAHARASHTRIAN THALI*

***

**MEHFIL CATERING SERVICES**
*ALL TYPES OF CATERING SERVICES*

***

**HARSHAL HALL**
*Two Specious Marriage Hall With All Amenities*

***


**PESHWA (DUBAI & SHARJAH)**
*Maharashtrian cuisine for the world*

***

**ASIA HOSPITALITY PVT. LTD.**
*April rain chain of fine dining restaurants*

---

**Chinchwad Office :** Plot No. 81, D-III Block,
MIDC Chinchwad, Pune 411019. Telephone : 27473730.
E-mail : product_coating@yahoo.com, guru_const@yahoo.co.in
**Pune Office :** 759/55, B Deccan Gymkhana, Pune 411 004
Telephone : 25678217, 25679488, Telefax : 25679497
E-mail : mehfil_catering@yahoo.com,
decent.interiors@yahoo.co.in


With Best Compliments From
CADMOSIL CHEMICALS PVT. LTD.
(Mfg. of Photo Resists & Allied Chemicals)
A-58, MIDC-Latur
Latur 473531.
www.imagetechindia.com

# With Best Compliments from

autohangar
Dealer for Mercedes-Benz Passenger Cars

metromotors
Auto Hangar Division

**PRABHADEVI:**
Ground Floor, Electric Mansion, Appasaheb Marathe Marg, Mumbai - 400 025.
Tel.: (022) 6743 4360-64, Fax: (022) 6743 4365.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**HUGHES ROAD (SOUTH MUMBAI):**
Metro Motors Auto Hangar Division, Motor House, Ground Floor,
66 Hughes Road, Mumbai - 400 007. Tel.: (022) 6612 3500, Fax: (022) 6612 3535.
**Email: info@metromotors-autohangar.com • Website: www.metromotors.in**

**ANDHERI (W):**
Aston Building, Ground Floor, Suburban Diagnostic Centre, Near Lokhandwala Circle,
Shastri Nagar, Mumbai - 400 053. Tel.: (022) 6710 6660-63, Fax: (022) 6710 6664.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**CORPORATE SALES:**
Mezzanine Floor, Rajan House, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025.
Tel.: (022) 6612 3870, Fax: (022) 6612 3899.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**NAGPUR:**
Plot No. C-40 B, Central MIDC Main Road, MIDC Hingna, Nagpur - 440 028.
Tel.: (07104) 238180-83.
**Email: customerconnect@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**RAIPUR:**
P. C. No. 104, Village Dumartalab, Mohaba Bazaar, Next to Hotel Picadaly,
G. E. Road, Raipur - 492 099. Tel.: (0771) 6537801-08.
**Email: customerconnect@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

'SWA'-ROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR / 2007 / 26609 24 / 12 / 2008
Concessional postage under Regd. No. PNCW / M-137 / 2014-2016
DT. of Publication - 25th every month
Dt. of Posting - at PSO Kasba Peth, Pune on 25th of every month


# श्री माऊली विश्व आयुर्वेद

आयुर्वेद सेवेची १७ वर्षांची गुणवत्तापूर्ण सेवा स्त्रियांच्या सर्व शारीरिक आणि मानसिक आजारांवर शास्त्रोक्त आयुर्वेद आणि पंचकर्म उपचार

पुणे –सदाशिव पेठ, बाणेर, चिंचवड
मुंबई – दादर पश्चिम
संपर्क – ९६८९४७१३१५ /०२०२४४५१५८५

आकांक्षा कौन्सेलिंग सेंटर
IQ testing / Aptitude testing
आणि करिअर मार्गदर्शन



Dr. Vinesh Nagare Ph - 02024451585

|| सर्वे सन्तु निरामयः ||


प्रति,

______________________________

______________________________

______________________________

हे मासिक 'स्व'रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन,
यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे –११ येथे प्रसिद्ध केले.